29506

# संततिनियमन

# औचित्यविचारचर्चा

लेखक

डॉ. रामचंद्र अनंत राईरकर.
एम. बी. बी. एस.

29606

A. H. WHEELER & CO.

ONE RUPEE

RAILWAY BOOKSTALLS.

ति · 9033

B. P. D. BOOKSTALL

534

# संततिनियमन

## औचित्यविचारचर्चा

[ शास्त्रीय विवेचन व पद्धतींचें दिग्दर्शन ]

लेखक

डॉ. रामचंद्र अनंत राईरकर

एम्. बी. बी. एस्.

आवृत्ति पहिली ] किंमत १ रुपाया [ मार्च १९३४

प्रकाशक—
डॉ. रामचंद्र अनंत राईरकर,
आंबराई कँप, डेक्कन जिमखाना,
पुणें ४

[ सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. ]

मुद्रक—
स. रा. सरदेसाई, बी.ए., एल्‌एल्‌.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा ' समर्थ भारत '
छापखाना, पुणें २

ती. दत्तात्रय वासुदेव

ऊर्फ

आबासाहेब आंबेकर

यांस

प्रेमादरपूर्वक समर्पण

४३७ गा...
दा. नों. ८७९८

# प्रस्तावना

संततिनियमन हे शब्द कानीं पडतांच कित्येकांच्या अंगावर कांटा उभा राहतो. त्यांना असें वाटतें कीं, आपल्या संस्कृतीवर व समाजसंघटनेवर घाला घालणारी ही एक राक्षसीच उत्पन्न झाली आहे! पण यांत असें भेदरून जाण्यासारखें कांहींच नाहीं, हें थोडासा विचार केला असतां समजून येणार आहे. आदा पाहून खर्च करणें ही व्यावहारिक नीति समजण्यांत येते. अर्थात् आपल्या ऐपतीला झेंपणार नाहीं इतकी संतति होऊं देणें म्हणजे या व्यावहारिक नीतीचें अतिक्रमण करण्याप्रमाणेंच होत नाहीं का? सामान्य ऐपतीच्या कुटुंबांत दोनतीन मुलें असलीं म्हणजे त्यांचें संगोपन व संवर्धन हीं योग्य रीतीनें होण्याचा संभव असतो. तेंच दोहोंच्या ऐवजीं आठ मुलें असलीं म्हणजे दोन मुलांच्या जोपासनेस पुरी असलेली साधनसामग्री आठ मुलांत वाटली जाते आणि त्यामुळें कोणाचेंच धड रीतीनें संगोपन किंवा संवर्धन होत नाहीं. अशा स्थितींत कुटुंबाच्या ऐपतीप्रमाणें संततिसंबंधांत परिमिति राखण्याचा कांहीं उपाय निघाला तर त्याचा अवलंब करणें शहाणपणाचें ठरत नाहीं का? एका माणसाला फार मुलें होऊं लागलीं तेव्हां त्याच्या एका मित्रानें "हें मुलांचें लेंढार आतां कोठपर्यंत जाणार?" असा त्याला प्रश्न विचारला. त्यानें त्याला उत्तर केलें, "मुलेंच तीं! त्यांना काय समजतें व्हावें कां नाहीं तें!" मित्रहि विनोदीच होता. तो या गृहस्थाला म्हणाला, "मुलांना एक समजत नाहीं. पण तुम्हांला तर समजतें ना?" मित्राच्या या उत्तरांतील समर्पकता कोणाहि समंजस माणसाच्या लक्षांत येण्यासारखी आहे. ऐपतीच्या प्रमाणांतच कुटुंबांतील संतति असली म्हणजे सगळयांचाच योग-क्षेम साधारण चांगल्या रीतीनें चालतो. संततीचा परिवार ऐपतीबाहेर वाढत गेल्यानें मुलांचे, आईबापांचे व कुटुंबांतील इतर माणसांचे सारखे हालच होऊं

लागतात. ही आपत्ति टाळून कुटुंबाचें जीवन साधारण निश्चित व सुखावह करण्याचा कांहीं उपाय असेल तर त्याचा अवलंब करणें हें प्रत्येक शहाण्या माणसानें आपलें पवित्र कर्तव्य समजलें पाहिजे. आणि संततिनियमन हा अशाच स्वरूपाचा उपाय कसा आहे हेंच हें पुस्तक वाचल्यानें वाचकांच्या लक्षांत येईल. यासंबंधांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, असा कांहीं उपाय निघाला तर त्याचें अंतःकरणपूर्वक स्वागत करण्यासारखीच पुष्कळ मातांची मनःस्थिति असते. थोडथोड्या अंतरानें वरचेवर मुलें होणें ही स्त्रियांनाहि आपत्तीच वाटते. वरचेवर गर्भारपण येणाऱ्या बाईच्या तोंडून " यावांचून कांहीं अडलें होतें का ? " असेच प्रायः दुःखोद्गार निघत असतात. ज्याच्या आगमनानें मातेच्या मनाला आनंद वाटत नाहीं, उलट ज्याच्या योगानें तिला एक प्रकारची दहशतच बसत असते तें मूल अशक्त व किरकिरें निपजल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नाहीं. या परिस्थितीमुळें, मूल उपजल्यावर कुटुंबाचें दारिद्य व आईची शारीरिक व मानसिक क्षीणता या कारणांमुळें त्याची आबाळ होते; इतकेंच नव्हे तर गर्भावस्थेंत सुद्धां त्याचें नीट पोषण होत नाहीं ! हा सर्व प्रारब्धाचा खेळ आहे असेंच मानून पुष्कळ स्त्रिया स्वस्थ बसतात. हें प्रारब्ध टाळतां येण्यासारखें आहे, त्यांतून बचाव करून घेण्यासारखा उपायहि उपलब्ध आहे, हें त्यांना समजलें तर त्यांच्या मनाला किती आनंद होईल बरें ? संततीस कांहीं आळा बसेल अशा उपायाची अपेक्षा बाळगणाऱ्या अशा स्त्रियांना संततिनियमनाचा उपाय समजावून देणें हें परोपकाराचेंच ठरत नाहीं का ? ज्यांना असा उपाय योजणें पसंत नसेल त्यांच्यावर यासंबंधांत सक्ति केली पाहिजे असें कोणाचेंहि म्हणणें नाहीं. पण हे उपाय समजतांच, " आपल्यावर ईश्वराची मोठी कृपा झाली " असें ज्या स्त्रियांना वाटतें त्यांच्यापासून ते लपवून ठेवणें किंवा ते योजण्यासंबंधांत त्यांना प्रतिबंध करणें हें कोणत्याहि दृष्टीनें अनिष्टच ठरेल. मुलांना कंटाळलेल्या व बाळंतपणांनीं मेटाकुटीस

आलेल्या अशा कित्येक स्त्रिया आडाणी आयाबायांच्या किंवा इतर कित्येक अजाण लोकांच्या सल्ल्यानें संततिप्रतिबंधाचे उपाय योजतातहि; पण हे उपाय प्रकृतीस अपायकारक ठरतात, इतकेंच नव्हे तर त्यांमुळें प्रसंगवशात् जिवासही मुकण्याची कित्येक स्त्रियांवर पाळी येते. असा अनिष्ट परिणाम होण्यापेक्षां त्यांना संततिनियमनाचे पायाशुद्ध व अनुभवसिद्ध उपाय तज्ज्ञां-कडून समजवून देण्यांत येणेंच अधिक श्रेयस्कर आहे, ही गोष्ट कोणीही समंजस मनुष्य नाकारणार नाहीं. संततिनियमनाचें तत्त्व व त्याचे उपाय यांसंबंधानें जनतेस कल्पना यावी हाच प्रस्तुत उपक्रमाचा उद्देश आहे.

आपली प्रकृति अबाधित रहावी, प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्या नित्याच्या व्यवसायांत व्यत्यय येऊं नये यासाठीं आहारविहार, आचारविचार वगैरे सर्व बाबतींत मनुष्याला नियमन राखावें लागतें. तशाच स्वरूपाची संतति-नियमनाची बाब आहे. किंबहुना, ही इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां अधिक महत्त्वाची आहे. मुलें हीं राष्ट्राचे भावी नागरिक होत. तीं निकोप जन्मावीं व त्यांचें संवर्धनही निकोप रीतीनें व्हावें अशी योजना ठेवणें हें प्रत्येक नागरिकानें आपलें कर्तव्य समजलें पाहिजे. ही स्थिति उत्पन्न होण्यास कुटुंबा-निहाय संततीचें प्रमाण ऐपतीप्रमाणें मर्यादित राहणें व दोन मुलांतील अंतर साधारण बरेंच असणें हें अत्यंत आवश्यक आहे. दोन माणसांकरितां केलेल्या स्वयंपाकांत आठ माणसांना जेवावयास घालण्याचा प्रसंग ओढव-ल्यास आठांचीहि उपासमार होते, तोच न्याय संततीसंबंधांतहि लागू आहे! जितक्या मुलांची सरबराई करणें सांपत्तिक स्थित्यनुरूप आपल्याला शक्य आहे तितकींच मुलें जन्मास येतील, अधिक येणार नाहींत, अशी खबरदारी ठेवणें कुटुंबाच्या हिताच्या दृष्टीनें, त्याचप्रमाणें राष्ट्राच्याहि हिताच्या दृष्टीनें सर्वथा श्रेयस्कर होय. या बाबतींत हलगर्जीपणा किंवा चालढकल झाल्यास त्यामुळें संतति अशक्त आणि नादान निपजते, मुलांमधील मृत्यूंचें प्रमाणहि वाढतें; त्याचप्रमाणें वारंवार, किंबहुना अविश्रांत रीतीनें प्रसूतीचें

व मुलांच्या खस्ता खाण्याचे कष्ट सोसावे लागल्यानें मातांच्या प्रकृतीहि कायमच्या ढांसळतात व कित्येकांना आपल्या कच्च्याबच्च्यांचा अकालीं त्याग करावा लागून प्राणासहि मुकावें लागतें! आपल्याला किती मुलें व्हावींत व तीं कोणत्या अंतरांनीं व्हावींत हें आईबापांनीं आपल्या परिस्थित्यनुसारच ठरविलें पाहिजे. हा नुसताच व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न नसून तो समाजहिताचाहि कसा आहे, हें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं आणि तो समाधानकारक रीतीनें सोडविणें हाच संततिनियमनाचा हेतु आहे.

संततिनियमनाचे उपाय योजल्यानें भ्रूणहत्येचें पातक लागेल अशी भीति कित्येक प्रदर्शित करतात. पण ती निराधार व निर्मल कशी आहे हें आम्हीं एका प्रकरणांत दाखविलेंच आहे. भ्रूणहत्येची दहशत बाळगणाऱ्या माणसांना यासंबंधांत दुसराहि एक प्रश्न विचारतां येण्यासारखा आहे. यदाकदाचित् यांत भ्रूणहत्या घडते असें घटकाभर गृहीत धरलें तरी मातेची प्रकृति ढासळत असतां किंवा ढासळण्याच्या मार्गांत असतां प्रजोत्पादनाची परिस्थिति उपस्थित होऊं देणें म्हणजे मृत्यूचीच धन करण्याप्रमाण नाहीं काय? यांत होणारी स्त्रीहत्या ही भ्रूणहत्येहूनहि अनर्थावह नाहीं काय? पुष्कळ प्रसंगीं अशा परिस्थितींत मुलांनाहि मातेच्या भेटीस जावें लागतें, याचीहि गुन्हेगारी उत्पादनकार्य करणाऱ्या पुरुषावरच येत नाहीं का? यदाकदाचित् अशीं मुलें जगलींच तर त्यांना सबंध जन्म हालअपेष्टांत घालवावा लागतो. त्याच्या पापाचें खापर जनकाच्याच माथ्यावर फुटत नाहीं काय? संततिनियमनानें उच्छृंखलपणास उत्तेजन मिळून अनीति वाढेल असाही यावर एक दुसरा आक्षेप घेण्यांत येतो; पण त्याचीहि वासलात वरील कोटिक्रमानेंच लावतां येण्यासारखी आहे. संततिकार्य निर्वेध रीतीनें चालविण्यास प्रवृत्त होण्यापूर्वी उपजणाऱ्या मुलांची योग्य जोपासना आपल्या हातून होईल किंवा नाहीं हें पाहणें आवश्यक नाहीं काय? तसा विचार न करतां प्रजोत्पादन अनिर्बंध चालू ठेवणें म्हणजे भूतदयेच्या दृष्टीनें तो नीती-

विरुद्धच गुन्हा होत नाहीं काय ? नीतिअनीतीच्या दृष्टीनें संततिनियमनाच्या योगानें थोडी हानि होईल असें मान्य केलें, तरी एकंदरीनें विचार करतां त्यापासून फायदाच अधिक होण्याचा कसा संभव आहे, हें या प्रश्नाचा, पूर्वग्रह सोडून निर्विकार बुद्धीनें विचार करणारास वेगळें सांगण्याची आवश्यकता आहे असें आम्हांस वाटत नाहीं.

संततिनियमन हें निसर्गाविरुद्ध आहे असेंहि कित्येक समजतात. पण निसर्गाला आळा घालून एकंदर परिस्थिति आपल्या सुखसोयींना सुलभतेनें पोषक व्हावी यासाठीं आजच्या युगांत मनुष्यानें अनेक रीतींनीं यशस्वी प्रयत्न केले असल्याचें दिसून येतें. किंबहुना, मनुष्यास कल्पक व संशोधक बुद्धि दिली आहे ती स्वजातीच्या सुखसोयींत भर घालण्याकरतांच होय हें लक्षांत ठेवलें म्हणजे वरील आक्षेपांतील वैयर्थ्य तेव्हांच लक्षांत येईल. संतति ही देवच देतो आणि देवच नेतो असें म्हणून कित्येक लोक आपली समजूत करून घेत असतात. सृष्टींतील सर्व गोष्टींचा कर्ताकरविता ईश्वर आहे अशीच ज्यांची भावना असेल त्यांनीं ही संततिनियमनाची योजना मनुष्याकरवीं घडवून आणण्यांत ईश्वराचाच हात आहे असें कां मानूं नये ? सारांश काय कीं, आर्थिक, सामाजिक किंवा आरोग्यविषयक कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी संततिनियमन हें हितावहच ठरण्यासारखें आहे. थोडथोड्या अवधींच्या अंतरांनीं मुलांना जन्म देणाऱ्या आयांना असा कांहीं उपाय निघाला तर तो हवाच असतो. कांहीं स्त्रिया असे उपाय योजतातही; पण त्यांत अजाणतेपणाचा भाग पुष्कळ असल्यामुळें हे उपाय ठरण्याऐवजीं परिणामीं अपायच ठरतात ! अशा स्त्रियांना हा विषय समजावा किंवा जाणत्या पुरुषांनीं तो त्यांना समजवून द्यावा व त्यांच्या इच्छेनुरूप संततिनियमनाच्या निर्दोष साधनांची त्यांना अनुकूलता लाभावी हाच हें पुस्तक लिहिण्याचा मुख्य हेतु आहे. संततिनियमनाचा उपाय ज्यांना पटला त्यांना त्याच्या साधनांसंबंधानें माहिती करून देणें, ज्यांना त्याची पुसटपुसट कल्पना

आहे त्यांना ती स्पष्ट रीतीनें आणून देणें व ज्यांना हा उपाय अनैतिक व अधार्मिक वाटतो त्यांना त्यांचा युक्तिवाद भ्रामक कसा आहे हें नीट पटवून देणें हें त्रिविध कार्य या उपक्रमाच्या योगानें व्हावें असा आमचा नम्र संकेत आहे. प्रत्येक मुद्याचा सविस्तर विचार होणें एवढ्या लहान पुस्तकांत शक्य नाहीं. तरी पण या प्रश्नाच्या अंगोपांगांची जरूरीपुरती कल्पना यावी अशीच यांतील विषयांची मांडणी करण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. तो कितपत साधला आहे हें सुज्ञ व सुबुद्ध वाचकांवरच सोंपविणें जरूर आहे.

आंबराई कँप, पुणें ४<br>
ता. ५ मार्च १९३४

रामचंद्र अनंत राईरकर

इंग्रजीमधील शास्त्रीय किंवा पारिभाषिक शब्दांना मराठींत प्रतिशब्द देणें पुष्कळ वेळां अवघड असतें व तसे ते दिले तर त्यांचा उपयोग नीट होईल कीं नाहीं याचीहि शंका असते. अशा स्थितींत निरनिराळ्या लोकांनीं निरनिराळे शब्द योजन घोटाळा उत्पन्न करणें योग्य नाहीं असें वाटल्यामुळें आम्हीं प्रस्तुत पुस्तकांत शारीरशास्त्रांतील बहुतेक सारे शब्द डॉ. एन्. एस्. सहस्रबुद्धे, एम्. एस्., यांच्या " शारीरशास्त्रांतील पारिभाषिक शब्द " या पुस्तकाप्रमाणें वापरले आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं ते बोजड व अवघड असले तरी पारिभाषिक शब्द एकच असावेत या उद्देशानें आम्हीं या गैरसोयीकडे थोडेंसें दुर्लक्ष केलें आहे. कठीण शब्द नीट कळावेत व प्रतिशब्दांचे मूळ इंग्रजी शब्द लक्षांत यावेत म्हणून शेवटीं " प्रतिशब्द व मूळ इंग्रजी शब्द " हा भाग जोडला आहे.

प्रस्तुत पुस्तक लिहितांना आम्हांला बऱ्याच इंग्रजी पुस्तकांचा उपयोग झाला त्यांचाहि नामनिर्देश शेवटीं स्वतंत्रपणें केला आहे.

पुस्तक लिहिण्याची कल्पना डिसेंबर १९३३मध्यें सुचली व पुस्तक छापण्यास फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत सुरुवात झाली. कामाची गर्दी असतांहि 'समर्थ-भारत' छापखान्याचे उत्साही व्यवस्थापक श्री. स. रा. सरदेसाई यांनीं हें पुस्तक एक महिन्याच्या आंत छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. पुस्तक लिहितांना आम्हांला बऱ्याच स्नेही व आप्त मंडळींचें प्रोत्साहन व साहाय्यहि मिळालें याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत. त्यांनीं हें साहाय्य केवळ आमच्यावरील प्रेमामुळेंच केलें. त्यांचीं नांवें येथें यावीं अशी त्यांची इच्छा नाहीं व तीं तशीं येण्यानें त्यांचा मोठेपणा वाढेल असेंही नाहीं. यासाठीं कृतज्ञतापूर्वक या गोष्टीचा उल्लेख करण्यापेक्षां आम्हांला जास्त कांहींच करतां येत नाहीं.

रामचंद्र अनंत राईरकर

# अनुक्रमणिका


पृष्ठें

**प्रकरण पहिलें–भूमिका** १–८

हिंदुस्थानांतील स्थिति–विषयाची व्याप्ति–मराठींतील वाङ्मय–प्रयत्नांचें स्वरूप–वाङ्मयाचा प्रचंड प्रसार.

**प्रकरण दुसरें–चळवळीचा इतिहास–पूर्वार्ध** ९–१६

गर्भपात व भ्रूणहत्या हेच मार्ग–रानटी लोकांतील मिका–पहिले ग्रंथिक उतारे–रासायनिक द्रव्यांचा प्रथम उल्लेख–गर्भप्रतिबंधक आच्छादनें.

**प्रकरण तिसरें–चळवळीचा इतिहास—उत्तरार्ध** १७–२६

दोन सालांचें महत्त्व–माल्थसचें पुस्तक–सैतानी पुस्तक–प्लेसची कामगिरी–आणखी कांहीं पुस्तकें–ब्रॅडला व बेझंटवरील खटला–प्रसिद्ध डॉक्टरांचा पाठिंबा–नवीन वर्तमानपत्रें.

**प्रकरण चवथें–गर्भधारणा कशी होते ?** २७–३३

शरीरशास्त्रदृष्ट्या विवरण–गर्भाशय, रजःपिंड, रजोवाहक. रजःपिंडांत होणाऱ्या घडामोडी–दोन्ही बीजांचा योग व त्यांची वाढ–रजःपिंड व वृषण यांचीं इतर कार्यें. ऋतुस्नान.

**प्रकरण पांचवें–गर्भधारणेचे नियम** ३४–४१

ब्रह्मचर्य–सुरक्षित काळ–त्रुटित संभोग–ओडीना कॉलनी–बिन त्रासाचा एकच उपाय.

**प्रकरण सहावें–संततिनियमनाचें आरोग्यदृष्ट्या विवेचन** ४२–५१

बाळंतपण ही नैसर्गिक क्रिया आहे. गरीब लोकांची स्थिति–संजीवनींतील उतारा–गर्भपाताचे तोटे–बाळंतपणाचा मृत्युसंख्येवर परिणाम–संततिनियमनाच्या साधनानें गर्भाशयाला कांहींहि त्रास पोहोंचत नाहीं–कॅन्सर कशामुळें होतो ? वंध्यात्वाचीं कारणें–वांझपणाची निष्कारण भीति.

प्रकरण सातवें–समाजशास्त्रदृष्ट्या विचार–पूर्वार्ध ५२–५९

दुपारची भ्रांत व मुलांची संक्रांत–निरनिराळ्या वर्गांतील लोकांना होणाऱ्या मुलांचें प्रमाण–संततिनियमन हें पुण्यकर्म आहे–उपदंश व परमा यांपासून होणारा त्रास–जगाच्या सुखांतील भर–समतोल बुद्धीनें विचार.

प्रकरण आठवें–समाजशास्त्रदृष्ट्या विचार–उत्तरार्ध ६०–६९

रोगग्रस्तांचा संततिप्रतिबंध.

वेड्यांना मुलें होऊं देणें म्हणजे भयंकर गुन्हा–रोगप्रसाराचें ठळठळीत उदाहरणें–अमेरिकेंतील त्यांची संख्या–वेड्यांना संभाळण्याचा खर्च–वेड लागण्याचीं कारणें–आनुवंशिक संस्कार–कांहीं कायदे–कोणत्या स्थितींत कायमचें शुद्धीकरण करावें–शस्त्रक्रिया–जर्मनींतील स्थिति.

प्रकरण नववें–लोकसंख्या व संततिनियमन ७०–७७

लोकसंख्येची वाढ–ती कमी करण्याचे उपाय–आशियाखंडावर गर्भपातासंबंधीं कटाक्ष–मृतभर्तृका व गर्भपात–बालमृत्यूचें प्रमाण–जन्ममृत्यु व जिवंत राहण्याचें प्रमाण–ब्रह्मचर्याचें ब्रह्मज्ञान–लोकसंख्या कमी करण्यासाठीं कांहीं तरी उपाय करण्याची आवश्यकता.

प्रकरण दहावें–नैतिक दृष्ट्या विचार ७८–८५

गर्भाचा नाश होत नाहीं–अनैसर्गिक हा मुद्दा लागू नाहीं–पापपुण्याचा कांहीं संबंध नाहीं–नियमन नीतिच वाढवितें–सारासार विचार.

प्रकरण अकरावें–विरोधकांच्या आक्षेपांचें निरसन ८६–९६

जुनें तें सोनें–पूर्वींचे दिवस राहिले नाहींत–असल्या नीतीचा काय उपयोग?–पशुवृत्तीच्या अनुकरणाची निष्कारण भीति–मातृपद पाहिजेच आहे.

प्रकरण बारावें–संततिनियमनाचा पुरस्कार ९७–१०५

रोगाआधींच त्याचा प्रतिरोध–संततिनियमनाचीं प्रमाणें–आर्थिक परिस्थिति–लोकसंख्येच्या वाढीवर उपाय–भाऊबंदकीस आळा बसेल.

प्रकरण तेरावें–तज्ज्ञांचे अभिप्राय १०६–११२

लॉर्ड डॉसन–हॅवेलॉक एलिस–हॅरॉल्ड कॉक्स–ना. वॉटम्स–एच्. जी. वेल्स–डॉ. नॉफ–हर्मन विग्न्–अनोॅल्ड बेनेट–नॉर्मन हेअर–जस्टिस मॅक्कार्डी.

प्रकरण चवदावें—संततिनियमनाची कायदेशीर परिस्थिति १११–११८
अमेरिका—फ्रान्स—हंगेरी—मेक्सिको—नेदरलंड—रशिया—स्वीडन—इंग्लंड.

प्रकरण पंधरावें—पद्धतींचें दिग्दर्शन ११९–१३५
साध्या औषधांच्या गोळ्या—फेंस उत्पन्न करणाऱ्या औषधांच्या गोळ्या—पिचकारीनें मारावयाचीं औषधें—स्पंज—रबरी टोप्या—दोन्ही प्रकारांचा एकदम उपयोग.

प्रकरण सोळावें—नवीन पद्धतींचें संशोधन १३६–१४३
क्ष-किरणें—ग्रॅफेनबर्गची पद्धति—पुरुषबीजांचें इंजेक्शन—हार्मोनचें कार्य—उत्कृष्ट उपायाची शक्यता.

प्रकरण सतरावें—गृहस्थिति १४४–१५४
हिंदुस्थानांतील माहिती—विसाव्या वर्षी वार्धक्य—जन्ममृत्यूंचीं प्रमाणें—निरनिराळ्या धंद्यांतील व जातींतील कुटुंबांतील मुलें—वंध्यात्व येण्याचें प्रमाण—हिंदुस्थानांतील वेडे, आंधळे, महारोगी वगैरेंची संख्या—तटस्थ लोकांचा अभिप्राय.

---

# संततिनियमन

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ नारायण
दा. नों. ८५९८

# प्रकरण पहिलें

## भूमिका

सन १९३१ सालांतील खानेसुमारीचा अहवाल नुकताच म्हणजे १९३३ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आला. त्यांत हिंदुस्थानची लोकसंख्या साडेतीन कोटींनीं वाढल्याचें आढळून आलें आहे. वाढत्या लोकसंख्येला आळा घालणाऱ्या मार्गांचा विचार करीत असतांना अहवालकर्ते डॉ. हटन यांनीं संतति-नियमनाची फार जोरानें तरफदारी केली आहे. अशा रीतीनें त्यांचें मत अह-वालांतून अधिकृत रीत्या प्रसिद्ध झाल्यापासून संततिनियमनाविषयींच्या चर्चेला बरेंच प्राधान्य मिळालें आहे. संततिनियमन खाजगी रीतीनें बरेच दिवस सुरू आहे. पण एवढ्यावरच संतुष्ट न राहतां त्याला सरकारी परवानगीचा शिक्का-मोर्तब मिळून सरकारनेंच त्याचें शिक्षण व तत्संबंधीं सर्व माहिती लोकांना पुरविण्याची व्यवस्था करावी, एतद्विषयीं प्रयत्न सुरू झाले व त्याचें दृश्य फल म्हणजे मागील महिन्यांत मुंबई कॉर्पोरेशनमध्यें यासंबंधीं आलेला ठराव हें होय. या ठरावानें मुंबईमधील हॉस्पिटलमध्यें संततिनियमनासंबंधीं माहिती पुरविण्याला स्वतंत्र तज्ज्ञाची नेमणूक करावी अशी मागणी करण्यांत आली होती. अर्थातच असा ठराव पुढें आल्यावर त्यावर बरीच धुमश्चक्री होऊन तो

ठराव फेटाळण्यांत आला. पण ठरावाच्या चर्चेनें या विषयाकडे लोकांचें लक्ष मात्र वेधलें गेलें व ठरावाचा तज्ज्ञ नेमण्याचा उद्देश जरी सफल झाला नसला तरी लोकांमध्यें या विषयासंबंधीं जाणीव उत्पन्न करण्याचें काम या ठरावानें केलेंच!

म्हैसूर व बडोदें या हिंदुस्थानांतील पुढारलेल्या दोन संस्थानांत संततिनियमनाची माहिती लोकांना सांगण्यासाठीं तेथील हॉस्पिटलमधून व्यवस्था करण्यांत आली आहे. म्हैसूरमध्यें १९३० सालीं संस्थानांतील मुख्य चार हॉस्पिटलमध्यें या विषयाची माहिती पुरविण्यासाठीं तज्ज्ञ नेमण्यांत आले आहेत. मद्रासमध्यें जरी अजून या विषयाला सरकारनें सक्रिय मदत केली नसली, तरी एक महत्त्वाची संस्था तेथें स्थापण्यांत आली आहे. त्या संस्थेस दोन महाराजे, तीन हायकोर्ट जज्ज व लोकांत मानमान्यतेस चढलेले चार-पांच पुढारी लाभले आहेत व त्यांच्याच श्रमानें ही संस्था स्थापन करण्यांत आली आहे.

येथें एक मुद्दा वाचकांच्या विशेषतः निदर्शनास आणला पाहिजे व तो ह्याच कीं, इंग्लंड, हॉलंड वगैरे देशांतून तत्रस्थ सरकार संततिनियमनाविरुद्ध नसलें तरी पण या विषयाची प्रत्यक्ष माहिती देण्याची जबाबदारी पत्करण्यास तेथील सरकार कबूल नाहीं. फ्रान्स, अमेरिकेंतील कांहीं संस्थानें इत्यादि देशांतून मात्र सरकार संततिनियमनाच्या विरुद्ध आहे व तेथें एतद्विषयक कोणचीहि माहिती वा उपकरणें पुरविणें गुन्हा समजलं जातं. आपल्याला किंवा ब्रिटिश साम्राज्यांतील लोकांना जी चळवळ करावयाची ती अर्थातच या विषयाला सरकारची मान्यता मिळविण्यासंबंधीं नसून, सरकारनेंच या विषयाला आपल्या खर्चानें हातभार लावण्यासंबंधीं होय.

स. १९३३ सालच्या नाताळांत भरलेल्या ऑल-इंडिया मेडिकल कॉन्फरन्स व वुइमेन्स कॉन्फरन्स या दोन परिषदांनीं संततिनियमनाचा पुरस्कार करणारे ठराव पास केले. पुण्यालाही संततिनियमनासंबंधीं एक संस्था

डॅ. गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालीं स्थापन झाली आहे. शहरांतून किंवा प्रांतांतून अशा प्रकारच्या संस्था असण्यापेक्षां सर्व हिंदुस्थानांत जर एक मध्यवर्ती संस्था स्थापन झाली तर चांगलें होईल. या दृष्टीनें ता. ८ डिसेंबर १९३३च्या टाइम्समध्यें विलेपार्ले येथील बेडेकर व जोशी या डॉक्टरद्वयानें एक पत्र लिहिलें आहे. अशा रातीनें या विषयाला आतां जास्त चालना मिळत राहणार यांत शंका नाहीं. संततिनियमनाच्या बाजूनें अथवा विरुद्ध कशींहि मतें असलीं तरी या विषयाचा प्रसार आतां कोणाला थांबवितां येईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ होय. हा विषय नेहमींच्या विषयांच्या कक्षेबाहेरील असल्यामुळें त्यासंबंधीं माहिती मिळविण्याची उत्सुकता मनुष्यांत साहजिकच उत्पन्न होते. हें एक कारण या विषयाच्या प्रसाराला कारणीभूत होतेंच. पण नुसती जिज्ञासातृप्ति झाली कीं कार्यभाग संपला असें मात्र या बाबतींत घडत नाहीं. या दृष्टीनें मनुष्य एकदां विचार करूं लागला व वरवर दिसणारा थिल्लरपणा थोडा कमी होत गेला म्हणजे या विषयांत कांहीं तथ्य असून जगांतील पुष्कळ शहाणे लोक याचा पुरस्कार करतात या गोष्टी वाचकांच्या नजरेस येतात. अर्थातच कांहीं प्रसिद्ध लोक याच्या बाजूला आहेत हा त्याच्या चांगुलपणाचा पुरावा नव्हे. पण मनुष्याला जिज्ञासा उत्पन्न होऊन त्या अनुरोधानें अभ्यास करण्याला तें एक कारण होतें एवढेंच. अशा परिस्थितींत सुशिक्षितांमध्यें तरी याविषयीं विशेष अगत्याची भावना उत्पन्न होणें साहजिकच आहे. आणि ती उत्पन्न झाल्यावर त्यासंबंधीं माहिती मिळविण्याच्या खटपटीस त्यांनीं लागणें हें क्रमप्राप्तच आहे. त्या विषयासंबंधीं साधक-बाधक मुद्दे लक्षांत घेणें, त्याचे फायदेतोटे पाहणें व व्यक्तीपासून तों थेट देश व जग यांपर्यंत त्यापासून होणाऱ्या परिणामांचा विचार करणें येथवर याची व्याप्ति आहे. कोणत्याहि विषयासंबंधीं मत बनवावयाचें झाल्यास त्या विषयाचा सांगोपांग व सर्वांगीण अभ्यास करणें अवश्य आहे व तसा अभ्यास करून त्या विषयाचें ज्ञान प्राप्त झाल्यावर मग त्यासंबंधीं मत व्यक्त करण्याचा

अधिकार कोणासहि प्राप्त होतो. असें मत व्यक्त करण्याला ज्या माहितीची सुशिक्षितांना आज गरज भासत आहे ती माहिती एकत्रित करून थोडक्यांत वाचकांपुढें मांडण्याचा या पुस्तकाचा उद्देश आहे.

ही माहिती देण्यापूर्वी मराठींत या विषयासंबंधीं कोणती साधनसामग्री आज उपलब्ध आहे, याकडे प्रथमतः लक्ष वळविलें पाहिजे. संततिनियमनावर मराठींत दोन पुस्तकें झालीं आहेत. त्यांपैकीं एक प्रो. र. धों. कर्वे यांनीं १९२५ सालीं प्रसिद्ध केलें व आजपर्यंत त्याच्या पांच आवृत्त्या काढाव्या लागल्या, इतकें तें लोकप्रिय झालें. दुसरें पुस्तक प्रो. ना. सी. फडके यांनीं विजय-साहित्य-मालेंत १९२५ मध्यें प्रसिद्ध केलें. या दोन्ही पुस्तकांमध्यें शास्त्र व पद्धति या दोन्ही भागांचा चांगला परामर्ष घेण्यांत आला आहे. प्रो. कर्वे यांच्या पुस्तकांतील आचार व विचार या भागांमध्यें विशेषतः आचारच जास्त विस्तृत रीतीनें मांडण्यांत आला आहे व त्यांचा या विषया-वरील अनुभव पाहतां आचाराची त्यांनीं दिलेली माहिती निःसंशय सुंदर व आजतागाईत अशी आहे. परंतु त्यांनीं जास्त व्यापक रीतीनें विचार पुढें मांडला नाहीं. तें काम प्रो. फडके यांनीं आपल्या ' शास्त्र ' या विभागांत उत्तम तऱ्हेनें केलें आहे. त्यांची भाषा व विषय मनोरंजक करण्याची पद्धति अत्यंत सुंदर आहे, हें नव्यानें सांगण्याची गरजच नाहीं. प्रकरणाला दिलेल्या नांवापासून तों आंतील उत्कृष्ट विवेचनापर्यंत साऱ्या गोष्टी मोठ्या खुबीनें व कौशल्यानें त्यांनीं वाचकांपुढें मांडल्या आहेत.

असें जर आहे, व त्या विषयाच्या शास्त्र व पद्धति या दोन भागांवर दोन विद्वानांनीं पूर्वींच लिहिलें आहे तर मग या पुस्तकाची काय जरूरी आहे ? असा कोणीहि प्रश्न करणें साहजिकच आहे. त्याला उत्तर एवढेंच कीं, या विद्वानांचें लक्ष शास्त्रापेक्षां पद्धतीकडेच विशेष होतें व तीं पुस्तकें जेव्हां प्रसिद्ध झालीं तेव्हां त्यांना पद्धतीचा जास्त प्रसार करण्याची जरूरी वाटली. हल्लींहि तशी जरूरी आहेच. पण सध्यां या विषयासंबंधीं जागृति जास्त झाल्यामुळें या विषया-

वरील वाङ्मयाकडे लोकांचें लक्ष साहजिकच अधिक अधिक वेधत चाललें आहे. म्हणूनच अशा वाङ्मयाचा परिचय करून देऊन वैद्यकशास्त्रदृष्ट्याहि या विषयाचा विचार करण्यास सुलभता आणणें हा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश आहे. या विषयाची निदान महाराष्ट्रांत तरी जागृति करण्यास उपरिनिर्दिष्ट विद्वान्द्वयच कारणीभूत झाले आहेत. त्यांच्या पुस्तकांना हें पुस्तक कोणत्याहि दृष्टीनें विरोधी नसून असलेंच तर पूरकच होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. या जागतिक महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीं जगांत काय मतें बनत चाललीं आहेत व या विषयाची आवश्यकता कां भासूं लागली आहे यांसंबंधींचें विवरण प्रस्तुत पुस्तकांत येईलच. पण या विषयाचा नीतिदृष्ट्या, कुटुंबदृष्ट्या, वैद्यकशास्त्रदृष्ट्या, आर्थिक दृष्ट्या वगैरे निरनिराळ्या दृष्टींनीं यावर जो विचार-संभार आजवर उभारण्यांत आला आहे, त्यासंबंधींची थोडक्यांत पण समर्पक माहिती देण्याचा विचार आहे. असें करितांना मागें उल्लेखिलेल्या पुस्तकांतील माहितींचा देखील पुनरुच्चार होणें संभवनीय आहे. पण तसें झालें तरी तें शक्य तितक्या परिमित प्रमाणांत व अगदीं अनिर्वाहपक्षींच होईल हें येथें सांगणें अवश्य आहे.

या दोन पुस्तकांव्यतिरिक्त संततिनियमनावर मासिकांतून व वर्तमानपत्रांतूनहि क्वचित् लेख येतात. हे लेख समाजस्वास्थ्याच्या संपादकांपासून तों नवजीवनांत लिहिणाऱ्या प्रो. ना. के. बेहरे यांच्यापर्यंत सर्व तऱ्हांच्या लोकांनीं लिहिलेले आहेत. यावरून या विषयाकडे निरनिराळ्या लेखकांचें लक्ष कसें वेधलें गेलें आहे हें दिसून येईल.

आपल्याकडे हा विषय बहुजनसमाजपुढें अलीकडेच येऊं लागला असला तरी पाश्चात्य राष्ट्रांतून यासंबंधींचें वाङ्मय फारच जोरानें प्रसार पावत आहे. या विषयाच्या सर्व शाखोपशाखांवर तिकडे ग्रंथरचना होत आहे. हा विषय दिसतो तितका सोपा नाहीं. संततीचें नियमन करणें हा जरी याचा प्रमुख उद्देश असला तरी त्याची सिद्धता करण्यापूर्वी पुष्कळ गोष्टींचा विचार करावा

लागतो. लोकसंख्येचा व याचा किती निकट संबंध आहे हें सांगण्याची जरुरीच नाहीं. लोकसंख्येच्या वाढीमुळेंच याचें महत्त्व लोकांना पटूं लागलें, एवढेंच नव्हे तर लोकसंख्येचा विचार करीत असतांनाच याचा जो आद्य प्रवर्तक माल्थस त्यानें याला जगापुढें आणलें. माल्थसनें नियमनाची पद्धति किंवा उपाययोजना कशी असते याचें विवेचन न करितां लोकसंख्येच्या वाढीला आळा घालण्याच्या कामीं याचा कितपत उपयोग होईल एवढेंच नमूद करून ठेवलें आहे. व तेंहि लग्नाची वयोमर्यादा वाढविणें वगैरे उपाय सुचवूनच. त्यानंतर या विषयाला जोराची चालना मिळाली व हलकें हलकें यानें सर्व जग व्यापलें आहे. लोकसंख्येप्रमाणेंच मनुष्याच्या निर्वाहादि साधनांचा विचार करितां एका कुटुंबाला किती मुलें पोसतां येतील याच्या विचारावरच संतती अवलंबून असावी असे विचार प्रसृत झाल्यामुळें अर्थशास्त्रदृष्ट्याहि या विषयाला महत्त्व प्राप्त झालें.

अशा दृष्टीनें या विषयाला उत्तरोत्तर महत्त्व प्राप्त होत आहे असें पाहतांच धार्मिक दृष्ट्या तो अनीतिकारक आहे असा कोटिक्रम लढवून त्यावर हल्ले चढविण्यांत आले व त्यामुळें या विषयाला बरेंच भीषण स्वरूप प्राप्त झालें. धार्मिक व नैतिक मुद्यांवर वाद येऊन ठेपल्यावर धर्मगुरूंच्या जाळ्यांत तो अचानक अडकल्यासारखा झाला व अजूनहि त्यांतून तो सहीसलामत सुटला नाहीं!

या विषयाबरोबर लैंगिक विषयांनाहि महत्त्व येत चाललें आहे; पण स्त्री-पुरुषसंबंधाच्या मर्यादा, त्यापासून उत्पन्न होणारा आनंद, स्त्रीपुरुषांचें परस्परांवरील प्रेम, विवाह, विवाहाबाहेरील स्त्रीपुरुषसंबंध वगैरे अवांतर विषयांशीं संततिनियमनाला निगडित करणें केव्हांहि योग्य ठरणार नाहीं. त्याचा जरी वरील विषयांशीं थोडाफार संबंध असला तरी शास्त्रीय दृष्टीनें जेव्हां आपण विचार करतों तेव्हां संततिनियमनाचें स्वरूप विशेष गंभीर आहे ही भूमिका विसरून कधींहि चालणार नाहीं. या दोन विषयांची उगीचच गुंतागुंत करण्यांत येऊं नये एवढ्यासाठींच प्रथमतः हा इषारा देऊन ठेवला आहे.

त्याचा जो संबंध आहे तो विवरणांत यथावकाश येईलच, पण सामान्यतः संततिनियमन हा स्वतंत्र विषय असून त्याच्या मर्यादा आतां ठरल्यासारख्याच झाल्या आहेत. त्याच्या बाजूचे लोकहि त्या मर्यादा ओलंडण्यास तयार नाहींत व त्याविरुद्ध असणारे लोकसुद्धां कांहीं मर्यादा कबूल करण्यास तयार आहेत. येथवर या वादाची स्थिति आज येऊन पोहोंचली आहे. अर्थातच हें पाश्चात्य लोकांसंबंधीं झालें. आपल्याकडील आहिताग्नि राजवाडे व त्यांच्याच विचाराच्या लोकांसंबंधीं अर्थातच असें म्हणतां येणार नाहीं. परंतु अशा प्रकारें केवळ शाब्दिक कोट्यांनीं पूर्वपक्ष-उत्तरपक्ष लढविण्याचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकांत करण्यांत येणार नाहीं. वादासाठींच वाद जो होतो त्याच्याशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. परंतु बहुजनसमाजाच्या हिताच्या दृष्टीनें या वादाचें स्वरूप काय आहे व यावर साधकबाधक चर्चा काय झाली आहे याचाच फक्त उल्लेख पुढें करण्यांत येईल.


इंग्लंड व अमेरिका या देशांमध्यें या विषयासंबंधीं विचार करण्यासाठीं कमिशनें नेमण्यांत आलीं. अशा कमिशनमध्यें मोठमोठ्या सुप्रसिद्ध डॉक्टरां-बरोबर मोठमोठे बिशपहि नेमण्यांत आले होते. या विषयाच्या तज्ज्ञांबरोबर धर्मगुरूंचेंहि साहचर्य घडवून आणण्यांत या विषयाचा सर्व बाजूंनीं विचार व्हावा हाच उद्देश होता व त्या कमिशनचा अहवाल वाचतां तो पूर्णांशानें सिद्धीसहि गेला असल्याचें दिसून येतें. अशा कमिशनपुढें साक्ष देण्यास इंग्लंडचे सुप्रसिद्ध डॉक्टर लॉर्ड डौसन व प्रसिद्ध लेखक बर्ट्रँड रसेल अशांसारखे लोक आले होते. अशा गृहस्थांच्या परिणत विचाराचा फायदा मिळाल्यानें उपरि-निर्दिष्ट अहवालाला साहजिकच विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

अशा रीतीनें या विषयाच्या वाङ्मयाचा प्रसार किती झाला आहे याचें जर मोजमापच आपण काढूं लागलों तर यावरील कमिशनचे अहवाल, याच्या शाखोपशाखांवरील ग्रंथ व अनेक मासिकें व वर्तमानपत्रें यांत यासंबंधीं आलेले लेख या सर्वांचा निर्देश करावा लागेल. त्याची नुसती

नांवनिशी जर एका ठिकाणीं छापली तर तसें करण्याला ४५ पानें लागतील! ही खटपट जूलिया जॉन्सेन यांनीं आपल्या बर्थ-कंट्रोल या पुस्तकांत केली आहे व या विषयावरील वाङ्मयाची खरोखर पंचेचाळीस पानांची सूचीच त्यांनीं आपल्या पुस्तकाला जोडली आहे!

प्रस्तुत पुस्तकांत या विषयाचा पूर्वीचा थोडासा इतिहास, हा विषय कळण्यास उपयुक्त तेवढीच गर्भ, गर्भधारणा व तत्संबंधीं शास्त्रीय माहिती, या विषयावर करण्यांत आलेल्या साधकबाधक चर्चेचा थोडक्यांत निष्कर्ष व महत्त्वाचे मुद्दे, आपल्या देशाला त्यापासून घेण्याजोगा बोध वगैरे विषयांचा अन्तर्भाव करण्यांत येणार आहे.

---



मालथस

## प्रकरण दुसरें

# चळवळीचा इतिहास

## (पूर्वार्ध)

संततिनियमनाची आवश्यकता विशेषत्वानें भासण्याचें एकमेव कारण म्हणजे लोकसंख्येची वाढ हेंच होय. लोकसंख्या योग्य प्रमाणांत, किंबहुना कमी असल्यावर संततिनियमनाची कल्पना सुचण्याचें तादृश कांहींच कारण नाहीं. उलट अशा वेळीं जितकी ज्यास्त संतति होईल तितकी पाहिजेच असते व यासाठींच प्रामुख्यानें 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' हा आशीर्वाद प्रचारांत आला. धनधान्यसंपत्तीची सुबत्ता असल्यामुळेंच या संपत्तीचा उपभोग घेण्यासाठीं लोकांची जरूरी होती व जितकी लोकसंख्या वाढेल तितकी इष्टच होती. परंतु या सुबत्तेच्या काळींसुद्धां मनुष्यामनुष्यांमधील शत्रुत्व, द्वेष, महत्त्वाकांक्षा वगैरे गुणावगुणांचें अस्तित्व होतेंच व त्यांच्या जोपासनेसाठीं लढाया होत असल्यामुळें लोकसंख्या थोड्याफार प्रमाणांत घटतहि असेच. अशा वेळीं जरी एकंदर पृथ्वीवरील लोकसंख्या कमी होती तरी आपल्या जातींतील किंवा आपल्या प्रांतांतील लोकसंख्या वाढावी अशीच

त्या त्या जातींची व प्रान्ताची प्रबल इच्छा असे व यासाठींच मुलें जास्त कशीं होतील हाच निदिध्यास त्या वेळच्या पुढाऱ्यांना लागला होता. अशी परिस्थिति असल्यामुळें मुलें होणें व त्यांची संख्या वाढणें याला धार्मिक स्वरूपहि प्राप्त झालें. संततीसाठींच लग्नाची जरूरी आहे व लग्न झाल्यावर संतति झाली नाहीं तर जन्माचें सार्थक होणार नाहीं वगैरे कल्पनांची उत्पत्ती साहजिकच झाली असावी. अशा प्रकारें लोकसंख्येच्या वाढीची अत्यंत जरूरी असतांना संततिनियमनाची कल्पना सुचणें शक्यच नव्हतें. म्हणूनच पुरातन काळच्या वाङ्मयांत यासंबंधीं कांहींहि उल्लेख सांपडत नाहीं. लोकसंख्येला आळा घालण्याची कल्पना जरी त्या वेळीं नव्हती तरी कांहीं कांहीं लोकांना आपल्याला मुलें थोडीं व्हावींत अशी इच्छा होत असे व अनैतिक मार्गानें होणाऱ्या संततीला कांहीं आळा बसावा किंवा अशा मार्गानें होणाऱ्या संततीचा नाश करावा अशा कल्पना त्या वेळींहि होत्याच. त्या परिस्थितींत गर्भधारणा होऊं देण्याचें टाळण्याचा विचार मात्र विशेष अस्तित्वांत नव्हता. गर्भसंभव झाल्यावर त्या गर्भाची विल्हेवाट लावणें हाच मार्ग त्या वेळच्या लोकांना मोकळा होता व ते लोक गभपात करणें किंवा मूल उपजल्यावर त्याची हत्या करणें या मार्गांचा अवलंब करीत. गर्भपात किंवा भ्रूणहत्या व बालहत्या हेच संततिनियमनाचे त्या वेळचे राजमार्ग होते. त्या वेळींच काय, पण हल्लींसुद्धां या मार्गाचाच अवलंब करण्यांत येतो. गर्भपात करण्यांत निरपराधी बालकांची हत्या तर होतेच, पण हत्या करणाऱ्या मातांचे हालहि कांहीं कमी होत नाहींत. बालहत्येचीहि तीच कथा! स्त्रियांवर या दोन्ही मार्गांचा फारच वाईट परिणाम होतो हें उघड आहे. अनैतिक कारणासाठींच या मार्गाचा अवलंब करण्यांत येत असे असें नाहीं, तर पुष्कळ वेळां गर्भपात करणें राजमान्यहि समजलें जात असे व बालहत्येलाहि लोकांची संमति असे. अर्थातच हेच त्यांचे संततिनियमनाचे मार्ग होते. अशा तऱ्हेनें संततिनियमन पूर्वींचे लोक कसें करीत याचें विवेचन आधीं केलेलेंच बरें.

ग्रीसमध्यें सुइणींना गर्भपात करण्यामध्यें कौशल्य संपादन करावें लागे. ग्रीसमधील स्पार्टा वगैरे राज्यांमध्यें निरुपयोगी लोकांची विल्हेवाट लावण्यांत येत असे हें पुष्कळ वाचकांना माहीतच आहे. या दृष्टीनें निरुपयोगी अशीं अनेक अपत्यें होण्यापेक्षां एखादेंच पण चांगलें मूल व्हावें असें त्या वेळीं लोकांना वाटे. हेसिऑडनें तर शेतकऱ्यानें एकापेक्षां जास्त मुलांची जोपासनाच करूं नये असें नमूद करून ठेवलेलें[1] मायर यानें दृष्टोत्पत्तीस आणलें आहे.

स्मिथ यानें तर फ्युटुना देशांत प्रचारांत असणारी एक क्रूर चाल नमूद करून ठेविली आहे. तेथील आयांना आपल्या मुलाला जिवंत मारणें मुळींच कमीपणाचें वाटत नसे! कांहीं कांहीं स्त्रिया तर अशा सांपडत कीं, ज्यांनीं सहज लीलेनें सहा सहा मुलें आपल्या हातांनीं मारलीं होतीं! मूल बाहेर येतांयेतांच त्याला दगडांनीं चेचणें किंवा तशांतून तें जिवंत राहिल्यास त्याला गळा दाबून मारणें व कधीं कधीं तर जिवंत वाळूंत पुरून टाकणें हे मार्ग अवलंबण्यास त्यांना मुळींच दिक्कत वाटत नसे![2]

पण खरें संततिनियमन म्हणजे गर्भपात किंवा बालहत्या नव्हे, तर त्याला गर्भ न राहण्यासाठींच कांहींतरी योजना करावी लागते व अशी योजना म्हणजेच पुरुषाच्या वीर्याचा स्त्रीच्या गर्भाशयांत प्रवेश न होईल अशी खबरदारी घेणें ही होय. ही कल्पना कांहीं रानटी लोकांत बरीच परिणत झालेली आढळून येते. त्यांना अर्थातच रबरी टोप्या किंवा औषधी गोळ्यांचें ज्ञान नव्हतें. पण ते पुरुषांच्या जननेंद्रियाच्या खालीं लांबलचक भोंक पडून वीर्य खालीं पडण्याची व्यवस्था करीत! या शस्त्रक्रियेला 'मिका' हें नांव देण्यांत आलें आहे. अशा प्रकारची मिका ऑस्ट्रेलियांतील कांहीं रानटी जातींत सांपडते. हें करण्यामध्यें अर्थातच संततिनियमन हा त्यांचा उद्देश असला तरी

---

1. 'The Causes of Rise and Fall in the Population of the Ancient World,' *Eugenics Review*, April 1915.
2. Smith-*Futuna, or Home Island and its People-Western Pacific.*

निरुपयोगी पुरुषांना संतति होऊं नये येवढेंच त्यांत धोरण होतें. हल्लींहि वेडे, दुर्धर रोगानें पीडलेले, महारोगी वगैरे दुर्दैवी लोकांना संतति होऊं नये, म्हणून पाश्चिमात्य राष्ट्रांत त्यांना संततिकार्यास निरुपयोगी बनविण्यांत येतें. ही कल्पना ऑस्ट्रेलियांतील रानटी जातींतहि होती. पण त्यांचे मार्ग मात्र चमत्कारिक होते. जननेंद्रियावर शस्त्रक्रिया करण्याची कल्पना फार पुरातनची आहे. त्यांत स्त्रीपुरुषांमधील एकमेकांची आकर्षकता वाढावी ही कल्पना असते. जननेंद्रियाला निरनिराळा आकार उत्पन्न करण्यानें हें साध्य होतें अशी त्या वेळची समजूत होती. त्यांतील एक प्रकार हल्लींहि कोट्यवधी लोक उपयोगांत आणतात व तो म्हणजे सुंता करणें हा होय.

अशा रीतीनें जरी संततिनियमनाचे मार्ग आपल्याला उपलब्ध नाहींत तरी निरनिराळया रानटी लोकांत त्यांचा प्रसार होता हें खास. आफ्रिकेंतील रानटी लोकांत संततीची संख्या नेहमींच कमी असल्याचें आढळून येतें. कांहीं कांहीं लोकांत दोन मुलांपेक्षां जास्त मुलेंच होऊं द्यावयाचीं नाहींत अशी चाल असे. कांहीं तरी मार्गांनीं ते संततिनियमन घडवून आणीत. त्यांचे मार्ग कोणते होते हें अर्थातच आपल्याला सांगतां येणार नाहीं.

सुधारलेल्या समाजाचा विचार करूं लागल्यावर जे पहिले ग्रंथिक उतारे सांपडतात ते अर्थातच आपल्याकडील कामसूत्रांत आलेले होत. त्या वेळीं संततिनियमनाची कल्पना प्रसृत होती यांत शंका नाहीं. त्या वेळचे मार्ग आज योग्य ठरणार नाहींत हें खरें असलें तरी, त्या लोकांनीं याचा विचार केला होता हें सुद्धां कांहीं कमी महत्त्वाचें ठरत नाहीं. मेरी स्टोप्सनीं या दृष्टीनें आपल्या पूर्वजांना दिलेली शाबासकी येथें उद्धृत करण्याजोगी आहे. त्या लिहितात, "One is surprised, not that these prescriptions may have failed but that the ancient orient should have considered this subject from so modern a point of view."

कामसूत्रांत लैंगिक माहितीच जास्त आहे. तो ग्रंथ कामशास्त्रावरच असल्यामुळें त्यांत लैंगिक माहितीच अधिक असणार; पण तदनुषंगिक जे

इतर विषय आहेत, त्यांचाहि थोडाबहुत परामर्ष त्यांत घेण्यांत आलाच आहे. अशाच विषयांमध्यें संततिनियमनाचा समावेश होतो. यासंबंधीं असलेले उतारे पुढीलप्रमाणें सांपडतात.

तुषतोयेन संक्वाथ्य मूलमग्नितरूद्भवं
पुष्पावसाने त्रिदिनं पीता वंध्यापि जायते
कदंबस्य फलं पादं मक्षिकाया दिनत्रयं
पीतमुष्णोदकेनैव वंध्यात्वं प्रतिपादयेत् ॥

वांझपणा आणणें म्हणजेच संतती न होणें होय; परंतु येथें अजिबात संतति न होणें हेंच ध्येय होतें हें लक्षांत ठेवलें पाहिजे. आपल्याला पाहिजे त्याच वेळीं संतति व्हावी व नको असेल त्या वेळींच फक्त नियमन करावें अशी कल्पना अर्थातच ब्रह्मचर्याशिवाय त्या वेळीं दुसरी असेलसें संभवत नाहीं. अशा दृष्टीनें वंध्यात्व प्राप्त करून घेण्याचे उल्लेख सांपडले तरी त्याचा कितपत उपयोग होत असेल हें संशयात्मकच आहे. गर्भपात हाच एक मार्ग हल्लींप्रमाणें त्या वेळींहि अनुसरला जात असला पाहिजे हेंच अनुमान खरें ठरण्यासारखें आहे.

यानंतर ग्रंथिक उल्लेख सोळाव्या शतकापर्यंत सांपडत नाहींत. या शतकांत प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकांत संततिनियमनाचा उल्लेख व विवरण सांपडतें. रासायनिक द्रव्याच्या साहाय्यानें संततिनियमन करतां येतें, याचा प्रथम उल्लेख याच पुस्तकांत सांपडतो. सतराव्या शतकांत प्रसिद्ध झालेल्या एका पुस्तकांत बर्टन यानें चांगल्या संततीची निपज व्हावी म्हणून रोगग्रस्तांना प्रजोत्पत्तीच्या दृष्टीनें निरुपयोगी करावें असें म्हटलें आहे. त्यानें स्कॉटलंडमधील एक चाल उद्धृत केली आहे, ती येथें उल्लेखनीय वाटल्यावरून देत आहे. एखाद्या बाईला, महारोग, वेड व इतर भयंकर रोग झाल्याचें आढळून आलें असतां तिला खोलींत कोंडून ठेवण्यांत येत असे. इतकें करूनहि ती गर्भार आहे असें आढळून आलें तर तिला व तिच्या नवऱ्याला दोघांनाहि जिवंत

फुरीत असत! भयंकर गुन्ह्याला भयंकर शिक्षा असा दंडक असणाऱ्या पूर्वीच्या लोकांची ही चाल आहे! त्यांतील तत्त्वच आपल्याला विचारांत घ्यावयाचें आहे. तत्त्व अमलांत आणण्यास आजच्यासारखें शास्त्रीय साहाय्य होण्यासारखी त्या वेळीं स्थिति नव्हती म्हणूनच त्यांना जें[1] शक्य होतें तेंच त्यांनीं प्रचारांत आणलें हें यासंबंधांत लक्षांत टेवणें जरूर आहे.

सतराव्या शतकाच्या शेवटीं संततिनियमनासाठीं टोपी वापरण्याची कल्पना निघाली व इटलीमध्यें कापडाच्या टोप्या या उद्देशानें वापरीतही असत, असें हॅव्हलॉक एलिस यानें नमूद करून ठेविलें आहे. या टोप्या जास्त चिवट पदार्थांच्याहि करण्यांत येत. मेंढयाच्या आंतडयापासूनहि अशी टोपी बनवीत. संततिनियमनासाठीं गर्भाशयावर आच्छादन ठेवण्याची कल्पना अरबांमध्येंसुद्धां होती व त्यांनीं ती हिंदूंपासून घेतली असावी असेंहि कांहीं तज्ज्ञांचें मत आहे.[२] पण आपल्या एतद्विषयक वाङ्मयांत टोपीची कल्पना कोठेंहि पहावयास सांपडत नाहीं. फक्त औषधाच्या योगानें स्त्रिया वांझ होतील, अशाबद्दलचे उल्लेख त्यांत पुष्कळ सांपडतात.[३]

अशा दृष्टीनें संततिनियमन करण्याची कल्पना निघाली होती तरी गर्भपाताची चाल सर्रहा प्रचारांत असल्यामुळें तिला फारशी चालना मिळाली नाहीं. गर्भपात करण्यामध्यें मात्र बरेंच कौशल्य पूर्वींच्या लोकांनीं मिळविलें होतें. अरबांमध्यें गर्भपात करण्यासाठीं पाणमोट फोडण्यांत येत असे, असें रिक म्हणतो. हिंदुस्थानांतहि गर्भपात निरनिराळ्या रीतींनीं करण्यांत येत असे. गर्भाशयांत कांठीं खुपसण्यापासून तों निरनिराळ्या औषधांचे

1. Burton's *Anatomy of Melancholy*.

2. Mary Stopes, *Contraception*, 290—"I have seen it often stated in reference books and elsewhere that the ancient medical practitioners of Greece, Rome and Arabia derived much of their knowledge from Hindu sources, and were acquainted with the contraceptive effect of grease placed in the vagina."

३. असे उल्लेख प्रो. कर्व्यांच्या पुस्तकांत जिज्ञासूंस पहावयास सांपडतील.

काढे पिण्यापर्यंत हे प्रकार पसरले होते! हिंग, मिरी, लसूण वगैरे औषधांचा यासाठीं उपयोग करीत. कांहीं कांहीं प्रकार तर इतके विचित्र होते कीं; त्यांनीं गर्भपात कसा होत असेल याचेंच आश्चर्य वाटतें. सुल्तानी बनात (एक तऱ्हेचें कापड) खाल्यानें गर्भपात होई असें वेब यानें नमूद करून ठेविलें आहे. चीनमध्यें गर्भपात राजरोस होत असे व असे गर्भपात करणारे लोक उघडपणें पैसे घेऊन गर्भपात करीत.

इंग्लंडमध्येंसुद्धां अठराव्या शतकांत गर्भपात उघडपणें होत असे. त्याच्या जाहिराती वर्तमानपत्रांत येत व मेरी स्टोप्सनीं तर १७८०मध्यें मॉर्निंग पोस्टमध्यें आलेली असली एक जाहिरात आपल्या पुस्तकांतहि उद्धृत केली आहे. याच सुमारास गर्भप्रतिबंधक आच्छादनेंहि विकण्यांत येत व अशा व्यापारांत पैसे कमावल्याचे दाखलेसुद्धां सांपडतात. इंग्लंडमध्यें असणाऱ्या एका व्यापाऱ्याला फ्रान्स, स्पेन, पोर्तुगाल, इटली वगैरे देशांतून मागणी येई! म्हणजे या प्रतिबंधक आच्छादनांचें क्षेत्र त्या वेळींहि बरेंच लांबवर पसरलें असल्याचें दिसून येतें. आच्छादनाला त्या वेळीं कंडम (Cundum) असें म्हणत. कर्नल कंडम यानें तें शोधून काढलें होतें, त्यामुळेंच त्याला हें नांव मिळालें.

अशा रीतीनें अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत संततिनियमनाचा प्रसार फारच मंद गतीनें होत होता. त्याला आजच्या दृष्टीनें मात्र महत्त्व मिळालें नव्हतें. त्या वेळीं लोकांची सांपत्तिक स्थिति चांगली असल्यामुळें व अमेरिकेसारखे नवे देश वाढत्या लोकसंख्येला वाट काढून देण्यास मोकळे असल्यामुळें संततिनियमनाची लोकांना फारशी जरूर भासली नाहीं. पण या वेळीं संततिनियमन एका निराळ्याच दृष्टीनें लोकांपुढें आलें. आतांपर्यंत लोकसंख्येचा शास्त्रीय दृष्टीनें कोणींच विचार केला नव्हता. लोकसंख्या भरमसाट वाढली तर पुढें मनुष्यसमाजाचें काय होईल वगैरे प्रश्न कोणाच्याच डोक्यांत आले नव्हते. हा प्रश्न माल्थस यानें घेऊन लोकसंख्येवर एक पुस्तक

१७९८मध्यें प्रसिद्ध केलें. त्यांत त्यानें, "लोकसंख्या वाढत राहिल्यानें सर्व जग लवकरच भरून गेलें असतें; पण लढाई, आजार, सांथी वगैरेंच्या योगानें ही लोकसंख्या बेतांत राहते." असें प्रतिपादन केलें. यापुढील आवृत्तींतून त्यानें लोकसंख्या प्रमाणांत ठेवावयास मुलें कमी व्हावींत हा उपाय सुचविला आहे. पण असें करण्याला संततिनियमन कृत्रिम रीतीनें करावें असें त्यानें कोठेंच म्हटलें नाहीं. लोकसंख्या जास्त वाढूं नये यासाठीं प्रौढविवाह करावेत अशी त्याची सूचना होती. यापेक्षां संततिनियमनाचें अधिक विवेचन त्यानें कधींच केलें नाहीं. असें असूनहि त्याला संततिनियमनाच्या चळवळीचा आद्य प्रवर्तक असें म्हणतात व या चळवळीला 'निओ-माल्थुशियन मूव्हमेंट' (Neo-Malthusian Movement) व अशी चळवळ करणाऱ्याला 'निओ-माल्थुशियन' असें म्हणण्याची प्रथा पडली आहे. याचें कारणहि तितकेंच महत्त्वाचें आहे. आतांपर्यंत लोकसंख्येचा शास्त्रीय दृष्टीनें विचार कोणींच केला नव्हता. 'लोकसंख्या' हा एक महत्त्वाचा विषय आहे, याचा संततिनियमनासाठीं जरी नसला तरी आर्थिक दृष्ट्या विचार होणें अगत्याचें आहे असें कोणींहि ध्वनित केलें नव्हतें. अर्थात् अशा महत्त्वाच्या विषयावर लिहून त्यानें हा नवीनच विषय लोकांपुढें आणला. यांतील संतति-नियमनाचा तेवढा भाग घेऊन प्लेस वगैरे लोकांनीं वरीच चळवळ केली व या विषयाला मूर्त स्वरूप प्राप्त करून दिलें. म्हणूनच आद्य प्रणेता होण्याचा मान माल्थसला मिळाला.



डॉ. मेरी स्टोप्स

# प्रकरण तिसरें

# चळवळीचा इतिहास

## ( उत्तरार्ध )

संततिनियमाच्या चळवळींत दोन सालांचें विशेष महत्त्व आहे. एक १७९८ व दुसरें १८७७. पहिल्या सालीं माल्थस याचा ' प्रिन्सिपल ऑफ पॉप्युलेशन ' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला व दुसऱ्याच सालीं ब्रॅडलॉ व ॲनि बेझंट यांच्यावर, संततिनियमनावर अमेरिकन डॉक्टरनें लिहिलेलें आक्षिप्त पुस्तक प्रसिद्ध करून विकल्याबद्दल खटला करण्यांत आला. या खटल्यानें प्रस्तुत विषयाकडे लोकांचें लक्ष वेधलें गेलें व संततिनियमनाला फार मोठी चालना मिळाली. या दोन्ही प्रसंगांमध्यें एक महत्त्वाचें साम्य आहे; तें म्हणजे या दोन्ही प्रसंगांतील प्रसिद्ध व्यक्तींनीं संततिनियमनाला मदत व्हावी म्हणून कांहींहि केलें नाहीं. किंबहुना, संततिनियमन हा विषय त्यांच्यापुढें प्रामुख्यानें नव्हताच; पण त्यांच्या कार्यानें संततिनियमनाच्या चळवळीला मात्र जोर आला! त्यांची इच्छा नसतांनाहि त्यांना या चळवळींत उगीचच खेंचण्यांत आलें. अर्थातच त्यांचा संबंध फक्त या दोन प्रसंगांपुरताच होता. त्यांनीं मात्र या विषयांचा आपल्या विशिष्ट चळवळीसाठीं उपयोग करून घेतला. माल्थसला

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ नारायण
दा. नों. ८५८८



लोकसंख्येच्या आर्थिक स्वरूपाचें लोकांना महत्त्व पटवावयाचें होतें तर ब्रॅडलॉ व बेझंट यांना पुस्तक छापणें व प्रसिद्ध करणें यांमध्यें मतस्वातंत्र्य सिद्ध करावयाचें होतें.

माल्थसच्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तींत त्यानें लोकसंख्येची वाढ कशी होते व एकदां लोकसंख्या बेसुमार वाढली म्हणजे लोकांमध्यें दारिद्र्य, रोग वगैरेंचा फैलाव कसा होतो याचें विवेचन केलें होतें. पुढील आवृत्तीमध्यें त्यानें या परिस्थितीला उपाय सुचविले होते. विवाहाचें वय वाढविल्याशिवाय किंवा मनुष्याला आपल्या संततीची नीट रीतीनें जोपासना करतां येईल इतकी चांगली स्थिति प्राप्त होईतोंपर्यंत प्रजोत्पत्ति होण्याचें टाळल्याशिवाय लोकसंख्येच्या वाढीपासून होणारें नुकसान कमी करतां येणार नाहीं, अशा रीतीचें विवेचन त्यानें आपल्या पुस्तकाच्या पुढील आवृत्त्यांतून केलें होतें.

माल्थसच्या पुस्तकाचा बराच बोलबाला झाल्यामुळें विद्वानांचें लक्ष या प्रश्नाकडे वेधलं व लोकसंख्या नियमित करण्यासाठीं कांय उपाय योजावेत व जे उपाय माल्थसनें प्रतिपादिले होते ते कितपत उपयुक्त आहेत, याची चर्चा सुरू झाली. माल्थसनें वस्तुस्थिति लोकांपुढें प्रामुख्यानें आणली; पण त्यानेंच प्रतिपादलेल्या परिस्थितीचा परिहार कोणचे उपाय योजून करतां येईल, याचा त्यानें मुळींच विचार केला नाहीं. त्यानें जरी याकडे कानाडोळा केला असला तरी त्याच्या विषयप्रतिपादनानें जागृत झालेले इतर विद्वान् या विषयाकडे वळले व त्यांनीं लोकसंख्येचा इतर अनेक दृष्टींनीं विचार केला. लोकसंख्येच्या दृष्टीनें संततिनियमनाचा विचार पुढें येणार असल्यामुळें सध्यां चळवळीच्या इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचा भाग तेवढाच येथें देण्यांत येत आहे.

माल्थसच्या वेळींच पण त्यानें अर्धवट सोडलेलें तत्त्व हातांत घेऊन निधड्या छातीनें मार्ग आक्रमणारा दुसरा प्रसिद्ध पुरुष म्हणजे फ्रान्सिस प्लेस हा होय. यानें माल्थसचीं मतें खोडून काढून त्यानें भीतभीत सुचविलेल्या प्रौढ विवाह वगैरे उपायांचा योग्य परामर्ष घेतला. मोलमजुरी करून गुजराण करणाऱ्या

लोकांच्या अनिवार प्रजोत्पत्तीकडे बोट दाखवून त्यानें यावर खरा उपाय काय म्हणून विचारणा केली. एवढेंच म्हणून स्वस्थ न बसतां त्यानें संततिप्रतिबंध करणें हाच एक उपाय आहे असें सांगून त्या दृष्टीनें त्या वेळचें सारें जग विरुद्ध असतां प्रतिबंधक उपाय शिकविणारें हें पुस्तक प्रसिद्ध करून तें गरीब लोकांत वाटलें. या पुस्तकाला सैतानी पुस्तक ( Diabolical Hand-bill ) म्हणून संबोधण्यांत येऊन बराच गवगवा करण्यांत आला. तरी पण मॅन्चेस्टर गार्डियनच्या संपादकांसारखे लोक त्याचा प्रसार करण्यास मिळाल्यामुळें या पत्रकाला बरीच प्रसिद्धि मिळाली. या वेळीं चळवळ बरीच जोरांत होती व संततिनियमनाचें ज्ञानहि लोकांत बरेंच प्रसृत होत होतें. या वेळीं संततिनियमनाची प्रगति किती झाली होती हें आधीं पाहिलें पाहिजे. प्लेसनें लिहिलेल्या एका विस्तृत पत्रांत त्या वेळच्या संततिनियमनाच्या परिस्थितीचें यथायोग्य स्वरूप चित्रित केलें आहे. प्लेसनें संततिनियमन केलेल्या लोकांची एक यादीच या पत्राला जोडली होती. या लोकांना प्रतिबंधक उपायांमुळें पुष्कळ वर्षांत मूल झालें नाहीं, असें त्यानें नांवनिशीवार लिहून ठेवलें आहे. याच लोकांनीं पुढें हे उपाय वापरण्याचें बंद केल्यावर त्यांना मुलें झालीं व या उपायानें मुलें होण्याचें अजीबात बंद होतें या आक्षेपाला आपोआपच उत्तर मिळालें.

संततिनियमन कां करावें यासाठीं प्लेसनें आपल्या पत्रकांत फारच सुंदर विवेचन केलें आहे. आर्थिक हलाखीच्या परिस्थितीनें, जितक्या माणसांना पोटापुरतें मिळण्यास पाहिजे तितक्यांना उपजीविकेचें साधनहि उपलब्ध होत नाहीं. यामुळें समाजाला आपल्या या अर्धपोटी घटकावयवांची काळजी घेणें शक्य नसतें व मग त्यांतील लोक ज्याप्रमाणें त्यांना उपजीविकेचें साधन प्राप्त करून घेतां येईल, त्याप्रमाणें वागण्यास तयार होतात. अशी वस्तुस्थिति झाल्यावर नैतिक बंधनांचा पाया थोडा ढिला होणें अपरिहार्यच आहे. तशांतून मुलांना मोठें झाल्यावर विवाह होईलच ही खात्री नसते व कांहीं काम लागलें तर तेंहि टिकेल किंवा नाहीं याची वानवाच असते. आपलें व आपल्या कुटुंबाचें

पोट नीट भरण्याची ताकद येण्यापूर्वी लग्न करण्यास तरुण तयार नसतात. या सर्व घटनेचा असा परिणाम होतो कीं, स्त्रियांची वेश्यावृत्तीकडे प्रवृत्ति होते व हे अविवाहित तरुण त्यांना गिऱ्हाईक पुरवतात. ही समाजाची स्थिति मोठी करुणास्पद आहे. म्हणजे समाजाच्या सर्व घटकावयवांची पोटापाण्याची उत्तम सोय लावणें हाच यावर उपाय होय. अशा रीतीनें निर्धास्त मनः-स्थिति झाल्यावर तरुण स्त्रीपुरुषांचीं मनें विवाहाला अनुकूल होतील तरच नैतिक बंधनें मनुष्यमात्राला योग्य तऱ्हेनें बंधक होऊं शकतील. पोटाला चिमटा घेऊनहि नैतिक बंधनें पाळणारे क्वचित् सांपडतात. त्यांना येणाऱ्या संकटांतून निभावून जाण्याचा कांहीं उपाय उपस्थित करून देण्याऐवजीं नैतिक मुद्यांवरच त्यांच्यावर तोंडसुख घेण्यांत काय अर्थ आहे ? ही स्थिति प्राप्त करून घेण्यासाठीं संततिनियमन हा एकच प्रभावी उपाय आहे. वरील विवेचन आजच्या परिस्थितीलाहि तंतोतंत लागू पडेल असें आहे. प्लेसनें १८२२ मध्यें हा विचार केला होता, एवढें सांगितलें म्हणजे त्याच्या दूरदर्शीपणाची, कार्याबद्दलच्या आस्थेची व सततोद्योगाची निराळी प्रशंसा करण्याचें कांहींच कारण नाहीं. अशा रीतीनें संततिनियमनाची आवश्यकता पटविल्यावर त्याचीं उपकरणेंहि लोकांना उपलब्ध करून देणें क्रमप्राप्तच होतें. या दृष्टीनेंहि प्लेसनें मोठी कामगिरी केली आहे. १८२६ सालीं 'बुलडॉग' नांवाच्या वर्तमानपत्राच्या एका अंकांत दोन पद्धती दिल्या आहेत. त्यांपैकीं एक म्हणजे स्त्रियांच्या योनिमार्गात स्वरी स्पंज ठेवणें ही होय. हा स्पंज कसा ठेवावा याची माहितीहि तेथें देण्यांत आली आहे. दुसरी पद्धति म्हणजे पुरुषानें वीर्यस्रावाच्या वेळीं तो स्राव योनिमार्गात न होईल अशी खबरदारी घेणें. ही पद्धत म्हणजेच त्रुटित संभोग होय. हे दोन्ही मार्ग अजून प्रचारांत आहेत. यांपैकीं दुसरा प्रकृतीस विघातक आहे. परंतु त्या वेळीं त्यानें काय नुकसान होतें हें लोकांना माहीत नव्हतें. अशा प्रकारें प्लेसच्या वेळीं संततिनियमनाच्या पद्धतींचीहि लोकांना बरीच माहिती होती.

याच सुमाराला फ्रान्स व अमेरिका येथील कांहीं विश्वविद्यालयांतून संतति-नियमनाचें शिक्षण देण्यांत येत असे. हॅल्यॅम यांच्या संग्रहांत, त्यांना त्यांच्या एका डॉक्टर मित्राकडून आलेलें पत्र आहे, त्यांत उपरिनिर्दिष्ट शिक्षणाचा उल्लेख केला आहे; व त्यांना यासंबंधीं कशी विचारणा करण्यांत येई याचेंहि त्यांनीं वर्णन दिलें आहे.

यासंबंधीं अमेरिकेमध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या दोन पुस्तकांचा नाम-निर्देश येथें करणें आवश्यक आहे. त्यांपैकीं पहिलें ओवेल यानें ' मॉरल फिजिआलॉजी ' म्हणून १८३० मध्यें प्रसिद्ध केलें व दुसरें १८३३ मध्यें नोल्टन यानें ' फ्रुट्स् ऑफ फिलॉसॉफी ' या नांवानें प्रसिद्ध केलें. हें पुस्तक पुढें फारच प्रसिद्धीस आलें. ब्रॅडलॉ व बेझंट यांच्या खटल्यानें याच पुस्तकाला अवास्तव प्रासिद्धि मिळाली. यामध्यें संततिनियमनाचे तत्कालीन उपाय वर्णिले आहेत. या उपायांत आच्छादन, स्पंज, तुरटी व इतर औषधें यांचा योनिमार्गांत उपयोग वगैरेंचें वर्णन प्रामुख्यानें देण्यांत आलें आहे.

यानंतर १८६६ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आलेल्या डॉ. ट्रॉल यांच्या ' सेक्शुअल फिजिऑलॉजी ' या पुस्तकाला फारच प्रसिद्धि मिळाली. एकट्या १८६६ या सालीं त्याच्या तीन आवृत्ती निघाल्या! यांत लैंगिक विषयावर बरीच माहिती दिली आहे. विवाहविषयक व तदनुषंगिक विषयहि यांत प्रतिपादिले आहेत. पण सर्वांत महत्त्वाचा भाग म्हणजे संततिनियमनाचा होय. यांत संततिनियमनाची आवश्यकता व त्याची पद्धति हीं संपूर्ण रीतीनें वर्णिलीं आहेत.

याच सुमाराला डॉ. ड्रिस्डेलचें ' समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें ' हें पुस्तक व १८६८ मध्यें डेली टेलिग्राफच्या वतीनें दोन पत्रकें प्रसिद्ध करण्यांत आलीं. त्यांपैकीं ' आईबापांचें आपलें कुटुंब मर्यादित करण्याबद्दलचें कर्तव्य ' या पत्रकांत संततिनियमनासंबंधीं पूर्ण माहिती ग्रथित केली होती. ' विवाहाचा प्रश्न ' या दुसऱ्या पत्रकांतहि अशीच माहिती देण्यांत आली होती. या पुस्तकाच्या

प्रकाशकाचें जॉन स्टुअर्ट मिल यानें मुद्दाम पत्र लिहून अभिनंदन केलें होतें या पत्राचा सारांश पुढीलप्रमाणें आहेः—" या पत्रकांत आलेला विषय अत्यंत महत्त्वाचा आहे व तो प्रसिद्ध करण्याचा उद्देशहि तितकाच उदात्त आहे. याचा प्रसार कसा होईल हें अर्थात् तुम्हांलाच नीट कळण्यासारखें आहे. माझें असें मत आहे कीं, नैतिक दृष्ट्या या गोष्टी विवाहित स्त्रीपुरुषांना त्यांच्या वैद्यकीय सल्लागारांनीं अवश्य सांगितल्या पाहिजेत. परंतु अजून अशी स्थिति प्राप्त होण्याला बराच कालावधि लोटावा लागेल." इतक्या सहानुभूतिपूर्वक मिल्नें या विषयासंबंधीं त्या वेळीं लिहिलें होतें हें वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

१८७७ हें साल संततिनियमनाच्या चळवळीच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. याच सालीं ब्रॅडलॉ व ॲनि बेझंट यांच्यावर करण्यांत आलेल्या सुप्रसिद्ध खटल्यानें या विषयाला बरीच चालना मिळाली. उपरिनिर्दिष्ट पुस्तकांत डॉ. नोल्टन याचें पुस्तक बरेंच उपयुक्त असल्यामुळें फार प्रसिद्ध होतें. तें पुस्तक अनैतिक आहे, असा आरोप ठेवून सरकारनें तें जप्त केलें व अशा रीतीनें त्या पुस्तकाचीच नुसती मुस्कटदाबी करण्यांत आली असें नव्हे, तर पुस्तकें प्रसिद्ध करणाऱ्या जनतेच्या हक्कावरहि गदा आणली; हें न खपूनच ब्रॅडलॉ व बेझंट यांनीं तें पुस्तक आपल्या जबाबदारीवर पुन्हा छापून विकलें. यांत त्यांचा उद्देश उघडपणें मतस्वातंत्र्यावर आलेलें गंडांतर नाहींसें करावें हाच होता व त्यासाठीं त्यांनीं कायदेभंग करून आपल्यावर खटला ओढवून घेतला. ब्रॅडलॉ व बेझंट हीं आपल्या निरलस उद्योगानें व नास्तिक मतामुळें इंग्लंडांत बरींच प्रसिद्धीस आलीं होतीं. त्यांनीं या रूपानें ओढवून आणलेला खटला बराच गाजला. हा खटला लॉर्ड चीफ जस्टिसपुढें स्पेशल ज्यूरीसमोर चालविण्यांत आला. सरकारतर्फे सॉलिसिटर-जनरल खटला चालविण्यास आले होते. ब्रॅडलॉ व बेझंट यांनीं आपला खटला स्वतःच चालविला. या खटल्याचा निकाल प्रथम जरी विरुद्ध लागला तरी अपिलांत दोघींहि

निर्दोषी म्हणून सुटली. या खटल्यापेक्षांहि त्यापासून झालेले परिणाम विशेष महत्त्वाचे व चिरस्थायी असे झाले. एक तर ज्या उद्देशानें खटला भरला होता तो विफल झालाच. पण जें होऊं नये म्हणून हा खटाटोप करण्यांत आला तेंच नेमकें झालें! आक्षिप्त पुस्तकाच्या इतक्या प्रती खपल्या कीं, जर हा खटला झाला नसता तर कदाचित् तितक्या प्रती ऐशीं वर्षांतहि खपल्या नसत्या! दुसरा व विशेष महत्त्वाचा परिणाम म्हणजे ब्रॅडलॉ व डॉ. ड्रिस्डेल यांनीं सुरू केलेल्या माल्थुशियन लीगला विशेष महत्त्व प्राप्त झालें. या लीगच्या शाखा हॉलंडमध्यें व यूरोपांतील इतर देशांत स्थापन झाल्या. हॉलंडमध्यें तर या माहितीचा बराच प्रसार झाला.

हॉलंडमध्यें १८७८ मध्यें संततिनियमनाची माहिती प्रसृत करण्या-साठीं ॲम्स्टरडॅम येथें जगांतील पहिलें केंद्र स्थापण्यांत आलें. त्याच्या पुढल्याच वर्षी लंडनमध्यें 'दि माल्थुशियन' नांवाचें वर्तमानपत्र निघालें. अशा तऱ्हेनें ही माहिती प्रस्तुत पुस्तकांत येत असतांनाच संततिनियमनाच्या पद्धतीमध्यें सुद्धां सुधारणा होत होत्या. याच सुमारास करण्यांत आलेल्या सुधारणा म्हणजे फ्लेन्स्बर्ग येथील डॉ. मेन्सिंगा यांनीं शोधून काढलेली रबरी टोपी ही होय. ही टोपी अजूनहि वापरण्यांत येते. हे डॉक्टर आपल्याकडे येणाऱ्या रोग्यांची काळजीपूर्वक तपासणी करीत व त्यांना संततिनियमनाची जरूरी आहे असें त्यांना वाटलें तर ते त्यांना उपयोगी पडेल अशी रबरी टोपी देत असत. निरनिराळ्या बायकांना योग्य तऱ्हेनें बसतील असे त्यांनीं या रबरी टोप्यांचे निरनिराळे नमुने केले होते.

ब्रॅडलॉ व ॲनि बेझंट यांच्याप्रमाणेंच डॉ. अल्बट यांनाहि पुढें १८८७ मध्यें त्रास सोसावा लागला. पण डॉ. अल्बट यांच्यावर सरकारनें खटला भरला नसून ते स्वतःच कोर्टाची पायरी चढले. त्यांनीं 'पत्नीचें पुस्तक' म्हणून एक पुस्तक प्रसिद्ध केलें. यांत स्त्रियांचें आरोग्य, रोग, त्यांची चिकित्सा वगैरे माहितीबरोबर संततिनियमनाचीहि माहिती त्यांनीं ग्रथित केली होती.

यावर प्रथमतः ब्रिटिश मेडिकल ॲसोसिएशननें त्यांचें नांव आपल्या यादींतून काढून टाकलें व पर्यायानें डॉक्टर लोकांना असणारा पाठिंबा नाहींसा केला. याचा सर्व डॉक्टरांवर वचक बसावा असाच उद्देश होता. ॲसोसिएशननें अर्थातच हें कारण न सांगतां डॉ. अल्बटनीं आपल्या पुस्तकाची किंमत फारच थोडी ठेविली, हा आरोप त्यांच्यावर ठेवला. डॉ. ॲल्बट कोर्टांत गेल्यावर तेथेंहि त्यांच्यावर टपका ठेवण्यांत आलाच. पण या घडामोडींनें संततिनियमनाच्या कार्याला बरीच चालना मिळाली व तें कार्य हलकें हलकें पुढें सरकूं लागलें.

आतांपर्यंत या चळवळीला वैद्यकशास्त्रांतील मोठमोठ्या तज्ज्ञांचा पाठिंबा नव्हता. अशा पाठिंब्याशिवाय हा विषय सर्वसाधारण समाजांत प्रसृत होण्यास बऱ्याच अडचणी येतात. संततिनियमन हा विषय जरी वैद्यकशास्त्रांत येत नसला, तरी पण इतर कोणत्याहि शास्त्रापेक्षां वैद्यकशास्त्रच त्याला जवळचें आहे. या दृष्टीनें व संततिनियमन करण्यासारखी स्थिति आहे किंवा नाहीं हें ठरविणेंहि डॉक्टराकडेच पर्यायानें येत असल्यामुळें वैद्यकीय तज्ज्ञांच्या मताला विशेष महत्त्व आहे. ब्रिटिश मेडिकल ॲसोसिएशनच्या ८० व्या वार्षिक सभेच्या अध्यक्षीय भाषणांत सर जेम्स बार यांनीं १९१२ मध्यें संततिनियमनाला महत्त्वाचें स्थान दिलें व त्या विषयाच्या आवश्यकतेचें प्रतिपादन केलें. याच सालीं अमेरिकन मेडिकल ॲसोसिएशनच्या ६३ व्या वार्षिक सभेंत डॉ. जेकोबी यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत संततिनियमनाला मानाचें स्थान दिलें. १९१३ मध्यें नॅशनल बर्थरेट कमिशन नेमण्यांत आलें. त्यामध्यें धार्मिक दृष्ट्या बिशप, पाद्री वगैरे लोकांनीं भाग घेतला व विचारविनिमय या दृष्टीनें कां होईना, पण या विषयाला महत्त्व प्राप्त झालें.

अशा दृष्टीनें याचा प्रसार होत असतां जागतिक संततिनियमन परिषदांचीं अधिवेशनें (International Birth-Control Conferences)





मिसेस मार्गारेट सँगर

भरूं लागलीं. पहिलें अधिवेशन पॅरिस येथें १९०० सालीं भरलें. दुसरें लीज येथें १९०५मध्यें भरविण्यांत आलें. १९१०मध्यें तिसरें अधिवेशन हेग येथें भरलें व चवथें ड्रेस्डेन येथें १९११मध्यें जर्मन आरोग्यविषयक प्रदर्शनाच्या वेळीं भरविण्यांत आलें. अमेरिकेंत या विषयाला महत्त्वाचें स्थान प्राप्त करून देण्याला मिसेस् मार्गारेट सँगर यांनीं एतद्विषयक चळवळीला १९१४पासून सुरुवात केली. याच सालीं 'दि वुमन रेबल' हें पत्र निघालें व त्याला बंदी करण्यांत आली. अमेरिकेंतील संततिनियमन परिषद याच सालीं स्थापण्यांत आली. सँगर यांच्यावर खटला करण्यांत येऊन त्यांना १९१५मध्यें अटक करण्यांत आली. या बाबतींत प्रेसिडेंट विल्सन यांना एक निषेधाचें पत्र लिहिण्यांत आलें. त्यावर एच्. जी. वेल्स, अर्नोल्ड बेनेट, मेरी स्टोप्स वगैरेंच्या सह्या होता. यामुळें असो वा दुसऱ्या कशानें असो, सँगर यांच्या विरुद्ध केलेली फिर्याद काढून घेण्यांत आली. परंतु पुन्हा त्यांना संततिनियमनाचें केंद्र स्थापण्याबद्दल अटक करण्यांत येऊन शिक्षाहि ठोठावण्यांत आली. याविरुद्ध मिसेस बर्न यांनीं अन्न व पाणी न घेण्याचा निश्चय करून सत्याग्रह पुकारला. त्याचा परिणाम होऊन अकरा दिवसांनीं गव्हर्नर व्हिटमन यानें सँगरची मुक्तता केली. चळवळीला योग्य दिशा लागावी म्हणून मार्गारेट सँगर यांनीं १९१७ मध्यें 'बर्थ-कंट्रोल रिव्ह्यू' नांवाचें मासिक सुरू केलें.

याच सुमारास मेरी स्टोप्स यांनीं 'वैवाहिक प्रेम' व 'जनकत्वाची जबाबदारी' अशीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं. त्यांनीं या विषयाच्या प्रसाराला आपल्याला वाहून घेतलें आहे. १९२१च्या मार्च महिन्यांत त्यांनीं इंग्लंडमध्यें संततिनियमनाचें पहिलें केंद्र स्थापन केलें. या केंद्राबद्दल मोठमोठ्या लोकांनीं सहानुभूति दाखविली. त्या लोकांत सर जेम्स बार, अर्नोल्ड बेनेट, **सरोजिनी नायडू**, राइट ऑनरेबल क्राइन्स वगैरे लोक प्रामुख्यानें होते. यानंतर खुद्द इंग्लंडमध्यें कमिशननंतर कमिशन नेमण्यांत येऊन या विषयाकडे लोकांचें लक्ष जास्तच वेधण्यांत आलें. १९२१ मध्यें प्रसिद्ध डॉ. लॉर्ड हडसन

यांनीं बर्मिंगहॅम येथें भरलेल्या चर्च काँग्रेसपुढें संततिनियमनाची आवश्यकता पटविणारें भाषण केलें. ' दि न्यू जनरेशन ', ' बर्थ-कंट्रोल न्यूज़ ' वगैरे वर्तमानपत्रें १९२२ मध्यें सुरू झालीं. याच वेळीं अमेरिकेमध्यें ' बर्थ-कंट्रोल हेरल्ड ' हें सुरू झालें. १९२२ मध्यें माल्थुशियन लीगचें न्यू जनरेशन लीगमध्यें रूपान्तर होऊन त्यातर्फे जागतिक संततिनियमनाचें पांचवें अधिवेशन लंडन येथें भरलें. अशा रीतीनें या चळवळीचें महत्त्व लोकांना पटत चालल्याचें वाचकांच्या निदर्शनास येईल.


Sigmoid mesocolon
Sigmoid Colon
गर्भाशय
मूत्राशय
Symphysis pubis
त्रिकोण स्थूलांत्र
मूत्रनलिका
गुदमार्ग
लघु ओष्ठ
गुरु ओष्ठ



रजःपिण्ड द्विपत्र
रजोवाहक
गर्भाशय
रजःपिण्ड
विस्तृत द्विपत्र बंध
अंगुलि प्रसर
योनिमार्ग
गर्भाशय मुख

# प्रकरण चवथें

## गर्भधारणा कशी होते ?

संततिनियमनाची सर्वांगीण चर्चा करतांना संततिनियमन म्हणजे काय, याची यथायोग्य व पूर्ण कल्पना प्रत्येकाला असणें आवश्यक आहे. संतति-नियमनामध्यें संततीचा प्रतिबंध व दोन मुलांमध्यें असणारें अन्तर कमी जास्त करण्याची आईबापांच्या शारीरिक व आर्थिक सामर्थ्यानुसार आवश्यकता या दोन गोष्टींचा अन्तर्भाव होतो. यांतील दुसरी गोष्ट जरी आर्थिक व आरोग्य-विषयक असली तरी संततीचा प्रतिबंध करण्याच्या कल्पनेवरच ती गोष्ट अव-लंबून आहे. संततीचा प्रतिबंध करण्यावर नैतिक दृष्ट्याच प्रामुख्यानें आक्षेप येतो. कांहींच्या मतानें यांत पुढें होणाऱ्या अपत्याचा मृत्यूच ओढवून आणण्यासारखें आहे. धार्मिक दृष्टीनें सुद्धां यांत जीवात्म्याचा नाश होतो किंवा कसें हाहि महत्वाचा मुद्दा आहे. या सर्व मुद्यांचें नीट आकलन व्हावें यासाठीं, गर्भ कसा संभवतो याची माहिती असणें जरूर आहे. परंतु गर्भाची रूपरेषा पूर्ण ध्यानांत येण्यापूर्वी तो ज्यां जागेंत मूळ धरून राहतो त्या त्याच्या निवास-स्थानाची थोडक्यांत कल्पना असलेली बरी. हें निवासस्थान जरी वस्तुतः एकच असलें तरी पण तें सिद्ध होण्यापूर्वी गर्भाला स्थानांतर करावें लागतें,

या सर्वांची नीट कल्पना येण्यासाठीं स्त्रियांच्या अंतर्गत जननेंद्रियाचें थोडक्यांत वर्णन करावें लागेल.

या जननेंद्रियामध्यें तीन इंद्रियांचा समावेश होतो. तीं इंद्रियें म्हणजे ( १ ) रजःपिंड (Ovary), ( २ ) रजोवाहक (Fallopian Tube) आणि ( ३ ) गर्भाशय (Uterus) हीं होत.

( १ ) गर्भाशय हें पोटाच्या खालच्या भागांत ज्याला ओटीपोट म्हणतात त्यामध्यें असतें. गर्भाशयाच्या पुढें मूत्राशय व मागें गुदद्वाराच्या वरच्या आंतड्याचा भाग, ज्याला त्रिकोण स्थूलांत्र (Rectum) म्हणतात तो, हीं दोन इंद्रियें असतात. गर्भाशयाच्या वरच्या भागांत रजोवाहक येऊन मिळतात व खालचा भाग योनिमार्गांत गेलेला असतो. रजःपिंडांत तयार होणारें स्त्रीबीज (Ovum) रजोवाहकांतून गर्भाशयांत येतें. येथें त्याचा पुरुष-बीजाशीं संबंध येऊन गर्भसंभव झाला तर गर्भ तेथेंच वाढीला लागतो. गर्भाची जसजशी वाढ होईल तसतसा गर्भाशय ताणला जातो व गर्भाच्या वाढीप्रमाणें गर्भाशयाचीहि वाढ होते. बाळंतपणानंतर गर्भाशय पुन्हा पूर्वी-सारखा होतो.

गर्भाशयाचे दोन भाग करण्यांत आले आहेत. मोठा तिकोनी भाग मोकळा असतो व याच्यांतच गर्भाची वाढ होते. एरव्हीं यांत पोकळी मुळींच नसते. दोन्ही बाजूंचे मांसल भाग एकमेकांना चिकटून बसलेले असतात. गर्भाशयाची लांबी सुमारें तीन इंच असते व रुंदी दोन इंच व जाडी एक इंच असते. वजनांत गर्भाशय एक ते दीड औंस भरतो. इतकें हें लहान इंद्रिय, पूर्ण वाढलेलें बालक आपल्या पोकळींत कसें सामावूं शकतें याचें वाचकांना आश्चर्य वाटणें साहजिक आहे. पण गर्भारपणीं जसजशी गर्भाची वाढ होत जाते तसतसा गर्भाशयाचा मांसल भागहि वाढत जातो. या वाढींत मांसल भागाची पुनर्निर्मिति तर होतेच, पण या नवीन उत्पन्न झालेल्या मांसल भागानें गर्भाशयाचे स्नायु वाढतात व ते ताणलेही जातात. योनिमार्गांत

आलेल्या थाकट्या भागाला गर्भाशयमुख असें म्हणतात. हा भाग सरळ असतो. हा योनिमार्गात घट्ट धरला गेल्यामुळें हलत नाहीं. याचें योनिमार्गातील तोंड गच्च आंवळून धरलेलें असतें व त्यामुळें बाहेरून कांहींहि आंत जाऊं शकत नाहीं. एक दोन मुलें झालेल्या बायकांत याच्या तोंडाशीं थोडा ढिलेपणा आलेला असतो. तरी देखील थोड्या आंतल्या बाजूला हें मुख गच्च आंवळून धरलेलेंच असतें. या मार्गानेंच पुरुषबीजाला आंत जावें लागतें. आणि त्यास येथें मज्जाव करण्यांतच संततिनियमनाचें कार्य असतें. हें कोणत्या मार्गांनीं साध्य करावयाचें हें पुढें येईलच. या मुखापासून पृष्ठ-भागापर्यंत जी पोकळी असते तिला योनिमार्ग म्हणतात. या मार्गांत गर्भा-शयाचें मुख जरासें पुढें आलेलें असतें. या पुढें येण्यामुळेंच त्या मुखावर संरक्षक टोपी नीट बसवितां येते. टोपीची कडा या मुखावरून जाऊन तिच्या भोंवतीं योनिमार्ग जेथें गर्भाशयाला चिकटलेला असतो, तेथें जाऊन घट्ट बसते व अशा तऱ्हेनें पुरुषबीजाला आंत जाण्यास बंदी करते. या योनिमार्गाची लांबी २॥ ते ३ इंच असते. बाहेरून याचें भोंक दोन बोटें आंत जातील इतकें मोठें असतें, परंतु तें गुरु ओष्ठ व लघु ओष्ठ (Labia Majora and Minora) या दोन अन्तस्त्वचांच्या पटयांनीं आच्छादलेलें असतें. गर्भा-शयाच्या दोन्हीं बाजूंना दोन गर्भाशयरज्जू असतात. रजोवाहक, गर्भाशय-रज्जू वगैरे दोरासारखे भाग हे गर्भाशय बाजूच्या बस्तीच्या अन्तर्भागाला जोडणाऱ्या दोन विस्तृत द्विपत्रबंधांमध्यें असतात. या बंधांच्या योगानें गर्भाशय बस्तीला बांधला गेला असतो. रजोवाहक चार इंच लांब असतो. त्याचें एक टोंक गर्भाशयाच्या वरच्या टोंकाला चिकटलेलें असतें. गर्भाशय व रजोवाहक यांना जोडणारें जें भोंक असतें तें फारच सूक्ष्म म्हणजे एखादा केस आंत शिरेल न शिरेल इतकें लहान असतें! रजोवाहकाचें दुसरें टोंक विस्तृत द्विपत्रबंधामध्येंच पण रजःपिंडाशेजारीं मोकळें सोडलेलें असतें. या टोंकाला लहान लहान धागे चिकटल्यासारखे दिसत असल्यामुळें याचें रूप

एखाद्या फुलासारखें दिसतें; म्हणून या टोंकाला 'अंगुलिप्रसर' असें म्हणतात. रजःपिंडांतून निघालेलें स्त्रीबीज याच अंगुलिप्रसरांतून रजोवाहकांत जातें.

रजःपिंड गर्भाशयाच्या दोन्ही बाजूंना एक एक मिळून दोन असतात. ते विस्तृतद्विपत्रबंधाला लागलेले असतात व रजोवाहक या बंधावरून रजःपिंडाच्या बाजूला येतो. प्रत्येक रजःपिंड सव्वा इंच लांब, पाऊण इंच रुंद व अर्धा इंच जाड असतो.

## रजःपिंडांत होणाऱ्या घडामोडी

रजःपिंडाचा छेद घेतला व तो सूक्ष्मदर्शक यंत्राखालीं पाहिला तर त्यांत आपल्याला दोन भाग दिसतील. एकामध्यें सूक्ष्म धागे इतस्ततः विखुरलेले असतात. त्यांमधून अस्तरवजा जो सूचिपडदा असतो त्यामध्यें अनंत गोल जीवपेशी ( Oocyte ) असतात. या जीवपेशी एकएक फुग्यांत (Graffian follicle ) ठेविलेल्या असतात. या फुग्यांत दोन अस्तरें असतात व त्यांतल्या आंतील अस्तरांत जीवपेशी असते. या दोन अस्तरांत पाणी असतें. हा फुगा फुटला म्हणजे जीवपेशी मोकळी होते व मग सरकत सरकत ती रजोवाहिनीकडे जाते. ही क्रिया चार आठवड्यांतून एकदाच होते.

जन्मतःच मुलीच्या रजःपिंडांत अशा ७०,००० जीवपेशी असतात! यांपैकीं फारच थोड्या पक्व होऊन उपरिनिर्दिष्ट फुग्यांत जाऊन बसतात. पुष्कळसे फुगे फुटतच नाहींत. प्रत्येक महिन्याला एक जीवपेशी बाहेर पडते असें धरलें तर साधारण पंधराव्या वर्षापासून तों पंचेचाळीस वर्षांपर्यंत एका स्त्रीच्या अंडाशयांतून साधारणतः ४०० पक्व जीवपेशी बाहेर पडतात. यांपैकीं अत्यंत अल्प प्रमाणांतीलच जीवपेशींच्या वांट्यास गर्भावस्था येते. याविरुद्ध पुरुषबीजांची संख्या अत्यंत मोठी आहे. एका वीर्यपातांत अशीं पुरुषबीजें ( Spermatozoa ) कोट्यवधी असतात! हीं स्त्रीबीजें व पुरुषबीजें ज्या स्थितींतून रजःपिंडांतून व वृषणांतून बाहेर पडतात त्याच स्थितींत तीं एकमेकांशीं संलग्न होत नाहींत; तर तसें होण्यापूर्वी त्यांमध्यें बरेच बदल होतात.

या फेरफारांत प्रत्येकामध्यें असणारे मनुष्याचे आनुवंशिक विशेष ज्या सूक्ष्म पदार्थांत समाविष्ट झालेले असतात, त्या क्रोमोझोनची संख्या निम्यानें कमी होते. ते प्रत्येक बीजांत चोवीस असतात. पण संलग्न होण्यापूर्वीच्या स्थितींत स्त्रीबीजांत बारा व पुरुषबीजांत बारा अशी त्यांची स्थिति असते.

## दोन्ही बीजांचा योग व त्यांची वाढ

पुरुषबीजांना लांबलचक शेपटी असल्यामुळें ते गर्भाशय-मुखांतून आंत शिरल्यावर आपला पुढला मार्ग सपाट्यानें आक्रमतात. ते तसेच वर जात जात रजोवाहिनींत जातात. तेथें ते जिवंत स्थितींत पुष्कळ दिवस राहूं शकतात. म्हणजे संभोगाच्या वेळीं जरी स्त्रीबीज पुढें आलेलें नसलें तरी हें पुरुषबीज स्त्रीबीजाची वाट पाहत बरेच दिवस राहतें व जेव्हां स्त्रीबीज तेथें उपस्थित होतें तेव्हां या दोहोंचा संयोग होतो. स्त्रीबीज एकच असल्यामुळें त्याच्याशीं संलग्न होण्यास एकाच पुरुषबीजाची आवश्यकता असते. अशा रीतीनें यशस्वी पुरुषबीज स्त्रीबीजांत प्रविष्ट झालें म्हणजे इतरांना आंत जाण्यास मज्जाव होतो. अशा रीतीनें त्यांचा संयोग झाल्यावर जी स्थिति प्राप्त होते तिला गर्भ हें नांव देण्यांत येतें. ही क्रिया बहुशः रजोवाहिनींत घडून येते. बाहेरील जगाप्रमाणेंच स्त्रीबीज विनयशील असतें. तें गजगतीनें सावकाश सावकाश मार्गक्रमण करतें, तर पुरुषबीज नेहमींच उतावळें असतें. तें स्त्रीबीजाची वाट न पाहतां धांवत धांवत त्याला भेटावयास जातें. रजोवाहिनींत त्यांची भेट झाल्यावर तें युग्म खालीं गर्भाशयांत उतरतें व गर्भाशयाच्या अस्तरांत त्यांची जीवनयात्रा संथपणें सुरू होते.

## रजःपिंड व वृषण यांचीं इतर कार्यें

शरिरांत दोन प्रकाराच्या ग्रंथी किंवा पिंड असतात. त्यांपैकीं एकीला रसवाहिनी किंवा नलिका असतात. अशांपैकीं ग्रंथी म्हणजे यकृत वगैरे ग्रंथी होत. दुसऱ्या कांहीं ग्रंथी अशा आहेत कीं, त्यांचा रस बाहेर नेण्यास नलिका नसतात. अशा नलिकाविरहित ग्रंथींस अमृतपिंड ( Ductless glands ).

असें म्हणतात. यांच्यामध्यें जो रस किंवा स्राव उत्पन्न होतो तो नलिकेंतून दुसरीकडे न जातां एकदम रक्तांत मिसळतो व आपापलें विशिष्ट कार्य करतो. या अन्तःस्रावाचें महत्त्व फार आहे. त्याच्यावर आपली जीवितयात्रा सुद्धां अवलंबून आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. यांपैकीं रजःपिंड व वृषण यांच्या अन्तःस्रावाबद्दलच आपल्याला प्रस्तुत विचार करावयाचा आहे. या अन्तःस्रावाच्या योगानें शरिरावर दिसणारे लैंगिक विशेष (Secondary sexual characters) दृष्टीस पडतात. पुरुषांच्या बाबतींत मिशा येणें, आवाज मोठा होणें वगैरे व बायकांच्या बाबतींत आवाजांत माधुर्य, नितंबांत मोहकपणा, स्तनांची योग्य वाढ वगैरे गोष्टी होतात. हे विशेष उत्पन्न होण्यास उपरिनिर्दिष्ट अन्तःस्रावाची आवश्यकता असते. हें सिद्ध करण्याचे कामीं दोन संशोधकांचे श्रम कारणीभूत झाले आहेत.

[१]ब्राउन सेक्वर्ड यांनीं १८९१ मध्यें या दृष्टीनें केलेले शोध प्रसिद्ध केले. ते बहात्तर वर्षांचे असतांना त्यांनीं वृषणाचा भाग आपल्या अंगांत टोचून घातला व त्यापासून त्यांच्या शरिरामध्यें तरुणपणाचे विशेष दिसूं लागले! हा शोध प्रसिद्ध झाल्यापासून अशा दिशेनें प्रयत्न सुरू झाले. इतर प्राण्यांवरहि प्रयोग होऊं लागले. प्राण्यांतील नरांचें वृषण काढून घेतल्यानें त्यांचे लैंगिक विशिष्ट गुण वाढत नाहींत असें सिद्ध झालें आहे. काळवीट व एक तऱ्हेचे मेंढे यांना शिंगें येत नाहींत. अशा प्राण्यांमध्यें जर पुन्हा वृषण टोचून घातलें तर ते विशेष हळू हळू दिसूं लागतात. या दृष्टीनें विशेष संस्मरणीय प्रयोग डॉ. व्हेरोनॉक यांनीं केले आहेत. त्यांनीं कित्येक वृद्धांमध्यें वृषण शस्त्रक्रिया करून घातल्यानें अशा वृद्धांना तारुण्य प्राप्त झालें आहे. डॉ. व्हेरोनॉक कांहीं दिवसांपूर्वी हिंदुस्थानांत आले होते व त्यांनीं इंदूर येथील प्रसिद्ध नगरशेट हुकूमचंद यांच्यावर हे प्रयोग केले होते.[२]

१. यांचें चरित्र ' वैद्यक शास्त्रांतील संशोधक ' यांमध्यें आलें आहे.

२. याविषयीं जास्त माहिती ' नवजीवना'च्या १९३२ सालच्या दिवाळी अंकांत आलेल्या ' नवजीवन ' या लेखांत जिज्ञासूंना सांपडेल.

स्त्रियांच्या बाबतींत मात्र रजःपिंड काढल्यानें आर्तवस्राव थांबण्यापलीकडे विशेषसा दृश्य फरक होत नाहीं. कदाचित् स्तन थोडे लहान होतात, गर्भाशय आकुंचन पावतो व मेदोवृद्धि होते.

रजःपिंडांत असणाऱ्या फुग्यांतून जीवपेशी निघून गेली म्हणजे जो भाग राहतो त्याला कॉर्पस ल्युटिअम असें म्हणतात. यामध्येंहि अन्तःस्राव असतो असें सिद्ध झालें आहे व त्याचा आणि गर्भारपण व स्त्रियांचे विशेष यांचा संबंध आहे असें दाखवून देण्यांत आलें आहे.

## ऋतुस्नान

प्रत्येक स्त्रीला दर महिन्याला जो आर्तवस्राव होतो त्याचें सुद्धां कारण उपरिनिर्दिष्ट कॉर्पस ल्युटिअम याचेंच कार्य होय. एकदा जीवपेशी रजःपिंडांतून निघून गेली म्हणजे तिचें गर्भांत रूपान्तर व्हावें, अशीच निसर्गाची योजना असते व तसें झालें म्हणजे त्याच्या वाढीस उपयोगी पडावा म्हणून रक्ताचा सांठा या अन्तःस्रावामुळें गर्भाशयाच्या अस्तरांत करून ठेवण्यांत येतो. गर्भधारणा जर झाली नाहीं तर हा कॉर्पस ल्युटिअम निरुपयोगी होऊन आकुंचित होतो व गर्भाशयांतील निसर्गक्रियेनें सांठलेलें रक्त बाहेर निघून जातें व त्यालाच आपण ऋतुस्नान असें म्हणतों.

---

# प्रकरण पांचवें

# गर्भधारणेचें नियमन

संततीचें नियमन करणें म्हणजेच गर्भधारणा होऊं न देण्याची काळजी घेणें होय. यासाठीं गर्भधारणेला ज्या गोष्टी आवश्यक आहेत, त्याच न होऊं देणें व तशा त्या होण्याचा संभव असल्यास त्यांना वेळींच प्रतिबंध करणें यांशिवाय दुसरा उपाय नाहीं. गर्भधारणेला पुरुषबीज व स्त्रीबीज यांचा संयोग होणें जरूर आहे. त्याला प्रतिबंध एकाच उपायानें करतां येईल. तो म्हणजे पुरुषबीजाला गर्भाशयांत जाण्यास मज्जाव करणें हा होय. स्त्रीबीज अर्थातच गर्भाशयाच्या बाहेर कधींच येत नाहीं व रजःपिंडांतून गर्भाशयांत येण्यास त्याला प्रतिबंध करणें आपल्या हातांत नाहीं. पुरुषबीज मात्र बाहेरून गर्भाशयाकडे जात असतें. अशा स्थितींत त्यालाच जर मार्गामध्यें अडवून धरलें किंवा त्याचा मध्येंच बींमोड केला तर गर्भ राहणें शक्य होणार नाहीं. अशी अडवणूक करण्याला अर्थात् दोन मार्ग आहेत. एक तर पुरुषबीज गर्भाशयाकडे जाणार नाहीं, किंबहुना तें योनिमार्गांतहि पडणार नाहीं अशी व्यवस्था करणें व दुसरा म्हणजे तें योनिमार्गांत आल्यावर त्यास रबरी टोप्यांनीं किंवा अन्य कांहीं साधनांनीं अडथळा करणें किंवा औषधींनें मारून

टाकणें हा होय. ब्रह्मचर्याचा अवलंब केल्यानें बीजांचें एकत्रित होणें वगैरेंचा संभवच उपस्थित होत नाहीं. हा संततिनियमनाचा पहिला प्रकार झाला. दुसरा प्रकार म्हणजे वीर्य पडण्यापूर्वीच इंद्रिय योनिमार्गांतून काढून टाकणें किंवा त्रुटित संभोग हा होय. दुसऱ्या मार्गामध्यें संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांचा समावेश होतो. तिसराहि एक प्रकार आहे. तो म्हणजे कांहीं एका विवक्षित मर्यादेंतच संभोग करणें किंवा सुराक्षित कालांत संभोग करणें हा होय. या सुरक्षित कालांत स्त्रीबीजाचा संभव नसतो अशी कल्पना आहे. इतके प्रकार गर्भधारणेचा प्रतिकार करूं शकतील. हे सर्व यशस्वी होतीलच असें नाहीं. त्यांतले कांहीं यशस्वी आहेत तर कांहींबद्दल जबरदस्त शंका आहे. यासाठीं प्रत्येक प्रकाराचा अलग रीतीनें पण संक्षेपानें विचार करणें भाग आहे.

## ( १ ) ब्रह्मचर्य

याचा प्रचारांत असलेला अर्थ येथें लागू होत नाहीं. ब्रह्मचर्याचा खरा अर्थ म्हणजे विवाहच न करणें होय. परंतु त्या ब्रह्मचर्याशीं आपल्याला तादृश कांहीं करावयाचें नाहीं. एकदा विवाह केला म्हणजे मग मुलें न व्हावींत म्हणून ब्रह्मचर्य पाळावें किंवा नाहीं हा वादाचा मुद्दा आहे. विवाह झाला म्हणजे मुलें होणारच, असें जें आपण म्हणतों त्याचा खरा अर्थ मुलें होण्याचा संभव आहे असा आहे. कारण मुलें ज्या योगानें होतात तो संभोग विवाहानंतर खात्रीनें होणार याबद्दल कोणालाच शंका नसते व म्हणूनच वरील म्हण प्रचारांत पडली आहे. पण संततिनियमनाचा हा जो प्रकार आहे त्यांत लग्न तर लावावयाचें, पण त्याचा जो परिणाम म्हणजे संभोग तो होऊं द्यावयाचा नाहीं अशी कल्पना गृहीत धरण्यांत आली आहे. अर्थात् या परस्परविरोधी गोष्टी कशा शक्य आहेत व कदाचित् असल्या तरी त्या कां कराव्यात हा विचारणीय प्रश्न आहे. दोन प्रेमी जीव एका ठिकाणीं राहून, निरनिराळ्या ठिकाणीं राहिल्याप्रमाणें त्यांनीं वर्तणूक ठेवावयाची याचा परिणाम त्यांच्या मनावर झाल्याशिवाय रहात नाहीं. विचारानें व निग्रहानें ते ब्रह्मचर्य पाळतील.

पुणे मराठी ग्रं
४३७ नारायण
दा. नं. ८५९८

पण त्याचा त्यांच्या मनावर व शरिरावर वाईट परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. एवढं कशासाठीं करावयाचें तर मुलें होऊं नयेत म्हणून! पण त्याला हा आडमार्ग कशाला? लग्नापूर्वीच विचार करून विवाह थांबविण्याला कोण नको म्हणत होतें? पण जेवणासाठीं पानावर तर बसावयाचें पण अपचन होईल म्हणून तसेंच उठावयाचें! अशक्य गोष्टींच्या मागें लागून तन मन दोन्ही बिघडवून घेणें हें केव्हांहि शहाणपणाचें नाहीं. याच्या योगानें पति-पत्नींच्या अन्य संबंधांतहि अडचणी उत्पन्न होतात. दोघेहि किरकिरे, क्षुल्लक कारणानें रागावणारे व उदास बनतात. त्यामुळें कुटुंबांत ज्या सुखाची किंवा जीवनाची अपेक्षा असते तें सुख किंवा तें जीवन कधींहि उपभोगावयास मिळत नाहीं. या व इतरहि अनेक कारणांसाठीं हा मार्ग निरुपयोगीच नव्हे, पण धोक्याचाहि आहे.

## ( २ ) सुरक्षित काल

स्त्रियांच्या मासिक स्रावाच्या दरम्यान असा एक काळ येतो कीं, त्या वेळीं गर्भधारणा होणें शक्य नसतें, अशी समजूत बरीच दृढ झाली आहे. त्या काळामध्यें संभोग केला असतां संततिनियमनाची जरूरी नाहीं या समजुतीनें ख्रिश्चन धर्माच्या पुरस्कर्त्यांनीं कोणत्याहि कृत्रिम साधनसामग्रीपासून अलिप्त असणाऱ्या या संततिनियमनाला परवानगी दिली आहे. या काळामध्यें स्त्रीबीज क्वचितच बाहेर पडतें व तेंच जाग्यावर नसल्यामुळें पुरुषबीज गर्भाशयांत जाऊनहि कांहीं उपयोग होत नाहीं अशी कल्पना आहे. पण पुरुषबीज आठ आठ दिवस गर्भाशयांत जिवंत व प्रभावी राहूं शकतें हें विसरून चालणार नाहीं! दुसरें असें कीं, या सुरक्षित कालाची मर्यादा अजून कोणालाच कायम करतां आली नाहीं. साधारण हा काळ दोन स्रावांच्या मध्यावर असतो असें गृहीत धरण्यांत आलें आहे. याची मर्यादा ३ ते १५ दिवस इतकी कमजास्त होऊं शकते. हा काळ ओळखण्याचें एक गमक असें आहे कीं, या काळांत स्त्रियांना संभोगाची इच्छा होत नाहीं. ज्या वेळीं स्त्रीबीज गर्भाशयांत येतें त्या वेळीं

संभोगाची इच्छा फार असते व अशा वेळीं झालेल्या संभोगानें गर्भधारणा हटकून होते. यावरून स्त्रियांना आपला सुरक्षित काल ओळखतां येतो असें म्हणतां येईल. ठोकळ मानानें हा नियम जरी खरा असला तरी पुष्कळ बायकांची परिस्थिति लक्षांत घेऊन यासंबंधीं नियम बसविले पाहिजेत. न्यूयॉर्क येथील प्रख्यात डॉ. डिकिन्सन यांचें मत जरा निराळें आहे. त्यांनीं या विषयाचा बराच अभ्यास केला आहे व त्यांनीं असें सिद्ध करून दिलें आहे कीं, स्रावानंतर आठ ते दहा दिवस गर्भधारणेचा अत्यंत संभव असतो व तो कमी होत होत शेवटच्या आठवड्यांत हा सुरक्षित काल येतो व यांत दहांमध्यें एखाद्याच बाईला गर्भधारणा होऊं शकते. म्हणजे या कालांतहि स्त्री सुरक्षित असते असें निःशंकपणें म्हणतां येत नाहीं.

संभोग या कालापुरताच मर्यादित करण्याला बरेच महत्त्वाचे आक्षेप आहेत. एक तर या कालामध्यें स्त्रियांना मुळींच इच्छा नसते व त्यांच्या या अशा निरिच्छ स्थितीमध्यें त्यांच्यावर संभोग लादणें म्हणजे एक बळजबरीचाच प्रकार आहे. फक्त येथें बळजबरी खुषीची असते एवढेंच! इतर प्राण्यांमध्यें तरी निदान गर्भधारणेचा काल ठराविक असतो व त्या वेळीं संभोग घडून येतो. एरवीं त्यांच्यांतील एक पक्ष संभोगाला केव्हांहि तयार नसतो. दुसरा आक्षेप असा आहे कीं, संभोग हा वाटेल तेव्हां व वाटेल त्या मनःस्थितींत योग्य रीतीनें होत नाहीं. त्याला दोघांच्याहि मनःस्थिति पूर्ण अनुकूल व्हाव्या लागतात. या ठिकाणीं त्या तशा कधींच नसतात. एक तर स्त्रियांना या वेळीं इच्छाच नसते व दुसरें पुरुषांना जरी संभोग करावासा वाटला तरी त्या वेळीं तसें करणें म्हणजे आपल्या पत्नीची इच्छा नसतांना आपल्यासाठीं तो तिच्यावर लादल्यासारखें होतें, व तिचें मनहि तितकेंसें तयार नसतें. आपल्या इच्छेसाठीं बायकोचा नुसता उपयोग करणें ही कल्पना कोणालाहि चमत्कारिकच वाटेल. या प्रकारानें अशी परिस्थिति उत्पन्न होणें संभवनीय आहे कीं, ज्या वेळीं स्त्रीपुरुषांना संभोगाची इच्छा नसते त्या वेळीं त्यांना तो करणें भाग

पडेल व ज्या वेळीं त्यांची तशी इच्छा असते त्या वेळीं मात्र त्यांना तो करण्याचा मज्जाव होईल. या प्रकाराविरुद्ध तज्ज्ञांकडून निदर्शित केलेल्या या युक्तिवादांतील इच्छा, अनिच्छा किंवा सक्ती अथवा बळजबरी यांसंबंधींचे मुद्दे एरव्हींच्या परिस्थितीसहि लागू होण्यासारखे असल्यामुळें ते तितके महत्त्वाचे नाहींत असें म्हणतां येण्यासारखें आहे. पण या बाबतींतील दुसरें व निर्णयात्मक एक कारण असें आहे कीं, या सुरक्षित समजल्या जाणाऱ्या काळांत स्त्री खात्रीनेंच सुरक्षित असते असें नाहीं. कारण या वेळींहि गर्भधारणेचा संभव, थोड्या प्रमाणांत कां होईना, पण असतोच.

## ( ३ ) त्रुटित संभोग

या प्रकारामध्यें वीर्यपतनापूर्वींच संभोग पुरा करण्यांत येतो व तसें केलें असतां पुरुषजीवाला आंत जाण्याला वावच सांपडत नाहीं अशी समजूत आहे. हा प्रकार आतांपर्यंत बराच प्रचारांत होता. आपल्याकडेसुद्धां याचीं उदाहरणें पुष्कळ सांपडतात. संततिनियमनाच्या साधनांची माहिती नसल्यामुळें किंवा माहिती असूनहि तीं आणविण्याचें धैर्य नसल्यामुळें या प्रकाराचा उपयोग करण्यांत येतो. याच्यापासून तोटे होतात हें माहीत असूनहि वायकोला मृत्युमुखांत ढकलण्यापेक्षां याचा उपयोग करणें जास्त श्रेयस्कर आहे अशा विचारसरणीचे लोक मला माहीत आहेत. त्यांत त्यांना दोष देतांना बराच विचार करावा लागेल. अलीकडे अलीकडे बरेच सुशिक्षितहि याचा अवलंब करीत होते. या संबंधांत वस्तुतः सुशिक्षित व अशिक्षित असा आपल्याकडे भेद करतांच यावयाचा नाहीं. कारण सुशिक्षितांशिवाय इतरांना अजून संततिनियमनाची गंधवार्तासुद्धां नाहीं! अलीकडे मात्र हा विषय लोकांच्या परिचयाचा होऊं लागला आहे व त्यामुळें अन्य साधनें उपलब्ध होण्याचा संभव वाढल्यानें लोक यापासून परावृत्त होऊं लागले आहेत. असें होण्याला मेरी स्टोप्स यांच्या ‘ वाइज पेरेंटहुड ’ या पुस्तकाचा बराच

उपयोग झाला. त्यांत त्यांनीं याचा सांगोपांग विचार करून यापासून होणारे तोटे निःसंदेह रीतीनें दाखवून दिले आहेत.

सर्वांत महत्त्वाचा आक्षेप असा आहे कीं, ज्यासाठीं हा प्रकार उपयोजावयाचा तें वीर्यपतनच यानें थांबवितां येत नाहीं किंवा थांबवितां आलें तरी पतनाआधींसुद्धां पुरुषबीज योनिमार्गांत जाण्याचा पुष्कळ संभव असतो; म्हणून यापासून अपेक्षिलें जाणारें कार्यच कसें साध्य होत नाहीं हें, याची क्रिया कशी होते हें लक्षांत ठेविलें म्हणजे कळून येईल. कोणतेंहि कार्य करितांना त्याच्या विवक्षित मर्यादेपर्यंत तें जाऊं देणें हें नेहमींच आवश्यक असतें. जर विहिरींत किंवा तळ्यांत उडी मारावयाची असेल तर ती जेथें पडावी अशी आपली अपेक्षा असेल तेथेंच ती पडली पाहिजे. पण एकदा झोंक गेल्यावर त्या जागीं दगड आहे असें आपल्याला कळलें व आपण दुसरीकडेच झुकलों तर काय परिणाम होईल? वाटेल त्या ठिकाणीं व वाटेल त्या रीतीनें पडल्यामुळें अंगाला मार बसेल व फार त्रास होईल. तसेंच येथें होतें. त्रुटित संभोगांत इंद्रिय उत्थापित स्थितींत असल्यामुळें त्याला एकदम काढून घेण्यानें त्रास पोहोंचतो व हा त्रास एकट्या पुरुषालाच होतो असें नाहीं तर स्त्रीहि त्याची भागीदारीण असते. संभोग सुरू असतांना या प्रकारांत मनुष्याचें लक्ष वीर्यपतन केव्हां होईल इकडे असतें व त्यामुळें मनावर विलक्षण दाब असतो. असा दाब सतत राहिल्यानें लोकांना मानसिक रोग जडल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. दुसरें असें कीं, वीर्यपतनाच्या आधींसुद्धां वीर्य झिरपत असतें व अशा झिरपण्यांतून देखील पुरुषबीज आपला मार्ग गर्भाशयाकडे काढतें. या दुहेरी कारणासाठीं हा प्रकार निरुपयोगी तर आहेच, पण तेवढ्यावर न भागतां तो निंद्यहि आहे असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. संततिनियमनाच्या अन्य उपयुक्त साधनांचा जसजसा जास्त प्रसार होत जाईल, तसतसा या प्रकारांना आळा बसेल यांत शंका नाहीं. पण एके काळीं त्यापासून समाजांतील कांहीं घटकावयवांना बराच

त्रास पोहोंचला ही गोष्ट खरी आहे. यासारखा दुसराहि एक प्रकार आहे. त्यांत वीर्यपतनच होऊं नये याबद्दल काळजी घ्यावयाची असते. म्हणजे स्त्रीपुरुषांनीं संभोगस्थितींत कांहींहि हालचाल न करितां तास न् तास बसणें व वीर्यपतनाला उत्तेजनच न देणें हा या मार्गाचा विशेष आहे. हा मार्ग अमेरिकेंत एका विशिष्ट टापूंत प्रचारांत होता. त्या टापूला 'ओनीडा कॉलनी' असें म्हणत. हल्लीं ती नामशेष झाली आहे. या प्रकाराचा नामनिर्देश करण्यापलीकडे त्याला महत्त्व देण्याचें कारण नाहीं. हा येथें सांगण्याचें कारण एवढेंच कीं, अशा किती तरी पद्धती संततिनियमनासाठीं उपयोगांत होत्या व क्वचित् आहेतहि. यांपेक्षांहि सर्वांना ऐकून माहीत असलेली समजूत म्हणजे लहान मूल अंगावर पीत आहे तोंवर गर्भ रहात नाहीं ही होय. साधारणतः मूल झाल्यावर दहा महिने मुलाला पाजणें योग्य आहे व साधारण नियम असा आहे कीं, या कालांत गर्भधारणा होत नाहीं. परंतु याला नियम असें म्हणतां यावयाचें नाहीं. कारण त्या वेळीं गर्भ राहाणें शक्यच नाहीं असें कोणालाहि सांगतां येणार नाहीं. यासाठीं संततिनियमनाच्या दृष्टीनें याचा कांहींच उपयोग नाहीं. वर्षाचा पाळणा असणाऱ्या कांहीं बायका आहेतच. त्यांचें अस्तित्वच या समजुतीविरुद्ध आहे.

संततिनियमनाच्या साधनांव्यतिरिक्त जे कांहीं मार्ग अनुसरण्यांत येतात त्यांचें इतका वेळ विवेचन केलें. त्यांचें वैयर्थ्य अर्थातच उघड आहे; परंतु हीं साधनें उपलब्ध होण्यापूर्वी व तीं उपलब्ध जरी झालीं तरी सर्वांच्या हातांशीं येण्यापूर्वीं हेच मार्ग उपयोजिले जात होते व त्या दृष्टीनें नुसता इतिहास म्हणूनच नव्हे, तर मनुष्याची संततिनियमनाची इच्छा किती प्रबळ असते हें दाखविण्याचा सबळ पुरावा म्हणूनहि या गोष्टींचा उल्लेख करणें योग्य ठरेल. त्या वेळीं लोकांना यांपेक्षां अन्य उपाय दिसले नाहींत हा त्यांचा दोष नव्हे. ते उपायच त्यांच्या पासून लपवूं पहाणाऱ्या माहितगार लोकांचा हा दोष आहे. त्याला ते काय करणार ?

गर्भधारणेचें नियमन एकाच मार्गानें विशेष त्रास न होतां होतें व तो मार्ग म्हणजे नियमनाच्या साधनांचा उपयोग करणें हा होय. असा उपयोग करणें इष्ट कीं अनिष्ट हें प्रथमतः पाहूं व नंतर तो करण्याचीं साधनें कोणतीं याचें विवरण यथावकाश पुढें करूं.

---

## प्रकरण सहावें

# संततिनियमनाचें आरोग्यदृष्ट्या विवेचन

संततिनियमनाचा आरोग्यदृष्ट्या विचार दोन प्रकारांनीं करतां येईल. एक प्रकार उघडच आहे. तो म्हणजे संततिनियमन आरोग्यदृष्ट्या कसें आहे, त्यानें आरोग्याची हानि होते किंवा तें आरोग्यकारक आहे, तें केल्यानें स्त्रियांना किंचित् मात्र कां होईना, पण तात्कालिक किंवा फार दिवस टिकणारे रोग होण्याचा संभव आहे किंवा कसें, तत्काळ जरी नव्हे तरी वर्षानुवर्षे त्याचीं साधनें वापरल्यानें गर्भाशयाला कांहीं धोका पोहोंचतो का, वगैरे प्रश्न व तदंगभूत उपप्रश्न व त्यांचीं उत्तरें एकाच तऱ्हेच्या विचारसरणींत अन्तर्भूत होतात, तर दुसरी विचारसरणी अशी कीं संततिनियमनाची आरोग्यदृष्ट्या कांहीं आवश्यकता आहे काय, किंवा त्याचीं साधनें उपयोगांत आणल्यानें स्त्रियांचें आरोग्य चांगलें राहूं शकेल अथवा गेलेलें आरोग्य परत मिळूं शकेल काय वगैरेंचा विचार या दुसऱ्या प्रकारामध्यें समाविष्ट होतो. प्रथमतः ही दुसरी बाबच आपण विचारांत घेऊं. तिचें विस्तृत विवेचन करण्यापूर्वी प्रथमतः हें सांगणें इष्ट आहे कीं, संततिनियमनाची जर कशासाठीं अत्यंत आवश्यकता असेल तर ती फक्त स्त्रियांची प्रकृति ढांसळूं नये व रोगी स्त्रियांना मुलें होऊं नयेत एवढ्याच

सार्टी होय. आर्थिक, सामाजिक वगैरे विचार बाजूला ठेवले तरी मनुष्य-हानि होऊं नये अशी जर समाजाची इच्छा असेल तर मर्यादित रूपांत कां होईना, पण समाजानें संततिनियमनाला पाठिंबा हा दिलाच पाहिजे. संतति-नियमनाची योजना पटण्यासारखी परिस्थिति गरीब व मध्यम स्थितींतील लोकांना विशेष भासते. श्रीमंतांना सामान्यपणें थोडींच मुलें होतात. त्या-वरून ते संततिनियमन करतात असा अर्थ नव्हे; परंतु कांहीं थोडीं उदा-हरणें वगळल्यास त्यांना संततिनियमनाची विशेषशी जरूरी आहे असें दिसत नाहीं. दर वर्षाला बाळंतपण व तदंगभूत कष्ट हे मध्यम स्थितींतील व गरीब स्त्रियांनाच जाचक होतात. पहिल्या बाळंतपणांतून उठून सहीसलामत सुटका होते तोंच दुसऱ्या गर्भारपणाला सुरुवात होणें हेंच त्यांचें ठरलेलें जीवन असतें; म्हणजे गर्भारपण व बाळंतपण यांशिवाय पुष्कळांना दुसरें जीवनच माहीत नसतें! या महत्त्वाच्या दोन जबाबदाऱ्या सदैव शिरावर बसल्यानें त्यांच्या शरिराची कशी अवस्था होत असेल हें जाणण्याला कल्पनेचें कांहींच कारण नाहीं. कारण सहज जर आपण समाजांत पाहूं लागलों तर अशा हजारों स्त्रिया आपल्या दृष्टीला पडतील.

असा क्रम सुरू असल्यानें प्रकृतीची नीट जपणूक करण्याला व ती खालावली असली तरी तिला पुन्हां पूर्व पदावर आणण्याला अशा स्त्रियांना वेळच सांपडत नाहीं व त्यामुळें त्यांचा शक्तिपात क्रमशः पण निश्चित रीतीनें होत असतो. रक्त कमी होण्यानें त्यांच्या शरिरावर पांडुरता कायमचीच दृग्गोचर होते व अशक्तपणा आणि रक्ताचें अल्प प्रमाण या दोन कारणांनीं अशा स्त्रियांना पांडुरोग किंवा क्षय यांपैकीं कशाची तरी भावना होते. या भावनेलाच बाळंत रोग असें म्हणतात. बाळंत रोग हें नांवच, या दोन भयंकर रोगांचें मूळ बाळंतपणांत आहे हें दर्शवितें! वास्तविक पाहिलें असतां बाळंत-पण हा कांहीं रोग नाहीं, ती नैसर्गिक क्रिया आहे, तो शरीरधर्म आहे; असें असतांना या नैसर्गिक गोष्टीचें पर्यवसान उपरिनिर्दिष्ट भयंकर रोगांत कां

व्हावें याचा विचार ज़रूर केला पाहिजे. इतर कोणतेहि प्राणी घेतले तरी त्यांना असे रोग होत नाहींत. कारण त्यांच्यांत हा व्यापार निसर्गनियंत्रित आहे. त्यांचें संततिनियमन आपोआपच होत असतें. परंतु मनुष्यांमध्यें मात्र हे रोग वाढतात. याचें कारण हा नैसर्गिक क्रमच अनियंत्रित रीतीनें व लवकर सुरू होतो व शरिराला जी विश्रांति पाहिजे असते ती मिळत नाहीं हें होय. जेवण हें जरी नैसर्गिक असलें तरी त्याचें अतिरिक्त सेवन अपचनाला कारणीभूत होतें, तोच न्याय यासहि लागू आहे. अपचन होऊं नये म्हणून जेवणामध्यें कांहीं पथ्य पाळावें लागतें त्याप्रमाणेंच यामध्येंहि पथ्य पाळण्याची अत्यंत आवश्यकता असते. तेथें जसें अपचन न होईल इतक्या प्रमाणांतच अन्नाचें सेवन करावें लागतें त्याप्रमाणेंच येथेंहि हे रोग होणार नाहींत इतक्या प्रमाणांतच अपत्य-प्रसवाचे प्रसंग येणें जरूर असतें. याला अर्थात् अन्नाच्या अल्प सेवनाप्रमाणें अल्प प्रमाणांत संभोग कारणीभूत होईल असें कोणी म्हणतील; पण तें बरोबर नाहीं. कारण आपल्याला या बाबतींत कांहीं प्रमाणच बसवितां येणें शक्य नाहीं. कारण कोणत्या संभोगानें कोणत्या वेळीं गर्भधारणा होईल याचा कांहीं भरंवसा नसल्यामुळें अल्प सेवन हा उपायच या कामीं संभवत नाहीं. याकरितां संततिनियमनाची ज्या काळपर्यंत आवश्यकता वाटेल त्या काळपर्यंत संभोगापासून सर्वस्वीं अलिप्तच रहावें लागेल! हा उपाय अर्थातच शक्य नाहीं. याकरितां संभोगसुखास न मुकतां संततिनियमन साधेल असेच कांहीं तरी उपाय योजणें अवश्य आहे; आणि म्हणूनच प्रस्तुतच्या संततिनियमनाच्या चळवळींत तशा प्रकारचेच उपाय सुचविण्यांत येत असतात.

गरीब लोकांच्या चाळींतून काय स्थिति असते इकडे जर लक्ष दिलें तर काय दिसून येईल? एखाद्या घरांत एका खालोखाल एक अशीं सातआठ कच्चींबच्चीं, उघडीं तर उघडीं किंवा फाटकेतुटके कपडे घालून आंत बाहेर खेळत आहेत. या सर्वांना जगांत आणण्याचें प्रायश्चित्त मातेला भोगावें लागतें. तिचा कृश झालेला देह घरकामांनीं गांजून गेला आहे. नुसतें

घरकाम व मुलांची जोपासना यांचे श्रम करूनहि भागत नाहीं, तर वरती काम करून पोटालाही मिळवावें लागतें. जें कांहीं थोडें पोटाला मिळतें त्यांतूनच नवऱ्याच्या दारूचें व्यसन भागवावें लागतें ! हें सगळें रहाटगाडगें बाळंतपणापर्यंत सुरू असतें व बाळंतपणसुद्धां मुलाबाळांच्या देखत त्याच एका खोलींत होतें ! बाळंतपणाची जरी इस्पितळांतून फुकट सोय आहे तरी पण अशा बायांना त्या सोयीचा मुळींच फायदा घेतां येत नाहीं. कारण बाळंत होईतोंपर्यंत त्यांना आपल्या लहान मुलांची जोपासना करावयाची असते. बाळंतीण झाल्यावर अर्थातच त्यांना लवकर उठल्याशिवाय गत्यंतर नसतें व एकदा उठलें कीं, नवरा आपला हक्क गाजवितोच ! व पुन्हा हें चक्र सुरू होतें. अशा तऱ्हेनें झालेलीं मुलें अशक्त असतात व कधीं कधीं तीं अकालींच मृत्युमुखींहि पडतात. त्यामुळें वरून जरी मातांना दुःख होत असलें तरी अंतर्यामीं त्यांना थोडें समाधान होतें. त्यांना जर सहानुभूतिपूर्वक विचारलें तर त्या ही गोष्ट कबूल करतात. या बायांना होणारीं मुलें त्यांना खरोखरच हवीं असतात का, असा जर प्रश्न केला तर उत्तर काय येईल ? या दृष्टीनें १९२४ मध्यें लंडनमधील गाईज् हॉस्पिटलच्या आसपास असणाऱ्या व त्या हॉस्पिटलमध्यें ज्यांचीं बाळंतपणें झालीं अशा बायांना दहाव्या दिवशीं हा प्रश्न विचारण्यांत आला. दहाव्या दिवशीं विचारण्याचा मुद्दा हा कीं, एक तर त्या दिवशीं हॉस्पिटलांतून त्या घरीं जातात व दुसरें बाळंतपणांतील दुःख थोडें कमी झालेलें असल्यामुळें मुलाविषयीं प्रेम वाटूं लागलेलें असतें. अशा वेळीं विचारल्यास झटकून 'मुलें हवींत' असाच जबाब येण्याचा संभव जास्त असतो. इतकें असूनहि ७८ बायांपैकीं ४८ बायांनीं, आपल्याला मुलांची त्या वेळीं यत्किंचितहि हौस नव्हती असें सांगितलें. परंतु मुलें होणें ईश्वराधीन आहे, ही भावना दृढ असल्यामुळें आहे त्या स्थितींत संतोष मानण्यापेक्षां त्यांना दुसरें कांहींहि करतां येत नाहीं. 'नशिबांत असेल त्याप्रमाणें होईल,' अशीच या लोकांची

भावना असते. हें नशीब आपणच उत्पन्न करतों याची जाणीव त्यांना कशी असणार? ती त्यांना करून दिली पाहिजे. हें चक्र चुकविण्याचें आपल्या हातांत आहे असें जर त्यांना कळलें तर त्यांना किती आनंद होईल? पण त्यांना हें कोण पटवून देणार किंवा पटवून दिल्यावर त्यांच्याकडून तें आचरणांत कोण आणविणार? या दृष्टीनें सौ. कुसुमाबाई देशपांडे यांनीं 'संजीवनी'-मध्यें लिहिलेल्या लेखांतील पुढील उतारा उद्धृत करण्याजोगा आहे. "एक बाई तिच्या पांचव्या किंवा सहाव्या बाळंतपणाकरितां नागपूर येथील एका 'सूतिकागृहां'त आली होती. तिचा नवरा कारकून होता. घरांत वडीलधारें माणूस कोणीच नव्हतें. जवळच्या एका शेजाऱ्यानें सर्व मुलांना आपल्या येथें ठेवून घेतलें होतें. शेवटच्या नंबराला नुकतेंच वर्ष लोटलेलें दिसत होतें. शेजाऱ्याला तें मूल सांभाळणें त्रासाचें वाटत होतें व त्या मुलाला पण आई-शिवाय चुकल्यासारखें वाटत असल्यामुळें त्या बाईला बाह्यदर्शनीं सर्व सुख-सोयींची अनुकूलता व आराम होता तरी तिचें अंतःकरण घरीं असलेल्या कच्चाबच्च्यांच्या विवंचनेमुळें आंतल्याआंत जळत होतें. त्यांच्या भविष्याबद्दल तर ती साशंक होतीच, पण सध्यां दारिद्र्यामुळें होत असलेल्या त्यांच्या आबाळीबद्दल तिचें मन तिला खात होतें व या सर्व पापाचे धनी आपण आहोंत असें तिला वाटत होतें. एक दिवस सर्व मनस्ताप असह्य होऊन ती रडूं लागली व 'देवा, आम्हांला जर या बाळांना पोसावयाचें सामर्थ्य नाहीं, तर आमच्या घरीं त्यांना जन्म देतोस तरी कशाला?' असें ती म्हणूं लागली व या चक्रव्यूहांतून आपली कशी सुटका होणार याची तिला काळजी पडली! जवळच एक सुखी माता निजली होती. तिनें तिला आपला पत्ता देऊन घरीं बोलाविलें व संकटग्रस्त होणाऱ्या या प्राण्यांचा जन्म थांबविण्याचें अभिवचन दिलें." अशा तऱ्हेचीं अभिवचनें देऊन सहानुभूतीनें पाहणाऱ्या स्त्रिया आपणां-तहि आहेत हें सांगण्यासाठीं व एका सुशिक्षित विदुषीनें दिलेलें उदाहरण लोकांचें डोळे उघडण्यास विशेष कारणीभूत होईल या अपेक्षेनें वरील उतारा

येथें उद्धृत करण्यांत आला आहे. अशा तऱ्हेचीं उदाहरणें देण्याचें ठरविलें तर या पुस्तकासारखीं किती तरी पुस्तकें लिहावीं लागतील! अशीं उदाहरणें हरघडीं घरोघरीं घडत आहेत. या दुर्दैवी स्त्रियांच्या मृत्यूचें खापर निरनिराळ्या रोगांवर फोडून आपले लोक मोकळे होत आहेत! ते रोग ज्या कारणानें उत्पन्न होतात तें कारण नाहींसें करण्याकडे कोणाचेंच लक्ष नाहीं!

दुसरा एक मुद्दा लोकांच्या दृष्टीआड होतो तो हा कीं, अशा अशक्त बायका गर्भार राहिल्या म्हणजे बाळंतपणाचा त्रास चुकावा व मुलांच्या संख्येंत भरती होऊं नये म्हणून अवेळींच गर्भारपण संपवितात. हा गर्भपात शास्त्रज्ञांच्या देखरेखीखालीं होणें शक्यच नसतें. गर्भपाताचे अशास्त्रीय उपाय योजून स्त्रिया आपल्या प्रकृतीचें मातेरें करून घेतात. कांहीं कांहीं तर या अनिष्ट गर्भपातानें यमसदनालाहि जातात, तर कांहीं कांहीं कायमच्या रोगी होऊन बसतात. आपल्याला कल्पना नाहीं इतक्या प्रमाणांत हे पति-पत्नीसंमत गर्भपात होत असतात! पतिपत्नीसंमत गर्भपात होण्याचे कामीं कायद्याची अडचणहि असतेच. पण त्यासंबंधांत समाजाचा ठपका येण्याची किंवा अब्रूस काळिमा लागण्याची भीति नसते. पतिपत्नी नसलेल्या स्त्री-पुरुषांत घडलेल्या पापाचें फळ लपविण्यासाठीं केलेले गर्भपात यांत अर्थातूच धरले नाहींत. ते धरले तर अशा गर्भपातांची संख्या फारच होईल. एकट्या न्यूयॉर्क शहरांत १९२२मध्यें ८०,००० गर्भपात झाल्याचें 'अमेरिकन जर्नल ऑफ ऑब्स्ट्रेस्ट्रिक अँड गायनॉकॉलॉजी'मध्यें नमूद करून ठेविलें आहे. याव्यतिरिक्त कायदेशीर व पतिपत्नीसंमत गर्भपात घडलेले निराळेच होत.

हे गर्भपात कां होतात याचा विचार एक वेळ जरी बाजूला ठेविला तरी त्यांपासून होणारें मानव जातीचें नुकसान दृष्टीआड करून भागणार नाहीं. कांहीं लोक म्हणतील, "बरें झालें, या बायका मेल्या, करावेत कशाला त्यांनीं असले धंदे?" पण हें म्हणतांना त्या बायकांत आपल्या जवळच्या नात्यांतील किती असतील व स्वतःची गुन्हेगारी नसतांहि शिक्षा झालेल्या कितीतरी

बायका अश्लील हेंहि सहृदयता ठेवून लक्षांत घेतलें पाहिजे. या गर्भपातांची कारणमीमांसा करतांना त्यांच्या हातून गुन्हा झाला असें म्हणून भागत नाहीं. तर तो गुन्हा झाला किंवा त्यांच्यावर लादण्यांत आलेला आहे अथवा तो गुन्हा होण्याला कोणती परिस्थिति कारणीभूत झाली वगैरे बऱ्याच दृष्टींनीं विचार होणें जरूर आहे. निदान अशा स्त्रियांकडे समाजानें सहानुभूतिपूर्वक पाहणें अत्यंत आवश्यक आहे. त्यांची परिस्थिति सुधारून त्यांना या मार्गापासून परावृत्त करणें हेंहि समाजाचेंच कर्तव्य आहे. तें करीत असतांनाच अशा तऱ्हेच्या स्त्रियांचे शारीरिक कष्ट कांहीं कमी व्हावेत असा कांहीं तरी उपाय योजणेंहि जरूर आहे. पतिपत्नीसंमत गर्भपात संततिनियमनाच्या योगानें थांबूं शकतील, पण इतर बायकांची अडचण दूर करण्याला त्यांची व्यक्तिशः परिस्थिति समजून घेतली पाहिजे व त्या दृष्टीनें त्यांची कांहीं तरी सोय लाविली पाहिजे.

आणखीहि एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, त्यामध्यें भयंकर रोगी अशा आईबापांना मुलें होऊं द्यावींत किंवा नाहींत हा विचार समाविष्ट होतो. अशीं मुलें रोगीच निपजतात व सर्व समाजाच्या आरोग्यास तीं घातक होतात. पण हा मुद्दा बराच मोठा असल्यामुळें त्याचा विचार स्वतंत्र प्रकरणांतच करणें अधिक श्रेयस्कर होईल.

आरोग्यदृष्ट्या संततिनियमनाचा विचार करीत असतांना त्याचा बायकांच्या मृत्यूच्या प्रमाणावर काय परिणाम होतो हें पाहणें आवश्यक आहे. या दृष्टीनें मिस् ए. टि. राऊट यांनीं आंकडे जमविले आहेत. बाळंतपणापासून मरणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण हॉलंडमध्यें अत्यंत अल्प आहे. त्या देशांत संततिनियमनाचा प्रचार फार आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे. त्याखालोखाल स्वीडनचा नंबर लागतो. अमेरिकेमध्यें हॉलंडपेक्षां हें प्रमाण तिप्पट आहे. अमेरिकेमध्यें संतति-नियमन नुकतेंच सुरू झालें आहे. या दृष्टीनें संततिनियमनाचा परिणाम कसा अनुकूल होत आहे याची कल्पना वाचकांस येईल.

संततिनियमनाच्या अभावीं पुष्कळशा स्त्रियांची कशी दुर्दशा होते, किंबहुना त्या मृत्युमुखीं कशा पडतात हें आपण इतका वेळ पाहिलें. आतां संततिनियमनासाठीं उपयोजण्यांत येणारी साधनसामग्री आरोग्यदृष्ट्या अहित-कारक आहे किंवा कसें याचा विचार करावयाचा आहे. संततिनियमनाच्या साधनांत जे रासायनिक पदार्थ असतात त्यांच्या सतत उपयोगानें योनिमार्गाला कांहीं त्रास होण्याचा संभव आहे का, हा प्रश्न बरेच वेळां विचारण्यांत येतो. अशा पदार्थांत विशेषतः कोयनेलचा अन्तर्भाव नेहमीं करण्यांत येतो. तेव्हां कोयनेल योनिमार्गाचा दाह करूं शकेल का, या प्रश्नाचेंच आधीं उत्तर दिलें पाहिजे. एखादा रासायनिक पदार्थ खात्रीनें त्रासदायक होईल अशीच पुष्कळांची प्रथमदर्शनीं कल्पना असते. पण जास्त चवकशी करतां या कल्पनेला कांहीं आधार आहे का, असें जर विचारलें तर हीं द्रव्यें आपण कधींच उपयोजलीं नाहींत, असेंच आक्षेपकांकडून उत्तर मिळतें! नुसत्या ऐकीव माहितीवर हीं तर्कटें रचिलेलीं असतात. यानें खरोखरीच कांहीं त्रास होतो काय हें पाहण्यासाठीं कोयनेलनें बनविलेल्या रेंडेल पेझरी कांहीं गरजू कुटुंबांत वापरण्यास देण्यांत आल्या होत्या. त्यांच्याकडून कोणतीच तक्रार अजूनपर्यंत माझ्याकडे आली नाहीं. हाच अनुभव बहुतेक डॉक्टरांचा आहे. आमच्या माहितींत जरी थोडींच कुटुंबें असलीं तरी संततिनियमनाच्या केंद्राची हकीगत पाहिली तर तेथेंहि असेंच आढळून येईल. फील्डिंग यांनीं आपल्या 'पेरेंटहुड' या पुस्तकांत अशा केंद्रांतील अनुभव नमूद केला आहे. त्यांचें असें म्हणणें आहे कीं, क्वचित् कोठें थोडी आग होण्यापलीकडे याचा कधींहि विशेष त्रास झाला नाहीं. रासायनिक द्रव्यें सोडलीं तर रबरी टोप्यांपासून कांहींच त्रास होणार नाहीं हं सांगण्याची जरूरीच नाहीं.

संततिनियमन केल्यानें मुलें कमीच होणार व कमी मुलें झाल्यानें गर्भा-शयामध्यें काळपुळी ( Cancer ) हा भयंकर रोग होण्याचा संभव आहे, असा कांहींचा यावर आक्षेप आहे. परंतु खरें पाहिलें तर याउलटच स्थिति

आहे. म्हणजे सारखीं मुलें होण्यानें गर्भाशयमुखाला इजा होण्याचा संभव असतो व त्या इजेमुळेंच पुढें काळपुळी होण्याचा संभव असतो. अशा तऱ्हेचा उल्लेख डॉ. स्टुअर्ट व यंग यांनीं इंग्लंडमधील सुप्रसिद्ध लॅन्सेट नांवाच्या वैद्यकीय नियतकालिकांत नमूद करून ठेविला आहे.

संततिनियमन केल्यानें वंध्यात्व येतें अशी पुष्कळांची समजूत आहे व म्हणून थोडी सोय पहावयाला जायचें व निपुत्रिक राहावयाचें असें होण्यापेक्षां संततिनियमन न केलेलें काय वाईट? असें हे लोक म्हणतात. परंतु त्यांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, संततिनियमनानें संतती पुढें ढकलली जाते. त्या-पासून गर्भाशयाला कांहींच इजा होत नाहीं व जेथें कांहीं इजा, रोग वगैरे होत नाहीं, तेथें वंध्यात्व येण्याचा कसा संभव आहे? वंध्यात्व सिद्ध करण्याला ठराविक कुटुंबें घेऊन त्यांमध्यें कांहीं संततिनियमन करणारे व कांहीं न करणारे असे लोक जर घेतले व त्यांमध्यें जर वंध्यात्व येतें असें सिद्ध झालें तरच तो खरा पुरावा म्हणतां येईल. नुसता आक्षेप आणण्यांत काय अर्थ आहे? इंग्लंडमधील वॉल्वर्थ केंद्रामध्यें एकशेंचार बायकांना संततिनियमन करण्यांत चूक झाल्यानें ताबडतोब गर्भ राहिला व बत्तीस बायकांनीं मुलें होण्यासाठीं संततिनियमन बंद केल्यावर त्यांपैकीं एकतीस गर्भार राहिल्या. या आंकड्यांवरून कांहीं सिद्ध होत असेल तर तें संततिनियमनानें मुलें होण्याची प्रवृत्तीच जास्त वाढते हें होय. यावरून वंध्यात्वाचा मुद्दा सर्वस्वीं निराधार आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. हा मुद्दा कां उपस्थित करण्यांत येतो हें सांगण्यापूर्वीं वंध्यात्व कशामुळें उत्पन्न होतें हें थोडें पाहिलें पाहिजे. वांझ-पणाचीं गर्भपात व उपदंश हीं दोन मुख्य कारणें होत. गर्भपात करतांना कायद्याविरुद्ध वर्तन होत असल्यामुळें गर्भपाताच्या सर्वसंमत मार्गांनीं तो न होतां चोरूनमारून कांहींतरी औषधें घेऊन व घाण हत्यारें वापरून अतज्ज्ञ माणसाकडून तो करण्यांत येतो. असें झालें असतांना योनिमार्गाला धक्का लागून ताप व दाह हीं सुरू होतात (Sepsis). मग एक तर अशी स्त्री

मृत्युमुखीं पडते किंवा जन्माची रोगी होते किंवा वांझ होते. अशा वाचकांनीं जर संततिनियमनाचीं साधनें वापरलीं व वांझपणा कायमच राहिला तर या वांझपणाचें खापर संततिनियमनावर फोडण्यांत येतें. वास्तविक त्याचा व याचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं.

दुसरें कारण म्हणजे फिरंगी रोग होय. यानें गर्भ कधींच प्रौढ दशेस पोहोंचत नाहीं. नेहमीं गर्भपात होतो व त्याचा परिणाम वांझपणांत होतो. पुढील उदाहरण मननीय आहे. एका बाईचा असा रोग असणाऱ्या माण-साशीं विवाह झाला. त्यापासून त्या बाईला चोवीस अर्धवट मुलें झालीं व शेवटीं तीं लुलींपांगळीं होऊन मेलीं.

वंध्यात्व कशापासून आलें आहे हें पाहण्यापूर्वी त्याचें कारण संतति-नियमन म्हणून सांगण्यांत येतें व तें कसें चूक आहे हें सांगण्यासाठींच एवढें विवेचन करावें लागलें.

संततिनियमनाच्या साधनसामग्रीचा उपयोग करण्यापूर्वी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, अशीं साधनें उपयोगांत आणावयास स्त्रियांचीं जननेंद्रियें निरोगी असणें अत्यंत आवश्यक आहे. तेथें जर कांहीं रोग असतील तर तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय संततिनियमन करणें धोक्याचें आहे. रोग निरनिराळे असल्यामुळें कोणत्या वेळीं कोणता उपाय करावा वगैरे विवरण करणें येथें अप्रस्तुत आहे. गर्भाशयांतून जर पू, रक्त वगैरे स्रवत असेल तर संरक्षक टोपी अर्थातच वापरतां येणार नाहीं. परंतु असा दाह जर नसेल व गर्भाचें स्थित्यन्तर किंवा असाच कांहीं रोग असेल तर संततिनियमन करतां येतें. पू, रक्त वगैरे ज्यांत स्रवतो असे रोग थोडेच आहेत. या दृष्टीनें बरेचसे रोग संततिनियमनाच्या आड येत नाहींत, हें वाचकांनीं ध्यानांत धरावें व नुसता रोग आहे म्हणून विचकून न जातां तज्ज्ञांच्या सल्ल्यानें संततिनियमन करण्याला कांहीं हरकत नाहीं, हें विसरूं नये.

---

## प्रकरण सातवें

# समाजशास्त्रदृष्ट्या विचार

## ( पूर्वार्ध )

कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांचे राजकीय, धार्मिक, नैतिक, सामाजिक व इतरहि कांहीं दृष्टींनीं जे प्रयत्न सुरू असतात त्यांचें ध्येय समाजाची सर्वांगीण सुधारणा व्हावी हेंच असतें. समाजाची सुधारणा म्हणजेच समाजांतील घटकावयवांची सुधारणा होय. प्रत्येक व्यक्तीला जगामध्यें जगण्याला कांहीं ध्येय, प्रेम, सामाजिक बंधनें, सहानुभूति वगैरे भावनांची आवश्यकता असते. आपली इतरांना गरज आहे, अशी त्यांची खात्री असावी लागते. म्हणजेच त्याला जगामध्यें आपलेपणा वाटेल. आपल्यासाठीं कोणीहि तळमळत नाहीं, आपल्या अस्तित्वानें कोणाचींहि मनें आनंदित होत नाहींत किंबहुना आपण जर जगांत नसलों तर कोणाचेंहि अडणार नाहीं असें जर मनुष्याला दिसून आलें तर त्याला जगण्यांत मजा वाटणार नाहीं. समाजांतील निरनिराळ्या घटकावयवांकडे जर आपण सूक्ष्मपणें पाहिलें तर कितीसे लोक वरील विवेचनाप्रमाणें सुखी ठरतील ? महत्त्वाकांक्षा जरी एक वेळ बाजूला ठेवली तरी

जगांतील प्रस्तुत व्यवहार ज्यांचे सुरळीत चालले आहेत असे कितीसे लोक आपल्याला आढळतील? अशा लोकांचा तुटवडा पडण्याला काय कारणें होतात इकडे जरा लक्ष दिलें पाहिजे. जगांतील सुखसोयी व अन्नपुरवठा हीं जरी वाढत असलीं तरी त्यांपेक्षां झपाट्यानें मनुष्यजात वाढत आहे. या वाढीमुळें बापापेक्षां मुलगा थोड्या फार प्रमाणांत निराश व दुःखी असल्याचेंच आपल्याला आढळून येईल. नुसती लोकसंख्येंतील वाढच या दुःखाला कारणीभूत होते असें नाहीं. आहे या लोकसंख्येमध्येंसुद्धां कलह, द्वेष, महत्त्वाकांक्षा-वगैरे विकार प्रबळ झाले म्हणजे त्याचा समाजावर परिणाम होतोच. समाजा दृष्ट्या विचार जरी सोडला तरी व्यक्तिगत सुखदुःखें थोडीं कमीच होऊं लागल्याचें आपल्याला कळून येईल. व्यक्तिव्यक्तींचे दोन भाग पाडले पाहिजेत, एक सधन व दुसरी निर्धन. या दोन भागांमध्यें फारच मोठें अंतर आहे. सधनांना इतर कांहींहि काळजी असली तरी बाराची वेळ कशी निभावेल याची त्यांना कधींच विवंचना नसते. कुटुंबांत एखाद्या मुलाची भर पडली तर त्याचें कसें होईल याचा विचार त्यांना पडत नाहीं. किंबहुना अशा एखाद्या सुदैवी मुलाची भर पडावी म्हणून ते नवससायासही करीत असतात. याउलट निर्धनांची स्थिति असते. त्यांना दुपारची नेहमींच भ्रान्त असते व त्यामुळें आहे या कुटुंबांत एखाद्या मुलाची भर पडणें म्हणजे त्यांना फार दुःखदायक प्रसंग ओढवला असें वाटतें. आणखी एखादें मूल व्हावें अशी त्यांना कधींच उत्कंठा नसते. काय असेल तें असो, पण त्यांनाच मुलें भरपूर असतात व जेथें खाण्यापिण्याची चंगळ असते तेथें मुलांचा साधारण तुटवडाच असतो! अशामुळें या दोन प्रकारच्या कुटुंबांत आपल्याला निरनिराळींच दृश्यें दिसतात. या दोन प्रकारांत साधारणतः मुलें कोणत्या प्रमाणांत होतात व एक वर्षा-खालील मुलांची मृत्युसंख्या किती असते हें खालील कोष्टकावरून दिसून येईल. हे आंकडे १९२१ मधील इंग्लंडच्या खानेसुमारींतील आहेत-

| | एका हजारांत ९५ वर्षी-खालील पुरुषांना झालेलीं मुलें | एका हजारांत एका वर्षाखालील मृत्यु |
|---|---|---|
| मध्यम वर्ग | ९८ | ३८ |
| कारागीर | १४१ | ७७ |
| गडी | १७८ | ९७ |
| वैद्यकीय धंद्यांतील | ७९ | २९ |
| पाद्री | ७८ | २७ |
| गोदींतील मजूर | २०९ | ११२ |

यावरून मध्यम वर्ग, वैद्य व पाद्री या सदरांखालीं जन्माचें व मृत्यूचें अशीं दोन्ही प्रमाणें कमी आहेत. हे साधारण सधन या वर्गांत मोडतात. त्यांविरुद्ध कारागीर, गडी व मजूर यांचीं हींच प्रमाणें बरींच जास्त आहेत. यावरून उच्च धंदेवाईक व सधन लोकांची वाढ हळू हळू होत असते तर गडी, मजूर व लहानसहान कारागीर, सुतार, गवंडी वगैरे यांची संख्या झपाट्यानें वाढत असते, असें सिद्ध होतें. ही विषमता वाढविण्याला आणखीहि एक साधन कारणीभूत झालें आहे व तें म्हणजे संततिनियमन हें होय. सधन व उच्च धंदेवाईक लोकच जास्त सुशिक्षित असतात व त्यांच्या वाचण्यांत हीं साधनें व त्यांची आवश्यकता अगोदर येते. आपल्या स्त्रियांची प्रकृति चांगली रहावी किंवा मुलामुलांत योग्य अंतर असावें म्हणून ते यांचा उपयोग करितात व त्यामुळें ही संख्या कमी होऊं शकते. पण संततिनियमनाची विशेष आवश्यकता जर कोणास असेल तर ती गरीब स्थितींतील माणसांनाच होय. गरिबांना संततिनियमन शिकवून त्यांची संख्या मर्यादित करावी असें कित्येक प्रतिपादन करितात. परंतु अशा रीतीनें वर्गावर्गांत फरक करणें इष्ट नाहीं असा यावर आक्षेप येण्याचा संभव आहे. गरिबांच्या मुलांची शिक्षणाची उत्कृष्ट सोय झाली, त्यांना सुखसोयींची प्राप्ती झाली, तर गरिबांतहि संततिनियमन झालें पाहिजे असें कोणीहि

म्हणणार नाहीं. पण वस्तुस्थिती तशी नसते. यामुळेंच संततिनियमनासंबंधांत श्रीमंत आणि गरीब असा भेदाभेद मानणें जरूर पडतें. गरीब समाजांतील रोगराई कमी व्हावी, त्यांच्यांतील मृत्यूचें प्रमाण कमी व्हावें आणि अखेर त्याचे परिणाम त्यांनाच हमखास कल्याणकारक व्हावे म्हणूनच त्यांना संततिनियमनाची जरूरी आहे. संततिनियमनाची चळवळ विशेषतः याच वर्गांत केली पाहिजे. जसजशीं जास्त मुलें होतात तसतशी गरीब स्थितींतील मातांची प्रकृति अकालीं ढासळते व त्यामुळें मुलेंसुद्धां निःसत्त्व निपजतात. तीं रोगट असल्यामुळें लवकरच मृत्युमुखीं पडतात. शिवाय मुलें व्हावींत अशी आयांची बिलकूल इच्छा नसते. अशा स्थितींत त्यांना हवी असणारी श्रेयस्कर परिस्थिती उत्पन्न करून देणें हेंच खरें संततिनियमनाचें कार्य आहे. यांत कोणत्याहि प्रकारचें पाप नसून हें पुण्यकर्मच कसें आहे हें वरील विवेचनावरून समजून येईल.

होणारीं मुलें जगांत येण्यापूर्वी त्यांची आवश्यकता भासली पाहिजे. त्यांच्यावर प्रेम करणारीं मातापितरें त्यांच्या जन्मासाठीं उत्सुक असलीं पाहिजेत. तीं जन्मास आल्यावर त्यांच्या दुधाची पंचाईत असतां उपयोगी नाहीं. त्यांना कपडेलत्ते योग्य प्रमाणांत मिळाले पाहिजेत. इतकी जर व्यवस्था असली तर मुलें होण्यास कोणाचीहि हरकत असणें शक्य नाहीं. अशा सुस्थितींत कोणीहि संततिनियमन करणार नाहीं व करावें असा उपदेशहि करणार नाहीं. परंतु जोंपर्यंत अशी स्थिति नाहीं किंवा कधीं काळीं येईल अशी आशाहि करतां येत नाहीं तोंपर्यंत संततीचें नियमन हें केलेंच पाहिजे.

सधन व निर्धन दोन्ही वर्गांतील स्त्रिया पुष्कळ वेळां बाळंतपणें झाल्यानें रोगी व चिरचिऱ्या झाल्या म्हणजे त्यांच्या नवऱ्यांची स्थिती वेश्यागमनाला अनुकूल होते. असा कांहींसा परिणाम अविवाहित तरुणांमध्येंहि दृष्टीस पडतो. त्यांची संभोगेच्छा ज्या वेळीं जागृत झालेली असते त्या वेळीं त्यांचें लग्न झालेलें नसल्यामुळें व तिचें संयमन करण्याचे कामीं त्यांना यश येत

नसल्यामुळें कांहीं अविवाहितांचें लक्ष वेश्यागमनाकडे वळतें. असें होण्याला प्रौढविवाह, विशेषतः अतिप्रौढविवाह कारणीभूत होत असला तरी याच्या मुळाशीं आर्थिक परिस्थितीच असते, हें विसरतां कामा नये. सुदैवानें आपल्याकडे हा प्रश्न इतक्या तीव्रतेनें भासणारा नाहीं. कारण पुढारलेले लोक सोडले तर साऱ्या समाजांत सररहा बालविवाहच सुरू आहे. पण पुढारलेल्या लोकांतहि विवाहाची मर्यादा बरीच वाढली आहे; व त्या मानानें त्यांच्यांत उपरिनिर्दिष्ट प्रवृत्तीहि थोडी फार दिसून येते. वेश्यागमनाकडे लक्ष गेल्यानें पहिल्यांदा डोळे उघडण्यास जर कांहीं कारण मिळत असेल तर तें उपदंश व परमा हे रोगच होत. वेश्येचें हें देणें त्यांना भोंवल्याशिवाय रहात नाहीं व मग दुहेरी चोरी होते. एक तर त्यामुळें सत्तींचें संयमन करणें भाग पडतें. दुसरें, हे रोग झाल्याची कबुली देऊन औषधोपचाराची सोय करून घेणें अवघड जातें. अशा तऱ्हेचे लोक थोडे असतील अशी कल्पना असेल तर ती चुकीची आहे. डॉक्टरांच्या पहाण्यांत असे बरेचसे रोगी नित्यशः येत असतात हें येथें नमूद करण्यास कांहीं हरकत आहे असें वाटत नाहीं.

विवाहित पुरुषांनाहि हे रोग अत्यंत त्रासदायक होतात. त्यांना आपल्या बायकांना हे रोग होतील ही भीति असते व एक तऱ्हेची लज्जा सारखीच भेवडावीत असते. अशा पेंचांत सांपडल्यानें त्यांची परिस्थिति मोठी नाजूक व करुणास्पद होते. या मार्गांत पडण्याबद्दल त्यांना दोष देण्यांत हंशील नाहीं. त्यांची परिस्थिति नीट जाणून मगच आपलें मत बनविलें पाहिजे.

येथें आणखी एक मुद्याचा विचार करणें रास्त होईल. कांहीं लोक असें म्हणतात कीं, संततिनियमनाच्या साधनांची अनुकूलता विशेष झाल्यानें अविवाहित स्त्रीपुरुष बिघडतील. त्यांनीं उपरिनिर्दिष्ट विवेचन काळजीपूर्वक वाचावें. कोणच्याहि गोष्टीचा जसा फायदा असतो तसाच त्याच्यापासून तोटाहि होण्याचा संभव असतो. म्हणून ती गोष्टच नसावी या विचारसरणींत

कांहींच तथ्य नाहीं. विषारी औषधें जास्त प्रमाणांत घेतल्यानें मनुष्य मरतो म्हणून कमी प्रमाणांतही औषध म्हणून त्याचा उपयोगच करूं नये अशा-सारखें हें विधान हास्यास्पद आहे. संततिनियमन नसतांना काय थोडें पाप होतें ? गर्भपात किती होतात व केराच्या पेटींत किती मुलें सांपडतात ! गांव आहे तेथें महारवाडा असणारच. म्हणून गांवच सोडून द्यावें असें तर कोणी म्हणणार नाहीं ना ? उपदंशानें पीडित होऊन समाजाला त्रासदायक होण्या-पेक्षां विवाह करून संततिनियमनाचीं साधनें वापरणेंच श्रेयस्कर ठरेल. हा झाला अविवाहितांचा प्रश्न. आतां जे शेंकडोंशें विवाहित अज्ञानानें या रोगांना बळी पडतात त्यांची काय सोय ? त्यांना जर संततिनियमनाचें शिक्षण दिलें तर त्यांच्या बायका अशक्त होणार नाहींत व त्यांना गटारें धुंडाळण्याचें कारणच पडणार नाहीं. त्यापासून त्यांची स्वतःची प्रकृति व त्यांच्या बायकांचें आरोग्य उत्तम राहील. त्यांची वृत्ती समाधानाची राहून त्यांचा एकंदर संसार सुखाचा होईल. हें चित्र कोणीकडे व मघाचें चित्र कोणीकडे ! पण इतका विचार करतो कोण ? संततिनियमन या एका शब्दामध्यें इतका अर्थ भरला आहे. त्याचा जर योग्य उपयोग केला तर जगाच्या सुखांत खात्रीनें भरच पडेल.

संततिनियमन म्हणजे अजीबात संतती न होणें नव्हे, तर कुटुंबांतील गरजेप्रमाणें, आर्थिक स्थितीप्रमाणें ती कमजास्त करणें होय. संततीशिवाय अर्थात् कुटुंबाला किंवा घराला शोभा नाहीं. लहान मुलें नाचतबागडत असल्याशिवाय घरांत आनंदी वातावरणच उत्पन्न होणार नाहीं. नुसतीं नवराबायको असल्यानें गृहांत सर्व कांहीं सुख आलें असें नव्हे. तर मूल हें मूर्तिमंत आनंद आहे असेंच संततिनियमनाचे पुरस्कर्तेहि समजतात. पण त्यांचें म्हणणें एवढेंच कीं, तें मूल खरोखरच आनंदवर्धक असलें पाहिजे. त्याला पाहून प्रत्येकाला तें घ्यावेंसें वाटलें पाहिजे. त्याच्या हंसतमुखानें सर्वांना आकर्षिलें पाहिजे. अशी स्थिती कोणाला नको असणार ? परंतु

याऐवजीं एखादें रोडकें, रोगी, चिरचिरें, रडकें असें मूल जर पुढें असलें तर त्याला घेण्यासाठीं कधींच अहमहमिका उत्पन्न होणार नाहीं. तें स्वतः आनंदी व वाळसेदार असल्याशिवाय तें दुसऱ्यांना केव्हांही आनंदी करूं शकणार नाहीं. यासाठीं मुलाला वाळसेदार, निरोगी व आनंदी करणें हेंच संततिनियमनाचें ध्येय आहे. घरांत पुष्कळ मुलें असलीं व त्यांची जर जोपासना आईबापांना उत्तम रीतीनें करतां आली तर साऱ्यांना मुलें हीं हवींच आहेत. या स्थितींत संततिनियमन करावें असें कोणीच म्हणणार नाहीं. ही भूमिका वाचकांनीं नीट लक्षांत घ्यावी. संततिनियमन कुटुंबा-विरुद्ध नाहीं. त्याला मुलांचें वावडें नाहीं. परंतु तीं मुलें सुखी व समाधानी व्हावीं व त्या योगानें सारें कुटुंब आनंदी व्हावें यासाठींच ही सारी खटपट आहे. कुटुंबें सुखी झालीं म्हणजेच समाज सुखी होईल. आनंदी व निरोगी मुलें निपजलीं म्हणजेच समाजाचे घटक व आधारस्तंभ अशा ज्या व्यक्ती त्या सुदृढ, निकोप व निरोगी असल्यामुळें आनंदी व सुखी निपजतील. समाजाला निरोगी व निकोप करण्यासाठीं त्यांतील संततिरूप जी संपत्ति आहे तिची नीट जपणूक केली पाहिजे. यासाठींच संततिनियमनाचा पुरस्कार करावयाचा. मुलांचें मृत्यूचें प्रमाण कमी व्हावें व त्यामुळें समाजां-तील जिवंत राहणाऱ्या लोकांचें व त्यांच्या आयुर्मानाचें प्रमाण वाढावें हेंच संततिनियमनाचें ध्येय आहे. यासाठीं उपयोगांत येणारें तेंच खरें संततिनियमन. याव्यतिरिक्त आचरणांत येणारें संततिनियमन अर्थातच निरुपयोगी व त्याज्य आहे. जगांत पाप वाढावें असा संततिनियमनाचा कधींच उद्देश नाहीं. पण कांहीं लोक तसा उद्देश या चळवळीला चिकट-वितात म्हणूनच एवढें विवेचन करावें लागलें. कोणच्याहि चांगल्या गोष्टीचे वाईट परिणाम दाखवितां येतील. मात्र ते दाखवून ती गोष्ट वाईट आहे असें म्हणणें विचाराला धरून होणार नाहीं. यासाठीं जनतेनें डोळे उघडे ठेवून संतति-नियमन म्हणजे काय, तें कशासाठीं करावयाचें, त्याच्या मर्यादा कोणच्या,

त्याच्यापासून खरोखरच तोटा आहे कीं काय, व तें नियमित व योग्या प्रमाणांत पाळल्यानें काय फायदा होतो या साऱ्या गोष्टी समतोल बुद्धीनें विचारांत घेऊन या प्रश्नाचा निकाल लावला पाहिजे. नुसता वरवर विचार करून कांहींच साध्य होणार नाहीं. ढोबळ फायदे किंवा ढोबळ तोटे कोणत्याहि गोष्टीच्या बाबतींत सांगतां येतील. म्हणून तेवढ्यावरूनच लोकांनीं त्याचे पुरस्कर्ते किंवा त्याचे विरोधक होतां उपयोगी नाहीं. पुरस्कार करावयाचा तो सुद्धां विचार करून करावा व विरोध करतांनाहि पूर्ण विचार करूनच तसें करावें.

---

# प्रकरण आठवें

# समाजशास्त्रदृष्ट्या विचार

## ( उत्तरार्ध )

### रोगग्रस्तांचा संततिप्रतिबंध

संततीचें नियमन करण्याची जबाबदारी जरी कुटुंबापुरती व व्यक्तिशः म्हणजे खाजगी स्वरूपाची असली तरी पण एका विशिष्ट प्रकारच्या संततीला समाजांत स्थान द्यावें कीं नाहीं, हा सामाजिक प्रश्नहि फार महत्त्वाचा आहे. ही विशिष्ट संतती म्हणजे भयंकर रोगानें ग्रस्त झालेल्या आईबापांना झालेली किंवा वेड्या, आंधळ्या, मुक्या वगैरेंना झालेली संतती होय. अशी संतती अर्थातच वेडी, मुकी, बहिरी किंवा रोगी असते. ही संतती समाजांत वाढूं देऊन एकंदर समाजाचें जीवन अवघड व धोक्याचें करणें योग्य आहे किंवा नाहीं, हा प्रश्न तर महत्त्वाचा आहेच. पण अशा दुर्दैवी लोकांना मुलें होऊं देणें त्या मुलांच्या दृष्टीनेंहि योग्य आहे किंवा नाहीं हा प्रश्नहि विचारणीय आहे. रोगी व वेडींविद्रीं मुलें होणार हें माहीत असतांना अशा संततीला उत्पन्न करण्यास कारणीभूत होऊन त्यांचें जीवन हलाखीचें करणें हें 'भयंकर गुन्हा' या सदरांत याक्यास कांहींच हरकत नाहीं. अशी परिस्थिति उत्पन्न होऊं नये म्हणून सरसहा अशा लोकांना कृत्रिम रीतीनें संततिकार्यास अक्षम करण्यांत

( Sterilization ) येतें. असें केल्यानें त्या लोकांची कोणचीहि गैरसोय होत नाहीं. त्यांना उत्तम रीतीनें संभोग करतां येतो. फक्त अशा संभोगांत पुरुषबीज उत्पन्नच होऊं शकत नाहींत व त्यामुळें संततीचा किमपीहि संभव उरत नाहीं. हें असामर्थ्य कसें उत्पन्न करावयाचें हें पाहण्यापूर्वी तें कोणकोणत्या रोगांत करणें जरूर आहे हें आधीं पाहणें योग्य होईल.

अशा रोगांपैकीं प्रथमदर्शनींच वेश्यागमनापासून उत्पन्न होणारे उपदंश, परमा वगैरे रोग डोळ्यांपुढें उभे राहतात. ते रोग स्वतः रोग्याला त्रासदायक आहेतच, पण संततीलाहि त्यांपासून भयंकर उपसर्ग पोहोंचतो. आधीं या रोगांमध्यें बहुधा संतती होणें अवघडच असतें. बायकांना यदाकदाचित् गर्भधारणा झालीच तर वारवा होण्याची प्रवृत्ति असते; व त्यामुळें मुलें क्वचितच होतात व झालीं तर तीं लवकरच मृत्युमुखीं पडतात. पण तीं मुलें होण्यांत आयांना व झाल्यावर त्या मुलांना किती त्रास होतो याचाहि विचार केला पाहिजे. हे रोग बरे करण्याचें साधन हल्लीं आपल्यांत उपलब्ध झालें आहे. पण तें फार खर्चाचें असतें. दुसरें असें कीं, मध्यम स्थितींतील लोक, विशेषतः पुरुष डॉक्टरकडे जाऊन आपला रोग बरा करतात. परंतु लाजेनें किंवा भीतीनें ते आपल्या बायकांना डॉक्टरकडे नेत नाहींत. त्यामुळें त्या रोगीच राहतात व त्यांच्यामुळें पुन्हां पुरुषांना हा रोग होतो! असें हें रहाटगाडगें सारखें सुरू असतें. अशा रोग्यांना नीट औषधोपचार करविणें किंवा त्यांना जननकार्यास अक्षम करणें याशिवाय समाजाचें आरोग्य चांगलें राखण्यास दुसरा मार्ग नाहीं.

याशिवाय दुसरा महत्त्वाचा गट म्हणजे वेड्या लोकांचा होय. समाजांत वेडे लोक किती असतात याची कल्पना वाचकांना आहे. वेड्यांमध्यें पुष्कळ प्रकार आहेत. पण त्यांत प्रथमपासूनचे व जुने वेडे फार वाईट असतात. त्याशिवाय वेडे होण्याची प्रवृत्ति असणेंसुद्धां चांगलें नाहीं. अशी प्रवृत्ति होतां होईल तों संततीत जाऊं न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

अमेरिकेंतील ओहियो संस्थानांत १९१८ मध्यें १५,९७१ वेडे इस्पितळांत होते. यावरून त्यांची संख्या कशी जास्त आहे हें वाचकांच्या लक्षांत येईल. वेड्याप्रमाणेंच फेंपरें येणारे लोक ( Epileptics ) यांची स्थिती आहे. हे त्याच साली ओहियोमध्यें १८८५ होते. म्हणजे त्यांचीहि संख्या कांहीं कमी नाहीं. मुक्या-बहिऱ्यांची संख्या ५३६ होती. याशिवाय चोर, दरवडे-खोर वगैरे गुन्हेगार लोक विचारांत घेतले तर समाजास दूषित करणारे लोक किती आहेत यांची वाचकांना कल्पना येईल.

अशा लोकांची सरासरी काढली तर आपल्या कल्पनेबाहेर हें प्रमाण आहे असें आपल्याला आढळून येईल. अमेरिकेमध्यें हे आंकडे असे आहेत.

| | |
|---|---|
| वेडे | २,००,००० |
| आंधळे | १,००,००० |
| कैदी | १,००,००० |
| अनाथ पंगू | ८०,००० |
| बाल गुन्हेगार | २३,००० |

इतक्या लोकांवर सरकारला लक्ष ठेवावें लागतें. लक्ष ठेवणें म्हणजे त्यांच्याबर थोडथोडफार प्रमाणांत खर्च करणें होय. सर्व दृष्टींनीं व काटेकोर प्रमाण लावलें तर तिसांत एक अशा तऱ्हेचें अशा लोकांचें प्रमाण निघतें! खानेसुमारींतील खालील आंकडे मोठे मननीय आहेत. १८७४ पासून १८९६ पर्यंतच्या २२ वर्षांत इंग्लंडमध्यें हजारांत ५·४ ते ११·६ अशी या लोकांची वाढ झाली! १९०१ मध्यें इंग्लंडांत ४,८४,५०७ वेडगळ होते. त्यांचें सर्व लोकसंख्येशीं प्रमाण ८५मध्यें एक असें पडतें!

त्याच सालच्या खानेसुमारींत असें आढळून आलें कीं १,१७,००० वेड्यांपैकीं ४७,००० इतक्या लोकांनीं विवाह केले व देशाच्या लोकसंख्येंत भर टाकण्यास सुरुवात केली. ही भर कोणच्या प्रकारची असेल हें सांगण्याचें कारणच नाहीं! १८५८ पासून इंग्लंडमध्यें लोकसंख्येची वाढ शेंकडा ८१

इतकीच आहे. पण त्या सालापासून वेड्या लोकांची वाढ शेंकडा २५० इतकी अवाढव्य आहे! यावरून अशा लोकांना मुलें होऊं दिलीं म्हणजे काय परिस्थिति उत्पन्न होते हें कळून येईल. न्यू यॉर्क स्टेटमध्यें हेच आंकडे ४७ व १०३ असे आहेत. ओहियोमध्यें ३८ व १०८ असे आहेत. यावरून सगळीकडेच ही रडकथा कमीअधिक प्रमाणांत आहे हें वाचकांच्या प्रत्ययास येईल.

यासंबंधांत दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, या वेड्यांना संभाळण्यासाठीं कोणच्याहि देशाच्या सरकारला लोकांच्या करांतून मिळालेल्या पैशांतूनच खर्च करावा लागतो. हा खर्च कांहीं थोडाथोडका नाहीं. डॉ. डाना यांनीं अमेरिकेपुरता हा खर्च पुढीलप्रमाणें काढला आहे. अमेरिकेंत सध्यां २,६५,००० इतके वेडे आहेत असें धरलें तर त्यांना ६०,०००,००० इतके डॉलर्स वर्षाला लागतात! या लोकांमध्यें जर काम करण्याची ताकद असती तर त्यांनीं निदान २८,०००,००० इतके डॉलर्स मिळविले असते! म्हणजे देशाला या लोकांप्रीत्यर्थ निदान ८८,०००,००० इतके डॉलर्स नुकसान येतें. ही संख्या शेंकडा चार या प्रमाणांत वाढत आहे. यावरून देशाची केवढी भयंकर हानि होत आहे याची कल्पना येईल.

या लोकांची संख्या वाढण्याला कोणची परिस्थिति कारणीभूत होते हें आधीं पाहिलें पाहिजे. मुख्यतः दोन गोष्टी या कारणांत समाविष्ट होतात. त्या म्हणजे आनुवंशिक संस्कार व व्यक्तिशः परिस्थिति या होत. व्यक्तिशः परिस्थितींमध्यें गरिबी, मानसिक जबाबदारी, निरनिराळे रोग वगैरे गोष्टी प्रामुख्यानें येतात. अशा निकृष्ट परिस्थितींत ज्यांचा निभाव लागत नाहीं असे लोकच उपरिनिर्दिष्ट लोकांत समाविष्ट होतात. सध्यां या लोकांची परिस्थिति सुधारण्याची बरीच खटपट सुरू आहे. त्यांच्या करितां स्वतंत्र इस्पितळें, स्वतंत्र अनाथ पंगूगृहें वगैरे सोयी नित्यशः होत आहेत. तरीहि पण त्यांच्या संख्येंत कमतरता पडत नाहीं. याचें कारण त्यांना मुलें

होतात हेंच होय. त्यांनीं जगांतील सुखसोयींला पारखें व्हावें असें कोणाचेंही म्हणणें नाहीं. पण त्यांनीं लोकांच्या संख्येंत भर तरी टाकूं नये असेंच कोणालाहि वाटेल व त्यासाठीं त्यांना लग्न करण्यास प्रतिबंध करतां आला नाहीं तरी त्यांना जननाक्षम करण्यांत यावें, म्हणजे मुलें होण्याची किंवा त्यांचा वेडा वंश वाढण्याची मुळींच भीति राहणार नाहीं.

दुसरा मुद्दा आनुवंशिक संस्कारांचा होय. दोघेहि आईबाप वेडगळ असतील तर त्यांच्या संततींत हे संस्कार उत्क्रांत होतील. एक जर वेडगळ असेल तर थोड्या लोकांत तरी हे संस्कार उत्क्रांत होणार. यासाठीं एक वेडगळ व एक चांगला असेंहि जोडपें उपयोगी नाहीं. चांगली प्रजा उत्पन्न होण्याला दोघेहि चांगले लागतात. हा मुद्दा विशेष स्पष्ट व्हावा यासाठीं दोन उदाहरणें घेऊं. न्यू जर्सी फीबलमाइंडेड इन्स्टिटयूशनमधील एक मुलगी दिसावयाला जरा चांगली होती. तिचा बाप वेडगळ होता. तिला दोन लग्नांपासून जीं मुलें झालीं व त्या मुलांना जीं मुलें झालीं त्यांपैकीं ५९ मुलांची आज मोजदाद करतां येते. त्यांपैकीं १२ ची स्थिति माहीत नाहीं. आठ लहानपणींच वारलीं व राहिलेल्या ३९ पैकीं ३० वेडगळ निघालीं! यांमध्यें जीं लग्नें झालीं त्यांत इतर घराण्यांतून आलेले मुलगे किंवा मुली चांगल्या होत्या हें लक्षांत घेतलें पाहिजे. याउलट अमेरिकेंतील सुप्रसिद्ध एडवर्ड्स कुटुंबाची स्थिति आहे. १७०३ मध्यें जन्मलेल्या जोनॅथन एडवर्ड्सच्या संततीची मोजदाद करण्यांत आली. तेव्हां १९०० मध्यें त्यांची संख्या १३९५ इतकी भरली. यांमध्यें कित्येक पदवीधर, १३ कॉलेजचे प्रिन्सिपॉल, ६५ प्रोफेसर, ६० नामांकित डॉक्टर्स, शंभरांवर पाद्री, सैन्यांत ६० च्या वर अंमलदार, बरेचसे प्रसिद्ध लेखक व कादंबरीकार अशीं नानाविध अमोल रत्नें होतीं. यावरून संततीची निपज करतांना किती गोष्टींकडे लक्ष ठेवावें लागतें हें कळून येईल. देशाला अनवश्यक अशा लोकांना सक्तीनें असमर्थ करण्याचा कांहीं देशांत कायदा आहे. हा कायदा थोड्याफार प्रमाणांत कित्येक

पाश्चात्य राष्ट्रांतून पाळण्यांत येतो. अजून सररहा तो कोठेंच उपयोजण्यांत आला नाहीं.

अमेरिकेंतील नेवास्का संस्थानांत उपदंश व परमा झालेल्या लोकांना लग्न करण्याची मनाई करण्यांत आली आहे. विवाहापूर्वीं वधूवरांना हे रोग नाहींत असें सर्टिफिकेट आणावें लागतें. १८९५मध्यें कनेक्टिकट या संस्थानांत फेफरें येणाऱ्या लोकांना व वेडगळ लोकांना लग्नाची मनाई करणारा कायदा पास झाला. सध्यां जर्मनीमध्यें शुद्धीकरणाचा कायदा होऊं घातला आहे व तो पास झाल्यावर वेडे, वेडगळ वगैरे लोकांना सक्तीनें शुद्ध करण्यांत येणार आहे असें नुकतेंच वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. हें शुद्धीकरणाचें कार्य तात्पुरतें व कायमचें अशा दोन्ही प्रकारचें असतें. तात्पुरतें शुद्धीकरण म्हणजेच कांहीं विशिष्ट कालापर्यंत संततिनियमन होय. कायमचें शुद्धीकरण म्हणजे जननाक्षमता उत्पन्न करणें होय. तात्पुरतें शुद्धीकरण करण्याचें कारण एवढेंच असतें कीं, कांहीं विशिष्ट वेळांत स्त्रियांना मुलें होणें धोक्याचें असतें. हा धोका मूल व आई अशा दोघांनाहि असतो. क्षयासारख्या रोगांत आईची प्रकृति खालावलेली असते. अशा वेळीं ती बरी होईतोंपर्यंत गर्भारपण येणें फारच धोक्याचें असतें व म्हणून येथें तात्पुरतें शुद्धीकरण चालेल. कारण पूर्ण बरें झाल्यावर मुलें होण्याची आईला अपेक्षा असते, म्हणून येथें कायमच्या शुद्धीकरणाची आवश्यकता नसते. तात्पुरतें शुद्धीकरण म्हणजेच संततिनियमन होय. हा संततिनियमनाचा मार्ग कुटुंबाला व समाजाला दोघांनाहि सुखावह आहे. निदान समाजामध्यें दुखणें पसरूं नये, म्हणून तरी याचा अवलंब करण्यांत यावा. यामध्यें व इतर संततिनियमनामध्यें मोठा फरक आहे. इतर संततिनियमनामध्यें आईची प्रकृति आपण लक्षांत घेतों. तेथें मुलें भयंकर रोगानें व्याप्त अशीं उपजत नाहींत. म्हणून त्याचें आईच्या आरोग्यदृष्ट्या व आर्थिक दृष्ट्या महत्त्व आहे. पण येथें मूल जन्मतःच दुखणें बरोबर घेऊन येतें, म्हणून असें मूल जन्मूं नये

यांत समाजाचें हित आहे व म्हणून याला सामाजिक दृष्टया महत्त्व आहे. हें संततिनियमन करण्याचे मार्ग नेहमींचेच आहेत. जननाक्षमता साधण्यासाठीं शस्त्रकर्मांची (Operation) जरूरी आहे. तें सांगण्यापूर्वी कोणच्या रोगांत तात्पुरतें शुद्धीकरण व कोणच्यांत कायमचें शुद्धीकरण करणें जरूर आहे हें पाहूं.

कायमच्या शुद्धीकरणांत पुढील रोगांचा समावेश केला पाहिजे. वेड, फेफरें, जन्मजात मुकेपणा, बहिरेपणा, वेडगळपणा (Feebleminded), महारोग. यांशिवायहि कांहीं प्रकार आहेत. त्यांत मानसिक विकृति, भयंकर गुन्हेगारी व इतर कांहीं मनःस्थिति येतात. पण ते जरी सोडले तरी उपरिनिर्दिष्ट रोगांचा कायमच्या शुद्धीकरणासंबंधांत अवश्य समावेश करावा लागेल.

तात्पुरत्या शुद्धीकरणांत अर्थातच जास्त रोग येतात. त्यांमध्यें पुढील रोगांचा समावेश होतो. उपदंश, जन्मजात आंधळेपण ( यांमध्यें कायमचें शुद्धीकरण जास्त चांगलें ), क्षय, हृद्रोग, मूत्रपिंडरोग, मधुमेह, शरिरांतील वक्रता ( ज्यामध्यें गर्भ राहिला तरी मूल होणें पोट फाडल्याशिवाय अशक्य असतें ).

रोगाच्या सौम्य किंवा तीव्र प्रमाणावरून यांमध्यें उपयोजावयाचा संतति-नियमनाचा काळ ठरवावा लागेल.

कायमचें शुद्धीकरण पुरुषांत व स्त्रियांत दोन्ही ठिकाणींहि करतां येतें. असें करण्यानें कोणाचीहि संभोगेच्छा नाहींशी होत नाहीं. त्या क्रियेमध्यें वैगुण्यहि उत्पन्न होत नाहीं. दोघांच्याहि अमृतग्रंथीचे अन्तःस्राव बंद होत नाहींत; फक्त मुलें होण्याला आवश्यक असणारीं स्त्री किंवा पुरुषबीजें तेवढीं नाहींशीं होतात. हें करण्याला अर्थातच हें बीज ज्यांतून येतें त्या नलिकांचा छेद करावा लागतो. स्त्रियांच्या बाबतींत हा छेद पोटामध्यें असलेल्या रजोवाहिनीं-संबंधांत करणें भाग आहे. म्हणजे हें शस्त्रकर्म जास्त त्रासाचें असतें. रजःपिंड कायम असल्यामुळें एखादे वेळीं स्त्रीबीज तेथून निघून गर्भाशयांत

जाण्याचा अत्यंत सूक्ष्म असा संभव आहे. पण तो विचारांत घेण्याचें कांहीं कारण नाहीं. रजःपिंड काढणें धोक्याचें असतें. कारण त्या योगानें त्याचा अन्तःस्राव बंद होतो व स्त्री किरकिरी, मानसिक रोगांना बळी पडणारी अशी होते. यासाठीं सध्यां रजःपिंड केव्हांहि काढीत नाहींत. त्या पिंडालाच कांहीं विकार झाला असेल तर गोष्ट निराळी.

पुरुषाच्या बाबतींत शुद्धीकरणाचें शस्त्रकर्म सोपें आहे. कारण ज्यांच्यांतून पुरुषबीजें जातात त्या नळ्या किंवा वृषणरज्जू पोटाबाहेर असतात. ते जननें-द्रियाच्या मागें असलेल्या गोटींतून म्हणजे अंडकोशांतून निघून पोटांत जाऊन मग आंतल्या बाजूनें जननेंद्रियांत शिरतात. अंडकोशांतून बाहेर पडल्यावर ते नुस्ते कातडींत गुंडाळलेले असतात. तेथेंच त्यांचा छेद केला म्हणजे पुरुषबीज पुढें जाण्याची धास्ती रहात नाहीं. हा छेद दोन्ही बाजूंनीं केला पाहिजे. हें शस्त्रकर्म इतकें सोपें आहे कीं, त्याकरितां दवाखान्यांत किंवा इस्पितळांत फार वेळ रहावें लागत नाहीं व मनुष्याच्या नित्यक्रमांत किंवा व्यवसायांत व्यत्यय येत नाहीं. १९१९ मध्यें वेलफील्ड यांनीं यावर आपलें पुढीलप्रमाणें मत दिलें आहे. ते म्हणतात कीं, हें शस्त्रकर्म म्हणजे ऑफिस ऑपरेशन आहे. हें करण्याला थोडीं मिनिटें पुरतात व हें करण्यानें मनुष्याला निजून राहावें लागत नाहीं, एवढेंच काय पण दांत उपटण्याला जितका त्रास सोसावा लागतो तितका सुद्धां याला सोसावा लागत नाहीं.

या शस्त्रकर्मानें जननेंद्रियांत कांहींहि बदल होत नाहीं म्हणजे त्याची क्रिया योग्य प्रमाणांत चालते. त्यामध्यें कोणतीहि कमतरता उरत नाहीं. हॅवेलॉक एल्लिसनें आपल्या सायकॉलॉजी ऑफ सेक्सच्या नव्या मॅनुअलमध्यें उद्धृत केलेलें पुढील उदाहरण लक्षांत ठेवण्याजोगें आहे. २५० व्या पानावर ते लिहितात कीं, " माझ्या ओळखीच्या एका अमेरिकन डॉक्टरला पुष्कळ मुलें झालीं होतीं. आणखी जास्त मुलें व्हावीं अशी त्याची इच्छा नव्हती. तीं दोघेंहि पतिपत्नी निरोगी होतीं. त्यांना संततिनियमनाचीं साधनें

वापरण्याचा कंटाळा होता व तें त्यांना आवडतहि नसे. म्हणून त्यानें हें शस्त्रकर्म स्वतःवर करून घेतलें. त्यामुळें त्याच्या धंद्यांत एक दिवसहि खाडा झाला नाहीं. या शस्त्रकर्मानें त्यांच्या इच्छेंत किंवा संभोगक्रियेंत कांहींहि उणेपणा उत्पन्न झाला नाहीं." पुढें कित्येक वर्षे एलिस यांना त्यांची माहिती होती. यावरून या शस्त्रकर्मानें कितीतरी अडचणींतून त्रास न पोहोंचतां मार्ग काढतां येईल. बायकोच्या प्रकृतीसाठीं व तिला मोठें शस्त्रकर्म झेंपत नसल्यास पुरुषांना हें शस्त्रकर्म सहज करून घेतां येण्यासारखें आहे. हें शस्त्रकर्म स्त्रियांच्या पोटांतून करावयाचें असल्यामुळें मेजर ऑपरेशन या सदराखालीं येतें. तेव्हां शक्य तेथें बायकोला हें मोठें शस्त्रकर्म करण्यास लावण्यापेक्षां पुरुषानें जर हें शस्त्रकर्म केलें तर बराच फायदा होण्याचा संभव आहे.

जर्मनींत १ जानेवारी १९३४ पासून सुरू झालेल्या शुद्धीकरणाच्या कायद्यासंबंधीं गिझन हॉइट्सडीन्स या नांवाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालेला पुढील मजकूर येथें उद्धृत करण्याजोगा आहे. जर्मनींतील लोकसत्तात्मक सरकारनें शुद्धीकरणानें आनुवंशिक रोग नाहींसे करण्याकडे लक्ष दिलें आहे व त्यासाठीं ता. १ जानेवारी १९३४ पासून कायदाहि अमलांत येणार आहे. हा कायदा भावनेचा जोर होऊन नुसता कागदावरच राहूं नये म्हणून याला सक्तीचें स्वरूप देण्यांत आलें आहे. यामध्यें मानहानि किंवा शिक्षा आहे असें समजण्याचें कारण नाहीं. कोणालाहि शुद्ध करण्यापूर्वी त्याचें किंवा त्याच्या बाजूचें म्हणणें कोर्टात ऐकून घेण्यांत येऊन मगच त्याला शुद्ध करण्यांत येणार आहे. मागील काळांत शुद्धीकरणाचे दोनच मार्ग उपलब्ध होते. एक म्हणजे जन्मभर कैद किंवा दुसरा म्हणजे वृषण किंवा अंडाशयच अजिबात काढून टाकणें हा होय. यानंतर प्रसिद्ध संशोधक स्टेनॉक (Steinach) यांच्या संशोधनामुळें पुरुषबीज किंवा स्त्रीबीज गर्भाशयापर्यंत न पोंचेल असें शस्त्रकर्म शोधून काढण्यांत आलें व तें शस्त्रकर्म अगदीं सोपें असल्यामुळें तें करणें सोईचेंहि झालें आहे. या पद्धतीनें कांहींहि त्रास होत नाहीं हें पुढील

आंकड्यांवरून सिद्ध होईल. अमेरिकेंत ६६९९ पुरुष व ९०६७ नायका मिळून १५,७६६ माणसांवर हा प्रयोग करण्यांत आला. अमेरिकेंतील २७ संस्थानांनीं हें शुद्धीकरण करण्याचें ठरविलें आहे. क्ष किरण किंवा रेडियम यांच्या योगानें होणारें शुद्धीकरण जर्मनींत करीत नाहींत. कारण त्याचा परिणाम हटकून चांगलाच होईल असें सांगतां येत नाहीं व मुलावरहि त्याचा वाईट परिणाम होण्याचा संभव असतो. सामाजिक पुढारी व सत्ताधिकारी काम-गारांना तर ही निःसंशय सुधारणा आहे असें वाटतें. इतकेंच नव्हे तर त्याचा उपयोग इतका मर्यादित होत आहे याबद्दलहि वाईट वाटतें. या कायद्यानें जर्मनीचा किती फायदा होईल हेंहि डॉ. नॉयस्टेटर (Neustaeter) यांनीं सांगितलें आहे. डॉ. टिरला यांनीं शुद्ध करण्याच्या लोकांची संख्या ४,१२,००० आहे असें दाखविलें आहे. त्यांपैकीं २००,०० अर्धवट वेडे, ६०,००० फेफरें येणारे, ६०० कोरियावाले, ४०० जन्मांधळे, १८,००० जन्मापासून बहिरे, २०,००० वेडेवांकडे, १०,००० आत्यंतिक मद्यपी व आणखीहि कितीतरी लोकांचा यांच्यांत समावेश होतो. या कायद्यानें जरी साठ टक्के लोक शुद्ध झाले तरी तीसपस्तीस वर्षांत ४२ कोटी मार्कांचा नफा होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. या लोकांना होणाऱ्या मुलांच्या जोपासनेचा जो खर्च कमी होईल तो सुद्धां वर्षांत एक कोटी मार्क इतका होईल!

हे अर्धवट व वेडगळ लोक जरी शुद्ध केले तरी जगांत यांची उत्पत्ति थांबण्यास बराच वेळ लागेल. कारण दोन चांगल्या स्त्रीपुरुषांनाहि अशी संतति होण्याचा संभव असतो. कारण त्यांच्यामध्यें आनुवंशिक संस्कारांचे सुप्त जनक असतात. त्यामुळें ते स्वतः जरी चांगले असले तरी त्यांची संतति वाईट होऊं शकते.*

---

1. *Sterilisation in the Home*, Lancet, page 1408, 16th Dec. 1933.

## प्रकरण नववें

# लोकसंख्या व संततिनियमन

संततिनियमनाचें तत्त्व प्रामुख्यानें पुढें आणण्यास दोन गोष्टी मुख्यत्वें कारणीभूत झाल्या आहेत. त्यांपैकीं पहिली म्हणजे लोकसंख्येची वाढ ही होय व दुसरी अर्थात्च आरोग्यविषयक होय. लोकसंख्येची वाढ जास्त होण्याची भीतिच पुष्कळ वेळां संततिनियमनाला उचलून धरते. माल्थसच्या वेळेपासून याच दृष्टीनें तज्ज्ञांचा विचार चालू असल्याचें दिसतें. लोकसंख्येची वाढ सारखीच सुरू असते. कोणतेंहि कुटुंब घेतलें तरी दोनचार पिढ्यांत त्या कुटुंबाची बरीच वाढ झालेली दिसून येते. कुटुंबांप्रमाणेंच देशांमध्यें सुद्धां ही वाढ नेहमींच सुरू असते. अशा रीतीनें जर वाढ सारखी होऊं लागली तर थोड्याच काळांत पृथ्वीवर मनुष्याला उभें राहण्यास देखील जागा उरणार नाहीं अशी पुष्कळांना भीति वाटते. अशी भीति पुष्कळ दिवस वाटूनहि तशी स्थिति मात्र अजून प्राप्त झाली नाहीं. याला अर्थात्च निसर्गानें कांहीं उपाय योजून ठेवले आहेत. ते सांथी, रोग, लढाया, अवर्षणें वगैरे होत. या मार्गांनीं मनुष्यहानि होऊन लोकसंख्या पुन्हां पहिल्याप्रमाणें होते व असें हें रहाटगाडगें सारखें सुरू असतें. परंतु अलीकडे मात्र ही स्थिति राहणार नाहीं

अशी साधार भीति वाटूं लागली आहे. मनुष्याचे निसर्गावर मात करण्याचे प्रयत्न आधुनिक काळांत नेहमींच सुरू असतात. असे बरेचसे प्रयत्न सध्यां पुष्कळसे यशस्वीहि होऊं लागले आहेत; त्यामुळें रोगराई व सांथी यांचें व यांपासून होणाऱ्या मृत्यूचें प्रमाण बरेंच कमी होऊं लागलें आहे. लढाया-देखील यापुढें मोठ्या प्रमाणांत होण्याचा संभव कमी दिसूं लागला आहे. लढायाच अजीबात होऊं नयेत म्हणून जागतिक प्रयत्न सुरू आहेत. शास्त्रीय ज्ञान वाढत चालल्यामुळें मनुष्याचें आयुष्यमान वाढत आहे; व मृत्यूचें प्रमाणहि कमी होत आहे. अशा स्थितींत उपरिनिर्दिष्ट भीति पुन्हां डोकें काढूं लागली आहे. अशा वेळीं निसर्ग कांहीं तरी उपाय योजील म्हणून हात जोडून बसण्यांत हंशील नाहीं. निसर्गाला आपल्या कह्यांत आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. अशा वेळीं पुन्हां निसर्गाकडेच जाण्यांत काय हंशील आहे ? आपले प्रयत्न सुरू असूनहि एन्फ्ल्युएन्झासारख्या सांथी क्वचित् होतातच. परंतु त्यांचेंहि प्रमाण कमी आहे. अशा वेळीं लोकसंख्या योग्य प्रमाणांत ठेवण्यास काय उपाय योजावेत इकडे तज्ज्ञांचें लक्ष वेधणें अगदीं स्वाभाविक आहे.

आतांपर्यंत उपरिनिर्दिष्ट मार्गांखेरीज असे कांहीं मार्ग उपयोजण्यांत येत कीं, त्यांच्या योगानें लोकसंख्या कांहीं कमी होत असे. अशांमध्यें मुख्यत्वें गर्भपात व बालहत्या यांचा समावेश होतो. अर्थात् हे मार्ग लोकसंख्या कमी करण्याकरितां केव्हांच वापरण्यांत येत नाहींत, तर इतर नैतिक, धार्मिक वगैरे कारणेंच त्यांना कारणीभूत होतात. लढाया देखील लोकसंख्या कमी करण्यासाठीं कोणी करीत नाहींत तर त्यांनाहि अन्य कारणें असतातच. पण दूरवर विचार केला असतांना या दोहोंतील कार्यकारणभाव व्यक्त होण्याला उशीर लागत नाहीं.

या विषयावर लिहिणाऱ्या पुष्कळशा लेखकांचा कटाक्ष निदान गर्भपात व बालहत्या या बाबतींत तरी आशिया खंडावर फार आहे. येथें हे उपाय सररहा उपयोगांत आणतात असें त्यांचें मत आहे. परंतु मनुष्यस्वभाव,

पुणे म... ...लय
४३७ नारायण
दा. नं. ८५८८

नैतिक व धार्मिक कल्पना या सगळीकडे बहुतेक सारख्याच असल्यामुळें हे प्रकार युरोपांत नव्हते असें म्हणण्यांत कांहींच हंशील नाहीं. त्यांच्या म्हणण्या-प्रमाणें प्रौढविवाह तिकडे प्रचारांत असतील व त्यांचा संततिनियमनावर परिणाम होत असेल यांतहि शंका नाहीं. परंतु सामान्य लोकांत वरील दोन्ही प्रकार नव्हते असें म्हणून चालणार नाहीं. माल्थसपासून कांहीं तज्ज्ञांनीं लोकसंख्येला आळा बसावा म्हणून प्रौढविवाह सुचविला आहे. सकृद्दर्शनीं जरी तो चांगला दिसला तरी पण मागें प्लेस याचें मत उद्धृत केल्याप्रमाणें विचार केला तर त्याचाहि फारसा उपयोग होत नाहीं. एका दृष्टीनें थोडा उपयोग होतो; पण त्यामुळें नीति बिघडण्याचा जास्त संभव असतो. मुलींना जास्त वय झाल्यामुळें जर नोकरी मिळाली नाहीं तर त्यांना पुष्कळ वेळां वेश्या-वृत्तीचा अंगिकार करावा लागतो; व तरुण अविवाहितांना लग्न करण्याइतकी ऐपत नसल्यामुळें त्यांचें गिऱ्हाईक व्हावें लागतें. पण दोघांनींहि विवाह न करतां अशा मार्गाचा अवलंब करावयाचा म्हणजे प्रौढविवाहाचा मुद्दा निकामीच ठरतो! बरें, दुसरें असें कीं, या तरुण अविवाहित स्त्रीपुरुषांना संतति होणें संभवनीय नाहीं असें थोडेंच आहे! मग ते तरी गर्भपात किंवा बालहत्या याशिवाय काय करणार! अशा दृष्टीनें खिश्चन युरोपांतहि हे प्रकार सररहा चालू होते हें उघड दिसतें.

प्रौढविवाहाचा हा जो वर दोष दाखविला आहे त्याप्रमाणेंच बालविवाहा-मध्यंसुद्धां गतमर्तृकांचा वर्ग उत्पन्न होऊन गर्भपात व बालहत्या हे प्रकार चालू राहतातच. अशा दृष्टीनें कोणचाहि विवाह मान्य केला तरी त्या वेळीं या दोन प्रकारांशिवाय गत्यंतर नव्हतें. म्हणून त्याचाच नेहमीं उपयोग कर-ण्यांत येत असला पाहिजे. लोकसंख्येच्या वाढीवर त्याचा थोडाफार परिणाम होतच असे. हे प्रकार चालू राहूं न देणें हेंच मुळीं संततिनियमनाला बलवत्तर कारण आहे. या अनीतीला मारक होणारें संततिनियमन अनैतिक आहे असें म्हणणें म्हणजे उपायालाच अपाय हें नांव देण्यासारखें आहे! स्त्रियांची

ढांसळणारी प्रकृति व त्याचा बालमृत्यूवर होणारा परिणाम या बाबी तर सर्वांच्याच परिचयाच्या आहेत. जन्माचें प्रमाण ज्या रीतीनें सारखें वाढतें राहतें त्याच रीतीनें मृत्यूचेंहि प्रमाण वाढतच असतें. एका पाठीमागून एक अशीं मुलें होत गेल्यानें आईची प्रकृति खालावते व अशा आईला होणारीं मुलेंहि अशक्त असल्यामुळें त्यांच्या मृत्यूचें प्रमाणहि जबर होऊं लागतें. याला अर्थातच कमी पण सुदृढ मुलें होतील अशी तजवीज करणें हाच उपाय होय. आणि मातांची प्रकृति सुधारणें यावरच हें अवलंबून आहे. हल्लींच्या शास्त्रीय ज्ञानाच्या वाढीनें हलकें हलकें हें बालमृत्यूचें प्रमाण कमी कमी होत आहे. इंग्लंडमधील दर हजारीं बालमृत्यूचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

| सन | बालमृत्यूचें प्रमाण |
|---|---|
| १८९६–१९०० | १५६ |
| १९०१–०५ | १३८ |
| १९०६–१० | ११७ |
| १९११–१५ | ११० |

यावरून एवढें उघड आहे कीं, ज्या मानानें जन्माचें प्रमाण वाढतें त्या मानानेंच मृत्यूचें प्रमाण वाढतें व हीं दोन्ही जास्त झाल्यानें जिवंत राहणाऱ्यांचें प्रमाण कमी होतें. जिवंत राहण्यासाठीं जास्त लोकांनीं मरावें असें तर कोणीहि म्हणणार नाहीं ना? पण जन्माचें प्रमाण अवास्तव वाढूं देणें व तसें म्हणणें यांत काय फरक आहे? तेंच जन्माचें प्रमाण कमी झालें म्हणजे मृत्यूचें प्रमाणहि कमी होतें व मग जिवंत राहणाऱ्यांची संख्या वाढते. हीच परिस्थिति सर्वांना हवी असणार. पण त्यांत जन्माचें प्रमाण कमी असावयास पाहिजे हें विसरून चालणार नाहीं. हीं प्रमाणें पुढील कोष्टकांवरून जास्त उघड होतील.

## इंग्लंड

| सन | जन्म | मृत्यु | जिवंत राहण्याचें प्रमाण |
|---|---|---|---|
| १९१० | २५ | १३ | १२ |
| १९११ | २४ | १४·५ | ९·५ |
| १९१२ | २४ | १३ | ११ |
| १९१३ | २४ | १४ | १० |
| १९१४ | २४ | १४ | १० |

## हिंदुस्थान

| | | | |
|---|---|---|---|
| १९१० | ४० | ३३ | ७ |
| १९११ | ३९ | ३२ | ७ |
| १९१२ | ३९ | ३० | ९ |
| १९१३ | ३९ | २९ | १० |
| १९१४ | ४० | ३० | १० |

या दोन्ही देशांची तुलना केली असतां वरील विधानें सहज पटण्याजोगीं आहेत. मृत्यूचें प्रमाण कमी होऊं लागलें कीं जिवंत राहण्याचें प्रमाण वाढतें. पण मृत्यु कमी होण्यासाठीं सुदृढ व सशक्त लोकांची जरूरी आहे. मुलें व माता या दोघांच्याहि प्रकृति चांगल्या राहण्यास जन्माचें प्रमाण कमी केलें पाहिजे, हें कोणाहि समंजस माणसाला पटण्यासारखें आहे.

हें मृत्यूचें प्रमाण कमी करण्यासाठीं जन्माचें प्रमाण कमी केलें पाहिजे हें एकदां ठरल्यावर तें कसें करावें याचें विवेचन ओघानेंच आलें. मागल्या-प्रमाणें हल्लीं कोणी गर्भपात किंवा बालहत्या आनंदानें करीलच असें वाटत नाहीं. प्रौढविवाहसुद्धां जन्माचें प्रमाण कमी करण्यासाठींच करतील असें नाहीं. तर इतर सामाजिक निर्बंधांमुळें ते आपोआपच होऊं लागले आहेत. परंतु असे विवाह झाले म्हणजे त्यांना मुलें

होणारच. या मुलांचा त्यांच्या कुटुंबांवर काय परिणाम होतो व किती मुलें एखाद्या कुटुंबाला आर्थिक दृष्टीनें झेंपूं शकतील हे प्रश्न साहजिकच पुढें उभे राहतात. कुटुंबाचें उत्पन्न सामान्यतः सारखेंच राहत असतें. वाढ झाली तरी ती प्रायः थोडया प्रमाणांतच होणें शक्य आहे. पण त्या योगानें सुस्थिति प्राप्त होईल असें नाहीं. ज्या प्रमाणांत उत्पन्नांत वाढ होईल त्याच प्रमाणांत जर मुलें झालीं तर तीं कोणाला नकोत? पण उत्पन्न स्थिर राहून मुलांची संख्या मात्र वाढूं लागली म्हणजे अनवस्थाप्रसंग उत्पन्न होतो. अशा स्थितींत त्या कुटुंबाच्या राहणींत अवनति होऊं लागते. आणि मग मुलांची जोपासना नीट करावयाची म्हणजे मोठ्या माणसांना उत्तरोत्तर अधिक अधिक त्रास पोहोंचतो, आईची प्रकृति खालावते व पुन्हा खर्चाचें मान वाढतें. त्यांतून उत्पन्न तेंच राहून जागतिक हलाखीचा परिणाम कुटुंबावर होत गेल्यानें आहे त्या उत्पन्नांतहि खोट येते. कारण सगळया जिन्नसांचे भाव उतरलेले असतात व त्या मानानें प्राप्ति कमी होते. विविध प्रकारच्या अडचणींचा विचार केल्यावर मुलें जगांत आणण्याची घाई करणें तितकेंसें श्रेयस्कर नाहीं हें कोणालाहि पटेल. परंतु तसें करणें म्हणजे एक तर सारखें ब्रह्मचर्यव्रताचें पालन करणें किंवा कांहीं तरी मार्गानें संततिनियमन करणें या दोन मार्गांशिवाय दुसरा उपाय नाहीं. ब्रह्मचर्य अर्थात्च साऱ्यांना शक्य नाहीं व इष्ट नाहीं. राहतां राहिला संततिनियमन हा मार्ग. पण नैतिक, धार्मिक वगैरे किती तरी मुद्दे आणून त्याच्या मार्गांत कांटे पसरण्याचा प्रयत्न होत आहे. या मार्गाचा धिक्कार करणारे लोक या प्रश्नाचा नीट व सांगोपांग विचार करून कांहीं तरी मार्ग सुचवितात असेंहि नाहीं. येऊन जाऊन त्यांची मदार काय ती ब्रह्मचर्यावर! ब्रह्मचर्याचें ब्रह्मज्ञान सांगणें सोपें आहे, पण तें आचरणांत आणणें प्रायः अशक्य आहे. स्वतःस ज्ञाते किंवा समाजाचे नेते म्हणविणारांना सुद्धां तें पाळतां येणें अत्यंत कठीण आहे, मग सर्वसाधारण समाजाची गोष्टच बोलावयास नको!

कोणच्याहि कां उपायानें होईना, पण कुटुंबांतील माणसांची संख्या आरोग्यविषयक व आर्थिक स्थिती असेल त्या प्रमाणांत राखण्यांत आली पाहिजे. प्रत्येक कुटुंबानें हें अवधान राखलें तर एकंदर लोकसंख्याहि प्रमाणांत राहणें क्रमप्राप्तच आहे. कुटुंबाप्रमाणेंच देशाची स्थिति आहे. देशाच्या आर्थिक परिस्थितीला झेंपेल इतकीच लोकसंख्या जर देशांत असली तर तो देश सुखानें कालक्रमण करूं शकेल. परंतु लोकसंख्येंत जर प्रमाणाबाहेर वाढ होऊं लागली तर कांहीं तरी उपायानें ती मर्यादित ठेवावीच लागते. कांहीं कांहीं वेळेला देशांतर करून वसाहती स्थापून वाढत्या लोकसंख्येला वाट काढून देण्याचा उपक्रम होत असे. पण हें मागील शतकांत शक्य होतें. आज अशा वसाहती करून राहण्यास जागा सुद्धां मिळणें शक्य नाहीं. कारण, आज पृथ्वीवर राहण्यास योग्य असणारी सारी जागा निरनिराळ्या देशांनीं आपापल्यासाठीं राखून ठेविली आहे! लोकसंख्या जास्त वाढूं लागली तर कोणत्या तरी उपायानें यांतून बाहेर पडावयास मार्ग हा पहावा लागतोच. या दृष्टीनें जपानचें उदाहरण वाचकांना सांगण्यासारखें आहे. जपानची साम्राज्य-तृष्णा वाढण्याचें महत्त्वाचें व अंतरंगांतील कारण त्या देशांतील लोकसंख्येची बेसुमार वाढ हेंच होय.

अशा दृष्टीनें लोकसंख्येची वाढ झाली असतांना तिला मर्यादा घालणें व लोकसंख्या नेहमींपेक्षां कमी झाली तर या मर्यादा काढून घेणें या गोष्टी योग्य प्रमाणांत सुरू असल्याशिवाय देशाची परिस्थिति नीटनेटकी राहणें केव्हांहि शक्य नाहीं. खानेसुमारीवरून मिळालेले आंकडे जरी नुसते वरवर चाळले तरी देखील लोकसंख्येचें प्रमाण कसें वाढत आहे हें कोणाच्याहि प्रत्ययास येईल. ९२ वर्षांपूर्वीं सर्व जगांतील लोकसंख्या हल्लींपेक्षां निम्मी होती! अशीच वाढ सुरू राहिली तर आणखी साठ वर्षांत हल्लींपेक्षां दुप्पट लोक जगांत वावरूं लागतील! शंभर वर्षांत हीच लोकसंख्या तिप्पट होईल. जगांतील यच्चयावत् सर्व जमीन नांगरटीखालीं आणली तरीहि सर्वांचें

पोट भरेल किंवा नाहीं याची शंकाच आहे. यावरून जसजशी लोकसंख्या आंवाक्याबाहेर जाऊं लागेल तसतसा अन्नाच्या टंचाईमुळें जनतेंत हाहाकार कसा उडून जाईल हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे. एकीकडे शास्त्रीय व वैद्यकीय ज्ञानाची वाढ झपाट्यानें करून लोक सुखी करण्याची धडपड करावयाची व दुसरीकडे तें सुख डोळ्यांपुढें दिसूं लागल्यावर ज्यांच्यासाठीं एवढी खटपट करावयाची ते लोकच लोकसंख्येच्या वाढत्या प्रमाणांत मृत्युमुखीं पडावयाचे, हें दृश्य जसें भयानक आहे तसेंच तें उपस्थित होऊं नये यासाठीं आगाऊ तजवीज न करून ठेवणें हें पात्रापात्रविचार करण्याची शक्ति लाभलेल्या मनुष्यप्राण्यास सर्वस्वीं लांछनास्पद आहे!

## प्रकरण दहावें

# नैतिक दृष्ट्या विचार

संततिनियमनाचा नैतिक दृष्टीनें विचार करणें जरासें अवघड आहे. त्याचें कारण असें कीं, नीति आणि अनीति यांच्या मर्यादा निदान या विषयापुरत्या तरी कशा ठरवावयाच्या, हा प्रश्न आधीं सोडविल्याशिवाय तो विषयच या किंवा त्या विभागांत घालणें सयुक्तिक होणार नाहीं. तें ठरविण्यापूर्वी संततिनियमनानें समाजामध्यें नीति अथवा अनीति यांपैकीं कशाचा फैलाव होईल हें पहावें लागेल. समाजाच्या नीतीला हा विषय विघातक आहे कीं, यानें उलट नीतीची बैठक भक्कम पायावर स्थिर केली जाईल हें ठरविणें संततिनियमनापासून होणाऱ्या परिणामांवर अवलंबून आहे. कोणच्याहि गोष्टीचा नीतिदृष्ट्या विचार करावयाचा म्हणजे त्यापासून होणाऱ्या परिणामाचा समाजाशीं कसा संबंध पोहोंचतो हें आधीं पहावें लागेल.

प्रथमतःच हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, संततिनियमन करण्यांत गर्भाचा नाश संभवत नाहीं. गर्भ उत्पन्न होण्यापूर्वी त्याच्या घटकांना एकमेकांशीं संयुक्त होऊं न देणें हींच कामगिरी संततिनियमनाला करावी लागते. अर्थात् ही कामगिरी अनीतिकारक नाहीं. कारण यामुळें कशाचीहि हत्या होत नाहीं.

स्त्री किंवा पुरुषबीज हे प्रायः प्रत्यहींच नामशेष होत असतात. प्रत्येक स्त्रीचें स्त्रीबीज दर महिन्याला बाहेर पडून पुरुषबीजाच्या अभावीं निरुपयोगी होतें. त्याच प्रमाणें पुरुषबीज निकामीच नाहींसें होतें. म्हणजे ही हत्या नव्हे आणि हिला यदाकदाचित् हत्याच म्हणावयाचा कोणाचा आग्रह असेल तरी ती निदान आपल्याला थांबवितां येणें शक्य नाहीं. प्रत्यहीं स्त्रीपुरुष या गोष्टी करीतच असतात. परंतु ते अनिच्छया करतात. तेथें आपण त्यांना याच गोष्टी इच्छेनें ठरवून करावयास लावणें म्हणजेच संततिनियमन करणें होय. या दृष्टीनें संततिनियमनापासून अनीतीची उत्पत्ति सिद्ध होत नाहीं. गर्भपातामध्यें गर्भाची हत्या करण्यांत येत असल्यामुळें गर्भपात अनीतिकारक आहे असें म्हणणें योग्य होईल; पण गर्भ राहण्यापूर्वी कशाचीच हत्या होत नसल्यामुळें संततिनियमनाला या दृष्टीनें तरी कोणीहि अनीतिकारक म्हणेल असें वाटत नाहीं.

दुसरा एक मुद्दा पुढें असा आणण्यांत येतो कीं, संततिनियमन हें अनैसर्गिक आहे. प्रथमदर्शनीं जरी हा मुद्दा पटण्याजोगा असला तरी योग्य विचारांतीं तो बुद्धीला पटत नाहीं. वास्तविक आपलें सारें जीवनच अनैसर्गिक आहे. निसर्गानें आपल्याला जसें उत्पन्न केलें तसे जर आपण असतों तर आज देश, शहरें व घरें हीं कांहींच दिसलीं नसतीं व त्यांऐवजीं शेळ्या-मेंढ्यांच्या किंवा तरस-लांडग्यांच्या कळपांसारखे मनुष्यांचे कळप दिसले असते. त्यानें कपडे वापरले नसते, कारण तें निसर्गाविरुद्ध आहे. त्यानें घरें बांधलीं नसतीं, कारण तें निसर्गाविरुद्ध आहे. त्यानें लग्न केलें नसतें, कारण तें निसर्गाविरुद्ध आहे. तो मोकाट फिरत एखाद्या, गुहेंत राहिला असता व इतर वन्य प्राण्यांप्रमाणें त्याचें जीवन ठराविक व रूक्ष झालें असतें. परंतु तसें झालें नाहीं व मनुष्य आज दिसतो या स्थितींत आहे हेंच प्रमाण या मुद्द्याविरुद्ध आहे. नुसतें अनैसर्गिक म्हणून भागत नाहीं. सुधारणा सारीच अनैसर्गिक आहे म्हणून काय आपण सुधारण्याचें सोडून दिलें आहे? अनैसर्गिक म्हणून

अनीतिकारक असें म्हणण्याचा या लोकांचा उद्देश असतो. परंतु असें म्हटल्यानें सारी सुधारणाच अनीतिकारक ठरेल. याचें असें होतें कीं, घरांतील म्हाताऱ्या बायकांना तरुण मुलांमुलींचें वागणें फार चमत्कारिक वाटतें व त्या म्हणत असतात कीं, "आम्हीं झालोंत आतां म्हाताऱ्या, आमचे डोळे आतां लवकरच मिटणार, तर आमच्या डोळ्यांदेखत तरी घरांत असले ढंग करूं नका! घराबाहेर तुम्हांला वाटेल तें करा." असें म्हणण्यांत त्यांचा उद्देश हाच असतो कीं तुमचें खरें असेल, पण आम्हांला तें पटत नाहीं व पटवून घेण्याची आम्हांला आतां कांहींच आवश्यकता नाहीं. आपल्याला जें पटत नाहीं तें सारें अनीतिकारक असें त्यांना वाटतें. पण त्यापुढें कांहीं चालत नाहीं म्हणून त्या, या कलियुगांत अनीति, अधर्म वाढत जाणारच म्हणून स्वस्थ बसतात! तशीच येथेंहि स्थिति आहे. अनीतिकारक म्हटलें तरी कालाचा प्रवाह कांहीं थांबत नाहीं. तरी पण नीतीच्या व धर्माच्या संरक्षणाचा भार आपल्यावरच आहे अशी ज्यांची समजूत झालेली असते. त्यांना ही विचार-सरणी पटणार नाहीं व ते साऱ्याच सुधारणेला अनीतिकारक म्हणणार. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करणें म्हणजे आजीबाईची समजूत घालण्याचा निष्फळ प्रयत्न करणें होय. यासाठीं आपली सारी विचारसरणी त्यांच्यापुढें एकदा मांडावी; व आपल्या बुद्धीला पटलें म्हणजे इतर सुधारणांचा जसा आपण अंगिकार करतों तसा याहि सुधारणेचा अंगिकार करावा. याशिवाय यांतून दुसरा मार्ग सांपडणें शक्य नाहीं.

दुसरा धार्मिक मुद्दा असा आणण्यांत येतो कीं, जेथें आपण आशीर्वादच 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' असा देतों तेथें त्याविरुद्ध आचरण करून त्या बाईला कमी मुलें व्हावींत म्हणून साधनसामग्री पुरविणें म्हणजे धर्मा-विरुद्ध व अब्रह्मण्यम् आहे. परंतु हा आक्षेप घेण्यापूर्वीं हा आशीर्वाद देण्याची प्रथा केव्हां पडली याकडे जरा लक्ष दिलें पाहिजे. ज्या वेळीं पृथ्वीवर लोक थोडे होते व सुपीक जमीन सपाटून मोठी होती त्या वेळीं आठच काय, पण

जास्त पुत्रांची देखील अपेक्षा होती व त्यासाठीं जास्त मुलें होणें भाग्याचें समजत असत. याच कारणास्तव निपुत्रिक राहणें हें दुर्दैवाचें लक्षण गणलें गेलें असलें पाहिजे. या कल्पनेचा पगडा अजून इतका आहे कीं, एखाद्या बाईला जर मूल झालें नाहीं तर तिचा नवरा निव्वळ मुलाकरतां दुसरें लग्न करतो. इतकेंच नव्हे तर दुसरा मुलगा दत्तक घेऊन आपला वंश पुढें चालवितो. अर्थातच यामध्यें वंश वाढविणें हीच एक कल्पना असते. दुसरा कोणचाहि विचार बाजूला ठेवून वंश वाढविण्याची कल्पना अर्थात् त्या वेळीं अत्यंत आवश्यक होती. पण हल्लीं तशी स्थिति नाहीं. दत्तक मुलगा घेऊन वंशवृद्धि होण्याऐवजीं वंशाला काळिमा मात्र लागण्याचा हल्लीं पुष्कळ संभव असतो! अशा वेळीं वंशवृद्धि नाहीं झाली म्हणून बिघडलें कोठें? अर्थात् मुलें होऊं नयेत असें कोणाचेंच म्हणणें नाहीं. पण त्यासाठीं एवढा अट्टाहास करण्याची जरूरी नाहीं, हेंच सांगण्याचा मुख्य उद्देश आहे. नशिबानें मुलें झालीं तर हवींच आहेत. पण तीं जितकीं होतील तितकीं होऊं देणें किंवा तीं कमीअधिक करणें यामध्यें सारासार विचार करून कांहीं ठरविणें किंवा त्याप्रमाणें वागणें यांत कांहीं पाप आहे असें समजण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. युक्तिवादानें तें वाईट आहे असें सिद्ध झाल्यास तें करण्याचा कोणीहि आग्रह धरणार नाहीं. पण त्यामध्यें पापपुण्य व धर्म किंवा नीति-अनीति यांना निष्कारण घुसडवूं नका एवढेंच सुधारणावादी लोकांचें म्हणणें आहे. अगदीं पुरातन काळांतून आपण थोडे पुढें आल्यावर ज्या वेळीं साधारण बरींच मुलें होत होतीं तेव्हां पुष्कळ वाईट मुलांपेक्षां एकच मुलगा असलेला पत्करला अशी विचारसरणी प्रसृत होती. म्हणजे काळवेळ पाहून वागण्याचें आपल्यालाहि कांहीं वावडें नाहीं असें यावरून सिद्ध होतें. पुढील सुभाषित प्रसिद्धच आहे.

वरमेको गुणी पुत्रो नच मूर्खशतान्यपि।
एकश्चंद्रस्तमो हन्ति न च तारागणोपि च ॥

वायबलमध्येंसुद्धां अशीच स्थिति उत्पन्न झाली आहे. जेव्हां नोव्हा व त्याचे तीनच मुलगे जगामध्यें होते तेव्हां त्यांना आकाशांतील बापानें 'संतती उत्पन्न करा, त्यांची संख्या वाढवा व जग लोकांनीं भरून टाका' अशी आज्ञा केली. हीच आज्ञा हल्लींसुद्धां अक्षरशः पाळण्याचा हट्ट धरणें अर्थातच वेडेपणाचें होईल. तेव्हां जगांत किती थोडे लोक होते याचा विचार केल्यावर ईश्वराची ती आज्ञा योग्य होती असें कोणीहि कबूल करील. परंतु त्या आज्ञेप्रमाणें वागून ती अक्षरशः पाळल्यावर नंतरसुद्धां निरंतर तसेंच वागा असें म्हणण्यांत काय अर्थ आहे? आतां देवानें कोणची आज्ञा केली असती याचा थोडा विचार केला पाहिजे. त्या वेळीं त्यानें देशकालपरिस्थिति लक्षांत घेऊन ही आज्ञा केली होती; मग आतांच तो ती परिस्थिति विसरून जाईल असें कसें म्हणतां येईल? यासाठीं अक्षराकडे लक्ष न देतां त्या शब्दांतील अर्थ लक्षांत घ्या, म्हणजे आजच्या परिस्थितीला कशाची जरूरी आहे हें लक्षांत येईल.

वरच्या श्लोकाप्रमाणें वायबलमध्येंहि स्थिति उत्पन्न झाली आहे. तेथेंहि "Desire not a multitude of unprofitable children, neither delight in ungodly sons; though they multiply, rejoice not in them, for one that is just is better than a thousand." एकच पण तो सत्यवादी असेल तर हजारांपेक्षां चांगला असें म्हटलें आहे.

आतां हा विषय नैतिक आहे किंवा अनैतिक आहे हें ठरविण्याला उपरिनिर्दिष्ट निकष लावणेंच बरें. त्या निकषाचा मथितार्थ एवढाच कीं, संततिनियमनापासून उत्पन्न होणारे परिणाम किंवा त्याला कारणीभूत होणारे उद्देश हे नीतिकारक आहेत वा अनीतिकारक आहेत हें पहावयाचें. उद्देश थोडक्यांत लक्षांत घेतल्यावर परिणाम आपोआपच विचारांत घेतां येतील.

संततिनियमनाचे मुख्य उद्देश काय आहेत हें प्रथमतः पाहिलें पाहिजे. पहिला महत्त्वाचा उद्देश आयांची प्रकृति सुधारावी हा आहे. खालच्या व

मध्यम स्थितींतील बायकांची स्थिति किती करुणास्पद असते व त्यांचें जीवन म्हणजे एक मोठा आजारच कसा असतो हें वाचकांना अवगत आहेच. तेव्हां त्यांची प्रकृति चांगली रहावी, त्यांचीं मुलें व त्याहि मृत्युमुखीं पडूं नयेत म्हणूनच इतका खटाटोप करावयाचा. यामध्यें अनीतीला वाव कोठें मिळतो हें वाचकांनींच परस्पर ठरवावें.

दुसरा उद्देश, मुलांची प्रकृति निकोप असावी हा आहे. आईचा पाळणा जरा जास्त दिवस गेल्यावर असला म्हणजे तिला आपल्या मुलांकडे लक्ष द्यावयास वेळ मिळतो. मुलांची जोपासना नीट होते. तिची प्रकृति चांगली असली म्हणजेच ती मुलांची काळजी जास्त वहाते. मुलांना चांगलें दूध मिळतें व त्यांच्यावर देखरेख ठेवण्यास स्त्रियांना वेळ सांपडतो. इतकी काळजी घेतली म्हणजे मुलें निरोगी राहतात. आईची प्रकृति चांगली असलीं म्हणजे आधीं गर्भ चांगला वाढीस लागतो. व जें मूल उपजतं तें निकोप प्रकृतीचें असतें. त्याचा सांभाळ चांगला झाला म्हणजे तें दगावण्याची भीति रहात नाहीं. आईला मुलांविषयीं प्रेम व वात्सल्य वाटतें व तें कुटुंब सुखी असतें. या दृष्टीनें संततिनियमनानें समाजाची नीतीच आपण सुधारतों असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

अशा रीतीनें कुटुंबें सुधारूं लागलीं म्हणजे समाजाला सुधारण्यास वेळ लागणार नाहीं. ही सुधारणा व्हावी हा संततिनियमनाचा तिसरा महत्त्वाचा उद्देश आहे. श्रीमंत व गरीब या दोघांनाहि आपापलीं कुटुंबें सुधारतां यावींत अशी या उपायांत योजना आहे. मुलांची संख्या जितकी पाहिजे तितकी असली म्हणजे आईबाप दुःखी असण्याचें कांहीं कारण नाहीं. मुलें बेताचीं असलीं म्हणजे आर्थिक स्थितीहि समाधानकारक ठेवण्यास कुटुंबाला जड जाणार नाहीं व आर्थिक स्थिती बेताची असली म्हणजे त्या मानानें मुलांची व्यवस्थाहि चांगली ठेवतां येईल. मुलें निरोगी असलीं म्हणजे समाजाचें आरोग्यसुद्धां चांगलें राहील. या योगानें अनारोग्य व आर्थिक टंचाई या

दोन ज्या अनीतीला प्रेरक गोष्टी आहेत त्याच नामशेष झाल्यानें अनीति माजण्याचें प्रमाण फारच अल्प होईल.

चवथा व महत्त्वाचा उद्देश म्हणजे जगांतील लोकसंख्या प्रमाणांत ठेवणें हा होय. लोकसंख्या जर योग्य प्रमाणांत राहिली नाहीं तर लोक एकमेकांना मारून जगांत राहण्याचा प्रयत्न केल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत. म्हणजेच लढाया वरचेवर होतील. लढायांचीं कारणें अर्थातच अन्य कोणतीं तरी दाखविण्यांत येतील; पण त्यांचें मूलभूत कारण म्हणजे संख्या कमी करणें हेंच होय. लढाया थांबविण्यासाठीं निरनिराळ्या देशांनीं एका ठिकाणीं जमून कितीहि प्रयत्न केले तरी लोकसंख्या झपाट्यानें वाढत असल्यावर त्यांच्या प्रयत्नांना यश येणें कधींहि शक्य नाहीं. या दृष्टीनें लोकांना एकमेकांना मारण्यापासून परावृत्त करणें हा ज्याचा सुपरिणाम त्या संततिनियमनापेक्षां दुसरी कोणची गोष्ट नीतिकारक असूं शकणार ?

जगांत नीति वाढावयास समाजांत सुख नांदलें पाहिजे. आर्थिक स्थिति समाधानकारक पाहिजे. माणसें उपाशी मरत असल्यावर ते नीतीच्या कल्पना गुंडाळून ठेवून अनीतीचा मार्ग खासच पत्करणार! त्यांना तसेंच उपाशी ठेवून नीतीचा उपदेश करणें यांत कांहींच अर्थ नाहीं. त्यांची स्थिति सुधारली कीं आपोआपच ते नीतीनें वागूं लागतील.

नीतीची जोपासना शक्य होईल अशी परिस्थिति लाभवून दिल्याशिवाय स्त्रीपुरुषांना नीतीच्या नुसत्या गप्पा मारून केव्हांहि कार्यभाग होणार नाहीं. यामुळें उलट नीति सुधारण्याऐवजीं अनीतीचा प्रसार मात्र जास्त होतो. अशा प्रसंगीं गर्भपातांची संख्याहि वाढीला लागते. एकट्या अमेरिकेंत दर वर्षी वीस लाख मुलांचा गर्भावस्थेंत नाश करण्यांत येतो! याचें कारण लोकांना संतति नको असतांना ती होते हेंच होय. संततिनियमन करण्याची माहिती कायद्यानें मिळत नसल्यामुळें लोक स्वाभाविकच गर्भपाताकडे वळतात. यांतील बरेचसे लोक अनीतीनें झालेल्या गर्भाची विल्हेवाट लावणारे असतील;

पण पुष्कळांना आर्थिक दृष्ट्या किंवा आरोग्यदृष्ट्या वगैरे अन्य कारणांनीं मुलें होणें चांगलें वाटत नसल्यामुळेंच ते गर्भपातापर्यंत मजल मारतात ! संतति-नियमन केल्यानेंहि कांहीं अनीति वाढण्याचा कदाचित् संभव आहे. परंतु ती अनीति व संततिनियमन न केल्यामुळें उद्भवणारी अनीति या दोन्हींचाहि योग्य विचार करून समाजाला कोणची विघातक आहे, समाजाचें आरोग्य कशानें बिघडणारें आहे व समाज कशानें अधिक दुःखी होणें शक्य आहे याचा सारासार विचार करूनच एक वाईट व दुसरी चांगली हें ठरविलें पाहिजे.

संततिनियमनाची माहिती मिळत नसल्यामुळें अमेरिकेंत गर्भपाताच्या वाढीसंबंधानें लिहितांना, लंडन युनिव्हर्सिटी युजीनिक्स लॅबोरेटरीसाठीं प्रसिद्ध करण्यांत आलेल्या वर्थरेट रिपोर्टांत त्याचे संपादक एल्डर्टन म्हणतात कीं, हल्लीं गर्भपात करण्याच्या औषधांचा व्यापार इतका वाढला आहे कीं, त्याची लोकांना कल्पनाच येणार नाहीं. हीं औषधें घेऊन गर्भपात होत नसतो, परंतु माणूस याचा विचार न करितां हीं औषधें वापरतो व त्याचा परिणाम स्त्रियांच्या प्रकृतीवर अनिष्ट झाल्याशिवाय रहात नाहीं.

नैतिक दृष्ट्या विचार करावयाचा म्हणजे किती गोष्टी विचारांत घेतल्या पाहिजेत याचें आतांपर्यंत विवेचन केलें. यांतच धार्मिक दृष्ट्या थोडेंफार विवेचन येऊन गेलें आहे. यापेक्षां जास्त विवेचनाची आपल्या दृष्टीनें जरूरी आहे असें वाटत नाहीं.

---

## प्रकरण अकरावें

# विरोधकांच्या आक्षेपांचें निरसन

संततिनियमनाची आवश्यकता किती व कोणच्या दृष्टीनें आहे हें आतांपर्यंत सांगितलें. ही आवश्यकता प्रतिपादन करीत असतांनाच त्याच्या विरुद्ध काय काय मुद्दे आणण्यांत येतात हेंहि पाहणें योग्य होईल. असें केल्यानें या चळवळीविरुद्ध असणाऱ्या लोकांचा दृष्टिकोण काय आहे हें कळेल; व तो कितपत रास्त आहे याचीहि वाचकांना कल्पना येईल. परंतु हें पाहतांना आतांपर्यंतच्या विवरणांत असले बरेच मुद्दे येऊन गेले आहेत हें विसरून चालणार नाहीं. तेच पुन्हां येथें सांगत बसणें म्हणजे निष्कारण कालाचा अपव्यय करणें होय. तसें न करतां कारणापुरता त्यांचा नामनिर्देश मात्र येथें करण्यांत येईल.

पहिल्या प्रथम ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे कीं, हा विषय नवीन आहे. ही सुधारणा अलीकडेच घडून येऊं लागली आहे. नवीन सुधारणा दिसली कीं तिचे फायदे किंवा तोटे काय काय आहेत इकडे लक्ष न देतां एकदम तीविरुद्ध काहूर करणें हा मनुष्यस्वभाव आहे. कोणचीहि सुधारणा पुराणमतवादी लोकांच्या धिक्काराशिवाय समाजांत मान्यतेस चढली नाहीं.

जुनें तें सोनें व नवीन तें वाईट अशीच सर्वसाधारण लोकांची कल्पना असते. नवीनाकडे फारच थोड्यांची ओढ असते. समाजाला पटवून दिल्याशिवाय किंवा त्याच्या कानींकपाळीं ओरडल्याशिवाय समाज नवीन गोष्टींकडे ढुंकूनहि पहावयाचा नाहीं, ही प्रवृत्ति आपल्याला प्रत्येक सुधारणेच्या वेळीं प्रत्ययास येते. ज्या आज साध्या गोष्टी वाटतात त्यांच्याबद्दल कांहीं वर्षांपूर्वी किती रणें माजलीं होतीं हें लक्षांत घेतलें म्हणजे हा मुद्दा वाचकांच्या चटकन् लक्षांत येईल. प्रौढविवाह, पुनर्विवाह वगैरे सुधारणांचें असेंच झालें. पण आज त्याबद्दल वादच राहिला नाहीं. स्त्रीशिक्षणाबद्दल मागें किती वाद होत, परंतु हल्लीं ती एक प्रायः नित्य क्रमांतली गोष्ट झाली आहे. ज्याला शक्य असेल तो मुलींना शिक्षण देतो किंवा देत नाहीं. परंतु त्याबाबत कोणी वादविवाद घालीत बसत नाहीं. तशीच या विषयाचीहि स्थिति कांहीं वर्षांनीं होईल. पण सध्यां त्याला तशी स्थिति अजून प्राप्त झाली नाहीं. तरी पाश्चात्य राष्ट्रांतून याचा उपयोग हल्लीं सररहा करण्यांत येतो. ज्या देशांतून याला कायद्यानें बंदी केली आहे तेथें किंवा जे लोक याच्या विरुद्ध आहेत त्यांच्यामध्यें देखील याचा प्रसार बराच झाला आहे. वरून आपलीं मतें कोणीं कशींहि दाखविण्याचा जरी प्रयत्न केला तरी आंतून बरेचसे लोक याचा उपयोग करतात. हॅवेलॉक एलिस हे आपल्या 'सायकॉलॉजी ऑफ सेक्स'च्या नव्या मॅन्युअलमध्यें पान४५ वर लिहितातः—"( Contraception ) exists on a large scale even in countries where the law forbids its dissemination, and even among the adherents of creeds which disapprove of it."

संततिनियमनाच्या विरुद्ध असणाऱ्या लोकांतहि पुष्कळ प्रकारचे लोक आहेत. कांहीं लोक या तत्त्वाविरुद्धच आहेत. कांहींचें म्हणणें असें कीं, यानें स्त्रियांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम होतो; कांहीं वंध्यात्व येतें असें प्रतिपादन करतात, तर कांहीं लोकांना यानें अनीति जास्त बोकाळेल अशी भीति वाटते. याचा शरिरावर काय परिणाम होतो हें आधीं लक्षांत घेतलें पाहिजे.

संततिनियमन करण्याचें कांहीं एकच साधन नाहीं. त्यांत साधनांची विविधता आहे तसेच विनासाधनहि संततिनियमनाचे कांहीं प्रकार आहेत. यांपैकीं कोणच्या साधनानें व कोणच्या प्रकारानें वाईट परिणाम होतो हें उघड केलें पाहिजे. त्यांपैकीं एकानें होणारा वाईट परिणाम साऱ्या संततिनियमनासच लागू पडतो असें नाहीं. संततिनियमन करण्याची क्रिया योग्य रीतीनें माहीत नसल्यानें सुद्धां वाईट परिणाम होण्याचा संभव असतो हें विसरून चालणार नाहीं. पुष्कळ वेळां डॉक्टर लोक यावर जे आक्षेप घेतात ते त्रुटित संभोगावरच असतात. ते त्रुटित संभोगालाच संततिनियमन म्हणून त्यापासून होणाऱ्या तोट्यांना संततिनियमनापासून होणारे तोटे असें संबोधतात. अर्थात्च हें योग्य नाहीं. संततिनियमनाचे पुरस्कर्तेहि त्रुटित संभोगाच्या विरुद्ध आहेत.

डॉ. रूथ म्हणतात:——

"I have no doubt that prevention of maternity by artificial methods invariably produces physical, mental and, I think, moral harm to those who resort to it. I am sure it does harm to both if they both agree to it. The act is incomplete, it is not a spontaneous act; and if the act ceases before the proper crisis, as it were, the nervous system suffers enormously if the habit is continued for long." हें अर्थातच त्रुटित संभोगाला लागू पडतें. यांत संततिनियमनाच्या साधनांचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. परंतु डॉ. रूथ यांनीं आर्टिफिशियल मेथडस म्हणून सर्वच उपाय निष्कारण अपायकारक ठरविले आहेत.

याचप्रमाणें वंध्यात्वाचाहि विचार करावयास पाहिजे. यायोगानें वंध्यात्व प्राप्त होतें हें म्हणणें सोपें आहे. परंतु तें सिद्ध करतां येणें अवघड आहे. आधीं वंध्यात्व येतें हें सिद्ध करावयास उदाहरणें दाखविण्यांत येत नाहींत व उदाहरणें जरी पुढें असलीं तरी त्या बायका आधींच वांझ कशावरून नसतील ? हेंहि सिद्ध करून घेतलेलें नाहीं. या दृष्टीनें बाई आधीं वांझ नसून, तिनें जर हे उपाय योग्य रीतीनें वापरले तर ती वांझ होते किंवा नाहीं

हें पाहिलें पाहिजे. अशा दृष्टीनें पुरावा पुढें न आल्यामुळें हा मुद्दा निकालांत काढण्यास कांहींच हरकत नाहीं. याचें सांगोपांग विवरण मागें आलेंच आहे.

मागल्या पिढीच्या बायकांची प्रकृति कशी होती हें जर आपण पाहिलें तर त्या पिढींतील बायकांमध्यें व हल्लींच्या पिढीच्या बायकांमध्यें महदंतर दिसल्याशिवाय रहाणार नाहीं. मागल्या पिढींत बायकांना दर दोन वर्षांनीं मुलें होऊनहि त्यांची प्रकृति चांगली असे. पुष्कळ मुलांच्या माता त्या वेळीं घरोघरीं दिसत व कमी मुलें होणें कमीपणाचें समजलें जात असे. इतकें असूनहि त्या मातांची प्रकृति सुदृढ असे व मुलेंहि धडधाकट व निरोगी असत. आपल्याकडे हें दृश्य नेहमींच दिसे. त्याचप्रमाणें पाश्चात्य राष्ट्रांतूनहि अशीच स्थिति असे. व्हिक्टोरियाच्या कारकीर्दींत मोठें कुटुंब असणें अभिनंदनीय समजलें जात असे. न्यूयॉर्क येथील प्रसिद्ध डॉ. पॉड्विन यानें असें नमूद करून ठेविलें आहे कीं, इस्पितळांत येणाऱ्या बायकांमध्यें ज्यांना पुष्कळ मुलें झालीं आहेत अशाच बायका विशेष सशक्त व निरोगी असतात असें आढळून येतें! तो पुढें असें म्हणतो कीं, अशा मातांची स्थिति मोठी मननीय आहे. त्यांच्याभोंवतीं नेहमीं त्यांचीं हंसतमुख मुलें सुखासमाधानानें रहात असतात. व त्यांच्या सुखांतच या मातांचें सुख सामावलें असतें!

The finest physical specimens of womanhood that I have in my acquaintance at the age of forty to fifty or over are the mothers of large families. Health and happiness shine in their countenance—happiness engendered by the hopes and plans and endeavours in behalf of others—their children. Sacrifice, the great force, has refined their character, and surrounded by their progeny they are truly the queens of the earth, before whom every true and honorable man has ever bowed in allegiance and respect—noble motherhood.

—*Birth-Control* by Johnson, page 305.

अशा प्रकारची सुस्थिति संततिनियमनाच्या पुरस्कर्त्यांना नको आहे असें नाहीं. मातृपदाच्या विरुद्ध कोणीहि नाहीं. बाळबाळंतिणींची प्रकृति जर दर वेळीं चांगली राहिली तरीहि त्यांनीं नियमन करावें असें म्हणण्याचा कोणाचाच उद्देश नाहीं. मागल्या पिढीला आर्थिक सुस्थिति होती. त्याप्रमाणें जेथें स्थिति असेल तेथें मोठें कुटुंब अवश्य असावें. अशा स्थितीचें महत्त्व कोणीहि कमी करीत नाहीं. संततिनियमनाच्या विरुद्ध लिहिणारे हे डॉ.पॉड्विन सुद्धां कांहीं कांहीं स्थितींत संततिनियमन करावें असें म्हणतात. त्यांच्यांत व नियमनाच्या पुरस्कर्त्यांत विशेष फरक नाहीं. संततिनियमनाचा पुरस्कर्ता म्हटला म्हणजे तो सररहा व साऱ्या बायकांनीं नियमन करावें असें म्हणत नाहीं. तशी विरुद्ध लोकांची गैरसमजूत झाली असावी असें दिसतें. दोन्ही पक्षांनीं जर विचारविनिमय केला तर दोघांतहि पुष्कळ साम्य दिसेल असें पॉड्विनच्या लेखावरून म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा जो पुढें करण्यांत येतो तो एकदमच कबूल करणें योग्य आहे. तो असा कीं, संततिनियमनाचे मार्ग एकदां प्रचारांत आले म्हणजे गर्भ राहण्याची भीति उरणार नाहीं. गर्भ राहणें ही एकच भीति किंवा आडकाठी ज्या लोकांना पाप करण्यास पुरेशी होते त्यांना ती नाहींशी झाली म्हणजे अनीतीला मार्ग मोकळा झाल्याप्रमाणेंच होईल. अर्थात् हें खरें आहे. पण त्यामुळें पाप सर्वत्र फैलावेल ही जी समजूत आहे ती मात्र चुकीची आहे. अनीति होण्याचा संभव आहे हें खरें. पण त्यानें खात्रीनें अनीतीचा प्रसार होईल हें कांहीं खरें नाहीं. मुक्त व्यवहाराला अनुलक्षून जर हें म्हणणें असेल तर ते ज्या प्रमाणांत हल्लीं होतात त्याप्रमाणें ते पुढेंहि राहणारच. विवाहित स्त्रीपुरुषांना गर्भाची दहशत नसतांनाहि ते सर्वच अनीतीपासून अलिप्त असतात असें नाहीं. अर्थात् त्यांच्यामध्यें आहे त्याच प्रमाणांत अनीति राहणार. बरें, ज्यांना गर्भाची भीति वाटते ते त्या गर्भाची कोणत्याहि मार्गानें विल्हेवाट लावतातच. गर्भधारणेच्या भीतीनें वांकडें पाऊल टाकण्यास

न धजणाऱ्या अशा कांहीं स्त्रिया संततिनियमनाचा गैरफायदा घेतील हें खरें. पण तेवढ्यासाठीं या उपायांचे जे फायदे आहेत ते दृष्टीआड करून चालणार नाहींत. प्रत्येक चांगल्या गोष्टीला वाईट बाजू असतेच; पण तेवढ्यासाठीं कोणी चांगली गोष्ट त्याज्य समजत नाहीं.

या दृष्टीनें डॉ. पॉड्विन यांचें पुढील म्हणणें विचारणीय आहे. (*Birth-Control* by Johnson, page 302)

Again, we are all aware that one of the greatest protecting agencies of family virtue is the fear of conception. Remove this fear and you have taken away from those of not overstrong mental faculties one of the most important natural safeguards of chastity. Also, any physician is aware that the methods advocated by the disciples of birth-control are far from perfect, that in order to be even tolerably efficacious they must be intelligently carried out. Now, the very class of women for whom they are intended are the ones least likely by nature and environments to observe the prescribed technic. Thus we would have the terrible results of the false security promised by those prescriptions, and the inevitable accompaniment, the abortionist or suicide. गर्भधारणेची भीति नाहींशी झाल्यानें डळमळणाऱ्या पातिव्रत्याचा किंवा कौमार्याचा गुण काय उपयोगाचा ? तो केवळ भीतीनें दबून राहिला तर काय उपयोग ? तो मूळचाच असला पाहिजे.

Further, the knowledge that sexual intercourse may be enjoyed without the probability of pregnancy occurring tends to over-develop the sexual side of character in both men and women. Mankind is already over-sexed. The absence of all restraints, such as times and seasons impose on other animals, is probably the result of the over-exercise of this gracious gift, and anything which tends still further to increase the already superabundant sexua-

lity of man is an injury and not an advantage, both physically and morally. Can any one imagine a more terrible state of society than that which is found to evolve from the indulgence of unbridled sexual passions? The people and the nations which practise artificial prevention of conception, and who, therefore, have no restraint on their sexual passions, are likely to become effeminate and degenerate. The removal of the sanction of matrimony and the unhindered and unbalanced sexual indulgence that would follow, would war against self-control, chivalry and self-respect.

(by Dr. Mary Scharlieb, B. M. Journal, July 1921)

विरोधकांना थोडा उणेपणाहि भडक रंगांत कसा चित्रित करतां येतो हें दाखविण्यासाठीं हा उतारा येथें उद्धृत केला आहे.

संततीचें नियमन करण्याची एकदा सुरुवात झाली म्हणजे पतिपत्नीसंबंध-सुद्धां शिथिल पडतील असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे. त्यांना असें वाटतें कीं, पतिपत्नीसंबंध फक्त प्रजोत्पत्तीसाठींच आहे व इतर जीं त्यांचीं कारणें आहेत तीं सारीं गौण आहेत. हें जरी खरें धरलें तरी संततिनियमन कां करूं नये हें कळणें कठीण आहे. प्रजोत्पत्तीला कोणाचीच ना नाहीं. प्रजोत्पत्ती तर व्हावी; पण त्याबरोबर ती प्रजा सुप्रजा असावी एवढेंच आमचें म्हणणें आहे. ती प्रजा जर सुप्रजा असेल तर नियमनाचें कांहींच कारण नाहीं. परंतु ती तशी जर नसेल तर थोडेंसें नियमन हें केलेंच पाहिजे. कांहीं लोकांचें म्हणणें असें असतें का, पतिपत्नीसंबंध प्रजोत्पत्तीसाठीं असल्यामुळें फक्त त्यासाठींच पतिपत्नींनीं एका ठिकाणीं यावें, एरव्हीं वानप्रस्थाश्रमाप्रमाणें स्वतंत्र रहावें. जेव्हां मूल पाहिजे असेल तेव्हांच हा संबंध यावा. अर्थात् हें ध्येय सुंदर व दिव्य आहे, पण तें आचरणीय नाहीं. ज्याला त्याचें आचरण करतां येईल त्यांनीं तसें अवश्य करावें! परंतु त्यांना तसें करतां येतें म्हणून इतरांनीं तसें करावें असें त्यांना दुसऱ्यांना सांगतां येणार नाहीं. दुसऱ्यांना जर स्वयं-

नियमनाची ताकद नसेल तर त्यांना हंसण्यांत हंशील नाहीं. पतिपत्नी म्हणून एका घरांत राहावयाचें व स्वयंनियमन करावयाचें हें फार अवघड आहे. तें ज्यांना साध्य होईल त्यांची कीर्ति अवश्य गावी, परंतु ध्येय म्हणून जी गोष्ट आहे तिचें आचरण सर्वांनीं करावें असा दंडक घालून चालणार नाहीं.

पतिपत्नीसंबंधांत तीन गोष्टींचा प्रामुख्यानें समावेश होतो. त्यांमध्यें प्रणय, प्रेम व मातृपद हीं प्रमुख आहेत. इतर सामाजिक कर्तव्यें जरी बाजूला सारलीं तरी कुटुंबांत वरील त्रयीला महत्त्व आहे. कांहीं लोकांचें म्हणणें असें आहे कीं, एकदां पतिपत्नींना संततिनियमनानें पळवाट मिळाली म्हणजे ते स्वैराचारी होतील. त्यांना निर्बंध रहणार नाहीं व रात्रंदिवस ते पशुवृत्तीचें अनुकरण करतील! हा आरोप प्रथमदर्शनींच वेडगळ स्वरूपाचा दिसतो. संततीचें नुसतें नियमन करण्यामध्यें जर स्वैराचार होऊं लागला तर मनुष्याच्या मनाची कुवत फारच नादान आहे असें म्हणावें लागेल. मनुष्याचें मन, इतर संबंध व सामाजिक निर्बंध तर राहोतच. पण पतिपत्नींना आपल्या प्रकृतीची कांहींच काळजी नाहीं असेंच म्हणावें लागेल. त्या लोकांना असें वाटतें कीं, स्वैराचारानें प्रेमापेक्षां प्रणय जास्त प्रभावी होऊन व संततिनियमनानें मातृपदाची जबाबदारी नाहींशी होऊन मनुष्याला कांहींहि संयमन राहणार नाहीं.

Artificial birth-control tends likewise to isolate sex passion from its natural controls and correctives, love and parenthood. It reaps the pleasures of sex while at the same time evading the normally consequent sacrifices and responsibilities of sex. Contraceptive practices eliminate from the marital relation prospective acceptance of parenthood, and only too commonly eliminate parenthood itself from the home or reduce it to near the zero point. The element of the sacred that ordinarily hallows marital intercourse disappears where there is no question of co-operation in the divine creative act nor of acceptance of the sacrosanct office of parenthood. The evasion more-

over of parenthood means as well the evasion of the character-building and character-sustaining sacrifices and responsibilities that parenthood entails.

From pamphlet on Birth-Control by John M. Cooper, Ph.D.

हे लोक एवढेंच म्हणून थांबत नाहींत, तर यापुढें जाऊन ते असा आरोप करतात कीं संततिनियमन एकदा सुरू झालें म्हणजे विवाहित स्त्री वेश्येच्या दर्जाला जाऊन पोहोंचते. परंतु असा आरोप* करतांना त्यांची संततिनियमनाची कल्पना काय असते हेंच कळत नाहीं. नियमन म्हणजे ते स्वैराचार म्हणतात कीं काय याचेंच वाचकांना गूढ पडेल.

या सार्‍या आरोपांचा आपण जर नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं, या लोकांचें म्हणणें ध्येयभूत प्रेम, मातृपद वगैरे दैवी व पुराणांतरीं शोभणार्‍या गुणांविषयीं आहे. जगामध्यें जें जें अत्युत्तम त्याचा आरोप सर्वसाधारण जनतेवर करून ते गुण प्रस्तुत साधनांनीं कमी किंमतीचे ठरतील किंवा त्यांच्यांत वैगुण्य उत्पन्न होईल असें ते म्हणतात. परंतु त्यांना अजून ही भूमिकाच नीट कळली नाहीं असें दिसतें. संततिनियमन करणारांची भूमिका आधीं समजून घेतली पाहिजे. त्यांनाहि हे गुण हवेत; त्यांना कांहीं त्यांचें वावडें नाहीं. किंबहुना हे गुण विशेषत्वानें प्रगट व्हावेत म्हणूनच ते संततिनियमनाला प्रवृत्त होतात. कोणच्याहि गुणाचा विचार करावयाचा म्हणजे आधीं ते ज्या लोकांत दिसतात त्यांच्या प्रकृतीचा विचार केला पाहिजे. निकोप प्रकृति असली कीं मनहि निरोगी व प्रसन्न असतें; व मगच त्याला या गुणांना चिकटून बसतां येतें. मन जर प्रसन्न नसेल, तें जर सदाच निराश असलें तर या गुणांचें त्याला कांहींच वाटत नाहीं. तें कशाचाहि विचार करीत नाहीं व स्वार्थापुढें तें वाटेल ते अत्याचार करण्यास प्रवृत्त होतें.

* डॉ. हॉवर्ड केली म्हणतात:—"All meddling with the sexual relation to secure facultative sterility degrades the wife to the level of a prostitute ! ! "

लवकर लवकर होणारीं मुलें मरून जावींत असें देखील या मनाला वाटतें. पापाकडे किंवा अनीतीकडे प्रवृत्त करणारी ही स्थिति वाईट कीं ही स्थिति बदलून मन प्रसन्न व्हावें व या प्रवृत्तींना आळा बसावा म्हणून खटपट करणारें संततिनियमन वाईट याचा वाचकांनींच विचार करावा.

संततिनियमन नको असें सिद्ध करण्याला आध्यात्मिक, दैविक किंवा उच्च मनोवृत्तींना पोषक अशीं कारणेंच नेहमीं पुढें करण्यांत येतात. पण जास्त विचार केल्यावर असें आढळून येईल कीं, यासाठींच पुरस्कर्ते देखील प्रयत्न करतात व पतिपत्नींचे संबंध दृढ रहावे, त्यांची आध्यात्मिक उन्नत्ति व्हावी यासाठींच त्यांचीहि धडपड असते. तात्त्विक दृष्टीनें चर्चा करावयाची म्हणजे अनुकूल व प्रतिकूल असे किती तरी मुद्दे आणतां येतील. परंतु हा प्रश्न नुसता चर्चा करण्याचा नाहीं. जी केविलवाणी व हृदयद्रावक परिस्थिति आपल्या सभोंवतीं पसरली आहे तीवर चांगल्या तऱ्हेनें जर उपाय करतां आला तर तो आपल्याला पाहिजे आहे. ज्या उपायानें कमी तोटा होईल, किंबहुना तोटा होण्याचा संभव कमी असेल तोच उपाय अमलांत आणणें शहाणपणाचें आहे. व ही योजना त्यांपैकींच आहे. म्हणून तिचा अवलंब करावा असें पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. विरोधासाठींच विरोध करावयाचा ही भूमिका बाजूला ठेवून प्राप्त परिस्थितींतून मार्ग काढण्याचा योग्य विचार केला तर त्यांना सध्यां तरी या मार्गाचा अवलंब करणें हेंच पटेल. यापेक्षां दुसरे उपाय निघाले तर ते पाहिजेच आहेत. पण ते उपाय निघतील तोंपर्यंत तरी या उपा-यांचाच अवलंब करावा लागेल. यांचा उपयोग पाहिजे तेवढा मर्यादित करावा. तसें करण्यासाठीं कायद्याची सहानुभूति मिळवावी व योग्य लोकच त्याचा उपयोग करतात कीं नाहीं हेंहि पहावें; अर्थात् हें शक्य नाहीं. एकदां हे जिन्नस बाजारांत विकावयास ठेवले म्हणजे कोणीहि ते घेतील. तरी पण डॉक्टराच्या सर्टिफिकेटाशिवाय ते विकण्याची मनाई केली तर मनसोक्त विक्रीला आळा बसेल व गरजू लोकांनाच ते मिळूं शकतील. मर्यादा एकदां

कबूल केल्या म्हणजे नियमनाला विरोध असूं नये एवढें वाचकांना पटवून देण्यासाठींच याविरुद्ध पुरावा मुद्दाम येथें दिला आहे. मूळ इंग्रजी उल्लेख सुद्धां याचसाठीं उद्‌धृत केले आहेत. ज्यांना इंग्रजी येत नाहीं त्यांच्यासाठीं प्रत्येक ठिकाणीं या उल्लेखाचा मथितार्थ दिलाच आहे.

---

# प्रकरण बारावें

## संततिनियमनाचा पुरस्कार

संततिनियमनाचा योग्य अर्थबोध झाल्याशिवाय त्याचा पुरस्कार किंवा त्याला विरोध करणें हे अर्थातच सयुक्तिक ठरणार नाहीं. या अर्थाचा विपर्यास करून पुष्कळ वेळां विरोधक आपली बाजू पुढें मांडतात, तर त्याचे पुरस्कर्ते देखील जेथें तेथें संततिनियमन पुढें आणून त्याचें एक प्रकारें महत्त्वच कमी करतात. असें होऊं नये म्हणून त्या विषयाची व्याप्ति किती आहे व त्याच्या मर्यादा कोणच्या आहेत याचा प्रथमतः विचार केला पाहिजे. संततिनियमनाला सर्वांत योग्य परिस्थिति म्हणजे स्त्रियांची आरोग्यविषयक स्थिति होय. ती जर बिघडलेली असेल तर नियमन करणें अत्यंत युक्त समजलें जाईल. ज्या परिस्थितीनें स्त्रियांची प्रकृति ढांसळते ती परिस्थितीच येऊं द्यावयाची नाहीं हंच तत्त्व येथें अवलंबावें लागतें. एकसारखीं मुलें होण्यानेंच जेथें प्रकृति नादुरुस्त होते तेथें त्या नादुरुस्तीचें कारण उघडच असतें व त्याचा परिहार केला म्हणजे प्रकृति बिघडण्याची काळजी उरत नाहीं. अर्थात् या ठिकाणीं जास्त मुलें होण्याला आळा घालणें हाच श्रेयस्कर उपाय ठरतो. हा उपाय म्हणजेच संततिनियमन होय.

एखादा रोग झाल्यावर त्याच्यावर औषधोपचार करीत बसण्यापेक्षां तो रोगच न होईल अशी परिस्थिति निर्माण करणें हें अधिक महत्त्वाचें समजलें जाते. ' Prevention is better than cure ' ही म्हण सुप्रसिद्धच आहे. या दृष्टीनें देशाचें, शहरांचें किंबहुना प्रत्येक व्यक्तिमात्राचें आरोग्य कसें सुधारलें जाईल याचाच विचार हल्लीं जास्त करण्यांत येतो. नवीन नवीन शोध हे रोग न होऊं देण्याकरतांच अस्तित्वांत येतात. इनॉक्युलेशन, देवी काढणें, मच्छरदाण्या वापरणें वगैरे गोष्टी देखील याच तत्त्वाला अनुलक्षून आपण करतों. इनॉक्युलेशन करून घेतलें नाहीं किंवा मच्छरदाणी वापरली नाहीं तर प्लेग किंवा मलेरिया होण्याची भीति असते, हें तत्त्व ज्याला पटलें तो जास्त विचार न करतां टोंचून घेतो व मच्छरदाणी वापरतो. तसेंच मुलें लवकर लवकर झालीं व त्यांची योग्य व्यवस्था होणें शक्य नसलें किंवा स्त्रियांची प्रकृति तसें होण्यानें खालावत चालली म्हणजे संततिनियमन करणें हितकर आहे हें माणसास पटूं लागतें. वरील दोन उदाहरणांत महत्त्वाचा फरक म्हटला म्हणजे, प्लेग व मलेरियाची माहिती सुशिक्षित व अशिक्षित अशा साऱ्या समाजाला झाली आहे, त्यामुळें त्यांचा भयंकरपणा सर्वांना तावडतोब पटतो व माणूस त्यावर वेळींच प्रतिबंधक उपाय करण्यास प्रवृत्त होतो. परंतु येथें म्हणजे संततिनियमनासंबंधांत ही परिस्थितीच लोकांना पटत नाहीं. स्त्रियांची प्रकृति ढांसळत असलेली त्यांना प्रत्यक्ष दिसते. पण ती कशानें ढांसळत आहे याची मात्र त्यांना कल्पना नसते व त्यामुळें ते हताश होऊन स्वस्थ बसतात. त्यांच्या अशा स्वस्थ बसण्यानें ही शोचनीय स्थिति दूर होते असें मात्र नाहीं ! स्त्रियांची प्रकृति खालावत जाण्याचें कारण त्यांना समजावून सांगितलें व संततिनियमन हाच त्यास उत्कृष्ट उपाय आहे हें जरी त्यांच्या निदर्शनास आणलें तरी या उपायाच्या नवीनपणामुळें व त्यांशीं भ्रूणहत्येसारख्या पातकाचा निष्कारण संबंध जोडण्यांत आल्यानें ते भेदरून जातात ! या विषयाचें महत्त्व व निर्दोषता हीं लोकांना पटल्याशिवाय ते प्लेग व मलेरिया यांप्रमाणें यावर उपाय

करण्यास अर्थातच तयार होणार नाहींत. यावर प्रतिबंधक उपाय म्हणजे स्त्रियांची प्रकृति ढांसळूं नये यासाठीं प्रथमपासूनच त्यांच्या प्रकृतीला मानवेल इतकीच संतती त्यांना होऊं देणें हा होय. संततिनियमन हें एक औषध आहे. तें योग्य ठिकाणींच उपयोगांत आणलें पाहिजे. त्याची जरूरी नसतांना तें घेतल्यानें अपाय होईल. कारण अतिरिक्त संततिनियमन केल्यानें सुखहानि होते हें देखील लक्षांत ठेविलें पाहिजे. जेथें जरूर नाहीं तेथें म्हणजे घरीं सुस्थिति असून व पतिपत्नींची प्रकृतीहि निकोप असून जर हें नियमन केलें तर काय होईल ? त्या सुस्थितीला शोभण्याजोगी कुटुंबाची परिस्थिति उरणार नाहीं. घरांत लहान मुलें नसल्यामुळें घर ओकें ओकें वाटेल व त्या पतिपत्नींनाहि वेळ मोठ्या कष्टानें घालवावा लागेल. लहान मुलांचें सुख कांहीं औरच आहे हें कांहीं कोणाला नव्यानें सांगावयास नको. त्याला सुखासुखीं मुकणाऱ्याच्या बुद्धीची तारीफ करावी तेवढी थोडीच होणार आहे ! कांहीं निरोगी व सुस्थितींतील बायांना बाळंतपणानें व मुलाला पाजण्यानें सौंदर्यहानि होते असें वाटतें व त्यासाठीं त्या नियमन करतात. पण हीं उदाहरणें संततिनियमनाचा आरोग्यदृष्ट्या अवलंब करण्याच्या कक्षेंत येत नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. औषधाला जसें प्रमाण असतें तसें नियमनालाहि असलें पाहिजे. तें प्रमाणांत उपयोजिलें तर हटकून फलदायी होतें. दोन मुलांमधील अंतर आईच्या प्रकृतीस मानवेल इतकेंच ठेवणें हेंच तें प्रमाण होय. रोग फारच वाढल्यावर त्याचा बीमोड केल्याशिवाय गत्यंतर नसतें व त्यासाठीं जालीम उपाय योजावे लागतात. तो रोग कापूनहि काढावा लागतो. तसेंच येथेंहि फार मुलें झाल्यानें अत्यंत अशक्तता आल्यावर किंवा कांहीं आनुवंशिक रोग असणाऱ्या व्यक्तीच्या बाबतींत संततीस कायमचाच प्रतिबंध केला पाहिजे. तो शस्त्रकर्मानेंच करणें अवश्य असतें. संततिनियमन हें एक औषध आहे हें विसरून चालणार नाहीं. आतां औषधाचाहि दुरुपयोग होणें संभवनीय असतें. बरींच विषें उत्तम औषधेंहि आहेत. योग्य व परिमित

प्रमाणांत आम्हीं त्यांचा औषधांत नित्यशः उपयोग करतों. तेंच एखाद्याला आत्महत्या करावयाची असेल तर तो तेंच प्रभावी व उत्कृष्ट औषध जास्त प्रमाणांत घेऊन आपली जीवितयात्रा संपवितो! हा त्या औषधाचा दोष अर्थातच नाहीं. तसेंच संततिनियमनाचा जर कोणीं दुरुपयोग केला, त्याच्या योगानें अनीतिकारक संबंध घडले तर त्याला संततिनियमन काय करणार? त्याचा उपयोग करणाऱ्या लोकांचा हा दोष आहे. पण त्याला कांहीं इलाज नाहीं. लोक आत्महत्या करतात यांत त्यांचाच दोष असतो. पण त्याला आपण काय करतों? हे अनिष्ट प्रकार थांबविणें कांहीं आपल्या हातांत नसतें. त्याप्रमाणेंच संततिनियमनाच्या उपायांचा दुरुपयोग करणाऱ्या लोकांनाहि थांबविणें आपल्या हातीं नाहीं. औषध बाजारांत विकत मिळतें. तें कोणीहि घेईल व वाटेल तसा त्याचा उपयोग करील. परंतु या विक्रीवरहि बंधन असतें. विषारी औषधावरहि बंधन असतें. तें डॉक्टरांशिवाय किंवा डॉक्टरच्या सहीशिवाय किंवा कांहीं अधिकृत कारणांशिवाय उगीचच कोणाला विकत मिळत नाहीं. असें असूनहि कांहीं विषांचा उपयोग धंद्यांत करावा लागतो; तेथें तीं सर्रहा विकणें भाग पडतें. ऑक्झेलिक ॲसिड शाईला लागतें, पोटॅशम सायनाइड फोटोग्राफींत लागतें व त्यामुळें हीं विषें पुष्कळ लोक धंद्यासाठीं वापरतात; पण तीं भयंकर विषें आहेत. त्याचा जर वाईट उपयोग करावयाचें ठरविलें तर माणूस एक आत्महत्या तरी करील किंवा दुसरें कोणाचा खूनहि करूं शकेल! यासाठीं हीं द्रव्यें लागणारे धंदेच बंद करावयाचे कीं काय? त्याप्रमाणेंच संततिनियमनविषयक साधनसामग्री डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणालाहि घेतां येऊं नये अशी फार तर व्यवस्था करतां येईल. पण वर सांगितल्याप्रमाणें याहि संबंधांत अनिष्ट प्रकार घडूं शकतील. आत्महत्या किंवा खून झाले तर आपण काय करतों? खुनी माणसांना पकडून शिक्षा करतों किंवा स्वस्थ बसतों. तसेंच येथेंहि करावें लागेल. येथें शिक्षा कांहीं कोणाला करतां येत नाहीं, फक्त स्वस्थ बसणें एवढेंच आपल्या

होतों आहे ! यावरून स्त्रियांच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं नियमन करणें ही पहिली मर्यादा आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. या मर्यादेशीं संलग्न अशी दुसरी एक मर्यादा म्हणजे लहान मुलांची प्रकृति विचारांत घेणें हें होय. हा मुद्दा मागें विशेष तऱ्हेनें विशद केलाच आहे. पण त्याचा येथें नुसता नामनिर्देश करणें जरूर आहे. लवकर लवकर मुलें झालीं म्हणजे तीं अशक्त असतातच असें नाहीं. आपल्याकडे सामान्यतः दोन वर्षांचा पाळणा असतो व अशा रीतीनें होणारीं मुलें पुष्कळदां निरोगीहि असतात. परंतु ज्या कुटुंबांत घरकामाचा सारा भार स्त्रियांवर पडतो व मुलेंहि लवकर लवकर होतात त्या कुटुंबांतील स्त्रिया नेहमीं अशक्त असतात. व म्हणूनच अशा स्त्रियांना होणारीं मुलेंहि अशक्त असतात. या दोघांचाहि अशक्तपणा जावा याकरितांच अशा ठिकाणीं संततिनियमनाचा अवलंब करणें अवश्य आहे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा आर्थिक परिस्थितीचा होय. आपल्या देशांतील आर्थिक परिस्थिति पाश्चात्यांच्या मानानें फारच खालावलेली आहे. त्यांच्या मजुरांची व आपल्या मध्यम स्थितींतील लोकांची स्थिति सारखीच आहे असेंहि म्हणतां येण्यासारखें आहे. मध्यम स्थितींतील माणसाला साधारण पन्नास रुपये पगार मिळतो असें धरलें तर तेवढ्यांत त्याला किती माणसांना पोसणें शक्य आहे याचा विचार झाला पाहिजे. पुष्कळ वेळां शाळामास्तर किंवा म्युनिसिपालिटीचे कारकून किंवा खाजगी दुकानांतून वगैरे असणारे कारकून यांची प्राप्ति नेहमींच वरील रकमेच्या आंत असते. एवढ्या पैशांत त्याला नुसतीं बायकामुलेंच पोसावयाचीं नसतात; तर भाऊ, बहिणी किंवा आईबाप किंवा इतर कांहीं जवळचे नातेवाईक यांपैकीं कोणीना कोणी तरी त्याच्यावर अवलंबून असतातच. या साऱ्यांचा खर्च भागवून तो बायकोची प्रकृती चांगली राखण्यासाठीं तिची कामांतून सोडवणूक कशी करणार ? ती रोगट असली तर तिला औषधपाणी कसें देणार व बाकीच्या मंडळींच्या प्रकृतीकडे लक्ष कसें देणार ? अशी परिस्थिति असूनहि दर वर्षी

किंवा वर्षाआड त्या कुटुंबांत मनुष्याची भर पडतच असते! ही नवीन जबाव-दारी नीट पार पाडणें अशा माणसाला अशक्य होतें व मग त्या कुटुंबांत निराशा व दुःख या भावनांचा प्रवेश होतो. त्याचा परिणाम स्त्रीपुरुषांवर होतोच. पण तेवढ्यानें न भागून त्यांना गरिबीमुळेंहि अनन्वित हाल सोसावे लागतात व मग कधीं मूल तर कधीं घरधनीण तर कधीं मुख्य कर्ता पुरुष या ना त्या रोगाला बळी पडतो! ही घटना थांबवावयाची असेल तर अशा कुटुंबाची आर्थिक परिस्थिति सुधारली पाहिजे. परंतु ती सुधारणें सध्यां तरी आपल्या हातीं नाहीं. यासाठीं असेल त्याच आर्थिक परिस्थितींत जितकीं माणसें सुखासमाधानानें राहतील तितकींच त्या कुटुंबांत असावीं अशी योजना करणें भाग पडतें. त्यांत जास्त भरती होणार नाहीं याबद्दल काळजी घ्यावी लागते, म्हणजेच संततिनियमन करावें लागतें. हा मुद्दा निरनिराळ्या रीतींनीं आतांपर्यंत विचारांत घेण्यांत आलाच आहे. तेव्हां त्याचें यापेक्षां जास्त विवरण करण्याची आवश्यकता नाहीं.

तिसरा महत्त्वाचा मुद्दा सांसारिक सुखासंबंधीं आहे. उपरिनिर्दिष्ट परि-स्थितींतील कुटुंबाला कशा मासल्याचें सुख असतें व त्या ठिकाणीं पतिपत्नींचे संबंध कसे असतात याची कल्पनाहि येणार नाहीं! या स्थितींतील लोक सोडले तरी मध्यम व उच्च वर्गांतील लोकांमध्येंसुद्धां कुटुंबांतून किंवा संसा-रांतून डोकें वर काढून बायकांनीं समाजांत मिसळण्याचें मनांत आणलें तर तें अशक्य असतें. एखाद्या पदवीधर बाईचें लग्न झालें व तिच्यामागें जर असें लेंढार लागलें तर तिला आपले अन्य व्यवसाय बाजूला ठेवावे लागतील. तिला मैत्रिणींकडे जाणें, सभा-संमेलनांत भाग घेणें, एखाद्या चळवळीशीं समरस होणें या गोष्टी अशक्य होतील. तिला झेंपतील इतकींच मुलें झालीं तर अशी स्त्री आपलें सामाजिक कर्तव्यहि नीट रीतीनें पाळूं शकेल. मुलांची संख्या व ती उत्पन्न करण्यांत होणारा कालापव्यय व शक्तिपात यांपुढें सुशिक्षित व सधन स्त्रियांचेंहि जेथें कांहीं चालेनासें होतें तेथें गोरगरिबांची गोष्टच

विचारावयास नको ! अशा रीतीनें विचार केला तर स्त्रियांत व गुलामांत अंतर काय आहे ? या दृष्टीनें पाव शतकापूर्वीच लंडनमधील उत्तरेच्या भागांतील एका चर्चमध्यें भाषण करतांना रे. जेम्स पॅंगवॉर्न यांनीं काढलेले उद्गार येथें उल्लेखनीय आहेत. ते म्हणतात, " गुलामांचा व्यापार जरी कायद्यानें मागेंच बंद केला असला तरी खुद्द या भागांत शेंकडोशें बायका गुलाम आहेत. या बायकांना त्यांच्या पतीच्या विषयवासनेला बळी पडून जन्मभर मुलें वाढविण्याचेंच काम करावें लागतें ! यांपैकीं बऱ्याचशा स्त्रीगुलामांचें नशीब खडतर असतें. त्यांना जगांत सुख कशाला म्हणतात हें कळत नाहीं. पुष्कळांना मरण येईल तर बरें, असें वाटतें व तेंच एक आपल्याला या नरकवासांतून सोडवील अशी त्यांची समजूत असते ! " पंचवीस वर्षांपूर्वीं हे उद्गार एका धार्मिक संस्थेंतील जबाबदार माणसानें काढले होते हें लक्षांत ठेविलें म्हणजे या प्रश्नाचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत येईल.

संततिनियमनाच्या मर्यादा जरी बऱ्याच असल्या तरी व्यावहारिक दृष्टीनें ज्यांना विशेष महत्त्व आहे अशा या दोनच होत. आईची व मुलाची प्रकृति उत्तम रहावी यासाठीं नियमन करणें ही पहिली मर्यादा व आर्थिक परिस्थितीप्रमाणें मुलांच्या जन्माला योग्य परिस्थिति पहाणें ही दुसरी मर्यादा. या दोन कारणांसाठींच आज संततिनियमनाची विशेष जरूर आहे. हिंदुस्थानांत काय किंवा दुसऱ्या कोणत्याहि देशांत काय, ही परिस्थिति सगळीकडेच आहे. प्रत्येक कुटुंबांतील जरूरीच्या गोष्टींपैकींच ही एक गोष्ट आहे, असें समजलें पाहिजे. इतर गोष्टींप्रमाणेंच हिचाहि जरुरीप्रमाणें उपयोग केला पाहिजे व जेव्हां जरूर नसेल तेव्हां ती बाजूला सारली पाहिजे. संततिनियमनाचें हेंच साधेंसुधें स्वरूप आहे. यासाठीं जास्त अवडंबर करण्याची आवश्यकता नाहीं. आणखी इतर दृष्टींनींहि याचा विचार आपल्याला करतां येण्यासारखा आहे. देशाची, किंबहुना मनुष्यजातीची परिस्थिति सुधारण्याकरतां संततिनियमनाची जरूरी आहे. पण तो प्रश्न आपल्या विवरणाच्या मर्यादेबाहेरील आहे.

व्यक्तीलां स्वतःच्या स्वास्थ्याकरितां आज काय करतां येईल एवढ्याचाच येथें विचार कर्तव्य आहे. इतका साधा प्रश्न असूनहि तो समजून सांगण्याला पुस्तकें लिहावीं लागतात व चळवळ करावी लागते, याचें कारण म्हणजे या विषयाचें जनतेंतील अज्ञान हें होय. तें कमी झालें म्हणजे लोकांना याची जरूरी आपोआप पटेल, ते याचा विचार करूं लागतील व मग त्याचा योग्य प्रसार होईल.

मनुष्यजातीच्या दृष्टीनें संततिनियमनानें बरेच महत्त्वाचे फायदे होण्याचा संभव आहे. वैद्यकीय ज्ञानाची जसजशी सुधारणा होऊन नवीन नवीन शोध लागत आहेत तसतसे मनुष्याच्या जीवितयात्रेंतील बरेच भानगडीचे प्रश्न आपोआप सुटूं लागले आहेत. लहान मुलांच्या मृत्यूचें प्रमाण कमी होत आहे. एकंदर मृत्यूचें प्रमाणहि कमी होत आहे व त्यामुळें जिवंत राहण्याचें प्रमाण वाढूं लागलें आहे. रोगराई कमी होत आहे व त्यामुळें मनुष्य साधारण निरोगी होऊं लागला आहे. एकंदर जीविताची किंमत हल्लीं जास्त वाटूं लागली आहे. असें होण्यानें लोकसंख्या मात्र प्रमाणाबाहेर वाढूं लागली. यासंबंधीं विचार मागें आलाच आहे. इतर जसे शोध लागूं लागले तसाच या लोकसंख्यावाढीला योग्य मर्यादा घालण्याचाहि शोध लावण्यांत आला. हा शोध म्हणजेच संततिनियमन होय. लोकसंख्यावाढीचे भयंकर परिणाम टाळण्याला कांहीं उत्तम उपाय निघेल असें कोणाला वाटलेंहि नसेल. पण कांहींहि त्रास न पडतां लोकसंख्या प्रमाणांत ठेवण्याला संततीचें नियमन करणें हाच उपाय फलदायी आहे. या योगानें मनुष्यहानि न होतां लोकसंख्या मर्यादेंत ठेवतां येते. अशाच स्थितीची लोकांना आज अपेक्षा आहे. किती तरी निरपराध प्राण्यांचे जीव वांचविण्याचें श्रेय संततिनियमनाच्या साधन-सामग्रीला आज मिळत आहे. निष्कारण होणारी मनुष्यहानि कमी करणें हा कांहीं थोडाथोडका फायदा नाहीं. या एवढ्या फायद्यानेंसुद्धां संततिनियमनाचें काम झालें असें म्हटलें तरी चालेल. मनुष्याची जीवितयात्रा लांबवून ती

सुखदायी करणें हाहि तितकाच महत्त्वाचा फायदा आहे. अशा दृष्टीनें मनुष्य-जातीचें सुख वाढविणारा उपाय कोणाला नकोसा वाटेल असें संभवत नाहीं. तो योग्य प्रमाणांत व योग्य पद्धतीनें उपयोगांत आणला म्हणजे झालें.

मनुष्यजातीच्या सुखांत भर टाकण्याला संततिनियमन दुसऱ्याहि एका प्रकारानें कारणीभूत होतें. कुटुंबांत दोनतीनच मुलें असलीं व त्यांपैकीं मुली वगळल्या म्हणजे सध्यां जे भाऊबंदकीमध्यें अंगावर शहारे आणण्यासारखे प्रकार घडतात ते दिसून येणार नाहींत. वांटणीला आला बसेल व घराचे व शेताचे तुकडे होऊन सर्वनाश होण्याची भीति उत्पन्न होते ती थोडी तरी कमी होईल. भाऊबंदकीमध्यें किती काळ, पैसा व शक्ती यांचा निःपात होत असेल हें कांहीं नव्यानें सांगावयास नको. ती सारी शक्ती, पैसा व तो वेळ जर सत्कारणीं लागला तर कुटुंबाची स्थिति उन्नत होईल व पर्यायानें देशाचें सुद्धां हित होईल.

अशा रीतीनें संततिनियमनाच्या पुरस्कारानें किती तरी फायदे होण्याचा संभव आहे. ते कशा प्रकारचे व किती प्रमाणांत होतील याची कल्पना वाचकांना आलीच असेल. संततिनियमनाच्या योग्य मर्यादा पाळल्या व त्याचा योग्य प्रकारानें उपयोग केला म्हणजे केव्हांहि तोटा होण्याचा संभव नाहीं. त्याच्या वाईट उपयोगांपासून होणारे तोटे जरी कबूल केले तरी ते उपरिनिर्दिष्ट फायद्यांच्या मानानें उपेक्षणीयच ठरतील. साऱ्या गोष्टींचा नीट व सांगोपांग विचार केला असतां कांहीं कांहीं स्थितींत संततिनियमनाची अत्यंत जरूरी असते व कुटुंबाच्या व पर्यायानें देशाच्या दृष्टीनें त्या वेळीं दुसरा कोणताहि उपाय इतका फलदायी होत नाहीं हें कोणाहि विचारी माणसास कबूल करावें लागेल.

---

## प्रकरण तेरावें

# तज्ज्ञांचे अभिप्राय

संततिनियमनाचा सांगोपांग विचार यथाक्रम आतांपर्यंत करण्यांत आलाच आहे. त्यांतील महत्त्वाचे मुद्दे वाचकांच्या लक्षांत आलेच असतील. त्याला दुजोरा मिळावा व जगांत ज्यांचें नांव विशिष्ट कामगिरीनें माहीत झालें आहे अशा प्रथितयश लोकांचें प्रस्तुत विषयासंबंधीं म्हणणें काय आहे हेंहि कळावें, म्हणून या प्रकरणांत अशा त्या त्या विषयांतील श्रेष्ठ दहा लोकांचे अभिप्राय देण्याचें योजिलें आहे.

प्रथमतः इंग्लंडमधील सर्वश्रेष्ठ डॉ. लॉर्ड डौसन यांचें काय म्हणणें आहे तें पाहूं. त्यांच्याच शब्दांत त्यांचा अभिप्राय येथें उद्धृत केला आहे. " संततिनियमनाची जसजशी वाढ होत गेली तसतशी प्रत्येक मुलाच्या जीविताच्या महत्त्वाची जाणीव लोकांना होऊं लागली. नवीन मुलें जगांत आणण्याला पतिपत्नींना त्यांच्या जीवितांतील उत्कृष्ट वेळ लाधावी असें वाटूं लागलें व हें रास्तहि आहे. अशी वेळ ठरविणें सोपें झाल्यामुळें विवाह योग्य वेळीं होऊं लागले व त्यामुळें नीतिमत्ता व नागरिकत्व हे दोन गुण ठळकपणें दिसून येऊं लागले. एखाद्या कुटुंबाला एक मूल पोसण्याचें सामर्थ्य असतें,

पण दुसऱ्या मुलाची नीट जोपासना करण्याचें सामर्थ्य प्राप्त होण्याला दोनदोन किंवा तीनतीन वर्षे वाट पहावी लागते. या नियमनाच्या मार्गानें अनीति माजण्याचा संभव आहे, परंतु मनुष्यनिर्मित कोणच्या गोष्टीची अशी स्थिति नाहीं? मुलें कोणच्या वेळीं व्हावीं हें ठरविण्याचें आपल्या हातीं असावें हें योग्य व आवश्यक आहे. मातृपदाची जबाबदारी योग्य रीतीनें लोकांच्या मनावर पटली पाहिजे व त्यामुळें आरोग्य तर प्राप्त होतेंच, पण हें करण्यानें समाजाचें व देशाचें आपण एक कर्तव्य बजावतों असें प्रत्येकाला वाटलें पाहिजे." [1]

लैंगिक विषयाच्या आकलनामध्यें सर्वश्रेष्ठतेच्या पदवीस चढलेले सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानी हॅवेलॉक एलिस यांचें मत पुढीलप्रमाणें आहे. "संततिनियमनाची आवश्यकता आतां सर्वांना जाणवूं लागली आहे. ज्यांना मुलें नकोत अशांनाच फक्त नव्हे तर ज्यांना मुलें पाहिजे आहेत अशांना देखील याची जरूरी वाटते. याचें कारण मातेची प्रकृति व आरोग्य हें तर आहेच, पण मुलाची योग्य जोपासना व निकोप प्रकृति यांसाठीं देखील याची आवश्यकता आहे. प्रत्येक मुलामध्यें निदान दोन वर्षांचें तरी अंतर असावें. मूल होण्याची कितीहि जबर इच्छा असली तरी त्याची जोपासना नीट होईल असें जेव्हां पतिपत्नींना वाटेल तेव्हांच मूल होणें योग्य आहे. मोठ्या कुटुंबांचे दिवस आतां संपले. प्रत्येक कुटुंबांत दोन किंवा तीन मुलें झालीं म्हणजे पुरे. त्या योगानें कुटुंब, त्याचप्रमाणें देश व समाज यांचा फायदा होईल. हल्लींच्या आरोग्यविषयक व सुधारणाविषयक परिस्थितींमध्यें लोकसंख्या योग्य प्रमाणांत ठेवण्यास दोन तीन मुलें पुरीं होतील. ज्या ठिकाणीं स्त्रियांची प्रकृति चांगली नसेल व एकाद्या रोगाचें संततींत संक्रमण होऊं नये अशी इच्छा असेल तेथें तर संततिनियमनाची अत्यंत आवश्यकता आहे." [2]

---

1. *The Ethics of Birth-Control*, page 51.
2. *Psychology of Sex*, Manual for students, page 247.

एडिंबरो रिव्ह्यूचे प्रसिद्ध संपादक हॅरोल्ड कॉक्स हे आपल्या लेखांत म्हणतातः—" गर्भधारणेच्या भीतीमुळें ज्या अविवाहित स्त्रिया अनीतीनें वागत नाहींत त्यांना गर्भधारणेची भीति नाहींशी झाल्यानें तसें करावेंसें वाटेल. उलटपक्षीं जे अविवाहित पुरुष वेश्याव्यवहार करतात त्यांना जर संततिनियमन करतां आलें तर ते लवकर लग्न करतील. अशा दृष्टीनें अनीतिकारक व्यवहारांपेक्षां सुखोत्पादक विवाहच पुष्कळ होतील. जरूर नसलेल्या संततीपासून होणाऱ्या भयंकर दुष्परिणामांपेक्षां अनीतिकारक संबंधांपासून जर मुलें झालीं नाहींत तर कमी दुष्परिणाम होतील. गरीब वर्गातील हजारों विवाहित स्त्रियांना गर्भधारणा होण्याची सारखी भीति वाटत असते. त्या भीतीमुळें त्यांना त्यांचे पति प्रेमळ असण्याऐवजीं राक्षस आहेत असें वाटतें. आणि आयुष्याला जरूर असणारे परस्पर प्रेमसंबंध तुटले जातात. तशांतून जर इच्छा नसतांना गर्भ राहिला तर ती बाई निराशेनें गर्भपात करण्यासहि उद्युक्त होते. जे धर्ममार्तंड संतातिनियमनाचा धिक्कार करतात ते अशा गर्भपाताचे वेळीं मूग गिळून बसतात आणि गर्भपाताचा जगांत किती प्रसार आहे याची त्यांना जाणीवहि नसते! संततिनियमनाचें शिक्षण जर त्यांना वेळींच मिळालें तर या विवाहित स्त्रियांना गर्भपातासारखा भयंकर गुन्हा करण्याचा प्रसंगच येणार नाहीं."[1]

अमेरिकेंतील न्यायाधिकारी कोर्टाचे प्रसिद्ध न्यायाधीश ना. वॉढॅम्स यांनीं एका बाईला घरफोडीच्या दोषापासून मुक्त करतांना काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. "या बाईचा नवरा क्षयी असल्यामुळें त्याला सरकार काम करूं देत नाहीं. मुलाचे कपडे धुणें त्याच्यासारख्या रोग्याला शक्य नाहीं. कारण त्याच्या योगानें मुलांना रोग होण्याची भीति आहे व तसें करण्याच्या विरुद्ध कायदाहि आहे. अशा कायद्यामुळें या गृहस्थाला चार वर्षें काम करतां आलें नाहीं; असें असूनहि तो मुलांची उत्पत्ति करीतच आहे. हीं मुलें अर्थातच

1. *The Ethics of Birth-Control*, page 106.

क्षयीं निपजतील व तीं मोठीं झाल्यावर पुन्हा क्षयी मुलांनाच जन्म देऊन हेंच रहाटगाडगें सुरू ठेवतील. याविरुद्ध कायदा नाहीं. अशा लोकांना संतति उत्पन्न करण्याच्या कामीं कायद्याचें बंधन नाहीं; परंतु तेंच त्यांना संततिनियमनाचें शिक्षण दिलें, तर मात्र कायदा असें करण्यास आडकाठी करतो आणि असें करणारास कोर्टांत खेंचतो. प्रश्न असा आहे कीं, या विषयावर आपला कायदा योग्य आहे का ? आपल्यापेक्षां युरोपखंडांतील कांहीं देशांत या दृष्टीनें चांगली स्थिति आहे. आपण सध्यां तर अज्ञानांधकारांत वावरत आहोंत व भावी पिढी आपल्याकडे पाहून आश्चर्यचकित होईल अशी आपली हल्लींची स्थिति आहे. या खटल्याची वस्तुस्थिति अशी आहे— प्रस्तुत कुटुंबांतील संख्या वाढत आहे. या कुटुंबाचा मुख्य कर्ता मनुष्य क्षयी आहे. घरधनिणीच्या अंगावर एक मूल आहे, बाकीचीं तिच्या आसपास खेळत आहेत व या सर्वांचें संगोपन करण्यास पैसा नाहीं. उपासापासून संरक्षण करण्यास यांना वेळोवेळीं धर्मादाय संस्थेकडून मदत मिळाली आहे व त्यांचे हे दाखले माझ्यापाशीं आहेत. अशा स्थितींत या बाईला मी शिक्षा करूं शकत नाहीं."[1]

सुप्रसिद्ध कादंबरीकार व लेखक एच्. जी. वेल्स हे पेरेंटहुडच्या प्रस्तावनेंत लिहितात, " संततिनियमनाचें ज्ञान सुशिक्षित समाजांतील प्रत्येक गृहस्थाला असलें पाहिजे, मग तो त्याचा उपयोग करो अथवा न करो. अज्ञानी लोकांना समाजांतील घाण म्हणून संबोधावयास कांहींहि हरकत नाहीं. ते स्वतः वाईट असतात व शेजारील चांगल्या लोकांनाहि ते तापदायक असतात. ज्यांना संततिनियमन करावयाचें नसेल त्यांनीं देखील याचें ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. कारण त्याशिवाय ते याविरुद्ध तरी कसे बोलूं शकतील ? ज्या गोष्टीची त्यांना माहिती नाहीं ती करूं नका असें त्यांना कसें सांगतां येईल ?'[2]

1. *Medical Times*, April 1917, from an article by Dr. Knopf, M.D., Professor of Medicine, New York. 2. *Parenthood*—Preface.

उपरिनिर्दिष्ट लेखांत नॉफ म्हणतात, "मला असें नेहमीं विचारण्यांत येतें कीं, तुम्हांला या संततिनियमनाचा आतांच इतका पुळका कां आला? वास्तविक मी याच्या विरुद्ध असेन अशी पुष्कळांचीं कल्पना होती. दिसतों तितक्या लवकर मी कांहीं संततिनियमनाचा पुरस्कर्ता झालों नाहीं. क्षयी लोकांत मीं पाव शतक काम केलें आहे. या दिवसांत माझा श्रीमंत व गरीब या दोघांशींहि संबंध आला. माझा ज्याप्रमाणें प्रासादांत संचार असे त्याच प्रमाणें मी झोंपडयांतूनहि फिरलों आहें. इस्पितळांशीं तर माझा नित्यच संबंध असतो. एखाद्या क्षयी बाईला गर्भ राहिल्यावर तिला कांहींच मदत करतां येत नाहीं असें पाहून मला नेहमींच वाईट वाटतें. त्या बाईचे अश्रु, तिच्या त्या वेदना माझ्या कानांत अजूनहि ऐकूं येतात. ही मदत कां करतां येत नाहीं, तर तिचा आतां कांहींच उपयोग नसतो. गर्भ राहिल्यावर तो राहूं नये म्हणून सांगण्यांत काय अर्थ आहे? अनपेक्षित मुलांची भर कुटुंबांत पडणार हें पाहून अशा बाईची होणारी करुणास्पद स्थितीच मला संतति-नियमनाचा पुरस्कर्ता करीत आहे. उपरिनिर्दिष्ट स्थितींत संततीची निपज करणें म्हणजे अनीतीलाच चालना देणें आहे असें माझें मत आहे."[१]

अर्धवटांच्या शुद्धीकरणाबाबत हर्मन बिग्ज्, स्टेट कमिशनर ऑफ हेल्थ, यांचे विचार मननीय आहेत. "संततिनियमनाची माहिती पुरविण्याबद्दल सध्यां जो आपला कायदा आहे तो मूर्खपणाचा आहे व म्हणूनच त्यांत सुधारणा केली पाहिजे. मानसिक व शारीरिक व्यंगें असणाऱ्या लोकांना कायद्यानें वाटेल तितकी संतति उत्पन्न करतां येते. या संततीच्या निर्मिती-विरुद्ध कायदा नाहीं. उलट तो अशा संततीला उत्तेजनच देतो असें म्हणाव-यास कांहीं हरकत नाहीं. ही स्थिति समाजाला जाचक होत चालली आहे. आर्थिक दृष्टयाहि हा आंतबट्याचा व्यवहार आहे."[२]

---

1. Dr. Knopf's article from *Medical Times.*
2. Ibid, page 187.

अनोंल्ड बेनेट यांचें पुढील मत येथें उद्धृत करण्याजोगें आहे. "माझ्या मतें संततिनियमनाला जर खरी अडचण कशाची असेल तर ती त्याविरुद्ध आणलेल्या उत्तम मुद्यांची नसून किंवा मनुष्यजातीच्या प्रत्येक सुधारणेला करण्यांत येणाऱ्या अदूरदर्शी विरोधाची नसून ती गर्हणीय अशा खोट्या लाजेची आहे. संततिनियमनाची गंभीर चर्चा करणेंच आपल्याला आवडत नाहीं."[1]

संततिनियमनाच्या प्रसारांत नॉर्मन हेअर हे प्रसिद्ध आहेत. त्यांचें मत एक निराळाच मुद्दा उपस्थित करतें. ते म्हणतात, "संततिनियमनाचा उपयोग पापासाठीं करण्यांत येतो, किंबहुना पुष्कळ लोक तसा करतातही. पुष्कळांना काळ मजेंत घालविण्यासाठीं संतति नको असते. अशा लोकांना ताळ्यावर आणण्यासाठीं संततिनियमनाविरुद्ध चळवळ करून कांहीं उपयोग नाहीं. तर त्यांची ही वृत्ति बदलण्यास त्यांना त्यांचें समाजाविषयीं कर्तव्य समजून सांगणें व उत्कृष्ट मुलेंच तेवढीं उत्पन्न व्हावींत यासाठीं समाजामध्येंहि जाणीव उत्पन्न करणें या गोष्टी आधीं झाल्या पाहिजेत. परंतु हें कर्तव्य लोकांना कळण्याला वेडगळ व रोगट मुलांची निपज करणें म्हणजे समाजाचा भयंकर गुन्हा करणें होय, हें आधीं कळलें पाहिजे."[2]

वर प्रसिद्ध अमेरिकन न्यायाधीश मि. वॉढॅम्स यांचें मत उद्धृत केलें आहे, त्याप्रमाणेंच इंग्लंडचे सर्वश्रुत न्यायाधीश मि. जस्टिस मॅक्कार्डी यांनींहि एका तसल्याच खटल्यांत आरोपीला शिक्षा न करतां सोडून दिलें. ते त्या बाईला म्हणाले कीं, "तुम्हीं दुःखाच्या दरींत राहूनहि धैर्यानें वागलां. सर्व कुटुंबाचा खर्च चालवून तुम्हीं या सात मुलांचें संगोपन केलें. नवरा आळशी व दरिद्री असल्यामुळें मुलें होण्यापेक्षां तुम्हांला त्याचा दुसरा कसलाहि उपयोग झाला नाहीं. मला तुमच्या परिस्थितीबद्दल पूर्ण जाणीव आहे. आणखी एक

1. Preface in *Fecundity versus Civilization* by Adelyne Moore.
2. *Hymen or the Future of Marriage*, page 84.

मुलाला जन्म देऊन हा संसार डोईजड करण्याचें तुम्हीं नाकारलें व होणाऱ्या मुलाला जगांत येऊं दिलें नाहीं याबद्दल मी तुम्हांला दोष देत नाहीं. माझा तुमच्यावर विश्वास आहे. न्यायाधिशाला अंतःकरण असतें. मी तुम्हांला तुरुंगांत पाठविणें शक्य नाहीं."[१]

घरांत अठरा विश्वे दारिद्य, संततीची समृद्धि व संततीचा जनक आळशी व ऐतखाऊ अशी त्रयी जमल्यानंतर मुलांचें लेंढार असलेल्या बाईला बाल-हत्येची इच्छा न होईल तरच आश्चर्य होय! अशा स्त्रियांना संततिनियमनाचीं साधनें उपलब्ध करून देणें म्हणजे संकटांतून त्यांची मुक्तता करण्याप्रमाणेंच होत नाहीं काय? त्याचप्रमाणें समाजस्वास्थ्यासहि हा उपक्रम उपकारक होणार नाहीं काय? बाईच्या गुन्ह्याचा निकाल करतांना वरील न्यायमूर्तींनीं जशी सहानुभूतीची व सहृदयतेची दृष्टि ठेवली तशीच या बाबतींत समाजानेंहि आपली दृष्टि राखल्यास संततिनियमनाविरुद्ध निष्कारण गैरसमज उत्पन्न होण्याचें कारणच उरणार नाहीं!

---

१. *A Learned Judge's View on Birth-Control*, page 17.

# प्रकरण चवदावें

## संततिनियमनाची कायदेशीर परिस्थिति

कायद्याच्या दृष्टीनें प्रतिबंधक उपायांना मान्यता आहे किंवा नाहीं व असली तर ती कोणच्या देशांत आहे हें प्रस्तुत प्रकरणांत पाहण्याचें योजिलें आहे. बरेच वेळां असें होतें कीं, कायद्यांत या विषयाचा नामनिर्देशहि नसतांना अश्लील वाङ्मयाच्या कक्षेंत याला ढकलल्यामुळें कांहीं लोकांची या विरुद्ध चळवळ सुरू होते. असले लोक या विषयाला अश्लील समजतात कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. परंतु तो त्यांच्या अश्लील वाङ्मयाच्या व्याख्येंत येत नसावा असें वाटतें. पुष्कळ वेळां या विषयावरील गंभीर पुस्तकहि अश्लील म्हणून दडपलें जातें व लोक फारसें लक्ष देत नसल्यामुळें म्हणा किंवा त्यांना त्याची विशेषशी माहिती नसल्यामुळें म्हणा, याबद्दल फारसा गवगवा होत नाहीं. पण जेव्हां तो होतो तेव्हां मात्र त्यानें देशाचा देश जागा होतो. नोल्टन यांच्या पुस्तकांसंबंधीं ब्रॅडला व ॲनी बेझंट यांनीं केलेली चळवळ वाचकांना माहितच आहे. एवढ्यावर न भागून अमेरिकेंत मुद्दाम कायद्यांमध्यें या विषयाचा नामनिर्देश केला आहे. अमेरिकेच्या पीनल लॉजच्या २११ सेक्शनमध्यें पुढील गोष्ट मुद्दाम नमूद केली आहे.

'Every article or thing designed, adapted, or intended for preventing conception, or producing abortion, or for any indecent or immoral use.' 'श्वानं युवानं मघवानं' यांना जसें पाणिनीनें एका सूत्रांत गोविलें आहे तसेंच अमेरिकेच्या सिनेटर्सनीं गर्भपात, संततिनियमन, अनीति वगैरेंना एका ठिकाणीं आणलें! असा जरी कायदा आहे तरी त्याला थोडी मुरड घालतां येते. जस्टिस क्रॉप्से हे पीपल व्हर्सस् वर्न या दाव्यांत निकाल देतांना म्हणतात, "Under it a Physician would be justified in prescribing the prohibited articles or drugs if, in his opinion, the health or condition of the patient required it" अशा तऱ्हेचे उल्लेख होणें देखील चळवळीमुळें शक्य झालें. तरी पुष्कळशा संस्थानांत अजून हा कायदा पाळला जातो. संततिनियमन हे शब्द या कायद्यांत कसे गोंवण्यांत आले हें पाहणें मजेचें आहे. एकोणिसाव्या शतकाच्या तिसऱ्या पाव शतकांत अमेरिकेमध्यें अश्लील वाङ्मयाचा फारच सुळसुळाट झाला होता. त्या योगानें तरुणांचीं मनें चळून ते या वाङ्मयाला बळी पडतील कीं काय अशी त्या वेळच्या सुबुद्ध लोकांना भीति वाटूं लागली. याला आळा बसावा म्हणून तें वाङ्मयच आक्षिप्त व बेकायदा ठरविण्याचें त्यांच्यापैकीं एकानें ठरविलें. या गृहस्थांचें नांव अँथनी कॉमस्टॉक असें होतें. त्यांनीं या अश्लील वाङ्मयाबरोबर संततिनियमनालाहि ओढलें! त्यांना असें वाटलें कीं, याच्या योगानें अनीति वाढेल व म्हणून हेंहि अश्लीलच आहे. त्याचे फायदे त्यांनीं लक्षांत घेतले नाहींत किंवा त्यांनीं त्यांच्याकडे माहीत असूनहि लक्ष दिलें नाहीं हें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. त्या वेळीं संततिनियमनाची योग्य जाणीव जनतेंत पसरण्यास चळवळ कांहीं जोरांत चालू नव्हती व त्यामुळें सिनेटर्सना या शब्दानें किती घोटाळा होईल याची जाणीव झाली नाहीं. हें बिल ता. ११ फेब्रुवारी १८७३ मध्यें कॉंग्रेसमध्यें आणण्यांत आलें व प्रेसिडेंटची सही होऊन त्याचें ता. ४ मार्चला कायद्यांत रूपांतर झालें. यावर अर्थातच फारशी चर्चा झाली नाहीं व अधिवेशन-

संपण्याच्या दिवशींच प्रेसिडेंटची सही मिळून घाईनें हा कायदा करण्यांत आला.

हा कायदा पास झाल्याबरोबर याप्रमाणेंच निरनिराळ्या संस्थानांतून कायदे करण्यांत येऊं लागले. चोवीस संस्थानांनीं आपल्या कायद्यांत संततिनियमनाचा समावेश केला आहे व चोविसांनीं केला नाहीं. तरी पण त्यांनीं अश्लील वाङ्मयाविरुद्ध कायदे केलेच आहेत व अश्लील वाङ्मयाची व्याख्या बरोबर होत नसल्यामुळें न्यायाधिशानें संततिनियमनाला त्यांत खेंचलें तरी चालण्याजोगें असतें व त्याला तसें करण्याला सबंध अमेरिकेचा फेडरल लॉ साहाय्यभूत आहेच.

**फ्रान्स**

फ्रान्समध्यें संततिनियमन १९२० च्या पूर्वी बेकायदा गणण्यांत येत नव्हतें. परंतु लोकसंख्या कमी होते आहे असें कळल्यावर व लढाईनेंहि लोकसंख्या घटल्यामुळें, लोकसंख्येची वाढ करणें हेंच ध्येय फ्रेंच सरकारपुढें होतें. लढाईनें फ्रेंच राष्ट्र सर्व बाजूंनींच खिळखिळें झालें होतें. त्यामुळें त्यांनीं विशेष विचार न करतां संततिनियमनावरच प्रथमतः गदा आणली. १९२०मध्यें संततिनियमन बेकायदा ठरविण्यांत आलें व त्यासंबंधीं चर्चा, उपकरणें व शास्त्रीय संशोधन करणेंसुद्धां या कायद्याच्या कक्षेंत आणण्यांत आलें. याचा परिणाम मात्र चमत्कारिक झाला. कायद्याच्या पूर्वी एका वर्षांत मृत्यूपेक्षां जन्म १,५९,१७० इतके जास्त होते, ते त्या कायद्याच्या पुढील एका वर्षांत फक्त १,१७,०८३ इतकेच झाले. यावरून संततिनियमनावर उगीचच खापर फोडण्यांत आलें हें दिसून येईल. दुसरें असें झालें कीं, या कायद्यानें गर्भपाताची संख्या वाढली. ज्या देशांत दर वर्षी फक्त ७५०,००० इतकी जन्मसंख्या होती त्या देशांत या कायद्यानंतर ५००,००० इतके गर्भपात होऊं लागले असें डॉ. लॅक्सेन यांनीं दाखवून दिलें आहे.[1] यावरून संततिनियमन थांबविण्यानें फायदा तर कांहींच झाला नाहीं, उलट तोटा मात्र झाला हें वाचकांना दिसून येईल.

---

1. Stope's *Contraception,* page 411.

**हंगेरी**

या देशांत जरी धार्मिक संस्था संततिनियमनाविरुद्ध आहेत तरी याला कायद्याची आडकाठी नाहीं. गरीबगुरीब व शेतकरी सुद्धां याचा उपयोग करतात. तसें करण्यांत त्यांचा उद्देश मात्र मोठा गमतीचा आहे. जास्त मुलें होऊन वांटण्या व भाऊबंदक्या वाढूं नयेत म्हणून ते या उपायांचें अवलंबन करतात. हा उद्देश गमतीचा वाटला तरी तो फार चांगला आहे. भावाभावांत मारामाऱ्या होऊन घरादाराची विल्हेवाट लागण्यापेक्षां थोडेच भाऊ जर सुखासमाधानानें नांदले तर किती चांगलें होईल! हा मुद्दा महाराष्ट्रीयांनींहि लक्षांत धरण्याजोगा आहे. भाऊबंदकी व त्यामुळें शेतीची नासाडी या साऱ्याला आळा घालण्यास संततिनियमन हें प्रभावी अस्त्र आहे यांत शंका नाहीं.

**मेक्सिको**

अमेरिकेच्या बर्थ-कंट्रोल लीगच्या प्रयत्नानें या देशांतील युकाटन परगण्यांतील मेरिडा या गांवीं संततिनियमनाचें एक केंद्र स्थापण्यांत आलें आहे.

**नेदरलंड**

हॉलंडमध्यें संततिनियमनाचा सर्वांत जास्त प्रसार आहे. आणि संततिनियमनासाठीं स्थापन झालेलें जगांतील पहिलें केंद्र हॉलंडमध्येंच १८८५ सालीं स्थापण्यांत आलें. त्यानंतर तेथें अशीं पुष्कळच केंद्रें सुरू झालीं. हीं सर्व केंद्रें एका संस्थेमार्फत चालतात. त्या संस्थेचें नांव 'निओ-माल्थुशियन लीग' असें आहे. या केंद्रांत गरिबांना माहिती फुकट पुरविण्यांत येते. व बाकीच्या लोकांना त्यांच्या ऐपतीप्रमाणें पैसे आकारण्यांत येतात. १८९५मध्यें या संस्थेला व तिच्या अमलाखालीं येणाऱ्या साऱ्या केंद्रांना सरकारची मान्यता मिळाली. या देशांत बालमृत्यूचें प्रमाण अत्यंत थोडें आहे. दुसरा एक महत्त्वाचा फायदा वाचकांनीं लक्षांत ठेवण्याजोगा आहे. सैन्यांत भरती करण्याला लायक इसमांचें प्रमाण या चळवळीनंतर बरेंच वाढलें. व उंचीचें

प्रमाणहि वाढल्याचें आढळून आलें. अठराव्या वर्षी पांच फूट सात इंच व त्यापेक्षां जास्त उंची असलेले तरुण १८८४मध्यें शेंकडा ३२ होते ते १९१८ मध्यें ५१ झाले. यावरून लोकांची प्रकृति कशी सुधारली हें दिसून येईल.

## रशिया

१९२३मध्यें भरलेल्या रशियन मॅटर्निटी व चाइल्ड-वेल्फेअर असोसिएशनच्या अधिवेशनांत गर्भपात होण्याची चिकित्सा करण्यांत आली व त्याचीं कारणें नीट समजून घेण्यांत आलीं. या योगानें स्त्रियांवर होणारा वाईट परिणाम लक्षांत घेऊन त्यांना त्या दृष्टीनें वैद्यकीय सल्ला देण्याचें ठरलें. योग्य वाटतील त्या स्त्रियांना संततिनियमनाची माहिती पुरविण्याचेंहि या परिषदेनें ठरविलें.

## स्वीडन

या देशांत फ्रान्सप्रमाणेंच संततिनियमनावर बहिष्कार पुकारण्यांत आला आहे.

## इंग्लंड

इंग्लंडमध्यें संततिनियमनाविरुद्ध कायदा नाहीं. तेथें अश्लील वाङ्मयाबद्दल कायदा आहे, परंतु त्यामध्यें संततिनियमनाचा समावेश होत नाहीं. इंग्लंड, हिंदुस्थान व वसाहती या सार्‍या देशांत एकच कायदा आहे. येथें संततिनियमनाची चळवळ करतां येते. त्यासंबंधीं उपयुक्त माहिती देण्यासहि प्रतिबंध नाहीं. मधून मधून मात्र ब्रॅडला व ॲनि बेझंट यांच्यावर जसा खटला झाला तसे खटले होतात, पण त्यांचेंहि प्रमाण फार कमी आहे. असे खटले करण्याला अश्लील वाङ्मय किंवा चित्र याचा धागा असलाच तर पोलीस या भानगडींत पडतात, एरव्हीं ते या चळवळीच्या वाटेस जात नाहींत. डॉ. ॲनि बेझंटवर १८७७ मध्यें मागें सांगितल्याप्रमाणें खटला झाला होता. त्याच स्वरूपाचा पण त्यांच्या एकट्यावरच १८८८ मध्यें ऑस्ट्रेलियांतील सिड्ने या गांवीं एक खटला भरण्यांत आला, तो तेथील सुप्रीम कोर्टातच

चालविण्यांत आला. त्या खटल्याच्या निकालांत न्यायाधिशानें ॲनी बेझंटच्या पुस्तकाची स्तुति केली व सांगितलें, " या पुस्तकांत एखाद्या सभ्य स्त्रीला किंवा पुरुषाला न शोभेल अशी भाषा कोठेंहि नाहीं. यांत फक्त आर्थिक कारणासाठीं संततिनियमन करणें हेंच सांगितलें आहे व तसें करण्याचे मार्ग प्रतिपादिले आहेत. " यावरून असे मार्ग प्रतिपादणें किंवा संततिनियमन करणें हें मुळींच बेकायदा नाहीं हें न्यायाधिशानें सिद्ध केलें.

इंग्लंडमध्यें १९२१ सालीं मि. हेलवुड नांवाच्या पार्लमेंटच्या सभासदानें संततिनियमनावर गदा आणणारें बिल आणण्याचा घाट घातला होता, परंतु तो फसला. त्यानें अश्लील वाङ्मयामध्येंच संततिनियमनाचा समावेश करून 'या प्रकाराला सरकार कायदा करून आळा घालणार आहे का?' म्हणून पार्लमेंटमध्यें प्रश्न विचारला. त्या प्रश्नास सरकारकडून योग्य उत्तर मिळालें. सरकारतर्फे मि. शॉर्ट म्हणाले कीं, अश्लील वाङ्मय आक्षिप्त ठरवून खटला करण्याचा पोलिसांना अधिकार आहे. अश्लील वाङ्मयांत संततिनियमनाचा समावेश होत नाहीं. अशा तऱ्हेचा कायदा करण्याची सरकारची तयारी नाहीं.

## प्रकरण पंधरावें

# पद्धतींचें दिग्दर्शन

संततिनियमन करण्याच्या पद्धति थोड्या असून त्या सोप्याहि पण आहेत. त्या पद्धतींत एक तत्त्व असतें व तें म्हणजे पुरुषबीजाला गर्भाशयांत जाऊं न देणें किंवा योनिमार्गातच त्याला चेतनाविहीन करणें हें होय. हें करण्याला गर्भाशय व योनिमार्ग यांमध्यें कांहीं तरी पडदा निर्मून बाहेरून येणारें पुरुष-बीज येथें थोपवून धरणें किंवा पडद्यांऐवजीं एखादा रासायनिक पदार्थ ठेवून पुरुषबीजांना मारणें हें दोन प्रकार शक्य आहेत. या प्रकारांबरहुकूमच अनेक पद्धति उत्पन्न करण्यांत आल्या आहेत. त्यांत औषधांच्या केलेल्या गोळ्या व रबराच्या केलेल्या टोप्या किंवा पिशव्या यांचा समावेश होतो. हीं औषधें पुष्कळ वेळां एखाद्या तेलकट पदार्थांत मिसळून त्यांच्या गोळ्या बनवितात. कांहीं वेळेला नुसत्या तेलकट पदार्थांचाच उपयोग करतात तर कांहीं वेळेला अशा औषधाच्या पाण्याची पिचकारी मारतात. या गोळ्यांचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारांत साधीं औषधें असतात तर दुसऱ्यांत फेंस उत्पन्न करणारीं औषधें असतात. मध्यंतरीं पडदा उत्पन्न करण्याचेहि दोन प्रकार आहेत. एक रबराचा प्रकार तर दुसऱ्यामध्यें स्पंजचा उपयोग करून मध्यंतरीं

अडथळा करण्यांत येतो. या साऱ्या प्रकारांचा निरनिराळा व स्वतंत्र विचार करण्यासाठीं खालीलप्रमाणें त्यांचे विभाग करणें योग्य होईल. ( १ ) साध्या औषधांच्या गोळ्या, ( २ ) फेंस उत्पन्न करणाऱ्या औषधांच्या गोळ्या, ( ३ ) पिचकारीनें मारावयाचीं औषधें, ( ४ ) स्पंज, ( ५ ) रबरी टोप्या, ( ६ ) दोन्ही प्रकारांचा एकदम उपयोग. या विभागांचें क्रमानें वर्णन करण्यांत येईल.

## ( १ ) साध्या औषधांच्या गोळ्या

या गोळ्यांमध्यें एक तेलकट पदार्थ व एक औषध असे दोन पदार्थ नेहमीं असतात. तेलकट पदार्थ नेहमींच कोकोबटर या नांवाचा असतो. तो पदार्थ लोण्यासारखा आपल्या शरिराच्या उष्णतेनें विरघळतो व तसें झाल्यावर योनिमार्गांत गर्भाशयमुखावर त्याचा थर बसतो. परंतु असें होण्याला सरासरी पांच मिनिटें लागतात. यासाठीं संभोगापूर्वी पांच मिनिटें ही गोळी घालणें जरूर असतें. या पदार्थाबरोबर विशेषतः कोयनेलचा बराच उपयोग करतात. बहुतेक गोळ्यांतून कोयनेल असतेंच. कोयनेल घालून केलेल्या वड्यांत रेंडेलच्या ‘ वाइफ्स फ्रेंड ’ या गोळ्या सगळीकडे बऱ्याच उपयोगांत आहेत. त्या कोणच्याहि केमिस्टकडे विकत मिळतात. त्यांचा भाव दीड रुपयाला बारा असा आहे. म्हणजे दोन आण्यांला एक अशा या गोळ्या पडतात. एका वडीची दोन आणे ही किंमत जरा महागच आहे. यांव्यतिरिक्त लँबर्टस् लॅव-बटस् व डॉकर्स कॉंट्रप्स या गोळ्याहि बऱ्याच वापरण्यांत येतात. या दोन्ही गोळ्या महाग आहेत. यांपेक्षां थोड्या स्वस्त एन्. बी. टी. या गोळ्या होत. त्या २ रु. ४ आण्यांला वीस मिळतात. यांत कोयनेल नसतें व तेलकट पदार्थहि कमी असतो. या एका प्रसिद्ध डॉक्टराच्या सल्ल्यावरून करण्यांत आल्याचें दिसतें. कोयनेल असलेल्या वड्यांनीं कांहीं बायकांना त्रास होतो. कांहीं बायकांना कोयनेल पोटांत घेतल्यानेंसुद्धां त्रास होतो. अशांना अर्थातच योनिमार्गांतून

कोयनेल आंत शोषलें गेल्यानें ( Absorption ) त्रास होतो. योनिमार्गाचा दाह होऊन तेथें बराच वेळ दुखतें. अशा बायका सरासरीं शेंकडा पांच इतक्या तरी असतात असें डॉ. मेरी स्टोप्स यांचें म्हणणें आहे. यासाठीं त्यांनीं कोयनेलच्या ऐवजीं चिनोझॉल हा पदार्थ वापरावा असें सांगितलें आहे. इंग्लंडमध्यें या पदार्थाच्या बनविलेल्या गोळ्याच फार वापरण्यांत येतात. असें जरी आहे तरी कोयनेलचें महत्त्व अजून कमी झालें नाहीं. कोयनेल किंवा त्याबरोबर इतर दुसरीं औषधें वापरतात. कोणाला जर अशा गोळ्या घरीं करावयाच्या असतील तर त्यांना खालील प्रमाण बरेंच उपयोगी पडेल.

| | |
|---|---|
| कोको बटर | $\frac{१}{४}$ पौंड |
| बोरॅक्स | ५ ड्रॅम ( चमचे ) |
| सॅलिसिलिक ॲसिड | १ ,, ,, |
| क्विनिन बायसल्फेट | १$\frac{१}{२}$ ,, ,, |

कोकोबटर मंदाग्नीवर ठेवून तें वितळूं लागलें म्हणजे बाकीचीं औषधें त्यांत मिसळावीं. औषध ढवळण्यासाठीं लांकडी चमचा वापरावा. औषधें एकजीव झाल्यावर तो सारा गोळा निवत ठेवावा व त्याच्या तीस वड्या पाडाव्यात. अशा रीतीनें या गोळ्या होऊं शकतात. पण त्या जर नीट झाल्या नाहींत तर लोण्याच्या पातळ प्रवाहाशिवाय करणाऱ्याच्या हातांत कांहीं रहात नाहीं ! व मग स्वतंत्र वड्या पडणें शक्य होत नाहीं. यासाठीं आयत्या गोळ्या विकत आणणें चांगलें.

## ( २ ) फेंस उत्पन्न करणाऱ्या औषधांच्या गोळ्या

या गोळ्यांत तेलकट पदार्थाऐवजीं असा एक पदार्थ असतो कीं तो योनिमार्गांत गेला म्हणजे त्याचें फेंसांत रूपांतर होतें व सारा योनिमार्ग या फेंसानें भरून जातो. असें झालें असतां त्या फेंसांत सारे पुरुषबीज नाहींसे होतात. डॉ. बेकर यांनीं अशा प्रकारच्या गोळ्यांमध्यें असणाऱ्या रासायनिक द्रव्यानें पुरुषबीजांचा संहार होतो किंवा नाहीं याचें संशोधन केलें व

त्यापासून काय निष्पन्न झालें यासंबंधीं 'जर्नल ऑफ हायजीन'मध्यें एक लेख लिहून प्रसिद्ध केला. त्यांत त्यांना असें आढळून आलें कीं, कोयनेल वगैरे रासायनिक द्रव्यांच्या योगानें पुरुषबीजांचा व्हावा तसा संहार होत नाहीं. अर्थात् हें संशोधन बाहेर कांचेच्या नळींत केल्यामुळें त्यांत थोडी चूक होणें संभवनीय आहे. हीं द्रव्यें बीजांना मारण्यास सर्वस्वीं समर्थ होत नाहींत असें जरी असलें तरी या गोळयांचें महत्त्व फक्त त्यांच्यांतील रासायनिक द्रव्यांवरच अवलंबून नसून त्यांतील तेलकट पदार्थांवरहि तितकेंच आहे हेंहि ध्यानांत ठेवणें जरूर आहे. फेंस उत्पन्न करणाऱ्या गोळया मात्र पुरुषबीजांचा संहार करूं शकतात. या फेंसाच्या जाळयांत अडकल्यावर बीजांना बाहेर पडण्यास मार्गच रहात नाहीं.

या वड्यांपैकीं विशेष प्रसिद्ध अशा दोन प्रकारच्या वड्या आहेत. त्या म्हणजे स्पेटॉन व सेमोरी या होत. स्पेटॉन इकडे सर्व केमिस्टांकडे मिळतें. त्याची किंमत १ रु. १३ आणे आहे. म्हणजे रेंडॉलपेक्षां या महाग पडतात. योनिमार्ग जर कोरडा असेल तर स्पेटॉन पाण्यांत बुचकळून आंत घालावी लागते. परंतु असें करण्याची सहसा जरूरी नसते. कारण योनिमार्ग कोरडा कधींच नसतो. या वडीनेंसुद्धां एखाद्या वेळीं योनिमार्गाची आग होण्याचा संभव आहे, पण तसें क्वचितच होतें. ज्यांना कोयनेलनें त्रास होतो त्यांनीं स्पेटॉन वापरावें. या दोन्ही गोळ्या चांगल्या आहेत व त्यानें बहुशः कार्यभाग होतो. ज्या लोकांना संततिनियमन करावयाचें आहे, परंतु एखाद्या वेळीं चुकून गर्भ राहिला तर फारसें बिघडणार नाहीं अशांना या गोळ्या फार उपयोगी आहेत. या बहुतेक चुकत नाहींत, पण यांबद्दल शंभर टक्के खात्री देतां येत नाहीं. मुलांतील अंतर योग्य प्रमाणांत ठेवण्यास यांचा चांगला उपयोग होतो. एखाद्या वेळीं जर चुकून गर्भ राहिला तरी फारसें बिघडण्याजोगें नसतें. पण जेथें गर्भ अजिबात नको असेल तेथें यांचा तितकासा उपयोग आणि खातरी नाहीं. यासाठीं याबरोबर दुसराहि एक उपाय करावा लागतो, तो पुढें येईलच.

## ( ३ ) पिचकारीनें मारावयाचीं औषधें

संततिनियमनासाठीं डूश देण्याची चाल आतां मागें पडत चालली आहे. याचें कारण असें कीं, डूश देण्याला बरीच तयारी करावी लागते व तसें संभोगानंतर करणें योग्य नसतें. हा त्रास पत्करण्यापेक्षां संभोग टाळण्याकडे सुद्धां लोकांची प्रवृत्ति होते. ज्या वेळीं इतर खातरीचे उपाय नव्हते त्या वेळीं हा त्रास घ्यावाच लागे. असें असूनहि या उपायाची खातरी आहे असें नाहीं. दुसरें असें कीं, डूशसाठीं वापरण्याचें औषध जर विषारी असेल तर योनिमार्गाला बराच धक्का पोहोंचण्याचा संभव असतो. कधीं कधीं तर या औषधाच्या वड्या संततिप्रतिबंधासाठीं योनिमार्गांत चुकून वापरल्या जातात व त्याचे परिणाम फारच भयंकर होतात. एका बाईनें करोसिव सब्लिमेट नांवाच्या एका विषारी औषधाची गोळी अशा रीतीनें वापरली होती. त्या योगानें अखेर तिला प्राणास मुकावें लागलें[1] ! या औषधाच्या पाण्याची पिचकारी देतात. परंतु त्यांत एका मोठ्या बाटलींत औषधाचा एक कण असतो इतक्या सूक्ष्म प्रमाणांत तें औषध देतात. वास्तविक हें औषध संततिनियमनाला वापरीत नाहींत. गर्भाशयाला कांहीं रोग असेल तर याची पिचकारी किंवा डूश देतात. पण कांहीं तरी ऐकून व या विषयावर पुकारलेल्या बहिष्कारानें बुजून जाऊन कोणालाहि न विचारतां अनमानधबक्यानें हें औषध घेतलें जातें. त्याचा असा विपरीत परिणाम झाला तर त्याचा दोष औषध वापरणाराकडे आहे. यासाठीं प्राणघातकी लाज बाजूला सारून, नीट चौकशी करून व तज्ज्ञांचा सल्ला घेऊनच कोणचाहि उपाय करावा हा या गोष्टीपासून प्रत्येकानें धडा घेतला पाहिजे.

दररोज डूश घेण्याचें कांहींहि कारण नाहीं. त्यानें गर्भाशयाचा नैसर्गिक स्राव सारखा धुतला जातो. वास्तविक गर्भापासून योनिमार्गांत थोडा थोडा स्राव नेहमीं येत असतो व त्याची त्या दोन्ही इंद्रियांना जरूरी असते. डूश

1. Dr. Fitzgibbon *Lancet*, March 1918, p. 486.

घ्यावयाचाच झाला तर तो संततिप्रतिबंधक उपाय म्हणून कधींहि घेऊं नये तर अशा कारणासाठीं वापरण्यांत येणाऱ्या वड्या कधीं कधीं तशाच राहतात त्या धुण्यासाठीं मधून मधून डूश घ्यावा. डूश घेण्यासाठीं उपयोगांत आणावयाचें औषध अगदीं निरुपद्रवी असावें. थोडेंसें मीठ, किंवा थोडेंसें बोरिक ॲसिड किंवा मेरी स्टोप्सनीं सांगितलेलें लिस्टरीन यांपैकीं कोणचेंहि औषध वापरण्यास कांहींहि हरकत नाहीं.

## ( ४ ) स्पंज

स्पंज योनिमार्गांत गर्भाशयमुखावर ठेवण्यांत येतो, हा ठेवावयास सोपा आहे. रबरी टोपी बरोबर बसली आहे किंवा नाहीं हें पाहणें जरूर असतं. पण स्पंजाचें तसें नाहीं. तें नुसतें आंत ढकलण्यानें बरोबर बसतें. यामुळें अर्धवट वाचांना किंवा अशिक्षित बायकांनाहि कोणाच्या साहाय्याशिवाय स्पंज नेमका बसवितां येतो. स्पंज नुसता वापरतात किंवा त्याच्यावर कांहीं औषध लावून वापरतात. कोयनेल, तुरटी किंवा कोयनेलचें मलम त्याच्यावर ठेवून वापरतात. कधीं कधीं तो ऑलिव्ह ऑइलमध्यें बुचकळून वापरतात. ऑलिव्ह ऑइल मिळणें सोपें असल्यामुळें इंग्लंडमध्यें संततिनियमनाच्या केंद्रांमधून या पद्धतीची माहिती गरीबगुरीब बायकांना नेहमीं देतात. हा उपाय बहुधा फसत नाहीं व प्रतिबंधाचें काम बिनबोभाट होतें. दुसरेंहि एक कारण याच्या बाजूचें आहे. जेथें रबरी टोप्या बसविणें अवघड आहे तेथें याचा चांगला उपयोग होतो. गर्भाशयमुख जर नीट नसेल, त्याला भेगा पडलेल्या असतील तर त्यावर टोपी नीट बसत नाहीं. अशा ठिकाणीं स्पंज सहज ठेवतां येतो. पुष्कळ बाळंतपणें झालेल्या बायकांत गर्भाशयमुख वाईट झालेलें असतें. अशा ठिकाणीं स्पंजाचा चांगला उपयोग होतो. परंतु स्पंज स्वच्छ ठेवणें अवघड जातें. स्पंज रबरी टोपीपेक्षां स्वस्त असतो. स्पंजाला १ रुपया किंमत पडते व तो बरेच दिवस टिकतो. कांहीं कांहीं स्पंजाला मध्यंतरीं गोळी ठेवण्यासाठीं खोलगट जागाहि केलेली असते. अशा स्पंजांना ' ऑक्लुजेटर ' असें म्हणतात.

परंतु या जागेच्या ठिकाणींच स्पंजाला भोंक पडण्याचा संभव असतो. या दृष्टीनें साधा स्पंज ऑलिव्ह ऑइलमध्यें बुचकळून वापरणें चांगलें.

स्पंजाप्रमाणें मऊ कापडाच्या केलेल्या घड्याहि कांहीं कांहीं वेळेला वापरतात. त्यांच्या उपयोगानंतर त्या टाकून द्यावयाच्या असतात, यामुळें फक्त घेतांना त्या स्वच्छ आहेत हें पाहून घेतलें म्हणजे झालें. या घड्या अर्थातच नेहमीं वापरावयाच्या नसतात. ज्या वेळीं इतर साधनें हाताशीं नसतील व मिळणेंहि शक्य नसेल त्या वेळीं याचा उपयोग केला तर चालेल. कोयनेल किंवा तुरटी मिळाली तर त्यावर ठेवावी. पण या उपायानें खातरी देतां येणार नाहीं. इतर साधनांच्या अभावीं व जरूरीच्या वेळांत हा वापरावयाचा असतो.

## (५) रबरी टोप्या

रबरी टोप्यांचे पुष्कळ प्रकार आहेत. त्यांत दोन प्रकारांचा पुष्कळ प्रसार आहे. त्या दोन प्रकारांना ( १ ) प्रोरेस किंवा ऑक्लुसिव्ह कॅप व ( २ ) डच पेसरी अशीं नांवें देण्यांत आलीं आहेत. हे सर्व प्रकार डॉ. मेन्सिगा यांनीं मागें सांगितल्याप्रमाणें शोधून काढलेल्या तत्त्वाबरहुकूम करण्यांत आले आहेत. यांतील मुख्य तत्त्व पुरुषबीजाला अडथळा करण्याचें असतें. पुरुषबीज व गर्भाशयमुख यांच्यामध्यें पडद्याप्रमाणें राहून अडथळा करणें हें या टोप्यांचें मुख्य काम. अर्थात् हा अडथळा पूर्ण रीतीनें व्हावयास पाहिजे. कारण पुरुषबीज बरेंच चळवळें असल्यामुळें जर कां थोडी जागा राहिली तर तींतून तें सहज पलीकडे जाऊं शकतें. हें पुरुषबीज सतरा दिवस-पर्यंत जिवंत राहूं शकतें. यासाठीं ते योनिमार्गांत राहणें चांगलें नाहीं. योनिमार्गांत बहुशः जो स्राव होतो तो तेजाबयुक्त ( Acid ) असल्यामुळें त्यांत पुरुषबीज राहूं शकत नाहीं व दुसऱ्या दिवशीं प्रोरेस टोपी काढल्यावर त्यांत साचलेला स्राव पुरुषबीजांवर पडला म्हणजे राहिलेले पुरुषबीजहि निरुपयोगी होतात. कोणाला असें वाटेल कीं, योनिमार्गांत पुरुषबीजाला विरोधी असा स्राव आहे तर ते एरव्हीं जगूं कसे शकतात व त्यांचा व स्त्री-

बीजांचा संयोग कसा होऊं शकतो ? संभोगाच्या वेळीं निसर्गानें पुरुषबीजांना उपयोगी पडणाऱ्या आम्लमय ( Alkaline ) स्रावाची योजना केली आहे. हा स्राव गर्भाशयमुखामध्यें असणाऱ्या कांहीं विशिष्ट पिंडांतून (Glands) होतो. नेहमीं हे पिंड स्रवत नाहींत, पण तरुणपणीं व विशेषतः संभोगकाळीं त्यांचा स्राव होतो व त्यांच्यांतून पुरुषबीजांना अनुकूल असे द्रव पदार्थ मिळतात व त्यांच्यावर तरंगत पुरुषबीज सहज लीलेनें गर्भाशयांत जातें. हा स्राव गर्भाशयांतून होणाऱ्या स्रावाविरुद्ध आहे व तो याच वेळीं फक्त होतो असें डॉ. किश यांनीं दाखवून दिलें आहे.[1]

यावरून दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवावयाची ती ही कीं, गर्भाशयांतून नेहमींच स्राव बाहेर येत असतो, तो जरी अगदीं सूक्ष्म असला तरी तो न सांचेल अशी किंवा तो बाहेर निघून जाईल अशी, ही टोपी वापरतांना व्यवस्था केली पाहिजे. ही टोपी पुष्कळ वेळां बरेच दिवस राहण्याचा संभव असतो. कधीं कधीं मासिक स्राव सुरू होण्याला व ही टोपी घालण्याला एकच गांठ पडते व त्यामुळें तो स्राव त्या टोपींत अडकून बसतो. यासाठीं ती टोपी या स्रावानें ढकलली न जाईल इतक्या बेताची असावी लागते. या साऱ्या गोष्टी नीट संभाळावयास त्या टोपीचा वरचा भाग, ज्याला डोम म्हणतात तो बराच मोठा असणें जरूर आहे. हा डोम जर लहान असेल तर उपरिनिर्दिष्ट साऱ्या गैरसोयी तेथें लागू पडतात. दुसरें असें कीं, त्या टोपीच्या कडा मऊ असणें अत्यंत जरूर आहे. कांहीं कांहीं टोप्यांत, विशेषतः डच पेसरींमध्यें या कडांतून धातूंच्या तारा बसविलेल्या असतात. या तारा मऊ रबरांत बसविलेल्या असल्यामुळें ते रबर गर्भाशयांतील स्रावानें वाईट होऊन तुटण्याचा संभव असतो. मग त्या तारांचीं टोकें योनिमार्गाला दुखविण्यास कारणीभूत होतात किंवा पुरुषेंद्रियालाहि त्यांपासून धोका पोहोंचण्याचा संभव असतो. यासाठीं या रबरी टोप्यांत कोणत्याहि रीतीची धातूंची सरमिसळ असतां उपयोगी

1. Kisch M. D., *The Sexual Life of Woman.*

नाहीं. या कडा नेहमीं भरीव खराच्याच असतात. टोपी बनविण्यास घेतलेलें खर अर्थातच चांगल्या तऱ्हेचें असलें पाहिजे. त्याचे सांधे चांगले जमलेले असले पाहिजेत. त्यांमध्यें कोठेंहि छिद्र असतां कामा नये. छिद्र आहे कीं नाहीं हें पाहण्याला त्या टोपीची आंतील बाजू जास्त प्रकाशांत पहावी म्हणजे प्रकाशानें त्यांतील बारीकसारीक भोकें सहज दिसतील. भोंक असलेली टोपी अर्थातच वापरूं नये. दुसरें असें कीं, पुष्कळ दिवस टोपी न वापरतां ठेवून दिली म्हणजे तिला घडी पडून त्या घडीच्या ठिकाणीं भोंकें पडलीं असण्याचा फार संभव असतो. तेव्हां बरेच दिवस न वापरलेली टोपी सहसा वापरूं नये. टोपी जर बरेच दिवस ठेवावयाची असेल तर ती पाण्यांत ठेवावी म्हणजे भोकें पडत नाहींत. नेहमींसुद्धां टोपी स्वच्छ धुवून एखाद्या कांचेच्या भांड्यांत घालून नीट ठेवावी. ती काढल्याबरोबर टोपीच्या पेटींतच टाकून देऊं नये. ती नीट धुवून ठेविली म्हणजे तिच्यावर सांचलेला स्राव धुतला जातो व वास येत नाहीं व गलिच्छता वाटत नाहीं. पुन्हा वापरतांना टोपी स्वच्छ पाण्यांत बुडवून वापरावी.

हें जास्त विस्तारानें सांगण्यापूर्वी प्रोरेस टोपी व डच पेसरी कशा असतात व त्या योनिमार्गांत कशा बसतात हें प्रथमतः पाहूं. प्रोरेस टोपी ही खरोखरच टोपी असते. तिचा आंतील भाग एखाद्या घुमटासारखा उंच असतो व त्याभोंवतीं कडा आलेली असते. ही कडा गर्भाशयमुखाच्या भोंवतीं नीट बसते व या घुमटांत गर्भाशयमुख योग्य तऱ्हेनें बसतें. ही टोपी आंत घातल्यावर खराखालीं गर्भाशयमुख सहज लागतें. टोपी घातली आहे असें बाईला वाटत नाहीं. यांतील मुख्य तत्त्व असें कीं, घुमट उलटा धरून ही टोपी आंत सरकवावयाची असते. याचा बहिर्गोल भाग बाहेर धरावयाचा असतो व मोकळा भाग आंतल्या बाजूला करावयाचा असतो. अशा रीतीनें ही टोपी दोन बोटांत धरून योनिमार्गांत बसलेल्या स्थितींत घालावयाची असते. एक टोंक आंत गेल्यावर दुसरें आंत जातें. व दोन्ही टोंकें


नीट सरकवल्यावर आंत जातात व गर्भाशयमुखाभोंवतीं बसतात. तसें झाल्यावर एका बोटानें त्याची कडा गर्भाशयमुखाच्या भोंवतीं आहे किंवा नाहीं हें पहावयाचें असतें. आंत टोपी नीट गेली म्हणजे ती योग्य तऱ्हेनें बसतेच. कडा पाहिल्यावर घुमटाखालीं गर्भाशयमुख लागतें कीं नाहीं तेंहि पहावें. गर्भाशयमुख तेथें लागलें कीं, टोपी नीट बसली आहे असें धरून चालावयास कांहीं हरकत नाहीं. वस्तुतः हें वर्णन करावयालाच अधिक वेळ लागतो, एवढ्या अवकाशांत टोपी घालण्याची क्रिया सहज व थोडक्यांत आटोपते देखील! एकदां पाहिलें म्हणजे साधारण समजुतीच्या स्त्रीला ही टोपी बसवितां येते.

यापेक्षांहि सोप्या रीतीनें डच पेसरी बसवितां येते. डच पेसरी ही गर्भाशयमुखावर जरी बसवावयाची असते तरी ती आंतील योनिमार्गच सारा झांकून टाकते. ही प्रोरेसपेक्षां रुंदट व अर्धवर्तुळाकार असते. याचा बहिर्गोल भाग आंत घालावयाचा असतो व कडा योनिमार्गाच्या अस्तरांत बसवावयाची असते. या योगानें योनिमार्गात मध्यंतरीं एक पडदाच उत्पन्न होतो असें म्हटलें तरी चालेल. ही बसविणें सोपें असतें. ती आंत घालून नुसती उघडी केली तरी भागतें. ती आपोआप नीट बसते. ही बसवावयाला बोट लांब पाहिजे असें नाहीं. आखुड बोटांच्या लोकांनाहि ती चांगली बसवितां येते. पण त्यांना प्रोरेस टोपी नीट बसवितां येणार नाहीं. कारण, तेथें बोटानें ती गर्भाशयमुखाभोंवतीं बसवावयाची असते व गर्भाशयमुख योनिमार्गात बरेंच लांब असतें. परंतु सर्वसाधारण स्त्रियांचीं बोटें त्या लांबीइतकीं लांब असतात. प्रोरेस टोपी बसविण्यास, डच पेसरी बसवावयास लागतें त्यापेक्षां जास्त कौशल्य लागतें. डच पेझरी सहज बसूं शकते, पण प्रोरेस नीट बसली किंवा नाहीं हें पहावें लागतें. साधारण समजुतीच्या स्त्रीला हें सहज समजूं शकतें व ती ही टोपी केव्हांहि बसवूं शकते.


टोपी बसविण्यांत एक मोठा फायदा असा आहे कीं, ती वाटेल तेव्हां

म्हणजे कोणत्याहि वेळीं बसवितां येते. त्यामुळें संभोगाच्या वेळीं कांहींहि करावयाचें नसतें. त्या वेळच्या मानसिक स्थितीला त्यामुळें कांहींहि बाध उत्पन्न होत नाहीं. माणून दूसराची भानगड नसते किंवा पूर्वी गोळी घाल-ण्याची यातायात नसते. त्या वेळीं आपण संततिनियमन करतों ही कल्पना-सुद्धां येण्याचें कांहीं कारण नाहीं! कारण रबर अगदीं मऊ असल्यामुळें तें संभोगाच्या वेळीं मुळींच लागत नाहीं व त्यामुळें नवीन कांहीं तरी आपण करतों आहों ही कल्पनासुद्धां रहात नाहीं. हा फायदा अत्यंत महत्त्वाचा आहे. संभोगक्रियेच्या आधीं किंवा मग कांहीं तरी प्रतिबंधक उपाय करावयाचे म्हणजे त्या क्रियेंत कांहीं तरी अपूर्णता राहिली असें वाटण्याचा संभव असतो; पण तेंच ही टोपी दुपारींच बसविली असली म्हणजे त्या वेळीं कांहींहि करण्याचें उरत नाहीं. अशा रीतीनें त्या वेळच्या मनःस्थितीला योग्य तेंच वातावरण असतें व तें बिघडविण्याचें पाप संततिनियमनाच्या या उपायाच्या माथीं मुळींच येत नाहीं. इतर उपायांत असें होण्याचा पुष्कळ संभव असतो व म्हणूनच हा उपाय सर्वोत्कृष्ट आहे. याच्या योगानें गर्भ राहण्याचा संभव अत्यंत क्वचित् असतो, किंबहुना नाहींच. ही टोपी नीट बसत असल्यामुळें ती योनिमार्गांत आहे अशी स्त्रीला कल्पनासुद्धां नसते. पुरुषेंद्रियानें ती निसटणें शक्य नसतें. संभोगक्रियेला तीमुळें काडीमात्र देखील अडचण होत नाहीं. दोन चार दिवसांनीं ती काढून धुवून पुन्हां बसवितां येत असल्यामुळें तिचा त्रासहि वाटत नाहीं. प्रोरेस टोपीला १ रु. १२ आणे ते २ रुपये पडतात. या दृष्टीनें ती महागहि नाहीं. ती नीट वापरली तर वर्षभर सहज टिकते. म्हणजे वर्षाला दोन रुपये हा हिशोब गरिबांना देखील डोईजड नाहीं. गोळ्या वापरावयाच्या म्हटलें तर त्या दोन आण्याला एक म्हणजे महागच पडतात. स्वस्ततेच्या दृष्टीनें प्रोरेस साऱ्यांत स्वस्त आहे. तिचें रबर चांगलें असतें व ती लवकर फाटतहि पण नाहीं. या साऱ्या दृष्टींनीं हल्लीं उपलब्ध असलेल्या साऱ्या उपायांत प्रोरेस टोपी ही सर्वोत्कृष्ट आहे असें


म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. या दोन टोप्यांची नीट कल्पना यावी म्हणून येथें त्यांचीं चित्रें दिलीं आहेत व त्या योनिमार्गात कशा बसतात हें कळावें यासाठीं योनिमार्गात असतांना त्या कशा दिसतात याचींहि चित्रें




डच पेझरी.



प्रोरेस पेझरी.




१ :- गर्भाशय
२ :- हाड
३ :- गर्भाशय मुख
४ :- डच पेझरी
५ :- मूत्र नलिका
६ :- त्रिकोण स्थूलांत्र




१.- गर्भाशय
२.- हाड
३.- गर्भाशयमुख
४ -प्रोरेस पेझरी
५.- मूत्रनलिका
६.- त्रिकोण स्थूलांत्र

सोबत जोडलीं आहेत. यावरून त्या एकमेकींविरुद्ध आंत बसविलेल्या असतात हें वाचकांच्या ध्यानांत येईल. प्रोरेस टोपीचा डोम खालीं असतो म्हणजे त्याची बहिर्गोल बाजू खालीं असते तर डच पेसरीची बहिर्गोल बाजू वर म्हणजे गर्भाशयमुखाकडे असते. हा फरक नीट लक्षांत ठेविला पाहिजे.

डच पेसरी सतरा प्रकारांनीं निरनिराळ्या मापांची करण्यांत येते. त्यामुळें प्रत्येक बाईला कोणची बरोबर बसेल हें पाहून ही पेसरी बसवायाची असते. ज्याप्रमाणें योनिमार्गांत वाव असेल त्याप्रमाणें हें माप कमी जास्त होतें. पुष्कळ वेळां असें होतें कीं, ही पेसरी वापरल्यानें योनिमार्गाचा मांसल भाग थोडा ताणला जातो व दर खेपेला जास्त नंबरची पेसरी वापरावी लागते. या पेसरीचे फायदे थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहेत. जेथें योनिमार्ग लांब असेल व बाईचीं बोटें आंखूड असतील तेथें ही पेसरी नीट बसवितां येते. तेथें प्रोरेस पेसरी बसविणें अवघड जातें. ज्या ठिकाणीं गर्भाशयमुख नीट नसेल किंवा तें पुढें आलेलें नसेल त्या ठिकाणीं प्रोरेस नीट बसणार नाहीं. कारण प्रोरेस गर्भाशयमुखाच्या भोंवतीं बसते. बऱ्याच वेळां बाळंत झालेल्या बाईला या दोन्ही टोप्या नीट बसत नाहींत. प्रोरेसची तिसऱ्या नंबरची बसूं शकेल. पण अशा स्त्रियांचें गर्भाशयमुख बरेंच जीर्ण झाल्यासारखें असतें, त्यामुळें ही टोपी एखादे वेळीं नीट बसत नाहीं. अशा वेळीं डयूमास या नांवाची टोपी वापरण्यास देतात. जेथें गर्भाशय निरोगी आहे व वापरणारी बाई समजूतदार आहे तेथें प्रोरेस सर्वांत चांगली. ती गर्भाशयमुखाच्या भोंवतीं गच्च बसते व त्यामुळें पुरुषबीज आंत जाण्याचा किमपीहि संभव नसतो. कडा नीट बसून टोपीचा वरचा भाग गर्भाशयमुखावर मोकळा असल्यामुळें ही टोपी निसटण्याचा संभव नसतो. परंतु जेथें बाईच्या समजूतदारपणाविषयीं किंवा तिच्या गर्भाशयाच्या निरोगीपणाविषयीं संशय असेल तेथें डच पेसरी वापरणें उत्तम. मायकेल फीलिंडग यांनीं पुढील सर्वसाधारण नियम बसविला आहे. "जेथें संशय असेल तेथें डच पेसरी वापरा."[1] या टोप्या जरी नेहमींच चांगल्या असल्या तरी जेथें शंभर टक्के खातरी पाहिजे असेल तेथें या टोप्यांबरोबर दुसरेंहि एखादें साधन उपयोजिलें असतां 'अधिकस्याधिकं फलं' या न्यायानें तें जास्त चांगलें. पण

1. A useful motto is, "when in doubt use a Dutch.' *Parent hood* page 72.

हें पाहण्यापूर्वी टोपी वापरण्याचे थोडे नियम आधीं लक्षांत ठेविले पाहिजेत. पेसरी डच असो अथवा प्रोरेस असो, हे नियम दोहींलाहि लागू आहेत.

( १ ) पेसरी दुपारीं योनिमार्गीत बसवावी. ती नीट बसली म्हणजे त्रास होतां उपयोगी नाहीं किंवा बसविली आहे असें सुद्धां वाटतां उपयोगी नाहीं. असें जर नसेल तर ती नीट बसली नाहीं असें समजावें.

( २ ) पेसरी वापरीत असतांना शौचाला साफ झालें पाहिजे. नाहीं तर आंतड्यांत सांचलेला मळ पेसरी नीट बसूं देण्याला त्रासदायक होईल.

( ३ ) पेसरी वापरण्यापूर्वी नीट धुतली पाहिजे. ती धुण्यास साबण वापरावा.

( ४ ) संभोगानंतर बारा तासांनीं पेसरी काढावी म्हणजे गर्भाशयांतील नैसर्गिक स्राव बाहेर पडण्याला मार्ग मोकळा होईल. वाटलें तर पेसरी तीन किंवा चार तासांनीं पुन्हां बसवावी.

( ५ ) पेसरी काढल्यावर डूश घेतला तर चांगलें, पण तसें करण्याची जरूरीच आहे असें नाहीं.

( ६ ) पेसरी काढल्याबरोबर ती स्वच्छ साबणानें धुवावी व कोरड्या डबींत ठेवून द्यावी.

( ७ ) मासिक स्रावांत पेसरी वापरूं नये. किंवा मासिक स्राव येण्याच्या सुमारासहि वापरूं नये. परंतु पेसरी असतांना जर मासिक स्राव सुरू झाला तर डूश घेऊन पेसरी काढून टाकावी.

( ८ ) मधूनमधून पेसरी चांगल्या उजेडांत तपासावी व एकादें भोंक दिसलें तर ती टाकून द्यावी. तशी चालढकल करूं नये. नाहीं तर संतति-नियमनाचें कार्य योग्य तऱ्हेनें होणार नाहीं.

( ९ ) गर्भाशयांतून नेहमींच थोडा स्राव येतो. तो असतांना पेसरी वापरण्याला कांहीं हरकत नाहीं. परंतु हा स्राव जर साधा नसेल किंवा तो

पू-मिश्रित असेल किंवा तेथें जर कांहीं रोग झाला असेल तर पेसरी कधींहि वापरूं नये. रोग बरा झाल्याचें डॉक्टरांनीं सांगितलें म्हणजे मगाच पेसरी वापरावी. *

## ( ६ ) दोन्ही प्रकारांचा एकदम उपयोग

पुष्कळ वेळां एक उपाय जरी खातरीचा असला तरी मनाची खातरी पटत नाहीं. अगदीं न चुकणारा उपाय म्हणूनहि दोन उपाय एकदम वापरल्यानें विशेषच खातरी होते. या दृष्टीनें आंत पेसरी बसवून वर एखादी गोळी घालणें चांगलें. ही गोळी रेंडॉल, स्पेटॉन किंवा मागें वर्णन केल्यापैकीं एखादी असावी. कोणी कोणी तर पेसरीला कोयनेलचें मलम लावून वर गोळी घालतात व दुसऱ्या दिवशीं डूश घेतात; म्हणजे यांत चार प्रकारांचा समावेश झाला. पण इतकें करण्याची तादृश आवश्यकता नाहीं. स्वतःच्या खातरीसाठीं कोणी तसें केलें तर कांहीं हरकत नाहीं, पण त्याची गरज नाहीं एवढेंच म्हणतां येईल. साधारणतः पेसरी व एखादी गोळी एवढें पुरे होतें. ही दुहेरी पद्धति अनुसरतांना गोळी पेसरीच्या आंत ठेवावी. विशेषतः डच पेसरी वापरतांना हें नेहमीं लक्षांत टेवावें. कारण डच पेसरी योनिमार्गाचा आंतील सर्व भाग झांकते. यासाठीं गोळी वितळून तिचा थर गर्भाशयमुखावर बसलेला चांगला. प्रोरेसमध्यें गोळी वरून वापरली तरी चालते. परंतु ती आंतून वापरावयाची असेल तर तशी कांहीं पेसरींतून सोय केली आहे. या प्रोरेस पेसरीच्या आंत गोळी बसण्यासाठीं सोय केली आहे. ही सोय असलेल्या प्रोरेस पेसरीला ‘ वायमेस्टॉन चेकपेसरी ’ असें म्हणतात. हल्लीं उपलब्ध असलेल्या मार्गांत रबर पेसरी व एखादी गोळी किंवा वडी वापरणें हा सर्वांत निश्चित व उत्तम असा मार्ग आहे. या उपायानें जर चूक झाली तर ती चूक

---

* हे नक्क नियम ‘ पेरेंटहुड ’ या पुस्तकांतील ७९ पानावरून घेतले आहेत.

उपायाची नसून वापरणाराची आहे असें समजावें. पेसरी नीट बसली म्हणजे चूक होण्याचा किमपीहि संभव नाहीं.

विवाहानंतर प्रथम संभोगाच्या वेळीं वर सांगितलेल्या कोणच्याहि उपायाचा उपयोग होत नाहीं. कारण पेसरी आंत घालण्याला योनिमार्ग मोकळा नसतो. त्यावर एक पडदा आलेला असतो, त्याला हायमेन असें म्हणतात. यदाकदाचित् हा पडदा जर बाजूला असला तरी देखील योनिमार्ग संकुचित असतो म्हणून पेसरी बसवितां येत नाहीं. योनिमार्ग ताणला गेल्याशिवाय पेसरी किंवा गोळी बसवितां येत नाहीं. दुसरें असें कीं, तो ताणला जात असतां आंतील मांसल भागाला धक्का नेहमींच लागतो व त्यामुळें सुरुवातीला संभोग नेहमीं दुःखदायक असतो. अशा वेळीं औषधाची गोळी तेथें वापरली तर तें दुःख जास्तच वाढतें. यासाठीं योनिमार्गाला योग्य ताण बसेपर्यंत म्हणजे दोन तीन आठवडे पेसरी किंवा गोळी कांहींहि वापरूं नये. या वेळीं पुरुषानें आपल्या इंद्रियावर एक रबराचा पडदा बसवावा. याला कंडोम किंवा 'फ्रेंच लेटर्स' असें म्हणतात. याच्या योगानें वीर्य या पडद्यांतच रहात व तें योनिमार्गांत पडत नाहीं. या कंडोमचा दुसरा एक उपयोग आहे. तो म्हणजे उपदंश किंवा परमा या रोगांपासून बचाव. पण आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें फक्त प्रथम प्रथमच्या संभोगाला तो उपयोगी पडतो एवढेंच आपल्याला पहावयाचें आहे.

याव्यतिरिक्त अशा कांहीं अवस्था असण्याचा संभव आहे कीं, त्या वेळीं स्वतंत्र उपायाचीच जरूरी असते. कांहीं कांहीं रोगांत किंवा गर्भाशयाच्या स्थानांतरामुळें विशिष्ट उपाय योजावे लागतात. पण त्यांचा उपयोग सर्वसाधारण माणसांना योग्य रीतीनें करतां येणार नाहीं. त्यासाठीं डॉक्टराचा सल्ला घेणेंच अवश्य आहे. साधारण नेहमींच्या निरोगी परिस्थितींत उपरिनिर्दिष्ट उपाय फलदायी होतात हें जरूर लक्षांत ठेवावें. हल्लीं मोठमोठ्या शहरांतून लेडी डॉक्टरांकडून असा सल्ला मिळूं शकतो. अर्थातच हा सल्ला फक्त

आरोग्यदृष्ट्या जरूर असेल तरच दिला जातो. यासाठीं कोणचाहि उपाय योजण्यापूर्वी असा सल्ला घेणें अगत्याचें आहे.[1]

---

१. पेरेंटहुड या पुस्तकांत फील्डिंग यांनीं या सर्व उपायांचा तुलनात्मक विचार करणारा एक प्यारा लिहिला आहे तो जिज्ञासूंसाठीं येथें उद्धृत करण्यांत येत आहे.

"No woman who at all costs must avoid another pregnancy should put her trust in any single contraception device. Married people who wish to practise birth control, but are prepared to take a chance of failure, may depend on the use of a rubber pessary or of soluble pessaries alone. Similarly, persons who can't be bothered with what they regard as a complicated method, will obtain far greater security from soluble pessaries than from the practice of "withdrawal" or from confining sexual intercourse to the "safe period". The condom may be used at the beginning of married life, or by persons who have sexual intercourse despite the fact that one or other of them is suffering from venereal disease. For all other persons, one of the combined methods especially the method of combining the Dutch pessary with a chemical contraceptive is best." page 89.

## प्रकरण सोळावें

# नवीन पद्धतींचें संशोधन

संततीचें नियमन कोणत्या उपायांनीं होईल हें आपण पाहिलेंच आहे. पण तेथें कांहीं तरी साधनसामग्री नित्य वापरावी लागते. अर्थातच हें कंटाळवाणें आहे. याशिवाय संततिनियमन शक्य आहे कीं नाहीं याचा शोध बरेच शास्त्रज्ञ करीत आहेत. असें करण्यामध्यें एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, संततीचा कायमचा प्रतिबंध होतां उपयोगी नाहीं. नाहीं तर शुद्धीकरणाचा मार्ग मोकळा आहेच. पण तसें केल्यानें पुन्हां केव्हांहि मूल होण्याचा संभव नाहीं. यासाठीं तात्पुरता बंदोबस्त करणारा एखादा मार्ग हल्लीं उपलब्ध झाला आहे किंवा नाहीं हें आपण या प्रकरणांत पाहूं.

या दृष्टीनें दोनतीन प्रयत्न सध्यां सुरू आहेत. या संशोधनांत क्ष किरणें व वीर्याचीं इंजेक्शनें यांचा उपयोग करून कांहीं फलनिष्पत्ति होते किंवा नाहीं याबद्दल प्रयत्न सुरू आहेत.

### १. क्ष किरणें

क्ष किरणांचा उपयोग करून वंध्यात्व उत्पन्न करण्याचा प्रयत्न १९०९ मध्यें रेगॉड व नोगीर यांनीं उंदरांवर केला. यापासून उंदरांना कोणत्याहि

त-हेनें इजा पोहोंचली नाहीं, पण ते शुद्ध मात्र झाले. या उपायानें कायमचें शुद्धीकरण होत नाहीं तर तें कांहीं काळच टिकतें. पण तो काळ किती दिवस टिकतो हें अजून नक्की ठरवितां येत नाहीं. यासाठीं पुढील गोष्टी पहाव्या लागतात. स्त्रियांमध्यें वंध्यात्व येणें म्हणजे त्यांचा मासिक स्राव बंद होणें होय. तो बंद होण्याचें कारण अर्थातच स्त्रीबीज उत्पन्न होऊं शकत नाहीं हें होय. तसें झालें असतां गर्भ राहण्याचा संभव उरत नाहीं. परंतु हा स्राव पुन्हां सुरू झाला म्हणजे स्त्रीबीज पुन्हां उत्पन्न होऊं लागलें असें समजावें व वंध्यात्वाचा काल संपला असें मानावें.

पुरुषांच्या बाबतींत हा काल मोजण्याला स्त्रियांप्रमाणें मासिक स्रावाचें प्रतीक नाहीं तेव्हां आपोआप हें आपल्याला कळणार नाहीं. तें पाहण्यासाठीं त्यांच्या वीर्यांत पुरुषबीज आहेत किंवा नाहीं हेंच सूक्ष्मदर्शक यंत्रानें पहावें लागेल. पुरुषबीज नसलें तर शुद्धीकरण अजून आहे असें समजावें व असलें तर तो काळ संपला असें गृहीत धरावें. यावरून मार्कोव्हिटज् यानें असा उपाय सुचविला आहे कीं, प्रथमतः पति-पत्नींपैकीं फक्त पत्नीलाच क्ष किरणानें वंध्यात्व आणावें. तिचा मासिक स्राव सुरू झाला म्हणजे ताबडतोब पुरुषाला शुद्ध करावें व त्याच्या वीर्यांत पुरुषबीज दिसूं लागलें कीं पुन्हा स्त्रीची पाळी यावी. अर्थातच हें रहाटगाडगें चमत्कारिक दिसलें तरी अशक्य नाहीं. कारण हा आळीपाळीनें येणारा काळ बराच मोठा असतो.

हा मार्ग दिसण्यांत जरी सोपा असला तरी तो अजून अंगीकारण्याइतका निर्धोक झाला नाहीं. कारण कीं क्ष किरणें देण्याची पद्धत अजून ठरली नाहीं. कोणाला किती वेळ क्ष किरणें घेतलीं असतां पुरीं होतील हें अजून ठरवावयाचें आहे. तीं घेतांना बाई जर गर्भार असेल तर मुलाला धोका असतो. ती जरी गर्भार नसली तरी पुढें गर्भार राहिल्यावर मुलें चांगलीं निपजतातच असें नाहीं. न्यूयॉर्क येथील डॉ. डिकिन्सन यांनीं गर्भारपणांत क्ष किरणें दिलेल्या पन्नास बायांच्या मुलांची पूसतपास करून असें सिद्ध केलें कीं, त्या पन्नासांपैकीं

निदान एकतृतीयांश तरी रोगग्रस्त किंवा वेडगळ होतीं. यावरून अजून हा मार्ग धोक्याचा आहे हें दिसून येईल. संशोधनानें धोका घालवितां आला तर हा फारच चांगला ठरेल. पण तोंपर्यंत त्याचा स्वीकार करतां येत नाहीं हें खरें.

## २. ग्रॅफेनबर्गची पद्धति

या पद्धतींत चांदीच्या तारांचें वेटोळें करून तें गर्भाशयांत बसवून द्यावयाचें असतें. तें गर्भाशयांत बसविलें तरी योनिमार्ग मोकळाच असतो. एकदां बसविलें म्हणजे हें वेटोळें एक वर्षपर्यंत काढण्याची जरूर नसते. तोंपर्यंत गर्भ राहण्याचा संभव नसतो. काढून हें पुन्हां बसवितां येतें. म्हणजे जरी बाहेरून मुद्दाम बसवावयाचें असलें, तरी पण तें इतर साधनांप्रमाणें नेहमीं काढावें व घालावें लागत नाहीं, व एकदां घातल्यावर तिकडे एक वर्ष तरी लक्ष देण्याची जरूरी नसते. यामध्यें तें वेटोळें योग्य ठिकाणीं बसलें आहे कीं नाहीं एवढेंच पहावयाचें असतें.

बर्लिन येथील प्रसिद्ध डॉ. ग्रॅफेनबर्ग यांनीं ११०० बायकांना हें वेटोळें वापरून पाहिलें आहे. हा अनुभव त्यांनीं दहा वर्षे घेतला. पण त्या काळांत त्यांना कोठेंहि हा उपाय फसला असें आढळून आलें नाहीं. हें आंत असल्यानें मासिक स्रावाला अडचण पडेल असें वाटण्याचा संभव आहे, पण वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. यानें स्राव उत्तम प्रकारें होतो. हें घातल्यानें कांहीं वर्षांनीं स्त्रिया वांझ होतील असेंहि कोणाला वाटेल, पण ग्रॅफेनबर्ग यांचें असें म्हणणें आहे कीं, यानें वंध्यात्व तर राहोच, पण स्त्रियांना उलट जास्त मुलें होण्याचीहि प्रवृत्ति होते. दुसरा असा मुद्दा आणण्यांत येतो कीं, हें सतत वापरल्यानें पुढें मागें काळपुळी होण्याचा संभव आहे. पण तसें मानण्यापूर्वी हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, दर मासिक स्रावामध्यें गर्भाशयांतील आंतील आवरण गळून पडतें व पुन्हां दुसरें नवीन तयार होतें. म्हणजे या चांदीचा संबंध नित्य नव्या आवरणाशीं येतो. अर्थात् सतत संनिकर्षानें होणारा रोग येथें शक्य नाहीं.

या मार्गाचा उपयोग करावयाचा म्हणजे एक गोष्ट नक्की असली पाहिजे व ती म्हणजे स्त्रियांच्या जननेंद्रियाचें पूर्ण आरोग्य ही होय. या आरोग्याशिवाय या पद्धतीचा कांहींहि उपयोग नाहीं. गर्भाशय किंवा योनि-मार्ग हे निरोगी असले पाहिजेत. तेथें सूज किंवा कोणत्याही प्रकारचा स्राव असतां उपयोगी नाही. हें वेटोळें घातल्यावर जर कांहीं रोग उत्पन्न झाला तर तावडतोब तें काढून टाकण्यांत आलें पाहिजे. परमा, रक्तस्राव किंवा वाईट वास असलेला स्राव अशा रोगांत ही पद्धति निरुपयोगी आहे. यावरून एवढें लक्षांत ठेवावयाचें कीं, स्त्रिया सुशिक्षित व समजूतदार असतील तरच त्यांना ही पद्धति फार चांगली. कांहीं कमजास्त असलें तर त्या तावड-तोब डॉक्टरांना कळवूं शकतील. तसें अशिक्षित व गरीबगुरिबांचें नाहीं. अशा दृष्टीनें जरी हा मार्ग उत्तम असला तरी अजून त्याच्याबद्दल खात्री देण्याइतका त्याला अवसर मिळाला नाहीं. कांहीं वर्षे गेलीं व त्यापासून कांहींहि त्रास होत नाहीं असें दिसून आलें म्हणजे या पद्धतीला पुष्कळच महत्व येईल.

डॉ. मार्गारेट मर्फे यांनीं ग्रॅफेनबर्ग पद्धतीचें दिलेलें उदाहरण मननीय आहे. या पद्धतीप्रमाणें जें वेटोळें बसवावयाचें असेल तें बरोबर गर्भाशयांतच बसविलें पाहिजे. जास्त जोर केला तर चांदी गर्भाशयाच्या वरील भागाला भोंक पाडून पोटांत जाण्याचा संभव असतो. मर्फे यांच्याकडे एक जपानी बाई आली होती. तिला प्रत्येक बाळंतपणाला अत्यंत त्रास होत होता, म्हणून तिनें हें चांदीचें वेटोळें बसवून घेतलें. तें एका सिव्हिलसर्जननें बसविलें होतें. पुढें पंधरा महिन्यांनीं त्या बाईला त्रास होऊं लागला म्हणून तें वेटोळें काढून दुसरें बसविण्यांत आलें. हेंहि पुढें एक वर्षानें बदललें. हें सुद्धां एका डॉक्टरानेंच बसविलें होतें. थोड्याच दिवसांत त्या बाईला पुनः त्रास होऊं लागला. क्ष किरणांनीं तपासल्यावर तें वेटोळें पोटांत आहे असें आढळून आलें. अर्थातच ऑपरेशन करून तें काढून टाकिलें.

तें बरोबर बसलें नसल्यामुळें त्या बाईला गर्भहि राहिला होता. या उदाहरणावरून दोन गोष्टी सिद्ध होतात. एक या पद्धतीनें गर्भधारणा थांबूं शकते व ती जर योग्य रीतीनें व्यवहारांत आणली नाहीं तर त्रास होण्याचा संभव असतो. अर्थातच असे प्रसंग क्वचितच येतात.[1]

३. पुरुषबीजांचें इंजेक्शन

पुरुषबीज हें बाहेरून स्त्रियांमध्यें येत असतें. तें आल्यावर स्त्रीबीजाशीं त्याचा संयोग होऊन गर्भ राहूं शकतो. पण तो संयोग टाळून गर्भ न राहण्याची अशा इंजेक्शनानें व्यवस्था करतां येते. येथें प्लेगमधील इनॉक्युलेशनची कल्पनाच गृहीत धरली आहे. तिची योग्य कल्पना वाचकांना आली म्हणजे इंजेक्शनानें गर्भधारणा कां होणार नाहीं हें त्यांना नीट कळेल.

कोणत्याहि रोगाचे जंतु शरिरांत गेले म्हणजे त्यांपासून एक तऱ्हेचें विष तयार होऊन मनुष्याला त्या रोगाचीं लक्षणें होऊं लागतात. ते जंतू शरिरांत गेल्यावर आपल्या शरिरांतहि त्याला प्रतिबंधक अशी रक्तामध्यें घटना होऊं लागते. या प्रतिबंधक पेशींना ॲंटिबॉडीज ( Antibodies ) असें म्हणतात. परंतु त्या जंतूंची पैदास जर झपाट्यानें होऊं लागली तर पुरेशा ॲंटिबॉडीज् उद्भवूं शकत नाहींत व मनुष्य त्या जंतूंना बळी पडतो. म्हणून प्रतिबंधक उपायांची योजना केलेली असते. प्लेगचेंच उदाहरण घेऊं या. प्लेगजंतू अल्प प्रमाणांत प्रथमतः शरिरांत टोचले तर प्रतिबंधक पेशी शरिरांत उत्पन्न होतात, व मनुष्य त्या जंतूंना टक्कर देण्याला समर्थ होतो. अशा स्थितींत पुन्हां जरी प्लेगचे जंतू शरिरांत शिरले तरी त्यांचा कांहीं उपयोग होत नाहीं. त्यांच्याशीं सामना द्यावयास त्यांच्या विरोधक पेशी शरिरांत असतातच. प्लेगचे हे मेलेले जंतू टोंचणें म्हणजेच इनॉक्युलेशन करणें होय. हेंच तत्व येथेंहि लागू पडतें. पुरुषबीज

---

1. "Migration of a Grafenberg Ring" by Margaret C. Murphy. *Lancet*, 16 December 1933.

स्रियांमध्यें टोंचून गर्भारपणरूपी रोग न होऊं देणें यासाठीं हें एक तऱ्हेचें इनॉक्युलेशनच आहे. या इनॉक्युलेशनचा मार्ग एका अर्थानें थोडा सोपा झाला आहे. म्हणजे वास्तविक जो रोग नाहींसा करावयाचा त्याला त्याचेच जंतू लागतात. अर्थात् येथें मनुष्याच्या पुरुषबीजांचीच जरूरी आहे. पण शोधाअंतीं इतकें सिद्ध झालें आहे, कीं कोणच्याहि प्राण्याचें पुरुषबीज टोंचलें असतां हा परिणाम होतो. असें नसतें तर अनवस्थाप्रसंगच आला असता! कारण यासाठीं पुरुषांच्या वृषणांची जरूरी लागली असती व त्यासाठीं तें पुरुषांच्या शरिरांतून काढावें लागलें असतें, पण तें शक्य नाहीं. यासाठीं दुसऱ्या प्राण्याचें वृषण काढून तें तयार करून शरिरांत टोंचलें म्हणजे त्याचा योग्य परिणाम होतो.

हीं इंजेक्शनें महिनाभर सात आठ इतकीं द्यावीं लागतात. त्यांपासून कांहींहि त्रास होत नाहीं. डॉ. नॉडिच यांनीं ३२ बायकांना हीं इंजेक्शनें दिलीं. त्यांपैकीं तिसांना त्यांचा चांगला उपयोग झाला. दोघींच्या बाबतींत डोस थोडा कमीजास्त झाल्यामुळें अपेक्षित परिणाम झाला नाहीं. अशा दृष्टीनें कांहीं काळ वंध्यात्व आणण्याला हा उपाय उत्तम आहे. पण हें वंध्यात्व सारें तीनच महिने टिकतें असें अनुभवांतीं कळून आलें आहे. इतका खटाटोप करून सात आठ इंजेक्शनें घेऊन गर्भ न राहण्याचा काळ फक्त तीनच महिने म्हणजे व्यावहारिक दृष्टीनें कांहींच उपयोग नाहीं. असें जरी आहे तरी पुढें मागें याच्यांत संशोधन होऊन हा मार्ग उत्तम ठरण्याचा संभव आहे. व त्या दृष्टीनें लोकांना त्याची माहिती असावी म्हणून त्याचें एवढें विवेचन केलें.

## ४. हार्मोनचें कार्य

अमृतपिंडापासून निघणाऱ्या अंतःस्रावापासून शरिरांत बरेंच कार्य होतें हें वाचकांना माहीतच आहे. या अंतःस्रावाला 'हार्मोन' असें म्हणतात. गर्भ राहण्याला या हार्मोनची जरूरी असते, म्हणजे पुरुष व स्त्रीबीज एके

ठिकाणीं आणण्यांत या हार्मोनची बरीच कामगिरी असते. कांहीं कांहीं प्राण्यांत गर्भाशयाची स्थिति पुरुषेंद्रियाला जवळच न येऊं देण्याची असते. पण अशा हार्मोनच्या योगानें गर्भाशय फुगून पुरुषेंद्रियाला योनिमार्गांत येण्यास मार्ग मोकळा होतो. अशा रीतीनें पुरुषबीज एकदा गर्भाशयांत आलें म्हणजे दुसऱ्याच एका हार्मोननें त्या गर्भाच्या वाढीला चालना मिळते. हे दोन्ही हार्मोन रजःपिंडांच्या अंतःस्रावांत उत्पन्न होतात. परंतु हे रजःपिंडांत आपोआप उत्पन्न होत नाहींत तर तसें करण्याला त्यांना दुसराच एक हार्मोन कारणीभूत होतो. हा मेंदूच्या खालीं असणाऱ्या पिट्यूटरी अमृतपिंडांमधून निघतो. म्हणजे या हार्मोनवर गर्भरक्षणाच्या क्रियेची बरीचशी जबाबदारी पडते. या दृष्टीनें उंदरावर प्रयोग करण्यांत आले आहेत. त्यांचा थोडा सारांश येथें दिला म्हणजे गर्भप्रतिबंधाला हे शोध कसे कारणीभूत होतील हें कळून येईल. उंदरामध्यें स्त्रीबीज नेहमीं गर्भाशयांत येतें, पण त्या वेळीं गर्भाशय लहान असल्यामुळें व संभोग शक्य नसल्यामुळें तें निरुपयोगी होऊन पडून जातें. परंतु या वेळीं रजःपिंडांत एक रासायनिक द्रव्य उत्पन्न होतें. याला ओस्ट्रिन ( Oestrin ) असें म्हणतात. हें द्रव्य उत्पन्न झाल्यावर गर्भाशय मोठा होतो. योनिमार्गांत पुरुषेंद्रियाला शिरण्यास वाव मिळतो व मग संभोगक्रिया शक्य होते. अशा रीतीनें संभोग घडून आला व पुरुषबीज गर्भाशयांत गेलें म्हणजे गर्भाशयाची पूर्ववत् स्थिति होते. या वेळीं गर्भ राहिला तर रजःपिंडांत दुसरेंच एक रासायनिक द्रव्य उत्पन्न होतें व त्या योगानें गर्भाच्या वाढीला अनुकूल असे बदल होतात. या द्रव्याला 'प्रेग्नन्सी हार्मोन' असें म्हणतात. हें द्रव्य उत्पन्न झालें म्हणजे संभोग अशक्य होतो. अशा प्रकारानें उंदरामध्यें संभोगक्रियासुद्धां या हार्मोनवर अवलंबून असते व जेव्हां गर्भ राहण्याची निसर्गाला जरूर भासते तेव्हांच संभोग घडून येतो.

हे फरक करणें हें उपरिनिर्दिष्ट पिट्यूटरी नांवाच्या अमृतपिंडाच्या हातीं असतें. या पिंडांतून दोन द्रव्यें निघतात. पहिल्याला ऑस्ट्रोजानिक हार्मोन

असें म्हणतात. याच्या योगानें संभोगक्रियेला अनुकूल असें ओस्ट्रिन द्रव्य उत्पन्न होतें. दुसऱ्या द्रव्यामुळें 'प्रेग्नन्सी हार्मोन'ची उत्पत्ती होते व गर्भाच्या वाढीला स्थिती अनुकूल होते. या चार द्रव्यांवर गर्भधारणा व गर्भाची वाढ अवलंबून असते. या द्रव्यांपैकीं एखादें द्रव्य इंजेक्शनानें उंदरामध्यें घातलें तर त्याचें कार्य सुरू होतें. संभोगक्रियेला प्रतिकूल द्रव्यच टोचून घातलें तर गर्भच राहणें शक्य होत नाहीं. अशा रीतीनें तात्पुरतें संततिनियमन उंदरांमध्यें उत्पन्न करणें शक्य आहे.

मनुष्यामध्यें अशी स्थिति नाहीं. तेथें संभोगक्रियेला हार्मोनची जरूरी लागत नाहीं व गर्भाच्या वाढीलासुद्धां गर्भाशय नेहमींच तयार असतो. या ठिकाणीं या चारी हार्मोनची क्रिया नेहमींच सुरू असते. या चारी हार्मोनच्या क्रियेवरच गर्भधारणा व वाढ अवलंबून असते. त्याचें प्रमाण काय व किती असतें हें अजून आपल्याला सांगतां येत नाहीं. त्याचा मनुष्यावर परिणाम कसा होतो हेंहि अजून कळलें नाहीं. उंदरावर प्रयोग यशस्वी होत आहेत, त्याप्रमाणेंच मनुष्यामध्यें देखील या हार्मोनचें प्रमाण आपल्याला लवकरच कळून येईल व त्याच्या एकमेकांवरील क्रियाप्रतिक्रियांचें स्वरूपसुद्धां आपल्याला कळेल. तें कळल्यावर एखाद्या हार्मोनची क्रिया थोपवून किंवा एखाद्याची जास्त वाढवून कांहीं काळपर्यंत संततिनियमन करणें शक्य होईल. मग तेथें साधनांची जरूरी पडणार नाहीं व वेळ देखील कमी जास्त करणें सोयीचें पडेल. पण असें होण्याला अजून संशोधन बरेंच झालें पाहिजे. हें संशोधन कोणत्या दिशेनें सुरू आहे हें सांगण्यासाठीं वरील वर्णन केलें आहे. या हार्मोनची जास्त माहिती पाहिजे असल्यास जिज्ञासूंनीं १६ डिसेंबर १९३२ च्या लॅन्सेटमधील १३७० पानावर आलेला लेख वाचावा.

## प्रकरण सतरावें

# ग्रहस्थिति

आतांपर्यंत संततिनियमनाचा सर्व दृष्टींनीं व सांगोपांग विचार करण्यांत आलाच आहे. नैतिक, आर्थिक, आरोग्यविषयक वगैरे सर्व दृष्टिकोन शेवटीं एकच गोष्ट सिद्ध करतात कीं, हल्लींच्या हलाखीच्या काळांत हिंदुस्थानाला संततिनियमनाची अत्यंत आवश्यकता आहे. ही आवश्यकता सिद्ध करण्याला जे मुद्दे मागील प्रकरणांतून पुढें माडण्यांत आले ते जरी वरून बरेचसे सारखे दिसले तरी त्यांचा निरनिराळ्या दृष्टींनीं विचार करतांना त्यांच्या निरनिराळ्या बाजू विचारांत घ्याव्या लागतात व त्यांचा पृथक्पणें विचार केला म्हणजे ते मुद्दे नवीन आहेत व त्यांची विषयाचा विचार करतांना जरूरी आहे असेंच वाचकांना दिसून येईल. संततिनियमनाचा विचार करणें म्हणजेच मनुष्य-जातीच्या सुखाचा व स्वास्थ्याचा विचार करणें होय. या दृष्टीनें यांमध्यें मनुष्याची कुटुंबसंस्था, त्याच्या मुलांची संख्या व त्या दृष्टीनें त्याची आर्थिक परिस्थिति, त्याचें व्यक्तिशः आरोग्य व देशाचें आरोग्य, संततीच्या वाढीमुळें होणारा परिणाम, असे किती तरी विषय उपस्थित होतात. त्यांचा सामग्र्यानें विचार करणें अर्थातच अशा लहान पुस्तकांत शक्य नाहीं. तरी पण

विषयांचा संततिनियमनापुरता संबंध येथें स्पष्ट करणें जरूर असल्यामुळें त्याबद्दलचे उल्लेख मागील प्रकरणांतून करण्यांत आले आहेत. प्रत्येक प्रकरणांत सामान्यतः एक एक दृष्टिकोन घेतला आहे व त्याच्या अनुषंगानें प्रत्येक मुद्याचें विवरण करण्यांत आलें आहे. असें विवरण करतांना जीं कोष्टकें देण्यांत आलीं तीं विशेषतः इतर देशाच्या परिस्थितीसंबंधींचींच आहेत. निरनिराळ्या प्रकरणांत निरनिराळीं कोष्टकें आलीं असल्यामुळें तीं विषयानुरोधानें व आधारभूत ग्रंथांतील विवेचनाच्या अनुरोधानें निरनिराळ्या देशांतील देण्यांत आलीं. परंतु त्या कोष्टकांतील माहिती आपल्या देशांतील माहितीशीं ताडून पाहणें केव्हांहि श्रेयस्करच आहे. किंबहुना तसें केल्याशिवाय या विषयाच्या विवेचनास पूर्तता येणार नाहीं. या दृष्टीनें ही माहिती येथें एकत्रित करण्याचा विचार आहे. या योगानें हिंदुस्थानांतील माहितीचीं कोष्टकें वाचकांस एका ठिकाणीं पहावयास मिळतील व ज्यांना तीं इतर कोष्टकांशीं ताडून पहावयाचीं असतील त्यांचीहि यामुळें सोयच होणार आहे. हीं कोष्टकें एका ठिकाणीं यावींत याच एका उद्देशानें तीं निरनिराळ्या प्रकरणांत न देतां येथें देण्यांत येत आहेत.

हिंदुस्थानांतील एक हजार जन्मांत बालमृत्यूचें प्रमाण

| | | | |
|---|---|---|---|
| १९११ | २०४·९८ | १९२६ | १८९·०४ |
| १९१६ | २०२·३४ | १९३० | १८०·८३ |
| १९२१ | १९७· ९ | | |

यावरून हें प्रमाण हलकें हलकें कसें कमी होत आहे हें दिसेल.

हेंच प्रमाण निरनिराळ्या शहरांत खालीलप्रमाणें आहे.

| | १९२५ | १९२६ | १९२७ | १९२८ | १९२९ | १९३० |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | ३५७ | २५५ | ३१६ | ३१४ | ३०१ | २९८ |
| कलकत्ता | ३२६ | ३७२ | ३४० | २७६ | २५९ | २६८ |
| मद्रास | २७९ | २८२ | २४० | २८९ | २५९ | २४६ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रंगून | ३५२ | ३२० | २९४ | ३४१ | ३२१ | २७८ |
| लखनौ | २६० | २८७ | २५६ | ३०१ | २६९ | ३२९ |
| लाहोर | २२२ | २४१ | २०१ | २०४ | २१४ | १८७ |
| नागपूर | २५८ | ३०२ | २५४ | २९९ | २९१ | २७० |
| दिल्ली | १८३ | २३८ | २०१ | २१० | २५९ | १९९ |

निरनिराळया महिन्यांत व निरनिराळया बायकांच्या बाबतींत बालमृत्यूचें हें प्रमाण कसें आहे हें खालील प्रमाणावरून दिसेल.

| एक वर्षाच्या आंतील बाल्मृत्यू | मोलमजुरी करणाऱ्या बायकांची | मोलमजुरी न करणाऱ्या बायकांची | सर्वसाधारण बायकांची |
|---|---|---|---|
| पहिल्या दिवशीं | ८ | ८ | ८ |
| १ ते ७ दिवस | २६ | ३८ | ३३ |
| ७ ते एक महिना | २६ | २३ | २४ |
| १ ते ३ महिने | २१ | २२ | २१ |
| ३ ते ६ महिने | २२ | २७ | २५ |
| ६ महिने ते १ वर्ष | ९९ | ८५ | ९१ |

काम न करणाऱ्या बायकांत हें प्रमाण जास्त आहे असें दिसून येईल.

बाळंतपणानें मृत्यु पावणाऱ्या स्त्रियांचें प्रमाण बरेंच मोठें असतें. त्यांतून ज्या वांचतात त्यांत अशक्त व रोगटच फार असतात. याविषयीं 'एज ऑफ कन्सेन्ट' कमिटीपुढें साक्ष देतांना असिस्टंट डायरेक्टर ऑफ हेल्थ यांनीं पुढील-प्रमाणें आपलें मत दिलें आहे. " There is vast number of invalids or physical wreeks among the survivals. " बाळंतपण मातांच्या मृत्यूला कसें जबाबदार आहे हें त्रावणकोर येथील सेन्सस कमिशनर पुढील उताऱ्यांत सांगतात, तें वाचकांनीं अवश्य लक्षांत ठेवावें. बाळंतपणाची सोय त्रावणकोरमध्यें इतर भागांपेक्षां जास्त आहे हेंहि याबरोबरच ध्यानांत धरावें, म्हणजे दुसरीकडे कशी स्थिति असेल याची योग्य कल्पना होईल.

" The highest female mortality, which exceeds that of males by 60 or 61 per 1,000 occurs in the age period 15-30, and must certainly be attributed to the early marriage of girls and the consequent premature maternity. Death of young mothers at child-birth is not an uncommon occurrence, but more than this, however, is the death of women in the later period of maturity, say, between the years of 20 and 30, brought on by the physical exhaustion, the nervous break-down and other ailments, which are the aftermath of premature child-bearing."

गर्भारपण व बालसंगोपन या दोन गोष्टी स्त्रियांच्या मृत्यूला कशा कारणीभूत होतात याचें दुसरें प्रत्यंतर देण्याची गरज नाहीं. बालविवाहामुळें अठरा वर्षांच्या वयांतच मुलींना सहा सात मुलें कशीं होतात हें 'एज ऑफ कन्सेन्ट' कमिटीपुढें एका साक्षीदारानें सांगितलें आहे. तो साक्षीदार म्हणतो:— " Cases are not uncommon in which girls bring forth six or seven children before they attain their eighteenth year. "

कमिटी आपल्या रिपोर्टांत म्हणते, बालवयांत मातृपद आलें म्हणजे स्त्रिया अशक्त व रोगी होतात. इतक्या कीं, त्या योगानें समाजाचा सांगाडाच बिघडून जातो. यांतून स्त्रीचा बचाव झालाच तर ती तिसाव्या वर्षी वृद्ध दिसूं लागते. " In the case of early maternity the evil is widespread...so extensive as to affect the whole framework of society. After going through the ordeal, if a woman survives to the age of 30 she is in many cases an old woman, almost a shadow of her former self."

यापेक्षां दुसरी कोणची हृदयद्रावक स्थिति असणार?

मागें इतर देशांतील जन्म-मृत्यूचीं प्रमाणें आलीं आहेत. हिंदुस्थानांत तीं कशीं आहेत हें खालील कोष्टकांवरून दिसेल.

| प्रांत | हजारीं जन्माचें प्रमाण | | | | हजारीं मृत्यूचें प्रमाण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १९२१ | | १९३० | | १९२१ | | १९३० | |
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| अजमीर मारवाड | १६·६ | १४·५ | १८·४ | १५·२ | २७·७ | २९·१ | २७·३ | २८·६ |
| आसाम | २९·४ | २९·८ | ३०·८ | ३१·९ | २६·९ | २५·९ | २१·४ | २१·३ |
| बंगाल | २८·१ | २७·९ | २५·१ | २५ | ३०·६ | २९·७ | २१ | २१·२ |
| बिहार ओरिसा | ३६ | ३३ | ३७ | ३५ | ३५ | ३१ | ३१ | २८ |
| मुंबई | ३२ | ३३ | ३७ | ३८ | २६ | २६ | २९ | ३० |
| ब्रह्मदेश | १५·३ | १४·५ | १३·४ | १२·७ | २२·२ | २०·७ | १९·१ | १८·६ |
| मध्यप्रांत आणि वऱ्हाड | १९·५ | १८·४ | २४·५ | २३·२ | ४६ | ४२ | ३९·६ | ३५·९ |
| कूर्ग | १४ | १३·४ | १२·३ | ११·३ | २८ | ५९·३ | २४·२ | २६·५ |
| दिल्ली | २१·७ | १९·९ | २०·७ | १९·२ | २८·८ | ३६·५ | २३ | ३०·४ |
| मद्रास | १३·८ | १३·२ | १८·७ | १७·७ | १०·२ | १० | ११·८ | ११·५ |
| वायव्येकडील प्रांत | २६·५ | २५·३ | २५·४ | २३·५ | ३०·३ | २९·८ | २१·२ | २०·५ |
| पंजाब | २२ | २० | २० | १८ | ३० | ३१ | २६ | २७ |
| संयुक्त प्रांत आग्रा | १८·१ | १६·३ | १८·६ | १६·६ | ४० | ३९·१ | २६ | २५·३ |
| बडोदा | २३·१ | २१·९ | २८·४ | २६·७ | १५·७ | १४·४ | २०·५ | २२·३ |
| कोचीन | १६·४ | १४·७ | १७·३ | १५·६ | १०·९ | ९·५ | ११·३ | १०·१ |
| ग्वाल्हेर | ५·८ | ४·७ | १२·९ | १३·८ | ५·५ | ४·९ | १४·८ | १२·७ |
| म्हैसूर | ८·७ | ८·२ | १०·३ | ९·७ | ७·६ | ७ | ७·९ | ७·६ |
| त्रावणकोर | १८·५ | १८·२ | २२·५ | २१·७ | १२·९ | १२·२ | १० | ९·६ |

निरनिराळ्या देशांचें हें प्रमाण कसें आहे हें लक्षांत यावें म्हणून कांहीं आशियांतील व कांहीं यूरोपमधील अशा निरनिराळ्या देशांचें कोष्टक पुढें दिलें आहे.

| देश | जन्माचें प्रमाण | मृत्यूचें प्रमाण | जिवंत राहण्याचें प्रमाण |
|---|---|---|---|
| पॅलेस्टिन | ५२·९ | २३·१ | २९·८ |
| इजिप्त | ४४·४ | २७·७ | १६·७ |
| जपान | ३२·४ | १८·२ | १४·२ |
| ऑस्ट्रेलिया | १९·९ | ८·६ | ११·३ |
| ब्रिटिश इंडिया | ३६·० | २६·९ | ९·१ |
| अमेरिका | १८·९ | ११·३ | ७·६ |
| ग्रेट ब्रिटन | १६·८ | ११·७ | ५·१ |
| फ्रान्स | १८·० | १६·३ | १·७ |

कुटुंबांत मुलांची संख्या काय असते, मुलें होतात किती व त्यांपैकीं जगतात किती यांची माहिती खालील कोष्टकावरून होईल. या कोष्टकांत बायकांचें लग्न ज्या वर्षी झालें असेल त्या मानानें प्रमाण काढलें आहे.

| बायकोचें लग्न ज्या वर्षी झालें तीं वर्षे | जिवंत जन्मलेलीं मुलें | जिवंत राहिलेलीं मुलें |
|---|---|---|
| सर्वसाधारण वय | ४·२ | २·९ |
| ०–१२ | ३·८ | २·९ |
| १३–१४ | ४·२ | २·९ |
| १५–१९ | ४·१ | २·९ |
| २०–२९ | ४·३ | ३·१ |
| ३० च्या वर | ५·१ | ३·६ |

यावरून जिवंत राहिलेल्या मुलांचें प्रमाण कसें कमी आहे हें लक्षांत येईल. हेंच प्रमाण निरनिराळ्या धंद्यांतील लोकांत कसें आहे हें आतां पाहूं.

| धंदा | प्रत्येक कुटुंबांतील मुलें | हजारांत जिवंत राहणारीं मुलें |
|---|---|---|
| शेतकरी ( शेतांत काम करणारे ) | ४·३ | ७०२ |
| शेताचे मालक | ४·४ | ६६६ |
| सुतार | ४·३ | ६७३ |
| लोहार | ३·८ | ८०३ |
| परीट | ३·९ | ६९८ |
| सैन्यांतील लोक | ३·६ | ७२९ |
| पोलीस | ३·७ | ६३० |
| डॉक्टर, वकील व शिक्षक | ३·७ | ७६० |
| धार्मिक ब्राह्मण, मुल्ला वगैरे | ५·२ | ६३१ |
| घरांतील नोकर | ३·८ | ६८७ |
| भिक्षेकरी व उडाणटप्पू | ४·३ | ७०९ |

उच्च धंद्याच्या व उच्च वर्णाच्या लोकांना मुलें थोड्या प्रमाणांत कशीं होतात हें यावरून दिसेल. हेंच प्रमाण जातवारीनें खालीलप्रमाणें आहे.

| जात | प्रत्येक कुटुंबांतील मुलें | हजारांत जिवंत राहणारीं मुलें |
|---|---|---|
| हिंदु | ४·३ | ६९७ |
| ब्राह्मण | ५·२ | ६४७ |
| कायस्थ | ६·३ | ६६२ |
| रजपूत | ४·८ | ६९१ |
| शीख | ४·१ | ७१४ |
| जैन | ४·२ | ६९७ |
| बुद्ध | ३·८ | ८१३ |
| पारशी | ४·६ | ७०७ |
| ज्यू | ३·८ | ७१६ |
| मुसलमान | ४·१ | ६९९ |
| ख्रिश्चन | ५·० | ७६८ |

निरनिराळ्या वर्षीं लग्न झालेल्या बायकांत किती बायका वांझ निघतात याचें प्रमाण खालील कोष्टकावरून दिसून येईल.

विवाहित काळ

| लग्नाचें वय | २ वर्षें |  | ५ ते ९ |  | १० ते १४ |  | १५ व पुढें |  |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
|  | मुलें होणाऱ्या | वांझ | मुलें होणाऱ्या | वांझ | मुलें होणाऱ्या | वांझ | मुलें होणाऱ्या | वांझ |
| ०–१२ | १५८८ | १५९२ | ५९३३ | ११८८ | ११७९२ | ६४५ | २६७६७ | ६०४ |
| १३–१४ | ६३८०३ | २८५९० | ९३७१८ | १६९८२ | ९१८७१ | १०१०६ | २०३१३५ | ९५०९ |
| १५–१९ | ८१६१० | ३४४२७ | ९२९०५ | १९४७३ | ८७८९० | १३५०९ | १६५४२१ | १२९१७ |
| २०–२९ | १५७५१ | ६०८५ | १९३५० | ३७११ | २०७१० | २७२७ | ४३०९८ | ३०२० |
| ३० व जास्त | १७३९ | ८०८ | १९०१ | ५७६ | २४३३ | ४४६ | ५७४० | ४६३ |

वांझ म्हणजे मुलें न होणाऱ्या असाच अर्थ येथें घेऊन चालणार नाहीं. कारण विधवा व बालविधवा यांचाहि यांत समावेश झाला आहे. पंधरा वर्षांच्या पुढें ज्यांचें लग्न झालें आहे, अशांमध्यें सहा टक्के बायका वांझ असतात, म्हणजे शंभरांत ९४ बायकांना मुलें होतात. धंद्यांप्रमाणें मुलांची संख्या घेतली तर सुखवस्तु व धार्मिक लोकांचें कुटुंब मोठें असतें. त्यांना ५ व ५·२ इतकीं मुलें असतात. बाकिच्यांचें हें प्रमाण ४·३ असें आहे, तर डॉक्टर, वकील व शिक्षक यांचें प्रमाण ३·७ असें आहे. पण या तिघांमध्यें जिवंत राहणाऱ्यांचें प्रमाण जास्त आहे. म्हणजे हजारांत ७६० मुलें जिवंत रहातात. यावरून सेन्सन कमिशनरनें केलेलें विधान मोठें गमतीचें आहे. तो म्हणतो कीं, डॉक्टर जरीं स्वतःला वांचवू शकला नाहीं तरी तो आपल्या मुलांना मात्र जपतो व वांचवितो !

हिंदुस्थानांत वेडे, आंधळे, मुके व बहिरे वगैरे कायमच्या शुद्धीकरणास योग्य असे किती लोक आहेत याची कल्पना येण्यासाठीं पुढील पानावरील कोष्टकें दिलीं आहेत. सुरुवातीला सर्व हिंदुस्थानांतील आंकडे व त्यांचें एक लाख लोकांशीं प्रमाण दिलें आहे.

हीं सर्व कोष्टकें मागील विवरणाबरोबर पाहिलीं म्हणजे हिंदुस्थानांतहि बालमृत्यु, एकंदर जन्मप्रमाण व मृत्युप्रमाण, वेडे व इतर निरुपयोगी लोक यांचें प्रमाण इतर देशांपेक्षांहि कांकणभर जास्तच कसें आहे हें वाचकांच्या प्रत्ययास येईल. विवरण वाचतांना मध्येंच अडथळा होऊं नये, म्हणून हीं हिंदुस्थानविषयक कोष्टकें जेथल्या तेथें न घालतां तीं येथें घातलीं आहेत. हिंदुस्थानांतील हे आंकडे खानेसुमारीच्या रिपोर्टांतील आहेत; आणि इतर देशांचे पूर्वीच्या प्रकरणांतून आलेले आंकडे डॉक्टरांनीं संततिनियमनाची आवश्यकता ठरविण्याची दृष्टि ठेवून घेतले आहेत. हा या दोन्ही आंकड्यांतील फरक लक्षांत ठेवणें जरूर आहे. पहिल्या आंकड्यांवरून संततिनियमनाची जरूरी प्रत्यक्षच सिद्ध होते. ती हिंदुस्थानविषयक आंकड्यांनीं थोडी पर्यायानें

| | १९३१ | १९२१ | १९११ | १९०१ | १८९१ | १८८१ |
|---|---|---|---|---|---|---|
| वेडे | १२०,३०४ | ८८,३०५ | ८१,००६ | ६६,२०५ | ७४,२७९ | ८१,१३२ |
| बहिरे, मुके | २३०,८९५ | १८९,६४४ | १९९,८९१ | १५१,१६८ | १९६,८६१ | १९७,२१५ |
| आंधळे | ६०१,३७० | ४७९,६३७ | ४४३,६५३ | ३५४,१०४ | ४५८,८६८ | ५२६,७४८ |
| महारोगी | १४७,९११ | १०२,५१३ | १०९,०९४ | ९७,३४० | १२६,२४४ | १३१,९६८ |
| एकंदर बेरीज | १,०९५,६७८ | ८६०,०९९ | ८३३,६४४ | ६७०,८१७ | ८५६,२५२ | ९३७,०६३ |

हेंच दर लाखाशीं प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

| | १९३१ | १९२१ | १९११ | १९०१ | १८९१ | १८८१ |
|---|---|---|---|---|---|---|
| वेडे | ३४ | २८ | २६ | २३ | २७ | ३५ |
| बहिरे, मुके | ६६ | ६० | ६४ | ५२ | ७५ | ८६ |
| आंधळे | १७२ | १५२ | १४२ | १२१ | १६७ | २२९ |
| महारोगी | ४२ | ३२ | ३५ | ३३ | ४६ | ५७ |
| एकंदर बेरीज | ३१४ | २७२ | २६७ | २२९ | ३१५ | ४०७ |

होईल एवढेंच. दोन्ही आंकडे संततिनियमनाच्या पुरस्कर्त्यांना साहाय्यक असेच आहेत. कांहीं कांहीं बाबतींत हिंदुस्थानांतील हे आंकडे संततिनियमनाच्या आवश्यकतेसंबंधांत अधिकच उपयोगी पडण्यासारखे आहेत हें चाणाक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच. संततिनियमनाविषयीं तटस्थ लोकहि कसे अनुकूल अभिप्राय देतात, हें ब्रिटिश मेडिकल कमिटीच्या रिपोर्टांतील पुढील उताऱ्यावरून दिसून येईल.

The Medical Committee of the British National Council of Public Morals unanimously declared, " No impediment should be placed in the way of those married couples who desire information as to contraceptives, when this is needed for medical reasons, or because of excessive child-bearing or poverty. "

ज्या विवाहित जोडप्यांना रोगग्रस्ततेमुळें, मनस्वी संतति होत असल्यामुळें किंवा दारिद्र्यामुळें संततिनियामक किंवा संततिप्रतिबंधक साधनांसंबंधानें माहिती पाहिजे असेल त्यांना ती मिळविण्यासंबंधांत कोणताहि अडथळा होऊं नये, अशा आशयाचा वरील अभिप्राय या कमिटीनें एकमतानें दिला आहे हेंहि लक्षांत ठेवणें जरूर आहे.

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ नारायण
दा

# सूचि


अमेरिकन मेडिकल असोसिएशन २४
अमेरिकेंतील रोगग्रस्तांचे आंकडे ६२
अमृतपिंड ३१
अरब १४
अॅल्बट डॉ. २३
अश्लील वाङ्मय ११३
अंगुलिप्रसर ३०
आद्यप्रणेता १६
आनुवंशिक संस्कार ६४
आफ्रिका १२
आम्लमय स्राव १२६
आर्थिक परिस्थिति १०१
आशिया-गर्भपातासंबंधीं कटाक्ष ७१
ऑक्झेलिक अॅसिड १००
ऑल-इंडिया मेडिकल कॉन्फरन्स २
ऑस्ट्रिया १४२
ऑस्ट्रेलिया ११
इटली-कापडाच्या टोप्यांची कल्पना १२
इनॉक्युलेशन १४
इंग्लंड-कायद्याची परिस्थिति ११७
उपायांचा तुलनात्मक विचार १३५
ऋतुस्नान ३३
एका वर्षाखालील मुलांची मृत्यु-संख्या ५४
एडवर्ड्स कुटुंब ६४
एलिस हॅवेलॉक १२
,, उतारा १०७
एलिस प्रसारावरील उतारा ८७
एल्डर्टन-गर्भपाताच्या औषधांचा अवाढव्य व्यापार ८५
ओडिना कॉलनी ४०
ओवेल २१
कनेक्टिकट संस्थानांत फेफरें येणाऱ्या व वेड्या लोकांना लग्नास मनाई ६५
कर्वे प्रो. र. धों. ४
कामसूत्रें १२
कॉर्पोरेशन, मुंबई १
कॉमस्टॉक अँथनी ११४
क्रॉप्से जस्टिस ११४
कॉक्स-उतारा १०८
कोकोवटर १२१
कोष्टकें १४५ ते १५४
क्रोमोझोन ३१
कंडम १५
खानेसुमारी १
गरीबांची स्थिति ४४
गर्भ २८
गर्भधारणा कशी होते? २७ ते ३३
गर्भाशय २८
गर्भाशयमुख २९
गर्भाशय रज्जू २९
ग्रंथिक उतारे १२
ग्रॅफेनबर्गची पद्धति १३८-१४१
गाइज् हॉस्पिटल-मुलांच्या जरूरीबद्दल चौकशी ४५
गाडगीळ डॉ. ३

गुरुओष्ठ २९
गोळ्या घरीं करण्याची पद्धति १२१
चिनोझॉल गोळ्या १२१
जपानची साम्राज्यतृष्णा वाढ-
ण्याचें कारण ७६
जर्नल ऑफ हायजीन १२२
जागतिक संततिनियमनाच्या
परिषदांचीं अधिवेशनें २४
जॉन्सेन जुलिया ६
जीवपेशी ३०
जेकोबी डॉ. २४
जोशी डॉ. ३
टाइम्स ३
ट्रॉल डॉ. २१
डच पेसरी १२५
,, फायदे १३१
डाना डॉ.—वेड्यांवर होणाऱ्या
खर्चाचा अंदाज ६
डॉकर्स् कॉंट्रॅप्स् १२०
डिकिन्सन-सुरक्षित कालासंबंधीं मत ३७
ड्रिस्डेल डॉ. २१
डयूमॉस टोपी १३१
डॉसन लॉर्ड ७
,, उतारा १०६
त्रिकोण स्थूलांत्र २८
त्रुटित संभोग ३८-४०
तेजाबयुक्त स्राव १२५
देशपांडे सौ. कुसुमावती ४६
दोन्ही बीजांचा योग व त्यांची वाढ ११
नवजीवन ५
नवीन पद्धतींचें संशोधन १३६-१४३
नॉफ डॉ.-उतारा ११०
निओ माल्थुशियन १६
निरनिराळ्या वर्गांत होणाऱ्या
मुलांचें प्रमाण ५४
न्यू जनरेशन, दि २६
नेदरलंड, कायद्याची परिस्थिति ११६
नेवास्का संस्थानांत उपदंश
झालेल्या लोकांस लग्नाची मनाई ६५
नैतिक दृष्ट्या विचार ७८ ते ८५
नोल्टन डॉ. २१
पतिपत्नीसंबंधांतील तीन गोष्टी ९३
पत्नोचें पुस्तक २३
पॅंगवॉर्न, रे. जेम्स १०३
पाणमोट १४
पाणिनि ११४
पॉड्विनमांतांच्या प्रकृती-
संबंधीं उतारा ८९
पांडुरोग ४३
पिचकारीनें मारावयाची
औषधें १२३-१२४
पिनल लॉज सेक्शन २११ ११३
पीपल विरुद्ध बर्न ११४
प्रिन्सिपल ऑफ पॉप्युलेशन १७
पुरुषबीज २८
पुरुषबीजांचें इंजेक्शन १४०-१४१
पुष्कळ मुलांच्या माता ८९
पेसरी वापरण्याचे नियम १३२
प्लेग १६
प्लेस फ्रॅन्सिस १८
पोटॅशम सायनाइड १००
प्रोरेस पेसरी १२५
प्रोरेसचें महत्त्व २९
फडके, प्रो. ना. सी. ४
फ्रान्स-कायद्याची परिस्थिति ११५-११६
फ्रूट्स ऑफ फिलॉसॉफी २१

फेंस उत्पन्न करणाऱ्या औषधांच्या गोळ्या १२१–१२२
फ्रेंच लेटर्स १३४
बडोदें २
बर्थ कंट्रोल ८
,, रिव्ह्यू २५
,, हेरल्ड २६
,, न्यूज २६
बर्न मिसेस २५
बस्ति २९
ब्रह्मचर्य ३५-३६
ब्रॅडलॉ १७
बायबलमधील उतारा ८२
बालमृत्यूचें प्रमाण ७३
बाळंतरोग ४३
बार, सर जेम्स २४
ब्राउन सेक्वर्ड ३२
बॉल्वर्थ केंद्र—संततिनियमनाचे आंकडे ५०
ब्रिग्ज्—उतारा ११०
ब्रिटिश मेडिकल असोसिएशन २४
बुलडॉग वर्तमानपत्र २०
बेकर यांचें संशोधन १२१
बेहेरे, प्रो. ना. के. ४
बेनेट—उतारा ११०
बेडेकर डॉ. ३
बेझंट, ॲनि १७
भयंकर गुन्हा ६०
मद्रास २
मर्फे—जपानीबाईचें उदाहरण १३९
मॅककार्डी, जस्टिस—उतारा १११
माल्थस ६
माल्थुशियन, दि २३
मार्कोव्हिटस्—क्ष किरणाविषयीं उपाय १३७
मॉरल फिजिऑलॉजी २८
म्हाताऱ्या बायकांचें तत्त्वज्ञान ८०
मिका ११
मिल्, जॉन् स्टुअर्ट २२
मूत्राशय २८
मेन्सिगा, डॉ.—रबरी टोप्यांचे संशोधक २३
मेक्सिको—संततिनियमनाची परिस्थिति ११६
म्हैसूर २
योनिमार्ग २९
रजःपिंड ३०
रजःपिंड व वृषण यांचीं इतर कार्यें ३१
रजःपिंडांत होणाऱ्या घडामोडी ३१
रबरी टोप्या १२५–१३३
रशिया—कायद्याची परिस्थिति ११७
रजोवाहक २९
रसेल—बर्ट्रँड ७
राउट—बाळंतपणांतील मृत्यूचें प्रमाण ४९
राजवाडे, आहिताग्नि ७
रूथ-त्रुटित संभोगाचे तोटे ८८
रेगॉड व नोगीर-क्ष किरणांचें संशोधन १३६
रेंडेल—वाइफ्स फ्रेंड गोळ्या १२०
रोगग्रस्तांचा संततिप्रतिबंध ६०–६९
लघुओष्ठ २९
लॅंबटस् लॅंब—बटस् १२०
वाइज् पेरेंटहुड-त्रुटित संभोगाचे तोटे ३८
विल्सन, प्रेसिडेंट २५
विवाहित स्त्रीच वेश्या ९४
विस्तृत द्विपत्रबंध २९

वुमन रेबल, दि २५
वेडे होण्याचीं कारणें ६३
वेलफील्ड—जननाक्षमतेच्या
शस्त्रक्रियेवर मत ६७
वंध्यात्वाचीं कारणें ५०
वंशवृद्धीसाठीं दत्तक ८१
श्वानं युवानं मघवानं ११४
समाजशास्त्राचीं मूलतत्त्वें २१
सरोजिनी नायडू २५
साध्या औषधांच्या गोळ्या १२०-१२१
स्कार्लिंक, डॉ. मेरी उणेपणाचें भडक
चित्र ९२
स्कॉटलंडमधील एक चाल ११
सिडने, बेझंटवर खटला ११७
स्वीडन, कायद्याची परिस्थिति ११७
स्त्रीबीज २८
सुल्तानी बनात १५
सुरक्षित काल ३६–३८
सुंता १२
सेक्शुअल फिजिऑलॉजी २१
स्पेटॉन गोळ्या १२२
स्टेनॉक, जननाक्षमतेच्या शस्त्रक्रियेचा
जनक ६८
सैतानी पुस्तक १९
स्टोप्स, मेरी डॉ. १२
संजीवनी ४६
सँगर, मार्गारेट २५
संततिनियमन अनैसर्गिक ७९
,, केल्यानें अनीति व न
केल्यानें अनीति यांतील
फरक ८५
,, हत्या होत नाहीं ७८
,, सामग्रीसाठीं डॉक्टराच्या
सर्टिफिकेटाची आवश्यकता९५
,, सामुग्री केव्हां वापरतां
येत नाहीं ५१
स्पंज १२४-१२५
हटन १
हार्मोनचें कार्य १४१–१४३
हायमेन १३४
व्हिट्मन गव्हर्नर २५
हिंदु १४
हुकूमचंद नगरशेट ३२
हेअर नॉर्मन उतारा ११९
हेलवुड पार्लमेंटांत प्रश्न ११८
हेसियॉड ११
व्हेरोनॉफ ३२
हंगेरी कायद्याची परिस्थिति ११६
लोकसंख्या व संततिनियमन ७०–७७
क्ष किरणें १३७–१३८
क्षय ४३

# प्रतिशब्द व मूळ इंग्रजी शब्द

अमृतपिंड–Ductless gland
अस्तर–Mucous membrane
आर्तवस्राव–Menstrual flow
ऋतुस्नान–Menstruation
अंगुलिप्रसर–Fimbria
अंडकोश– Scrotum
कायमचें शुद्धीकरण–Sterilization
काळपुळी–Cancer
क्रोमोझोन – ज्याच्यांतून आनुवंशिक संस्काराचे विशेष जीवपेशींत जातात तो भाग
गर्भ–Embriyo
गर्भाशय–Uterus
गर्भाशयमुख–Cervix
गर्भाशय–रज्जु–Round Ligament
गर्भपात–Abortion
गुरु ओष्ठ–Labia Majora
जनकत्वाची जबाबदारी–Wise parenthood
जीवपेशी–Oocyte
त्रुटित संभोग–Coitus Interruptus
त्रिकोण स्थूलांत्र–Rectum
पांडुरोग–Anæmia
पुरुषबीज–Spermatozoon
फुगा–Graffian follicle

फेफरें–Epilepsy
बस्ति–Pelvis
बर्हिर्गोल–Convex
बालहत्या–Infanticide
भ्रूणहत्या–Abortion
मिका–जननेंद्रियाच्या खालील बाजूस कापून सौंदर्यांत भर घालणें (एक रानटी चाल)
मूत्राशय–Bladder
योनिमार्ग–Vagina
रजःपिंड–Ovary
रजःपिंड द्विपत्र–Mesovarium
रजोवाहक–Fallopian tube
लघुओष्ठ–Labia Minora
विस्तृत द्विपत्रबंध–Broad Ligament
वेडगळ–Feebleminded
वैवाहिक प्रेम–'Married love'
वृषण–Testes
वृषणरज्जु–Spermatic cord
शस्त्रकर्म–Operation
सुरक्षित काल–Safe Period
स्त्रीबीज–Ovum (अनेकवचन Ova)
संततिकार्यास अक्षम करणें–Sterilization

दा. ८७८८

# आधारभूत ग्रंथ

सारेच आधारभूत ग्रंथ इंग्लिशमध्यें असल्यामुळें ते इंग्रजीमध्येंच दिलें आहेत.


1. *Contraception* ( 1927 )
   by Marie Stopes
2. *Birth control* ( 1925 ), Selected Articles
   by Julia Johnsen
3. *Parenthood* ( 1933 )
4. *Population* ( 1925 )
   by A. M. Carr-Launders
5. *The Ethics of Birth-Control* ( 1925 )
   ( Being the report of special Committee appointed by the National Council of Public Morals in connection with the investigations of the National Birth-Rate Commission)
6. *Birth Control and The State* ( 1926 )
   by Dr. C. P. Blacker
7. *Hymen or The Future of Marriage* ( 1928 )
   by Norman Haire
8. *Psychology of Sex*, A Manual for Students ( 1933 )
   by Havelock Ellis
9. *Aspects of Birth Control*
   by Dr. Adolphus Knopf, M.D.
10. *Population and Birth Control*
    by Col. G. T. K. Maurice
11. *Census of India*, ( 1933 )
    by J. H. Hutton

## याच लेखकाचीं इतर पुस्तकें

**प्रकाशित**

१ काव्यसुधा

२ आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांचें चरित्र

**संकल्पित**

३ वैद्यकशास्त्रांतील संशोधक

४ शास्त्रीयलेखसंग्रह